**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

<u>**औचित्याच्या मुद्यासंबंधी**</u>

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. केळकर समितीचा अहवाल आज सभागृहासमोर ठेवला तर या अधिवेशनामध्ये त्यावर चर्चा होऊ शकेल. विदर्भातील सिंचनाच्या दृष्टीने या अहवालावर चर्चा होणे आवश्यक आहे.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासानंतर औचित्याचे मुद्दे घेण्यात येतात. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना प्रश्नोत्तराच्या तासानंतर औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मी देईन.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईण्ट ऑफ प्रोसिजर</u>**

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ प्रोसिजर आहे. या सभागृहाच्या नियम आणि प्रथेप्रमाणे नियम स्थगित करुन महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी नियम 289 अन्वये किंवा नियम 93 अन्वये प्रस्तावाची सूचना आम्ही देत असतो. सन्माननीय सदस्यांना औचित्याच्या मुद्यावर बोलण्याचा अधिकार आहे. परंतु आम्ही जी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यासंबंधी आपण आधी निर्णय द्यावा.

**उप सभापती** : औचित्याच्या मुद्यासंबंधी मी निर्णय दिलेला आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सूचनेतील विषय हा नियम 289चा कसा होतो हे त्यांनी थोडक्यात सांगावे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, दोन आठवड्याच्या अधिवेशनामध्ये दुष्काळामध्ये होरपळत असलेल्या संपूर्ण महाराष्ट्रासंबंधी चर्चा झाली. या चर्चेला सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी महाराष्ट्रातील एकूणच परिस्थिती आणि मोठ्या प्रमाणावर वाढत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या यावर तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्यासंबंधी विवेचन केले.

श्री. दिवाकर रावते : लोकसभेमध्ये नियम स्थगित करुन महत्वाच्या विषयावर चर्चा घेण्यासंबंधीचे विषय हे प्रश्नोत्तराच्या तासानंतर घेण्यात येतात. लोकसभेप्रमाणे आपण देखील नियम 289 किंवा नियम 93 अन्वयेचे विषय हे प्रश्नोत्तराच्या तासानंतर घेण्याचे ठरविलेले आहे. माननीय सभापतींनी घेतलेला निर्णय बदलला असेल तर तसे सांगावे, नसेल तर त्याप्रमाणे कामकाज घ्यावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना थोडक्यात आपले म्हणणे मांडण्याची संधी मी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. सुनील तटकरे : शासनाच्या वतीने उत्तर देत असताना सभागृहाच्या नेत्यांनी असे सांगितले की, शेतकऱ्यांनी सावकाराचे घेतलेले 350 कोटी रुपयाचे कर्ज माफ करुन ते कर्ज सावकाराला देण्यात येईल. या संदर्भात आम्ही आमच्या भावना व्यक्त करताना सांगितले होते की, परवानाधारक सावकार असला तरी त्यांना नियमानुसार शेतकऱ्याला शेतीसाठी पीक कर्ज देता येत नाही. असे असताना 350 कोटी रुपयाचे कर्ज सावकाराला परस्पर दिले जाणार आहे. नियमाप्रमाणे सावकार शेतकऱ्याला शेतीसाठी कर्ज देऊ शकत नाही. मग शासन कर्ज माफ करणार आहे ते कोणते ? सावकार हा बँकेच्या व्याजापेक्षा किती तरी अधिक पटीने व्याज आकारणी करीत असतो. सावकाराच्या चक्रवाढ व्याजाची रक्कम किती,सरळ व्याजाची रक्कम किती, मुद्दल किती यासंबंधीची माहिती मिळणे आवश्यक आहे. 350 कोटी रुपये कर्ज माफ करताना त्याचे होणारे

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

दूरगामी परिणाम, आत्महत्या रोखण्यासंबंधी करावयाच्या उपाययोजना यासंबंधी तातडीने चर्चा होणे आवश्यक असल्याने प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांची सूचना मी नाकारलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापतींनी घेतलेला निर्णय कधी बदलला ? अशा प्रकारे निर्णय बदलण्याकरिता आम्ही देखील तुमच्याकडे निश्चितपणे आग्रह धरु.

**उप सभापती** : मी आता प्रश्नोत्तराच्या तासाकडे वळतो.

--

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी**

**केलेल्या बेकायदेशीर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत**

(१) * **५०१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी**, **श्री.अमरसिंह पंडित**, **श्री.**सतीश **चव्हाण** : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी एन.डी.पठाण यांनी अधिकार नसतांना त्यांनी वक्फ मालमत्ता संदर्भात घेतलेल्या निर्णयाची तपासणी करुन तरतुदीचे भंग करणाऱ्या व बेकायदेशीर प्रकरणाच्या चौकशीसाठी शासनाने श्री.कृष्णा भोगे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. पठाण यांच्या नियमबाहय व तरतुदीचा भंग करुन करण्यात आलेल्या प्रकरणांची चौकशी श्री. भोगे समितीने पूर्ण केली आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच दोषी अधिकारी व नियमबाहय रित्या हस्तांतरण झालेल्या मालमत्तांच्या प्रकरणी शासन स्तरावरुन कोणती कारवाई करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, संबंधित चौकशी अधिकाऱ्यांकडून चौकशी प्रकरणास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) श्री.भोगे, चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालाची शासन स्तरावर तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी : तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी एन.डी.पठाण याने वक्फ मालमत्तेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केलेला आहे. त्याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत ऑक्टोबर 2013 मध्ये चौकशी करण्यात आली. श्री. भोगे या चौकशी अधिकाऱ्याने सादर केलेल्या चौकशी अहवालाची शासनस्तरावर तपासणी सुरु आहे असे छापील उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. मागील अधिवेशनातील याच विषयाच्या संदर्भातील तारांकित प्रश्न क्रमांक 45431ला अशाच प्रकारे उत्तर देण्यात आले होते. वक्फ बोर्डाच्या मालमत्तेत गैरव्यवहार करणाऱ्या दोषी व्यक्तींची नावे काय आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? वक्फ बोर्डाचे

..6..

सदस्य आणि अध्यक्ष यांचा कारभार मनमानी होता. या सर्व बाबीची चौकशी करुन दोषीवर कारवाई करण्यात येणार आहे काय, तसेच वक्फ बोर्डाच्या सदस्यांची आणि अध्यक्षांची लवकरात लवकर नियुक्त करण्यात येईल काय ?

...नंतर श्री. भोगले..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, श्री.एन.डी.पठाण हे प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत होते, त्यांची बोर्डाचे एम.डी.म्हणून नियुक्ती केली होती. ते अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी असल्यामुळे त्यांची त्या कालखंडात नियुक्ती केली. नियुक्तीच्या काळात त्यांनी अनेक अनियमितता केल्या असा त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला होता. मधल्या काळात वयाची 58 वर्षे पूर्ण झाल्याने ते निवृत्त झाले. तरी देखील राज्य सरकारने त्यांना दोन वर्षे मुदतवाढ दिली. मुदतवाढ दिल्यानंतर अँटी करप्शन विभागाच्या रेडमध्ये ते पकडले गेले. त्यानंतर त्यांना निवृत्त करण्यात आले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक अनियमितता केल्याच्या तक्रारी महाराष्ट्रभरातून आल्यामुळे त्यांच्या कार्यकाळातील सर्व निर्णयांची चौकशी करण्यासाठी श्री.भोगे यांची नियुक्ती केली गेली. त्यांनी घेतलेले निर्णय नियमाला धरून आहेत की नाही या संदर्भात अहवाल सादर करण्याच्या सूचना श्री.भोगे यांना देण्यात आल्या. त्यानुसार श्री.भोगे यांनी आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला. त्या अहवालाची छाननी सुरु आहे.

प्राथमिक स्वरूपात त्यांनी ज्या अनियमितता केल्या आहेत त्यावर बोर्डाची प्रॉपर्टी नियमबाह्य लिजवर देणे, बोर्डाची जमीन नियमबाह्य एन.ए.करण्यासाठी एनओसी देणे, बोर्डाच्या प्रॉपर्टीवर नियमबाह्य बांधकामास परवानगी देणे, ज्या प्रयोजनासाठी जमीन वापरण्यात येते त्यासाठी न वापरता अन्य प्रयोजनासाठी वापरण्यास परवानगी देणे, मशीद व कबरस्तानच्या कुंपण दुरुस्तीसाठी परवानगी न घेता, नियमामध्ये न बसविता आदेश पारित करणे अशा स्वरूपाचे निष्कर्ष भोगे समितीच्या अहवालात आढळून आले आहेत. हा विषय व्यापक स्वरूपाचा असल्यामुळे कोणत्या ठिकाणी आदेश दिले, कोणत्या ठिकाणी चुका झाल्या आहेत याची छाननी सुरु आहे. छाननी केल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. त्यांच्यावर एक कारवाई झाली आहे. परंतु आणखी तथ्य आढळले तर फौजदारी कारवाई करावयाची का या संदर्भात राज्य सरकार विचार करीत आहे. नियमात बसत असेल तर कायद्याच्या चौकटीनुसार क्रिमिनिल ॲक्शन किंवा फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता असेल तर ती करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, श्री.भोगे यांच्या चौकशी समितीच्या कार्यकक्षा काय होत्या? अहवालाची छाननी सुरु आहे, परंतु अहवालातील प्राथमिक स्वरूपातील निष्कर्ष सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले आहेत. श्री.पठाण यांच्या व्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांविरुध्द ठपका ठेवण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.501..........

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अशा स्वरूपाचा ठपका अन्य लोकांवर नाही. श्री.पठाण यांच्यावर वक्फ बोर्डाच्या प्रॉपर्टीच्या संदर्भात अनियमितता केल्याचा प्रश्न आहे. सध्या वक्फ बोर्डाचे सीईओ म्हणून ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटची नियुक्ती करण्यात आली आहे व ते काम करीत आहेत. पूर्णपणे बॉडी बरखास्त करून नवीन बॉडी नेमावयाची आहे. कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करीत आहोत. वक्फ बोर्डाची नियुक्ती घटनेनुसार केलेली असते. आता जी पदे रिक्त आहेत ती भरणे व नवीन चेअरमन नियुक्त करणे या संदर्भात विधी व न्याय विभागाकडे नस्ती पाठविण्यात आली होती. नुकताच विधी व न्याय विभागाने अभिप्राय दिला आहे की, राज्य सरकारला अधिकार आहे. मोठया प्रमाणात तक्रारी होत्या, यापूर्वी सुध्दा दोन-तीन अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला होता. म्हणून हायकोर्टाकडून न्यायाधीश नियुक्त करण्यात यावा असे पत्र दिल्यानंतर हायकोर्टाने न्यायाधीशाची शिफारस केली आहे. ती शिफारस परत पाठविता येईल का या संदर्भात विधी व न्याय विभागाने ती शिफारस परत पाठविता येईल असे सांगितले. नव्याने नियुक्ती करता येईल, त्याला मान्यता दिली आहे. लवकरात लवकर बॉडीची पुनर्रचना करून नवीन बॉडी नियुक्त करण्यात येईल.

ॲड. हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, वक्फ बोर्डाची निर्मिती लवकरच करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. ती लवकरच होईल अशी अपेक्षा आहे. त्याचबरोबर वक्फ बोर्डाच्या मालकीच्या मालमत्ता संपूर्ण महाराष्ट्रात असून चौकशी केली असता जिल्हाधिकाऱ्यांकडून असे सांगितले जाते की, आमच्याकडे काही माहिती नाही. म्हणून मी शासनाला सूचना करु इच्छिते की, प्रत्येक जिल्हयात असलेल्या वक्फ बोर्डाच्या मालमत्तेची माहिती संकलित केली जाईल काय?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या संदर्भातील माहिती जमा झालेली आहे. प्रॉपर्टी कुठे कुठे आहे त्याची यादी तयार झाली आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे वक्फ बोर्डावर चेअरमन नेमलेला नाही. वक्फ बोर्डावर मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात आला आहे, जो ज्युडिशियल आहे. चेअरमनची नियुक्ती तीन महिन्याच्या आत करावयाची आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनींचे एकत्रीकरण करणे, त्यावर असलेली अतिक्रमणे काढून मालमत्तेच्या नोंदी घेणे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असलेले दस्तऐवज अद्यावत करणे यासाठी राज्यभरात विभागवार, ज्या ज्या विभागात अधिक मालमत्ता आहे त्या ठिकाणी एसडीओ या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. प्रत्येक विभागाला

...3...



एक उप जिल्हाधिकारी देऊन त्यांना अधिकार देण्यात येतील. त्यांची समिती असेल. त्या समितीमध्ये तहसीलदार असतील. त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन प्रॉपर्टीवरील अतिक्रमणे काढण्यसाठी टीम कार्यरत राहील. सर्व प्रॉपर्टीचे संगणकीकरण करणे, नियमावली तयार करण्यात येऊन त्यासाठी लागणारा अतिरिक्त कर्मचारी वर्ग शासनाकडे मागण्यात येईल. मोठया प्रमाणात कर्मचारी वर्ग लागणार आहे. सरकारचा अतिरिक्त कर्मचारी वर्ग नेमण्यात येईल. प्रॉपर्टीची विल्हेवाट लावत असताना जे उत्पन्न येईल त्या उत्पन्नामधून प्रांत व इतर अधिकारी डेप्युटेशनवर घेतले जातील त्याचा खर्च वक्फ बोर्ड करेल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सुदैवाने अल्पसंख्याक विकास व महसूल ही दोन्ही खाती सभागृहाच्या नेत्यांकडे असल्यामुळे या विषयाला लवकर न्याय मिळेल अशी आमची अपेक्षा आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण हे कोणत्या दर्जाचे अधिकारी होते, या पदासाठी कोणत्या दर्जाचे अधिकारी नियुक्त होणे आवश्यक होते? श्री.भोगे यांची चौकशी समिती नेमण्यात आली. श्री.भोगे हे औरंगाबादचे विभागीय आयुक्त असताना श्री.पठाण हे वक्फ बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते का? श्री.भोगे विभागीय आयुक्त असताना श्री.पठाण यांच्याबद्दलच्या तक्रारी त्यांच्याकडे केल्या गेल्या नव्हत्या का, त्या संदर्भात पाठपुरावा झाला नव्हता का, श्री.भोगे यांची समिती नेमली त्यावेळी ते विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत होते की निवृत्त झाल्यानंतर त्यांची समिती नेमली? त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या अखत्यारीत असलेल्या अधिकाऱ्याने अनियमितता केली असेल तर ती चौकशी त्यांनी का केली नाही या संदर्भात विचारणा करण्यात आली आहे का?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, श्री.पठाण हे अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी होते. ज्यावेळी श्री.भोगे यांची समिती नेमली गेली त्यावेळी ते विभागीय आयुक्त म्हणून काम करीत नव्हते.

नंतर सी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 501 ..............

श्री. रामनाथ मोते : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात आताच सांगितले की, तसेच उत्तरात त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, श्री. एन.डी. पठाण यांना निवृत्त झाल्यानंतर दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचे कारण काय, तसेच त्यांनी कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार केला अथवा आक्षेपार्ह निर्णय घेतले असतील अथवा मालाफाईड स्वरुपाची अनियमितता केली असेल तर त्यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाची कारवाई करणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, मी मघाशीच सांगितले की, भोगे समितीच्या अहवालाची तपासणी करण्यात येत असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने टाकलेल्या धाडीत श्री. पठाण हे रंगे हाथ पकडले गेले होते ते प्रकरण कोर्टात प्रलंबित असून त्यांच्याविरुध्द कारवाई झाली आहे. दुसरे म्हणजे समितीच्या अहवालानुसार अनियमितता किंवा अप्रत्यक्षरित्या मदत करण्यात आली असल्याचे निष्पन्न झाले असेल तर त्याचीही छाननी करण्यात येईल.

------------

.............2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्याना हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२) * १०६ श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले,** ॲड. **जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत देण्यात येणारी नुकसान भरपाई सात दिवसात देण्याचा निर्णय माहे, ऑगस्ट,२०१४ च्या पहिल्या सप्ताहात घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार संबंधितांना नुकसान भरपाई देण्यांत आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व नुकसान भरपाई केव्हा पर्यंत देणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) **प्रश्न** उद्‌भवत **नाही.**

श्री. सुनील तटकरे : महोदय, हवामानावर आधारित फळ बाग योजनेअंतर्गत झालेल्या नुकसानीची भरपाई फळ पीक विमा योजनेच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी देण्यात आली असून अशाच प्रकारे हवामानावर आधारित फळ पीक योजना राज्यभर सुरु करणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पिंगुळी या महसुली मंडळातील 121 शेतकऱ्यांना 66 लाख 21 हजाराची मदत या योजनेअंतर्गत देण्यात आली तसेच कुडाळ महसुली मंडळातील शेतकऱ्यांना 13 हजार 800 रुपये मिळून एकूण रु. 75 लाख 52 हजार 800 एवढी मदत कृषी विमा कंपनीकडून देण्यात आली. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानुसार अशा प्रकारची हवामानावर आधारित फळ पीक विमा योजना संपूर्ण राज्यभरात लागूच आहे. त्यानुसार ज्या ज्या ठिकाणी कर्जदार शेतकरी अशा प्रकारच्या फळ पीक योजनेसाठी कर्ज घेईल त्या त्या जिल्हा बँकांच्या माध्यमातून कर्ज देत असताना फळ पीक विमा योजनेचे हप्ते कापून घेण्याचे अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी आवश्यक असेल आणि शेतकऱ्यांनी मागणी केली अशा ठिकाणी ही योजना लागू करता येईल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, हवामानावर आधारित फळ पीक विमा योजनेअंतर्गत राज्यात एकूण किती जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला, तसेच राज्यात सर्वत्र अशी योजना लागू केली असेल तर इतर किती जिल्ह्यांना या योजनेच्या माध्यमातून फायदा झालेला आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.106..............

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, हवामानावर आधारित फळ पिकांसाठी विम्याचे संरक्षण करण्याची योजना एक पथदर्शी प्रकल्पाच्या माध्यमातून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे या चारच जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली होती.

श्री. सुनील तटकरे : महोदय, राज्यभरात शेतकऱ्यांनी मागणी केल्यानुसार ही योजना लागू केली जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. पण त्यांनी पथदर्शी प्रकल्प म्हणून ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या चारच जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू असल्याचे म्हटले आहे. म्हणजेच मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर हे ठराविक जिल्ह्यांपुरतेच मर्यादित असून मी सुरुवातीलाच विचारले की, संपूर्ण राज्यात ही योजना लागू करणार काय, तसेच सबंध राज्यात ही योजना लागू करण्याचा निर्णय शासन घेणार काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, मी दिलेले उत्तर आंबा या फळाशी संबंधित होते. कारण सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि ठाणे या चार जिल्ह्यांमध्ये आंबा या फळ पिकाचे उत्पादन जास्त प्रमाणात होते. त्यासाठीच हे जिल्हे पथदर्शक प्रकल्प म्हणून घेण्यात आले. संपूर्ण राज्यभरात आजही त्या त्या भागातील फळ पिकांच्या बाबतीत शेतकऱ्यांनी मागणी केल्यानुसार ही योजना लागूच आहे. जळगांव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केळी या पिकासाठी मागणी केल्यानुसार त्यांना केळीसाठी लागू आहे. नाशिक भागात द्राक्षे आणि डाळिंब, पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा डाळिंब आणि द्राक्षे या फळ पिकासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. विदर्भात आता यावर्षी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार संत्रा या फळ पिकासाठी ही योजना लागू करण्यात येईल.

-----------

.............4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दारुबंदी असलेल्या वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात अवैधरित्या होत असलेली दारु विक्री**

**(३)** * **१४२५ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी करण्याची घोषणा मा.अर्थमंत्री यांनी दिनांक ४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी असून ती फक्त कागदावरच आहे, विदर्भात दारु बंदी सुरु केली तरी अवैध मार्गाने दारु विक्री चालू असून चंद्रपूर जिल्ह्यात वर्धा पॅटर्नने दारुविक्री सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दारुबंदी कायमची हद्दपार करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मा.मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांनी दि.३ नोव्हेंबर, २०१४ रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदीबाबतचा निर्णय घेण्याची घोषणा केल्याचे वृत्त वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी करण्याची घोषणा माननीय अर्थमंत्र्यांनी दि. 4 नोव्हेंबर, 2014 रोजी केली हे खरे आहे काय याचे उत्तर मंत्री महोदयांनी "दि. 3 नोव्हेंबर, 2014 रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना चंद्रपूर जिल्ह्याबाबतची घोषणा केल्याचे वृत्तपत्रात प्रसिध्द झाले" असे उत्तर दिले आहे. वास्तविक मंत्री महोदय हे प्रशासनातीलच एक घटक असून एखाद्या मंत्र्यांनी असे जाहीर केले असेल तर हा शासनाचाच निर्णय का होऊ शकत नाही आणि त्यासंदर्भात पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात शासनाने तसे स्पष्ट का केले नाही की, हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, तसे म्हटले असते तर संयुक्तिक झाले असते. पण मंत्री महोदयांनी अशा प्रकारची घोषणा केली ते वृत्तपत्रात आले असे म्हटले आहे, याचा खुलासा झाला पाहिजे. दुसरा प्रश्न म्हणजे दारुबंदीच्या संदर्भात चंद्रपूर जिल्ह्याला जे निकष लावण्यात आले असतील अशाच प्रकारचे निकष संपूर्ण राज्यात अथवा जिल्ह्या-जिल्ह्यात लागू करुन सर्वत्र दारुबंदी करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1425............

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्नच मुळात विचारला आहे की, दि. 4 नोव्हेंबर, 2014 रोजी राज्याच्या अर्थमंत्र्यांनी दारुबंदीची घोषणा केली हे खरे आहे काय, वास्तविक ही बातमी 5 नोव्हेंबर, 2014 रोजी वर्तमानपत्रात आल्यानंतर लक्षात आली. मंत्रिमहोदयांनी तशी चर्चा मंत्रिमंडळाबरोबर केली नव्हती म्हणून वर्तमानपत्रात उल्लेख आल्याचे उत्तरात म्हटले आहे. तसेच संपूर्ण राज्यात अशा प्रकारे दारुबंदी करण्याचा शासन निर्णय घेणार काय असा प्रश्न विचारला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे प्रस्ताव त्या त्या भागातील नागरिकांकडून अथवा एन.जी.ओ. कडून शासनाला प्राप्त झाले .......अडथळा.......चंद्रपूर जिल्ह्याला अद्याप कोणतेही निकष लावलेले नाहीत, मुळात दारुबंदी केलीच नसल्याने निकष लावण्याचा प्रश्न येत नाही. यानंतर चंद्रपूर जिल्ह्याला जसे निकष लावले जातील आणि त्यानंतर सभागृहात इतर ठिकाणांबाबतचा प्रश्न विचारण्यात आला तर त्यावर उत्तर देता येईल.

श्री. भाई जगताप : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देताना "चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे" असे म्हटले आहे. वास्तविक हा प्रश्न विचारण्यामागचा गाभा असा आहे की, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात सुरु असलेले अवैध दारुचे थैमान बंद करण्यासाठी, त्याला आवर घालण्यासाठी असा खरा या प्रश्नाचा मतितार्थ आहे. म्हणून दोन गोष्टींचा शासनाकडून खुलासा होणे आवश्यक आहे. तो म्हणजे या तीन जिल्ह्यात अवैध मार्गाने दारु विक्री होत आहे, हे खरे आहे काय, असल्यास त्यासंबंधात कोणत्या उपाययोजना करणार, त्याचप्रमाणे जिल्ह्यात वर्धा पॅटर्नप्रमाणे दारुची विक्री सुरु असल्याचाही उल्लेख केला तो वर्धा पॅटर्न कोणता आहे ?

यानंतर श्री. भोगले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1425...

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्रश्नामधील गांभीर्य जात आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, गडचिरोली, वर्धा येथे अवैध दारूची विक्री होत असून तसा उल्लेख लेखी उत्तरामध्ये आलेला आहे. सन्माननीय सदस्यांचा प्रश्नाचा ओघ असा होता की, अवैध दारू विक्री कशी काय बंद करणार आहात व त्यासाठी कोणती उपाययोजना करणार आहात तसेच वर्धा पॅकेज संबंधी सभागृहाला माहिती द्यावी.

**उप सभापती** : आपण कोणीच घेत नसताना प्रश्न कशाला विचारता ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांच्याकडे बोट दाखवून बोलत आहेत. ते बरोबर नाही. त्यातून चुकीचा अर्थ निघतो.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वर्धा पॅटर्न असा उल्लेख लेखी उत्तरामध्ये कुठेही नाही. तो उल्लेख लेखी प्रश्नामध्ये आहे. तो प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे दारू पित नाहीत हे मला देखील माहीत आहे. पण ते दारू प्यायल्यासारखे प्रश्न कसे काय विचारत आहेत ? सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी वर्धा पॅटन संबंधी प्रश्न विचारला आहे.कदाचित त्यांना त्यासंबंधातील माहिती असेल. वर्धा, गडचिरोली जिल्हा आपण दारू मुक्त केला. वर्धा येथे महात्मा गांधी यांचे वास्तव्य होते म्हणून आपण तो जिल्हा दारू मुक्त जिल्हा म्हणून घोषित केला. या जिल्ह्यात देशी व विदेशी मद्याचे ज्यांच्याकडे लायसेन्सेस होते ते आपण रद्द केले. असे असले तरी त्या ठिकाणी चोरून दारू पिण्याचे प्रकार सुरू आहेत हे नाकारता येत नाही. यवतमाळ येथून नागपूर येथे जाताना दारूची वाहतूक करत असताना किंवा अन्य जिल्ह्यांमधून पास होत असताना अवैध दारूची विक्री होत असताना अनेक गाड्या पकडण्यात आल्या. ही वारंवार चालणारी प्रक्रिया आहे. वर्धा जिल्हा दारू मुक्त असताना सुद्धा या जिल्ह्यामध्ये सन 2013-14 मध्ये अवैध दारूसंबंधातील 12017 गुन्हे दाखल करण्यात आले. बंदी घातली तरी दारू पिणाऱ्यांची संख्या कमी झाली नाही हे त्यातून दिसत आहे. आपण चार महिन्यांचा म्हणजे नोव्हेंबर 2014 नंतरचा

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1425.....

श्री.एकनाथराव खडसे....

आकडा बघितला तर 6326 गुन्हे वर्धा जिल्ह्यामध्ये दाखल करण्यात आले. सन 2013-14 मध्ये गडचिरोलीमध्ये देखील 1945 गुन्हे दाखल झाले. आता या सहा महिन्यामध्ये 1459 गुन्हे दाखल झाले. वर्धा जिल्ह्यात मागच्या वर्षी 12099 जणांना अटक करण्यात आली. एक्साईज डिपार्टमेंटला नव्हे तर पोलिसांना अवैध दारूविक्रीवर धाडी घालण्याचे अधिकार दिलेले आहेत. पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

..........................

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात ३१५२ तलाठी पदांची सज्जांसह निर्मिती करणेबाबत

**(४)** * **२५२०** **श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३१५२ तलाठी पदांची सज्जांसह निर्मिती करण्याची शिफारस नागपूर आयुक्तांच्या नेतृत्वाखालील समितीने माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये राज्य शासनास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या वाढलेल्या लोकसंख्येमुळे तलाठ्यांच्या कामावर पडलेला ताण लक्षात घेता याबाबत शासनाने समितीच्या शिफारशीनुसार लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी मागणी तलाठी संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठ्यांची पदे निर्माण करून नविन सज्जे निर्माण करणे संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे, वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) तलाठी सज्जा पुनर्रचना समितीने राज्यात एकूण ३०८४ इतके नवीन तलाठी साझे निर्माण करण्याची शिफारस अहवालाद्वारे शासनास केली आहे.

(२) होय.

(३) तलाठी सज्जा पुनर्रचना समितीने केलेल्या शिफारशी शासनस्तरावर तपासण्यात येत असून त्या शासनाच्या विचाराधीन आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, ऑक्टोबर 2014 मध्ये माननीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित झाली. राज्यातील 3152 तालाठ्यांचे सज्जे निर्माण करण्याची शिफारस या समितीने केली आहे. एका सज्जामध्ये साधारणपणे आठ ते नऊ गावे येतात. मराठवाड्यातील एका तालुक्यासाठी 50 ते 60 तलाठ्यांची आवश्यकता असताना आज तेथे 15 ते 20 तलाठी आहेत. आठ तलाठी गुणिले 9 गावे असे अंदाजे प्रमाण आहे. त्यामुळे आज आमच्या येथे 100 ते 150 तलाठी गावांसाठी नाही. त्यामुळे त्या गावातील दफ्तर, माहिती,

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2520....

श्री.अमरसिंह पंडित...

लेखा-जोखा प्राप्त होत नाही. काल-परवा झालेली गारपीट, दुष्काळ, त्यासंबंधात झालेले सर्वेक्षण इत्यादी संबंधातील माहिती देत असताना अनेक गावे शासनाच्या योजनेपासून वंचित राहिलेली आहेत. याला कारण तलाठ्यांची कमी संख्या हे आहे. या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांना अगदी स्पेसिफिक प्रश्न विचारीत आहे. त्यांनी ही पदे निर्माण करण्याचे मान्य केले आहे. नवीन 3152 पदांची सज्जासह निर्मिती करीत असताना तलाठ्यांच्या नवीन पदांची भरती प्रक्रिया केव्हापासून सुरू करणार आहात आणि मराठवाड्यात दुष्काळ पडत असल्यामुळे तेथील भागांचे सर्वेक्षण करावयाचे आहे. त्यामुळे यात सुसूत्रता येण्याचा दृष्टीने आपण मराठवाड्याचा अनुशेष तातडीने दूर करण्यासाठी त्वरित निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणार आहात काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वाढती लोकसंख्या, वाढते नागरीकरण, वाढते, औद्योगिकीकरण, वाढते आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्र, इ, लक्षात घेता राज्यभरात तलाठ्यांची संख्या कमी आहे हे मला मान्य आहे. राज्यभरात तलाठ्यांच्या जागा रिक्त आहेत अशा तक्रारी आल्यामुळे नागपूरचे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती करण्यात आली व या समितीने नीट अभ्यास करून राज्यभरामध्ये नवीन सज्जांची निर्मिती करीत असताना 3084 इतकी नवीन तलाठ्याची पदे निर्माण करण्यासाठी शिफारस केली आहे. 6 तलाठ्यांचे मागे एक सज्जा असे सूत्र आहे. "क" वर्ग, "ब" वर्ग महानगरपालिका, "अ"वर्ग महानगरपालिका, महानगरपालिकेच्या शेजारी झालर क्षेत्र असेल तर या साऱ्यांचा विचार करून आपल्याला सज्जाची निर्मिती करावी लागते. समितीची 3084 सज्जे निर्माण करण्याची शिफारस शासनाकडे आलेली आहे. राज्य सरकार या शिफारशीचा विचार करीत आहे. कारण यावर आर्थिक ताण मोठ्या प्रमाणावर पडणार आहे. या पदांची आवश्यकता देखील मोठी आहे. सदर पदांची निर्मिती करीत असताना काही ठिकाणी संगणकीकरण करणे, असलेल्या तलाठ्यांना लॅपटॉप वगैरे सारख्या अत्याधुनिक सुविधा पुरविल्यामुळे काही पदे कमी करता येईल काय आणि कार्यक्षमता वाढविता येईल काय, लोकांचा त्रास कमी करता येईल काय याचा देखील सरकार विचार करीत आहे.

...5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2520...

श्री.एकनाथराव खडसे...

खर्चाची आकडेवारी एकत्रित झाल्यानंतर वित्तीय नियोजनाच्या दृष्टीने आम्ही निधीची मागणी करणार आहोत. यासंबंधात लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मराठवाडा, विदर्भ किंवा अविकसित व विकसित भागामध्ये आज तलाठ्यांची आवश्यकता आहे. तेव्ही ही सर्व पदे लवकरात लवकर निर्माण करून ती भरण्याचा सरकारचा प्रयत्न राहील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना या प्रश्नाच्या उत्तराची अधिक जाण आहे. शेवटी हा प्रश्न शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. शेतकऱ्याला 7/12 चा उतारा घेण्यासाठी तलाठ्याकडे जावे लागते. शेतीच्या कुठल्याही कामासाठी तलाठ्याच्या दारात जावे लागते. आताच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता नवीन सज्जे करणे आवश्यक आहे. आपण जे उत्तर दिले त्याबद्दल आम्ही काही अंशी समाधानी आहोत. परंतु, हे तातडीने करणे गरजेचे आहे. कारण आता महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईत लोटला गेला आहे. त्यामुळे जो काही सर्व्हे केला जातो, तपासणी केली जाते त्यासंबंधातील शासनाकडे जो काही अहवाल जातो तो तलाठ्यामार्फतच जातो. तेव्हा हे आर्थिक वर्ष संपण्याच्या आधी 3084 इतके नवीन तलाठी सज्जे कार्यान्वित होतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हा विषय वित्तीय भार किती येतो याच्याशी संबंधित असल्याचे मी मघाशीच सांगितले आहे. येत्या मार्च-एप्रिलच्या आत या जागांची किमान निर्मिती केली जाईल असा माझा प्रयत्न राहील. कदाचित भरती प्रक्रिया करायला वेळ लागेल.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात ३१५२ तलाठी पदांची सज्जांसह निर्मिती करणेबाबत

**(४) * २५२० श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३१५२ तलाठी पदांची सज्जांसह निर्मिती करण्याची शिफारस नागपूर आयुक्तांच्या नेतृत्वाखालील समितीने माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये राज्य शासनास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या वाढलेल्या लोकसंख्येमुळे तलाठ्यांच्या कामावर पडलेला ताण लक्षात घेता याबाबत शासनाने समितीच्या शिफारशी नुसार लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी मागणी तलाठी संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलाठ्यांची पदे निर्माण करून नविन सज्जे निर्माण करणे संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे, वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) तलाठी सज्जा पुनर्रचना समितीने राज्यात एकूण ३०८४ इतके नवीन तलाठी साझे निर्माण करण्याची शिफारस अहवालाद्वारे शासनास केली आहे.
(२) होय.
(३) तलाठी सज्जा पुनर्रचना समितीने केलेल्या शिफारशी शासनस्तरावर तपासण्यात येत असून त्या शासनाच्या विचाराधीन आहेत.

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2520........

श्री. एकनाथराव खडसे......

एप्रिल, 2015 च्या आत राज्य मंत्रिमंडळासमोर हा विषय नेऊन आवश्यक असणाऱ्या पदांना राज्यसरकारकडून मंजुरी घेण्याचा आमचा विभाग निश्चितपणे प्रयत्न करेन. ही परिस्थिती लक्षात घेता राज्य सरकारकडून या पदांना निश्चितपणे मंजुरी मिळेल असा मला विश्वास आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक येथे कायस्वरुपी औद्योगिक प्रदर्शन केंद्र उभारणीसाठी ७६ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजुरी करण्याबाबत**

**(५) * २४७१ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे कायमस्वरुपी औद्योगिक प्रदर्शन केंद्र उभारणीसाठी जिल्हा उद्योग केंद्राने माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या सुमारास शासनास ७६ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केंद्र साकारण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

नाशिक येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्याकरिता नाशिक इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरींग असोसिएशन (N M A), सातपूर, नाशिक यांनी सादर केलेला रुपये ३६८.१० कोटी इतक्या खर्चाचा प्रस्ताव उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, यांचेकडून दिनांक २२.०५.२०१३ चे पत्रान्वये उद्योग संचालनालयास प्राप्त झाला आहे.

(२) व (३) सदर प्रस्तावातील खर्च खूपच जास्त रुपये ३६८.१० कोटी असल्याने, रुपये ५० कोटीच्या मर्यादेत सुधारित प्रस्ताव सादर करण्यास उद्योग संचालनालयाच्या दिनांक २८.०६.२०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे, तथापि, सदर पत्राच्या अनुषंगाने रुपये ५० कोटी मर्यादेपर्यतच्या प्रदर्शन व व्यापारी केंद्र विकसित करण्याबाबत प्रस्ताव अद्याप उद्योग संचालनालयाकडे प्राप्त झालेला नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांना उत्तरात काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदय, उत्तरामध्ये सुधारणा करावयाची नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, हा प्रश्न नाशिकच्या संदर्भात असून NIMA या संस्थेने DIC कडे 368 कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. शासनाने NIMA या संस्थेस 368 कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर न करता 50 कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करावा असे सांगितले होते. त्यामुळे यासंदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी NIMA ची आहे की, DIC ची आहे ? उत्तरामध्ये काही बदल करावयाचा आहे काय असे मी मंत्री महोदयांना प्रश्नाच्या सुरुवातीला विचारले होते परंतु उत्तरामध्ये असे म्हटले आहे

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2471.....

श्री. जयवंतराव जाधव .....

की, अशा प्रकारचा प्रस्ताव उद्योग संचालनालयाकडे अद्याप पर्यंत प्राप्त झालेला नाही. परंतु माझ्याकडे जी माहिती आहे त्या माहिती नुसार दि. 29 जुलै, 2014 रोजीच DIC कडे NIMA ने हे प्रपोजल सादर केलेले आहे. असे असतांना उत्तरामध्ये हा प्रस्ताव सादर झालेला नाही असे म्हटले आहे. खरे म्हणजे हा प्रस्ताव पाठविण्याची जबाबदारी NIMA ची नाही. प्रस्ताव पाठविण्याची जबाबदारी ज्या संस्थेची आहे ती जबाबदारी त्या संस्थेने पार पाडलेली नसतांना NIMA सारख्या ज्या असोसिएशन्स आहेत अशा असोसिएशन्सने प्रस्ताव सादर केलेला आहे. असे असतांाही अद्याप पर्यंत प्रस्ताव सादर झालेला नाही असे उत्तरात सांगितलेले आहे. त्यामुळे अशा प्रकारे बेजबाबदार उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी सुरु आहे काय ? चौकशी सुरु असेल तर संबंधितांवर कोणती कारवाई केली जाणार आहे, तसेच 50 कोटी रुपये आजच्या आज दिले जातील अशी घोषणा केली जाईल काय ?

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदय, नाशिक येथे कायमस्वरुपी औद्योगिक प्रदर्शन केंद्र उभारण्याबाबत नाशिक इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरीग असोसिएशन (NIMA) यांनी 368 कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला होता परंतु हा प्रस्ताव जास्तीचा असल्यामुळे शासनाने त्यांना सुधारित प्रस्ताव 50 कोटी रुपयांपर्यंतचा सादर करण्यात यावा असे कळवले होते परंतु अद्याप पर्यंत असा प्रस्ताव उद्योग संचालनालयाला मिळालेला नाही. त्यांनी एवढेच कळवले आहे की, "या प्रस्तावित प्रदर्शनासाठी जागा कोणती मिळवता येईल याबद्दल नाशिक महानगरपालिकेबरोबर चर्चा केली आहे." महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण 2013 मध्ये जाहीर झाले होते व त्यामध्येही या गोष्टींचा उल्लेख आहे की, विविध राज्य आणि स्थानिक प्राधिकरणाद्वारे विकसित करण्यात येत असलेल्या प्रदर्शन व व्यापारी केंद्रांसाठी पुणे-नाशिक मार्गावरील मुळशी तसेच शेंद्रे औद्योगिक वसाहत, औरंगाबद आणि नागपूर येथील अंबाझरी या तीन ठिकाणी आवश्यक ते सहाय्य राज्य शासनाकडून पुरवण्याबाबतची तत्वत: मान्यता औद्योगिक धोरण 2013 मध्ये मिळालेली आहे. प्रत्यक्षामध्ये अशा प्रकारचे केंद्र उभारण्याबाबतची योजना अद्यापि तयार झालेली नाही. यामध्ये स्थानिक प्राधिकरण महानगरपालिका असेल तर महानगरपालिका तसेच राज्य शासन हे काम करु शकते एवढेच

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2471.....

श्री. सुभाष देसाई ......

औद्योगिक धोरण 2013 मध्ये म्हटल्ेले आहे. उ्द्योजकांच्या संघटनांच्या चांगल्या सूचना असल्या तर त्या सूचना शासनाला मिळाव्यात एवढा या मागील उद्देश होता. उद्योजकांच्या संघटनेने अशा प्रकारचा प्रस्ताव एका सभेत दिला होता परंतु हा प्रस्ताव जास्त किंमतीचा होता. एवढया मोठया प्रस्तावाचा विचार सुध्दा करता येणार नसल्यामुळे हा प्रस्ताव 50 कोटी रुपयांपर्यंत देण्यात यावा असे त्यांना कळवले होते. या संस्थ्ेने केवळ जागेच्या संदर्भात महानगरपालिकेशी चर्चा झालेली आहे एवढेच आम्हाला कळविलेले आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मुंबई,पुणे आणि नाशिक हा औद्योगिकरणातील सुवर्ण त्रिकोण आहे. या भागात उद्योग मोठया प्रमाणात विकसित व्हावे यासाठीच्या प्रोत्साहनपर योजना धोरणामध्ये असून त्यासाठी उद्योगाच्या संदर्भातील औद्योगिक प्रदर्शन हा विषय येतो. यासंदर्भातील निकष काय आहेत किंवा निमासारख्या संस्थेने शासनाला 368 कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु किंमत जास्त असल्यामुळे हा प्रस्ताव 50 कोटी रुपयांपर्यंत सादर करावा असे संबधित संस्थेला सांगितले. मुळात 50 कोटी किंवा 368 कोटी रुपये देण्याच्या संदर्भात आपल्या विभागाचे कोणते धोरण आहे ? कायमस्वरुपी प्रदर्शनासाठी नियोजन विभागाने नागपूर, नाशिक, औरंगाबाद येथे प्रदर्शन केंद्र उभारण्यासाठी किती जागेची आवश्यकता आहे, यामध्ये त्या ठिकाणच्या एमआयडीसी किती कोटी रुपयांपर्यंतची गुंतवणूक करु इच्छिते ? जर या प्रदर्शनामध्ये संस्था सहभागी होणार असतील तर पीपीपी सारख्या संस्थांची भागीदारी करुन अधिकची गुंतवणूक करता आली आणि नंतर स्थानिक प्राधिकरणाकडून कोणती जागा कशी मिळवायची हा भाग येतो. परंतु औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी कायमस्वरुपी औद्योगिक प्रदर्शन हा भाग महत्वाचा असल्यामुळे या सर्व प्रश्नांचा फेरविचार करुन औद्योगिक प्रदर्शनासाठी उपलब्ध असलेला निधी तसेच इतर ठिकाणाहून उपलब्ध होणाऱ्या निधीच्या संदर्भात फेरविचार करुन यासंदर्भातील धोरणाच्या संदर्भात निमा, नाशिक महानगरपालिका यांच्या बरोबर बैठक घेऊन आपल्याला पुढचे पाऊल टाकता येईल काय ?

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2471.....

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात नाशिक महानगरपालिका व निमा संघटनेबरोबर संयुक्त बैठक घेऊन या विषयाला चालना देण्याचा शासन निश्चितपणे प्रयत्न करील.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, नाशिक परिसरातील औद्योगिक विस्तार लक्षात घेता दिल्ली-मुंबई औद्योगिक कॅरिडॉर भविष्यामध्ये होणार आहे हे लक्षात घेता तसेच नाशिक परिसरात कृषीच्या संदर्भात उत्तम क्रांती झालेली आहे हे लक्षात घेता विशेष बाब म्हणून राज्य सरकार मान्यता देईल काय ? नाशिक येथील एमआयडीसीमध्ये प्रदर्शनासाठी जागा उपलब्ध नाही काय ? उत्तरामध्ये सांगण्यात आले आहे की, या संस्थाकडून प्रस्ताव आला त्यावेळेस नाशिक महानगरपालिकेत जागेच्या संदर्भात चर्चा झालेली आहे अशी माहिती मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिलेली आहे. त्यामुळे नाशिकच्या एमआयडीसीमध्ये आवश्यक असणारा भूखंड उपलब्ध करुन दिला जाईल काय ? सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी वर्तमानपत्रात 50 कोटी रूपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर झालेला आहे अशी माहिती दिलेली आहे ती बाब खरी आहे काय ?

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदय, नाशिक एमआयडीसीमध्ये जागा उपलब्ध होऊ शकेल काय याबाबत निश्चितपणे तपासणी करण्यात येईल. आमच्याकडे जो 368 कोटी रूपयांचा प्रस्ताव आला होता त्यासंदर्भातील फेर प्रस्ताव आमच्याकडे आलेला नाही परंतु जागेबद्दल नाशिक महानगरपालिकेबरोबर चर्चा झालेली आहे एवढेच आम्हाला कळविण्यात आलेले आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, या संस्थेने 50 कोटी रूपयांचा फेर प्रस्ताव सादर केलेला आहे हे मी जबाबदारीने सांगतो आहे.

श्री. सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य 50 कोटी रूपयांचा फेर प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे असे सांगत असून ही बाब तपासून घेण्यात येईल. या विषयाच्या संदर्भात उद्योग विभाग, नाशिक महानगरपालिका आणि निमा संघटना यांची एक संयुक्त बैठक घेऊन प्रदर्शन केंद्र स्थापन करण्यासंदर्भात शासन निश्चितपणे प्रयत्न करील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## (६) राज्यात शासकीय दूध योजना अडचणीत आल्याबाबत

**श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय -:

(१) राज्यात शासकीय दूध योजना अडचणीत आली असल्याची माहिती वितरक संघटनेचे अध्यक्ष यांनी दिनांक २७ जून, २०१४ रोजी उघडकीस आणली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वितरकांच्या अडचणींकडे लक्ष देण्याची मागणी संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी दूध हे वितरकांचे उपजिविकेचे साधन असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(६) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री .एकनाथराव खडसे :**१ शासकीय दूध योजना अडचणीत आली हे म्हणणे खरे नाही.
महाराष्ट्र दूध वितरक सेना या संघटनेने दि .२ जून, २०१४ रोजी निवेदन दिले आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) हे खरे नाही.
(५) दूध वाहतुकदार हे आरे केंद्र चालकांच्या वतीने दूध व दुग्धजन्य पदार्थाची वाहतुक करीत आहेत, सदर वाहतुकीचे काम पूर्ण वेळ नसून अंशकालीन आहे.

आरे केंद्र चालकांना दुधाच्या उपलब्धतेनुसार दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत .सध्या शासनाकडे येणाऱ्या दुधाची आवक वाढल्याने केंद्र चालकांना जास्तीचे दूध व दुग्धजन्य पदार्थ उपल्बध करुन देण्यात येत आहे.

आरे ब्रँड व को ब्रँड अंतर्गत दुग्धजन्य पदार्थ व इतर पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

शासन निर्णय दि .१/१२/२०११ नुसार आरे केंद्रावरुन महानंदचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर "हे म्हणणे खरे नाही" असे दिले आहे". पहिला प्रश्न असा विचारला आहे की, शासकीय दूध योजना अडचणीत आली आहे काय ? परंतु या प्रश्नाला "हे खरे नाही " असे उत्तर देण्यात आलेले आहे. दूध वितरक या प्रश्नाशी संबंधित असून वितरकांची संख्या हजारो आहे.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1...

श्री.भाई जगताप....

हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. या संदर्भात मी तत्कालीन मंत्री महोदयांसोबत बैठक घेतली होती त्या बैठकीनंतर तत्कालीन मंत्री महोदयांनी शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2011 नुसार आरे केंद्रावरुन महानंदचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. पण आज तशी परिस्थिती नाही. या दूध वितरकांना दुधाचा कमी पुरवठा केला जात आहे. त्यांचे हे काम अंशकालीन आहे, परंतु ते त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. त्यांना पाहिजे त्या प्रमाणात दूध वितरक मिळत नसल्यामुळे आणि विक्रीसाठी दुग्धजन्य पदार्थ मिळत नसल्यामुळे त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे. माझा प्रश्न आहे की, दिनांक 1.12.2011 रोजी शासनाने घेतलेला निर्णय तसाच पुढे सुरु ठेवण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये पहिल्या प्रश्नाचे जे उत्तर दिलेले आहे ते खरे आहे. कारण प्रश्न विचारण्यात आला होता की, शासकीय दूध योजना अडचणीत आली आहे काय, या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. शासनाची आरे, महानंद, अशा अनेक योजना आहेत, त्यापैकी कोणत्या योजनेसंबंधी त्यांनी प्रश्न विचारला त्या योजनेचे नाव दिलेले नाही. त्यामुळे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्याची आवश्यकता नव्हती तरी देखील आम्ही उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या संदर्भात निर्णय झालेला आहे. त्या निर्णयाची माहिती घेण्यात येईल आणि तो निर्णय उचित असेल तर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा कामगारांचा प्रश्न असून तो अनेक वर्षे प्रलंबित आहे. दूध वितरक अनेक वर्षापासून काम करीत असल्यामुळे तत्कालीन मंत्री महोदयांनी निर्णय घेतला होता. त्यांचे हे उदरनिर्वाहाचे साधन असल्यामुळे त्यांना न्याय देण्याची भूमिका शासन घेईल काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1...

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या संदर्भात तत्कालीन मंत्री महोदयांनी काय निर्णय घेतला त्याची मला माहिती नाही. त्यांचा निर्णय तपासून घेण्यात येईल, जर तो निर्णय योग्य असेल तर त्या संदर्भात कार्यवाही करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, दुधाचा पुरवठा कमी होत आहे, परंतु तशी परिस्थिती नाही. पूर्वी 19 हजार लिटर दुधाची विक्री होत होती आता ती 40 हजार लिटरपेक्षा जास्त होत आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांना दूध व्यतिरिक्त अन्य दुग्धजन्य पदार्थ विकण्याची परवानगी द्यावी. त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण आजही आरेच्या स्टॉलवर गेल्यावर आपणास दुधाच्या व्यतिरिक्त अन्य पदार्थ विकत असल्याचे दिसून येईल. पण ते अंशकालीन आहे त्यांना पूर्णकालीन लाभ देता येणार नाही एवढेच त्यामध्ये नमूद केलेले आहे.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दोन वर्षापूर्वी उच्च न्यायालयाने आदेश देऊनही पुणे जिल्हा प्रशासनाने**

**अनधिकृत बांधकामावर कारवाई न केल्याबाबत**

**(७) * ९६३ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा प्रशासनाने दोन वर्षापूर्वी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिका हद्दीलगतच्या अनधिकृत बांधकामाचे सर्वेक्षण करून त्या बांधकामाची यादी बनविली होती. मात्र त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत व यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) ग्रामीण भागातील अनधिकृत बांधकामाच्या प्रश्नाबाबत शासन नियुक्त समितीने अहवाल सादर केला असून सदर समितीने केलेल्या शिफारशीवर शासन मान्यतेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मध्ये सुधारणा करण्याची तसेच अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी मनुष्यबळ वाढविण्यासंबंधीची कार्यवाही नगर विकास विभागाकडून सुरू आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, आज पुणे शहराची झपाट्याने वाढ होत आहे आणि त्या शहरातील जमिनीच्या किंमती आकाशाला भिडलेल्या आहेत. पुणे शहरातील बावधन भाग घेतला तर तेथील काही भाग पुणे महानगरपालिकेमध्ये येतो आणि काही भाग ग्रामीणमध्ये येतो. आज पुणे शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम होत आहे. पिंपरी-चिंचवड भागात देखील मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. तेथील अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. अशापद्धतीचा प्रकार पुणे शहरात होऊ नये म्हणून शासन महानगरपालिकेला काही निर्देश देईल काय ? अनधिकृत बांधकाम जलद गतीने होत असल्यामुळे त्यामध्ये अपघात घडल्याचे दिसून आलेले आहे. पुणे शहरात अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून सरकार आपल्या स्तरावर महानगरपलिकेचे अधिकारी तसेच पदाधिकाऱ्यासोबत बैठक घेईल काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.963....

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुणे शहरातच नव्हे तर राज्यामध्ये अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी पूर्वीच शासनाच्या माध्यमातून निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे अनधिकृत बांधकामे काढण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर आहेत. या संदर्भातील कायदा कमी पडत असल्याचे काही प्रकरणांमध्ये दिसून आलेले आहे. अनधिकृत बांधकामे पाडली तरी त्या ठिकाणी पुन्हा नव्याने बांधकामे होतात. ही अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी प्रशासनाकडे तेवढे मनुष्यबळ आणि साधनसामुग्री नाही आणि अतिक्रमणे तोडल्यानंतर पुन्हा लगेच बांधकाम केले जाते त्यामुळे आता या कामासाठी एक नवीन विभाग तयार करावा लागेल की काय असे वाटत आहे. या संदर्भात माननीय उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झालेली आहे. न्यायालयाने शासनाची बाजू ऐकलेली आहे. अतिक्रमण होऊ नये अशी जनतेची भावना आहे त्यासाठी शासनामार्फत काय कारवाई करण्यात येईल असे हिअरींग झाले. माननीय उच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिले आहेत की, तातडीने अतिक्रमणे काढण्यात यावीत आणि त्यास कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी. मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, अस्तित्वात असलेला कायदा अपुरा पडत असल्यामुळे त्यामध्ये दुरुस्ती केल्याशिवाय कठोर बंधन घालता येणार नाही म्हणून एमआरटीपी ॲक्टमधील कलम 52 व 56 मध्ये दुरुस्ती करण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भातील विधेयक चर्चेला आहे. एक समिती नियुक्त करुन त्या समितीला अधिकार देणे, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणे, अशा शिफारशी त्यामध्ये आहेत. यापूर्वी फौजदारी केसेस दाखल करण्याचे अधिकार प्रशासनाला नव्हते. या निर्णयामुळे आपणास अनधिकृत बांधकामावर कठोरपणे बंधने आणता येतील. अनेकदा असे लक्षात आले आहे की, अनधिकृत बांधकामे पाडू नका असे लोकप्रतिनिधी सांगत असतात. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी अनधिकृत बांधकाम पाडण्यास प्रतिबंध केला किंवा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष संरक्षण दिले तर त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. त्या संदर्भातील विधेयक आजच सभागृहात चर्चेला आहे. अनधिकृत बांधकाम होऊ नये अशी आपल्या सर्वांची इच्छा आहे. आपण अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून ज्या काही सूचना असतील त्याचा आपण स्वीकार

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.963....

श्री.एकनाथराव खडसे....

करु या. सरकार अनधिकृत बांधकामाच्या विरोधात आहे. तेव्हा अनधिकृत बांधकामाबाबत कठोर पावले उचलण्यासाठी काही सूचना कराव्यात अशी विनंती आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, अधिकाऱ्यांना बैठक घेण्यासंदर्भात शासन निर्देश देणार काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, या संदर्भातील विधेयक चर्चेला येईल त्यावेळी आपल्या सर्व शंकांचे निरसन करण्यात येईल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, उत्तरात नमूद केले आहे की, शासन नियुक्त समितीने आपला अहवाल सादर केलेला आहे. या अहवालात अनधिकृत बांधकामांची संख्या दिलेली आहे का, असल्यास किती ? मंत्री महोदयांनी सांगितले की, एमआरटीपी ॲक्टमध्ये बदल करण्यात येईल. माझा प्रश्न आहे की, अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी समितीने शिफारशी केल्या आहेत का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यात अनधिकृत बांधकामे किती आहेत याची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. पुणे शहराच्या संदर्भातील माहिती माझ्याजवळ उपलब्ध आहे. पुणे शहर आणि बाजूला कदम वस्ती, शिवने नरी, मांगले वाडी, भिलारे वाडी, येलवे वाडी, आंबेगाव (खुर्द) वाघोली व अन्य या गावांमध्ये 1217 अनधिकृत बांधकामे आहेत. या संदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल. पुण्यातील अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात सर्व्हे सुरु आहे. त्यामुळे अंतिम आकडेवारी आता माझ्याजवळ नाही. सर्व्हे झाल्यानंतर ती सादर करण्यात येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, अनधिकृत बांधकामांचा प्रश्न फक्त पुणे शहरापुरता मर्यादित नसून तो राज्यभर आहे. तेव्हा या संदर्भात एक नियमावली तयार केली पाहिजे. पूर्वी असे ठरले होते की, जी अनधिकृत बांधकामे रेग्युलर करण्यासारखी असतील म्हणजे ज्या ठिकाणी पोर्च पुढे असेल किंवा जादाचा जीना काढला असेल अशी बांधकामे रेग्युलराईज करुन त्यांचे रेडीरेकनरप्रमाणे दर घ्यायचे. सर्वच ठिकाणी अनधिकृत बांधकामाचा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ AKA/KTG/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 12:00

ता.प्र.क्र.963....

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

नगरपालिकांमध्ये सर्वात जास्त अडचण आहे. कारण नगरपालिकेची महापालिका झाली तर तिचा विकास जास्त होतो. जुन्या शहरांमध्ये छोटेछोटे रस्ते आणि अडचणी मोठ्या आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी शासन धोरण निश्चित करेल काय ? तसेच ठराविक ठिकाणी रेडी रेकनरचा दर लावून ती कामे नियमित करण्यासाठी आणि उर्वरित सर्व अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी शासन कठोर कायदा करेल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, या विषयाच्या अनुषंगाने एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत कलम 52 आणि 56 मध्ये बदल करण्यासंबंधी किंबहुना अतिक्रमणांना प्रतिबंध घालण्यासाठीचे विधेयक आजच चर्चेला येणार आहे. ग्रामीण भाग हा नगरपालिका क्षेत्रासाठी आहे. एमआरटीपी ॲक्ट नगरपालिका क्षेत्र आणि अतिक्रमणाबाबतचा आहे. सन्माननीय सदस्यांनी सुचविले की, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण होत आहे. त्यामुळेच एमआरटीपी ॲक्टमध्ये सुधारणा करीत आहोत. तशीच महाराष्ट्र रेव्हेन्यू कोडमध्ये सुध्दा दुरूस्ती करण्यात येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ जिल्हयातील रेतीघाटाची मुदत संपूनही अवैधरित्या रेतीचा होत असलेला उपसा**

**(८) * १९३० श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील रेतीघाटाची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ रोजी संपली असूनही पूर्ण जिल्हयात ठिकठिकाणी अवैधरित्या रेतीचा उपसा होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर व उत्खनन करणाऱ्या ट्रक व ड्रायव्हर चालक मालकांवर कोणती कारवाई केली आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खनन / वाहतूक रोखण्यासाठी तालुका स्तरावर भरारी पथक गठीत करण्यात आले असून, भरारी पथकांद्वारे माहे ऑक्टोबर २०१४ पासून केलेल्या तपासणीमध्ये अवैध रेतीच्या २१२ प्रकरणांमध्ये रुपये १६.६५ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ६ प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यातील रेतीघाटाची मदत दिनांक 30 सप्टेंबर, 2014 रोजी संपली आहे. या अनुषंगाने मी विचारु इच्छितो की, रेतीघाटाची मुदत संपल्यानंतर त्या अनुषंगाने नवीन प्रक्रियेची कार्यवाही सुरु का केली नाही, या संदर्भात निर्णय का घेण्यात आला नाही, या संदर्भातील आवश्यक ती कार्यवाही न करण्यास कोण जबाबदार आहे, अवैध रेती उपसाबाबत संबंधित 212 प्रकरणी काय कारवाई केली आहे, त्यामध्ये रेती माफिया आणि अधिकारी/कर्मचारी किती आहेत, तसेच 212 प्रकरणी कारवाई करीत असताना किती वाहने जप्त केली आणि त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1930....

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार रेतीघाटाची मुदत ठरलेली आहे. रेतीघाटाची मुदत संपल्यास नवीन प्रक्रिया सुरु करावयाची असेल तर केंद्रीय पर्यावरण समितीची त्याला मान्यता घेतल्याशिवाय नवीन निविदा काढता येत नाहीत. राज्य सरकारच्या माध्यमातून अशा प्रकारचे प्रस्ताव पर्यावरण समितीकडे पाठविले जातात. पर्यावरण समितीने एनओसी दिल्यानंतर संबंधित रेती घाटाच्या ठिकाणी लिलावाची परवानगी दिली जाते. या संदर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने काही निकष व अटी ठरवून दिल्या आहेत. उदाहरणार्थ रेती उत्खनन करीत असताना जमिनीच्या खाली तीन फूट थर असला पाहिजे, रेती उत्खननाची परवानगी देत असताना चौरस फूट इत्यादी निकष ठरलेले आहेत. रेती घाटाच्या संदर्भात नवीन प्रक्रियेची कार्यवाही सुरु केली आहे. अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांना माफियाच म्हटले पाहिजे, चोरी करणाऱ्याला चोरच म्हटले पाहिजे. त्यामुळे रेती माफिया किती आहेत हे नेमके सांगता येणार नाही. तसेच दुसरी बाब अशी की, 212 प्रकरणांमध्ये अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांकडून दंड वसूल केला आहे. तसेच त्यांच्याकडे असलेली यंत्रसामुग्री जप्त केली आहे. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी यंत्रसामुग्री जप्त केल्यामुळे नेमकी किती यंत्रसामुग्री जप्त केली या बाबतची माहिती या क्षणाला देता येणार नाही.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सोलापूर जिल्हयासह मराठवाडयात कमी पाऊस पडत असल्याने दुष्काळ रोखण्यासाठी करावयाच्या कृती आराखडयाबाबत**

**(९) * १६४४ श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतीश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयासह मराठवाडयात सतत तीन वर्षापासून कमी पाऊस पडत असल्याने दुष्काळ रोखण्यासाठी कृति आराखडा करण्याची मागणी शासनाकडे सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर पाणी टंचाई भासण्याची शक्यता असणारी गावे/ वाडया निश्चित करुन स्वतंत्र तिमाहीसाठी (ऑक्टोबर ते जून) टंचाई कृती आराखडे तयार करण्यात येतात. औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हयांचे संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले असून सोलापूर जिल्हयाचा माहे ऑक्टोबर, २०१४ ते जून, २०१५ पर्यतचा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्यातील दुष्काळ निवारणार्थ कायमस्वरुपी काही योजना हाती घेण्याचा शासनाचा मानस आहे.

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, हा प्रश्न दुष्काळ रोखण्यासाठी करावयाच्या कृती आराखड्याबाबतचा आहे. परंतु या प्रश्नाचे लेखी उत्तर मोघम स्वरुपात आलेले आहे. महोदय, या अनुषंगाने मी चार प्रश्न विचारणार आहे. या निमित्ताने मी विचारतो की, सोलापूरसह मराठवाड्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या अर्धवट प्रादेशिक योजना किंवा छोट्यामोठ्या योजना किती आहेत, एमएसईबीची आर्थिक परिस्थिती वाईट असल्यामुळे प्रत्येक गावात पाणी पुरवठ्याच्या योजनेला एक्स्प्रेस फीडर बसविणार काय ? राज्य सरकारच्या कायद्यानुसार बोअरसाठी 200 फुटापर्यंतची परवानगी दिली जाते. परंतु खाजगी शेतकरी 500 ते 1000 फूट खोल बोअर घेतात. यामुळे भूगर्भातील पाणी कमी होत आहे. म्हणून मी विचारु इच्छितो की, अस्तित्वात असलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येईल काय ? तसेच पाझर तलाव आणि बंधाऱ्यांची गळती रोखण्यासाठी त्यांच्या पुनर्बांधणीसाठी कृती आराखडा तयार करण्यात येईल काय, ? महोदय, गेल्या दोन वर्षाच्या दुष्काळामध्ये माझ्या तालुक्यात 1 लाख 10 हजार जनावरांची दीड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ AKA/KTG/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 12:00

ता.प्र.क्र.1644....

श्री.दिपकराव साळुंखे....

वर्षे छावणी सुरु होती. त्यापोटी राज्य सरकारने 175 कोटी रुपये खर्च केले. वास्तविक पाहता सरकारने आमच्या तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांना 100 कोटी रुपये दिले असते तर त्या भागातील योजना पूर्ण झाल्या असत्या आणि त्या भागातील लोकांना कधीही दुष्काळाचा सामना करावा लागला नसता. त्यामुळे राज्य सरकार ही बाब गांभीर्याने घेईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, दुष्काळाच्या चर्चेवर या सर्व प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. आवश्यकता पडल्यास यावर चर्चाही करता येईल. परंतु हा प्रश्न दुष्काळ रोखण्यासाठी करावयाच्या कृती आराखड्याबाबतचा आहे. पुढील कालखंडात काय करावयाचे आहे, या संदर्भातील उपाययोजना किंबहुना त्या संदर्भातील बृहत आराखडा राज्य सरकारने तयार केलेला आहे. पुढील कालखंडात प्रत्येक शेतापर्यंत पाण्याची व्यवस्था असेल, नालाबंडींग व्यवस्था असेल, नाला रुंदीकरण, नाला सरळीकरण, शेती तलाव, लघु पाटबंधारे तलाव, गाव तलावातील गाळ काढणे, मृदसंधारणाची कामे इत्यादीसाठी एकंदरीत पावसाचे पाणी जिरवणे आणि जलस्त्रोत वाढविणे या अनुषंगाने कार्यवाही करणे हा एक भाग आहे. पाण्याचा गैरवापर टाळण्यासाठी बृहत आराखडा तयार केला आहे. चारा उत्पादनासाठी वैरण विकास योजना आहे. अशा विविध योजना पुढील कालखंडात येऊ नये म्हणून काळजी घेण्यात येत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भातील बृहत आराखडा पंचायत समिती तयार करते. वर्षातून तीन वेगवेगळे आराखडे तयार केले जातात. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, पंचायत समितीने केलेल्या आराखड्याला कट न लावता तो जसाच्या तसा शासन मंजूर करणार काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, आराखडा हा पुढील कालखंडाच्या अनुषंगाने करावयाचा आहे. सध्याचा आराखडा जिल्हाधिकाऱ्यांकडे तयार होतो. परंतु हा आराखडा दुष्काळापुरता मर्यादित आहे. त्यामुळे येणाऱ्या सहा-सात महिन्यांच्या कालखंडात कोणत्या गावाला पिण्याच्या पाण्याची अडचण येण्याची शक्यता आहे, कोणत्या गावाला टँकर लागण्याची शक्यता आहे, कोठे रोजगाराच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे, जेणेकरुन तेथे रोजगार निर्मिती करु शकतो,

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ AKA/KTG/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 12:00

ता.प्र.क्र.1644....

श्री.एकनाथराव खडसे....

मरेगा आणि नरेगा संदर्भातील कोणती कामे रोजगार निर्मितीसाठी वापरता येतील. या अनुषंगाने....

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

नंतर श्री.कांबळे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी सदर औचित्याच्या मुद्याद्वारे अत्यंत महत्त्वाचा विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. विदर्भात अधिवेशन सुरू आहे. विदर्भ, मराठवाडा येथील अनुशेषाबाबत तेथील जनतेच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. माननीय राज्यपालांनी तेथील अनुशेषाबाबत केळकर समिती नियुक्त केली. विदर्भ, मराठवाडा येथील व उर्वरित महाराष्ट्र येथील अनुशेषाच्या संदर्भातील अहवाल केळकर समितीने शासनाकडे सोपविला आहे. नागपूरच्या अधिवेशनामध्ये या सर्व अनुशेषाच्या संदर्भात चर्चा व्हावी आणि विदर्भ व मराठवाडा येथील जनतेला न्याय मिळावा, अशी आमची मागणी आहे. आता अधिवेशनाचे फक्त 3 दिवस राहिले आहेत. विदर्भात सुरूअसलेल्या अधिवेशनातील येत्या 3 दिवसांत केळकर समितीच्या अहवालावर चर्चा झाली पाहिजे. कारण या अहवालाच्या संदर्भात फार शंका निर्माण केल्या जात आहेत की, विदर्भ व मराठवाडा यांच्या अनुशेषाच्या फायद्याकरिता हा अहवाल होता, उर्वरित महाराष्ट्राच्या अनुशेषाच्या फायद्याकरिता किंवा त्या भागातील योजना पूर्ण करण्याच्या संदर्भात हा अहवाल होता. पुढच्या अधिवेशनापर्यंत हा अहवाल रोखून ठेवणे विदर्भ, मराठवाडा येथील जनतेवर अन्याय करण्यासारखे होईल. विदर्भ व मराठवाडा येथील जनतेला न्याय द्यायचा असेल, तेथील अनुशेष पूर्ण करायचा असेल तर आजच केळकर समितीचा अहवाल शासनाने सादर केला पाहिजे. सभागृहात अहवाल सादर केल्यानंतर त्यावर 2 दिवसांत चर्चा घेतली पाहिजे. केळकर समितीचा अहवाल विदर्भ, मराठवाड्याकरिता आहे आणि त्यावरील चर्चा मुंबईला जाऊन होत असेल तर शासन काही तरी लपविण्याचा प्रयत्न करीत आहे, ही भावना विदर्भातील जनतेची होईल. त्यामुळे केळकर समितीचा अहवाल राज्य शासनाने आजच सभागृहासमोर ठेवला पाहिजे, अशी आम्ही मागणी करीत आहोत. संबंधित माननीय मंत्र्यांनी या संदर्भात खुलासा केला पाहिजे की, आजच केळकर समितीचा अहवाल शासन आणील आणि 2 दिवसांतच यावर चर्चा घेण्यात येईल. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात स्पष्ट केले पाहिजे. शासनाने अशीच भूमिका घ्यावी, असा मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. चंद्रकांत रघुवंशी)**

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्यावर उत्तर देत नाही. केळकर समितीच्या अहवालाचा संबंध आहे म्हणून सांगतो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, केळकर समितीचा अहवाल फुटला. अहवालातील अनेक गोष्टींबाबत बाहेर चर्चा होत आहे. सभागृहात अजूनही तो अहवाल शासनाने ठेवलेला नाही. आता अधिवेशनाचे फक्त 3 दिवस राहिले आहेत. आपण आजची कार्यपत्रिका पाहिली तर लक्षात येईल की, हा अहवाल आज सभागृहात ठेवणे अभिप्रेत होते. उर्वरित 2 दिवसांत त्यावर चर्चा हाईल, असे आम्हाला वाटले होते. सभागृहाचे नेते सभागृहात उपस्थित आहेत. माननीय मंत्री या संदर्भात काही तरी बोलणार आहेत. आमची विनंती आहे की, सदर अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा. आवश्यक असेल तर अजून 4 दिवस अधिवेशनाचा कालावधी वाढविण्यात यावा. जेणेकरून अहवालातील गोष्टी बाहेर येतील. सदर अहवालावर चर्चा होणे आवश्यक आहे. विदर्भात अधिवेशन होत असताना येथेच त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे, त्या संदर्भात उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्यामुळे आमची विनंती राहील की, आपल्या उत्तरात या संदर्भात खुलासा व्हावा.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उठून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** : समाननीय सदस्यांनी खाली बसावे. औचित्याच्या मुद्यावर इतक्या सन्माननीय सदस्यांना बोलता येत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कोणताही अहवाल सभागृहात ठेवण्यापूर्वी तो फुटू नये.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याला उत्तर देण्याची प्रथा नाही. सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे व भाई जगताप यांची भूमिका बरोबर आहे. आपण अधिवेशनाचा कार्यकाल वाढवावा आणि सदर चर्चेला 8-10 दिवस द्यावेत. आमची हरकत नाही. सर्वांची इच्छा असेल तर अधिवेशनाचा कालावधी 8-10 दिवसांनी वाढवावा. आम्ही कामकाज सल्लागार समितीमध्ये या संदर्भातील प्रस्ताव आणण्यास तयार आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपल्याकडे अंतिम आठवडा प्रस्ताव आहे. त्या ऐवजी आपल्याला या अहवालावर चर्चा घेता येऊ शकते. अधिवेशनाचा कालावधी वाढविण्यास आमची हरकत नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आता खुलासा झाला आहे.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाने चालले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी औचित्याचा मुद्दा मांडला आहे. आम्ही अनेक वर्षे पाहत आहोत की, औचित्याच्या मुद्याला उत्तर देता येत नाही. परंतु, तरी सुध्दा माननीय मंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहिले. तरीही 3-4 सन्माननीय सदस्य बोलत होते. हा औचित्याचा मुद्दा आहे की, चर्चा आहे ? आपण यावर चर्चा कशी घडवून आणत आहात ?

**तालिका सभापती** : मी सांगू इच्छितो की, पहिल्यांदा एक सन्माननीय सदस्य बोलले. त्यानंतर माननीय मंत्री बोलण्यास उभे राहिले. माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले. सर्व सन्माननीय सदस्यांच्या शंकाचे निरसन व्हावे असे मला वाटले.

(गोंधळ)

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

**तालिका सभापती** : आपणास औचित्याच्या मुद्यावर कशी चर्चा करता येईल ?

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा देखील यावर पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. अधिवेशन सुरू असताना केळकर समितीचा अहवाल सभागृहात सादर होण्यापूर्वी टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रामध्ये छापून आला आहे. अधिवेशन सुरू आहे. मात्र, केळकर समितीच्या अहवालाच्या संदर्भात सभागृहाला माहिती मिळत नाही. हा हेतू काय आहे ? माननीय मंत्र्यांनी या संदर्भात निवेदन करावे, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला पॉईंट ऑफ प्रोसिजर अतिशय रास्त आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्यांना काही हक्क प्राप्त झाले आहेत, त्या हक्कांचा भंग सरकारकडून होत असेल तर ते अत्यंत चुकीचे व गंभीर आहे. सभागृहाचे नेते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे ....

असे म्हणाले की, औचित्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याची प्रथा नाही. आम्हाला हे मान्य आहे. औचित्याच्या मुद्यावर उत्तर देऊ नका. परंतु, केळकर समितीचा अहवाल वर्तमानपत्रामध्ये येत असेल तर ते योग्य नाही, गोपनीय राहत नसेल तर ते योग्य नाही. आजच्या आज आपण सभागृहाच्या समोर तो अहवाल ठेवावा आणि पुढील 2 दिवसांत त्यावर चर्चा घ्यावी, वाटले तर अधिवेशन कालावधी वाढवावा. आम्ही त्यास नाही असे म्हणलो नाही. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राचा प्रश्न आहे. पॉईंट ऑफ प्रोसिजरद्वारे माझे असे सांगणे आहे की, आमचा हक्कभंग होत अहे. शासनाने असे करू नये. माहिती बाहेर जात आहे, ही चुकीची बाब आहे. ताबडतोब आजच्या आज केळकर समितीचा अहवाल सभागृहात आणून 2 दिवसांत अहवालावर चर्चा करावी, अशी मी या निमित्ताने माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांना विनंती करीत आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालावर सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. खरे म्हणजे, या अहवालातील काही मुद्दे वेगवेगळ्या स्वरुपात बाहेर आले आहेत. कालच त्यामधील काही कागदपत्रे मला प्राप्त झ ााली आहेत. ही कागदपत्रे बाहेरच्या सोर्समधून उपलब्ध झाली आहेत. विद्यापीठातील ज्या लोकांनी अभ्यास समितीच्या टिममध्ये काम केले आहे, त्या लोकांकडील काही कागदपत्रे नागपूरमध्ये उपलब्ध होत आहेत. वर्तमानपत्रात देखील भरपूर गोष्टी छापून आल्या आहेत. अशा वेळी शासनाने हा अहवाल सभागृहाला सादर करण्यास विलंब न लावता तो आजच्या आज सादर करावा. ही अतिशय महत्त्वाची आणि योग्य गोष्ट होईल. त्या दृष्टीने शासनाने उत्तर द्यावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हे अधिवेशन संपण्याअगोदर हा अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

माझे ऐकून घ्या. माझे उत्तर पूर्ण होण्यापूर्वीच आपण अडथळा आणत आहात.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण ऐकून घ्या.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, केळकर समितीचा अहवाल सभागृहाला सादर करुन शासनाला चर्चा घडवून आणावयाची नाही का ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांचे उत्तर तरी पूर्ण होऊ द्या.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विधिमंडळामध्ये या अहवालावर चर्चा झाली पाहिजे. अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा घेण्याऐवजी या अहवालावर सभागृहात चर्चा घडवून आणावी. या अहवालावर चर्चा घेण्यास काय हरकत आहे ? हा अहवाल बाहेर फुटलेला आहे. सर्वांच्या हातामध्ये आलेला आहे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या. त्यांचे उत्तर पूर्ण झाल्यावर कदाचित आपले सर्वांचे समाधान होईल.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, केळकर समितीचा अहवाल याच अधिवेशनात सभागृहाला सादर करण्याबाबत शासनाचा निर्णय झाला आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण ऐकून घ्यावे. परंतु, पूर्ण उत्तर ऐकून घेण्यास सन्माननीय सदस्य तयार नाहीत. अहवाल कसा फुटला, तेही मी सांगण्यास तयार आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण ऐकले पाहिजे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : कामकाज सल्लागार समितीमध्ये या अहवालावर चर्चा करण्याबाबत....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, अहवाल सभागृहाला सादर केल्याशिवाय अहवाल फुटला, हे आपण कसे ठरवित आहोत ? नेमका अहवाल काय आहे आणि आता जे मुद्दे बाहेर आलेले आहेत, ते काय आहेत, याचा मेळ घातल्याशिवाय अहवाल फुटला आहे, असे आपल्याला म्हणता येणार नाही. हा अहवाल 750 पानांचा आहे. एका वर्तमानपत्रात 750 पानांपैकी एका पानाबाबतची बातमी आली म्हणजे अहवाल फुटला, असे आपल्याला म्हणता येईल का ? एखाद्या प्रश्नपत्रिकेतील एखादा प्रश्न, एखाद्या विद्यार्थ्याने आदल्या दिवशी सांगितला म्हणजे पूर्ण प्रश्नपत्रिका फुटली, असे म्हटले जाते का ? या अगोदर अशा घटना 100 वेळा घडल्या आहेत. दांडेकर समितीचा अहवाल अधिकृतपणे मांडण्यापूर्वी वर्तमानपत्रात बातमी छापून आली होती. निर्देशांक समिती सन 1997 मध्ये गठीत करण्यात आली होती. त्याबाबतही बातमी छापून आली होती. हे खरे की नाही, हे सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगावे. त्यांनी सद्सद्विवेक बुध्दीने सांगावे. हे पवित्र सभागृह आहे. आज आम्ही विदर्भाच्या आणि मराठवाड्याच्या अनुशेषाबद्दल अतिशय चिंतित आहोत. या राज्यात असमतोल विकास झाला, हे शासनाला मान्यच आहे. असमतोल विकास समतोल विकासाकडे नेण्याची या शासनाची भूमिका आहे. या संदर्भात चर्चा करण्याची विनंती सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी केली आहे. खरे तर आपल्या गटनेत्यांना, आपल्या विधिमंडळाच्या प्रमुखांना........... चर्चा कधीही टाळली जात नाही. आपण जर ठराव करणार

...3.....



SRR/ AKA/ AKA/ MMP/ प्रथम श्री.मंगेश........... 12:20

श्री.सुधीर मुनगंटीवार..........

असाल तर अर्थसंकल्पीय अधिवेशन नागपूरमध्ये घेण्याची शासनाची तयारी आहे. आपली सर्वांची तयारी आहे का ? या प्रस्तावाला सर्वपक्षीय गटनेत्यांनी मान्यता द्यावी. आवश्यकता असेल तर तशा प्रकारची बैठक घ्यावी.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घेतल्यानंतर मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आज हा अहवाल सभागृहात सादर झाला तर पुढील दोन दिवस आपल्याला त्यावर चर्चा करता येईल. अंतिम आठवडा प्रस्तावावर आपण दिवसभर चर्चा करतो. त्याप्रमाणे आपल्याला केळकर समितीच्या अहवालावर देखील चर्चा करता येईल. त्यामुळे हा अहवाल आजच सभागृहाला सादर झाला पाहिजे. हा अहवाल अगोदरच फुटलेला आहे. त्यामुळे आजच तो सभागृहाला सादर करुन पुढील दोन दिवस त्यावर चर्चा घ्यावी. परंतु, तसे उत्तर मुद्दामहून शासन देत नाही. कारण, त्यांना तो सादरच करायचा नाही. या अहवालावर येथे, विदर्भात चर्चा शासनाला नको आहे. हा अहवाल पुढे नेण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परंतु, या अहवालावर येथेच चर्चा झाली पाहिजे, असा आमचा सर्वांचा आग्रह आहे. मंत्री महोदय कामकाज सल्लागार समितीचा दाखला देत आहेत. त्या ठिकाणी सुरुवातीला चर्चा झाल्यानंतर फक्त तीन दिवस सभागृह चालविण्याचा निर्णय घेतला गेला. त्यामुळे आता या तीन दिवसात कोणते कामकाज व्हावे, हे सभागृहाने ठरवायचे आहे. हा अहवाल सभागृहाला सादर झाला तर पुढील दोन दिवस आपल्याला त्यावर चर्चा करता येणार आहे. या अहवालामध्ये काय आहे, विदर्भाला न्याय कसा मिळेल, मराठवाड्याला न्याय कसा मिळेल, याबाबत अहवालाच्या माध्यमातून आपल्याला भूमिका घेता येणार आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, काही गोष्टी राज्यकर्त्यांना सांगता येत नाहीत. परंतु, सन्माननीय सदस्यांची इच्छाच असेल तर आम्हाला बोलावे लागेल. या अहवालावर चर्चा व्हावी, अशी ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे, तशीच ती शासनाचीही आहे. हा अहवाल 750 पानांचा आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये काय चर्चा झाली, हे बाहेर सांगण्याची प्रथा नाही. तरीही सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे याबाबतचा मुद्दा

...4....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे...........

उपस्थित करीत आहेत. कामकाज सल्लागार समितीमध्ये विधानसभेचे सन्माननीय गटनेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील व श्री.अजित पवार यांनी असे सांगितले होते की, हा अहवाल 750 पानांचा आहे, दोन दिवसात या अहवालाचा अभ्यास करणे शक्य नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी बोलत नाही, सांगत नाही, खाली बसतो. तुमचे म्हणणे बरोबर आहे. कामकाज सल्लागार समितीमधील चर्चा बाहेर सांगू नये, असेच आहे. परंतु, जर सन्माननीय सदस्य अशा प्रकारे शासनावर ॲलिगेशन करीत असतील तर ती चर्चा सांगण्याची माझी तयारी आहे. मी तर असे म्हटले होते की, अधिवेशनाचा कालावधी 15 दिवसांनी वाढवावा. ही माझी पहिल्यापासूनची भूमिका आहे आणि आजही ती तशीच आहे. सर्व सन्माननीय गटनेत्यांनी आज बैठक घ्यावी. आमची 15 दिवस कालावधी वाढविण्याची तयारी आहे. खरे तर ही मागणी सरकारनेच केली होती. अधिवेशन विदर्भात होत आहे, त्यामुळे अधिवेशनाचा कालावधी 15 दिवसांनी वाढवावा. आमची चर्चा करण्याची अजूनही तयारी आहे. परंतु, येथे सांगता येत नसल्यामुळे कोणी नकार दिला, हे मी येथे सांगणार नाही. कोण काय बोलले, हा भाग वेगळा आहे.

सभापती महोदय, हा अहवाल 750 पानांचा आहे. दोन दिवसात या अहवालावर अभ्यास होणार नाही. आणखी असे की, केळकर समितीचा अहवाल गोपनीय स्वरुपाचा नाही. ही समिती काही कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत नेमण्यात आली नव्हती. सांख्यिकी माहिती संकलित करुन सरकारने उपाययोजना करणे, हे या समितीचे पहिले उद्दिष्ट आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे असेही म्हणणे आहे की, हा अहवाल फुटला आहे. परंतु, हा 750 पानांचा अहवाल सादर झाल्यानंतर आपल्याला फुटलेल्या मुद्यांची आणि अहवालाची तुलना करता येईल आणि हे ठरविता येईल की, हा अहवाल खरोखरच फुटला आहे का ? जोपर्यंत हा अहवाल सभागृहाला सादर केला जात नाही तोपर्यंत फुटलेली माहिती अहवालातीलच आहे, हे आपण कशावरुन ठरवित आहात ? या अहवालासंदर्भातील बातमी टाईम्स ऑफ इंडियामध्ये आलेली आहे.

...5....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : मग ही माहिती अहवालातील नाही, हे आपण कशावरुन ठरवित आहात ?

श्री.एकनाथ खडसे : आता कोठे तुम्ही मुद्यावर आला आहात. नसेल कशावरुन ? अद्याप शासनाने अहवालच सभागृहाला सादर केलेला नाही. हा काही प्रतिष्ठेचा प्रश्न नाही. मराठवाड्यावर, विदर्भावर सर्वात जास्त अन्याय झाला आहे, अशी तुमची भावना आहे. खरे तर महाराष्ट्रात सर्वात जास्त अन्याय खानदेशवर झाला आहे. मी तो अहवाल वाचला आहे. महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त अन्याय खानदेशवर झाला आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

मी मंत्री आहे. तुम्ही मंत्री नाही, हे लक्षात घ्या. पण तुम्ही इकडे आला तर मंत्री होऊ शकता. काही लोक इकडे येऊ घातले आहेत. चर्चा करण्यास हरकत नाही. माझे तर असे म्हणणे आहे की, यावर सखोल चर्चा झाली पाहिजे.

यानंतर श्री.वि.खर्चे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..

काही लोकांवर अन्याय झाला आहे, समन्यायी वाटप झाले पाहिजे अशी भूमिका शासनाची आहे. केळकर समितीचा अहवाल या अधिवेशनात ठेवण्याची सरकारची तयारी आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना माहीत आहे की, केळकर समितीचा अहवाल सदनात सादर केला पाहिजे. विदर्भातील अधिवेशनात या अहवालावर चर्चा झाली पाहिजे. आज अहवाल सादर केला तर दोन दिवस चर्चा होऊ शकते. अंतिम आठवडा प्रस्तावावर देखील आपण शेवटी चर्चा करतो. अहवाल जास्त पानांचा आहे, त्यांचे वाचन होणार नाही असे येथे सांगितले जाते. कोणताही अहवाल सादर झाल्यावर दुसऱ्या दिवशी चर्चा घेतली पाहिजे. त्यामुळे या अधिवेशनात केळकर समितीच्या अहवालावर दोन दिवस चर्चा घेण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालावर चर्चा करण्यास सरकारची तयारी आहे. उद्या आणि परवा असे दोन दिवस सभागृहात चर्चा करता येईल. त्यामुळे मग अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याची गरज लागणार नाही. केळकर समितीच्या अहवालात जे आहे ते आमच्या काळात झालेले नसून ते आघाडी सरकारच्या काळात झालेले आहे. त्यामुळे त्यामध्ये लपविण्यासारखे काहीही नाही. दोन दिवस चर्चा करुन अहवालावरील चर्चा संपवून टाकता येईल. हा अहवाल आमच्या काळातील नसल्यामुळे आम्ही चर्चा करण्यास पुढाकार घ्यायला पाहिजे. केळकर समितीच्या अहवालावर चर्चा करावयाची असेल तर सभापती महोदयांकडे बैठक घ्या. सर्व गट नेत्यांची तयारी असेल तर आज सायंकाळी केळकर समितीचा अहवाल सभागृहात सादर करण्यात येईल व पुढील दोन दिवस चर्चा करण्यात येईल. चर्चा केली तर ज्या भागावर अन्याय झाला आहे त्या भागाला न्याय मिळेल. अधिवेशनाचा कालावधी आणखी 15 दिवस वाढविण्यास गटनेत्यांची मान्यता असेल तर सरकारची तयारी आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्यावर आपण कोणत्या नियमान्वये चर्चा सुरु ठेवलेली आहे, हे ठरविणे महत्वाचे आहे. केळकर समितीचा अहवाल गोपनीय नाही असे मंत्री महोदयांनी आता सांगितले आहे, हे बरोबर आहे. परंतु केळकर समितीचा अहवाल गोपनीय नसला तरी तो प्रथम सभागृहात मांडला पाहिजे हा सभागृहाचा हक्क आहे. ही बाब सरकारला नाकारता येणार नाही. अहवाल गोपनीय नाही म्हणून तो टाईम्स ऑफ इंडिया व इतर वर्तमानपत्रात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे..

येणे हे योग्य नाही. याचे समर्थन करण्यात येऊ नये त्यापेक्षा हा अहवाल फुटला कसा याची चौकशी सरकारने केली पाहिजे. या अहवालावर चर्चा होणे आवश्यक आहे. हा अहवाल राज्याला दिशा देणारा आहे. दांडेकर समिती, अनुशेष निर्मूलन समिती अशा समित्यांचे अहवाल आहेत. सन 2000 मध्ये स्व.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना राज्यपाल महोदयांच्या निर्देशाचे पालन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय आघाडी सरकारने पहिल्यांदा घेतला होता. गेल्या 14 वर्षापासून राज्यपाल महोदयांच्या आदेशानुसार अनुशेषासंदर्भातील कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे केळकर समितीच्या अहवालावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. हा अहवाल 750 पानांचा आहे. सरकारने तो कधीही सादर केला तरी चालेल परंतु या अहवालाचे वाचन करण्यास वेळ लागणार आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, केळकर समितीचा अहवाल शासनाकडे गेल्या 6 महिन्यापूर्वी प्राप्त झालेला आहे. हा अहवाल आघाडी सरकारने सभागृहात का मांडला नाही ? सभागृहात अहवाल सादर करुन चर्चा करण्यास सरकारची तयारी आहे. विनाकारण एक एक गोष्ट बाहेर कशाला काढावयास लावता आहात. त्यापेक्षा या अहवालावर आपणाला चर्चा करता येईल. अहवाल फुटला असेल तर तो तत्कालीन सरकारच्या काळात तर फुटला नाही ना ? आघाडी सरकारच्या माजी मुख्यमंत्री महोदयांच्या हातामधून हा अहवाल तर गेला नाही ? यातून अनेक प्रश्न निर्माण होतील, त्यामुळे यावर जास्त चर्चा करु नका. सरकारकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत. अहवालावर चर्चा करण्यास सरकारची तयारी आहे. त्यामुळे हा विषय येथे संपविण्यात यावा. आघाडी सरकारने पाच महिने अगोदर हा अहवाल सभागृहात का मांडला नाही अशी आम्ही विचारणा करीत नाही. महत्वाचा विषय आहे, त्याला वेगळे वळण देऊ नका. हा अहवाल गांभीर्याने घेऊन त्यावर चर्चा करावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : केळकर समितीचा अहवाल सरकार सभागृहासमोर मांडत नसल्यामुळे आम्ही सरकारचा निषेध करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो.

सभापती महोदय, राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायदा अस्तित्वात आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून मापाडी, माथाडी, अडते यांना न्याय देण्याचे काम केले जाते. कृषी मालाला चांगला भाव मिळाला पाहिजे, असा उद्देश जपला जातो. राज्यात 250 पेक्षा जास्त कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. आज काही महत्वाच्या बाजारपेठा त्यामध्ये नाशिक जिल्ह्याची बाजारपेठ, नवी मुंबईतील एपीएमसी मार्केट, पुणे एपीएमसी मार्केट व इतर काही मार्केटमध्ये बंद पाळला जात आहे व त्यांनी बेमुदत बंदचा इशारा दिलेला आहे. पणन विभागाच्या संचालकांनी दोन परिपत्रके काढली आहेत. पहिले परिपत्रक 16 डिसेंबर, 2014 रोजी काढले आहे. दुसरे परिपत्रक 20 डिसेबर, 2014 रोजी काढले आहे. या दोन्ही शासन निर्णयात त्यांनी धोरणात्मक निर्णय घेण्याचे जाहीर केले आहे. यामध्ये अडते व मापाडी यांच्याबाबत काही मुद्दे उपस्थित केले आहेत. याबाबत कोठेही चर्चा करण्यात आलेली नाही. शासनाने कोणतेही निवेदन केलेले नाही. व्यापाऱ्यांचे म्हणणे ऐकण्यात आले नाही. तेथील अधिकारी मनमानी कारभार करीत आहेत. शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी औरंगाबाद खंडपीठाने शेतकऱ्यांनी विकलेल्या मालाच्या रकमेतून माथाडी कामगारांची लेव्ही कपात करु नये, असा निर्णय दिला होता, तेव्हा माजी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी निर्णय घेऊन त्याबाबत अंमलबजावणी केली. आज पणन संचालकांनी जो निर्णय घेतला त्या निर्णयाला ताबडतोब स्थगिती दिली पाहिजे सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे व माननीय पणन मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांना मी विनंती करतो की, त्यांनी अशा उर्मट अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे. असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य..

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी अतिशय चांगला औचित्याचा मुद्दा मांडला आहे...गोंधळ..

श्री.भाई गिरकर : अध्यक्ष महोदय, औचित्याच्या मुद्याला उत्तर देण्याची प्रथा नाही. औचित्याचा मुद्दा वाचून दाखववायाचा असतो...गोंधळ..

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य भाई गिरकर विनाकारण गैरसमज करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी जो औचित्याच्या मुद्दा मांडला त्यावर उत्तर देण्यास माननीय सहकार मंत्री उभे राहिले होते. ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे त्यांना सरकारच्यावतीने निवेदन करावयाचे होते. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला आहे. त्या विषयाला जोडून मला एवढेच सांगावयाचे आहे की, पणन संचालकांना सेवानिवृत्त होण्यासाठी चार दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे ते असेच वेडेवाकडे निर्णय घेतील म्हणून सरकारने त्यांचे निर्णय घेण्याचे अधिकार गोठविले पाहिजेत. मंत्री महोदयांची मान्यता घेऊनच त्यांनी निर्णय घेतले पाहिजे असे आदेशित करावे, अशी मला सूचना करावयाची आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, एका निर्णयामुळे राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आज व्यवहार बंद झाले आहेत. त्यासंदर्भातील निवेदन करण्यास मी उभा आहे. औचित्याच्या मुद्दयाला उत्तर देण्याची प्रथा नसली तरी यासंदर्भातील निवेदन आता होणे आवश्यक आहे. कारण संपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सौदे आता थांबले आहेत, ट्रक व ट्रॅक्टर उभे आहेत. शेतकऱ्यांच्या फायद्याचा हा निर्णय आहे. या रचनेतून अडत्याला बाहेर काढून त्याचे कमिशन बंद करणे, वेगवेगळ्या प्रकारे अडत्याचे कमिशन, तोलाई, हमाली वगैरे यातून जवळपास 12.40 टक्के किंवा 15 टक्के इतकी कपात शेतकऱ्यांच्या बिलातून होत असते. अडते पध्दत व अडत्यांचे कमिशन बंद करावे असा निर्णय सरकारने 1995 मध्ये घेतला होता, यामध्ये व्यापारी खरेदी करतो त्या खरेदीदाराने अडत्यांचे कमिशन द्यावे, असे ठरविण्यात आले होते, त्यावेळी देखील मोठे आंदोलन झाले व बाजार समित्या बंद राहिल्यामुळे त्या निर्णयाला सरकारने स्थगिती दिली होती. सन 1998 मध्ये पुन्हा शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी देखील आंदोलने झाली व त्या निर्णयास शासनाने स्थगिती दिली होती. यासंदर्भातील निर्णय सरकारला केव्हा तरी करावा लागणार आहे. अडत्यांना कमिशन देणे किंवा याबाबत पर्यायी व्यवस्था निर्माण करावी लागेल. रुपये 40 हजार कोटीचा ऑनपेपर हा व्यवहार आहे.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

ज्याच्या पावत्या होत नाहीत असा रू 2 लाख कोटीचा व्यवहार आहे. त्यामुळे यामध्ये कोणती पर्यायी व्यवस्था उभी करता येईल, मधला मार्ग काढता येईल का, अडत्याचे कमिशन निम्मे व्यापाऱ्यांनी आणि निम्मे शेतकऱ्यांनी सोसावे, अशा प्रकारचे अनेक विषय आहेत. इलेक्ट्रॉनिक कॉटयावर वजन इ ाले तर मग तोलाईचे पैसे शेतकऱ्यांनी का द्यायचे असा प्रश्न आहे. अडत्याचे कमिशन व्यापाऱ्यांनी सोसावे असा जो निर्णय आज घेण्यात आलेला आहे त्याच्या निषेधार्थ संपूर्ण महाराष्ट्रातील बाजार बंद झालेला आहे. त्यामुळे तो निर्णय आज आम्ही स्थगित करीत आहोत. येत्या 15 दिवसामध्ये अडते, व्यापारी आणि शेतकरी, तसेच हमाल यांच्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची एकत्र बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे आज जो निर्णय घेण्यात आलेला आहे त्याला शासन स्थगिती देत आहे. महाराष्ट्रातील सर्व व्यापाऱ्यांना आणि शेतकऱ्यांना सौदे आणि व्यापार सुरु करण्यासंबंधीचे आवाहन आम्ही करीत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला की पणन महासंचालक श्री. माने हे 31 डिसेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. मागच्या सरकारच्या वेळी त्यांनी अशा प्रकारचे अनेक निर्णय केलेले होते. त्या निर्णयाच्या बाबतीत सरकारने त्यांना सस्पेण्ड केले होते. सस्पेनशनच्या विरुध्द ते मॅटमध्ये गेले असता सस्पेनशन रद्द होऊन मॅटने सरकारला 2 लाख रुपयाचा दंड ठोठावला. सरकार त्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात गेल्यानंतर उच्च न्यायालयाने 2 लाख रुपयाचा दंड 20 हजार रुपये केला आणि त्यांचे निलंबन रद्द करण्यात आले. 1990साली एक परिपत्रक निघाले होते. त्या परिपत्रकान्वये महासंचालकांना अधिकार प्राप्त झाले होते. त्या अधिकाराचा वापर करुन त्यांनी काल सरकार बरोबर सल्लामसलत न करता निर्णय घेतला. अडत्यांचे कमिशन हा जसा महत्वाचा विषय आहे त्याप्रमाणे बाजार बंद होणे किंवा माल विकल्यानंतर व्यापारी पैसे न देता पळून गेला तर कोण जबाबदार, याबाबत पर्यायी विचार करणे आवश्यक आहे. श्री. माने हे 31 डिसेंबर 2014 रोजी निवृत्त होणार आहेत, तोपर्यंत त्यांनी काही धोरणात्मक निर्णय घेता कामा नये. मध्यंतरी त्यांचे अधिकार काढण्याचा प्रयत्न केला असता

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

श्री. चंद्रकांत पाटील...

त्यालाही मॅटने स्टे दिलेला आहे. निवृत्त होण्यापूर्वीचे 5-6 दिवस त्यांच्यासाठी मोठे आहेत. त्यांनी कोणताही धोरणात्मक निर्णय घेऊ नये यासाठी त्यांचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार शासन गोठवित आहे.

मापाड्यांशी संबंधित काढलेल्या परिपत्रकालाही स्थगिती देण्यात येत असून सर्वांचा एकत्रित निर्णय करण्यात येईल.

श्री. नरेंद्र पाटील : सन्माननीय सहकार आणि पणन मंत्री महोदय श्री. चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अजून 4 दिवसांनी म्हणजे दिनांक 26 डिसेंबर 2014 रोजी थोर समाजसेवक, वैदर्भीय स्वर्गीय बाबा आमटे यांच्या जन्म शताब्दी वर्षाची सांगता होणार आहे. गेले वर्षभर बाबांच्या या शताब्दी सोहळया निमित्त कुठेही काही कार्यक्रम झाले किंवा नाही या बद्दल इतकी प्रचंड उदासीनता आहे की त्याबद्दल जितके बोलावे तितके थोडेच आहे. बाबा आमटेंना 1971 साली पद्मश्री पुरस्कार मिळाला, 1985मध्ये आंतरराष्ट्रीय मॅगसेसे ॲवार्ड मिळाला, 1986मध्ये पद्मविभूषण पुरस्कार मिळाला, युनायडेड नेशनचे फिल्ड ऑफ ह्युमन राईटचे बक्षीस 1988मध्ये मिळाले आणि गांधी पीस प्राईज 1999मध्ये मिळाले. या माणसाने आयुष्यभर काम केले. त्यांची महत्वाची क्वोटस् आता माझ्याकडे आहेत. त्यांनी लिहिलेले एकच वाक्य मी सांगतो. ते म्हणतात one can live without finger एक वेळ बोटे नसली तर तुम्ही जगू शकल पण not without self respect, कुष्ठ रोग्यांच्या बाबतीत मुळापर्यंत जाऊन त्यांच्या जीवनामध्ये आनंदवन फुलविणारा एक महान योगी यांच्या जन्मशताब्दी वर्ष असताना त्यांचा आपणा सर्वांना विसर पडणे हे अत्यंत दु:खदायक आहे. मला वाटते की, अजूनही वेळ गेलेली नाही. शासनाला माझी विनंती आहे की, त्यांनी केन्द्र सरकारकडे पाठपुरावा करुन बाबा आमटेंच्या कार्याबद्दल एक विशेष टपाल तिकीट काढण्याचा आग्रह केन्द्र सरकारकडे धरावा आणि या सुपुत्राचा योग्य तो सन्मान, त्याची आठवण त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने शासन करीत आहे हे लोकांसमोर यावे असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी ज्या विषयाबद्दल आता भाष्य केले तो विषय सर्वांसाठी प्रेरणा देणारा आहे. आनंदवन हे सर्वांना प्रेरणा देणारे आहे. हा देश सेवेची पूजा करणारा देश आहे. या देशातील आनंदवनात आत्मसन्मानाने मग तो अंध असेल, अपंग असेल त्यांना आत्मसन्मानाने जगण्याचे शिकविले. ज्या काळात महारोग्याला घरचे कुटुंब घरात ठेवीत नव्हते अशा काळात स्वर्गीय बाब आमटेंनी हा सेवेचा मंत्र दिला. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हे त्यांचे जन्म शताब्दी वर्ष पाहूनच गेल्या 6 महिन्यापासून शासनाच्या वतीने नव्हे तर मी व्यक्तिगत जो प्रयत्न केला त्याला यश देखील आलेले आहे. त्यांच्या टपाल तिकिटाचे अनावरण येत्या 30 तारखेला होणार होते. पण काही तांत्रिक

..4..



श्री. हेमंत टकले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अडचणीमुळे 30 तारखेच्या कार्यक्रमाला येणे माननीय राज्यपालांना आणि माननीय केंद्रीय मंत्र्यांना शक्य होत नाही. या कार्यक्रमाचे निमंत्रण माननीय मुख्यमंत्र्यांना देखील दिलेले आहे. 30 तारखेऐवजी येणाऱ्या काही दिवसांमध्येच बाबा आमटे यांच्या सन्मानार्थ टपाल तिकिटाचे विमोचन करण्यात येणार असून त्यास मान्यता देखील मिळालेली आहे.

या सोबतच वरोरा रेल्वे स्टेशनला "आनंदवन" असे नाव देण्याचा प्रस्ताव माननीय रेल्वे मंत्रालयाकडे पाठवित असून या प्रस्तावाला देखील केन्द्र सरकाची निश्चितपणे मान्यता मिळेल असा मला विश्वास आहे. याच बरोबर स्व. बाबासाहेब आमटे यांच्या स्मरणार्थ आपणा सर्वांशी चर्चा करून एक योजना करण्याचा शासनाचा विचार आहे. या बाबतीत निर्णय घेण्यात येईल.

---

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) K-5

MSS/ AKA/ MMP/ पूर्वी श्री. विठ्ठल खर्चे 12:40

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

विधिमंडळाचा आणि संसदेचा कारभार हा भारतीय राज्य घटनेप्रमाणे चालला पाहिजे अशी आपली सर्वांची अपेक्षा आहे. केवळ विरोधी पक्षाने सरकारवर टीका करावी, प्रत्येक वेळी सरकारला अडचणीमध्ये आणावे असा विरोधी पक्षाचा उद्देश असू नये. आमचा तसा उद्देश नसतो. पण सर्वसामान्य जनतेची कामे व्हावीत यासाठीची प्रक्रिया शासनाने पार पाडली पाहिजे एवढीच आमची अपेक्षा आहे. राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली, अवकाळी पाऊस आला. त्यामुळे पालकमंत्र्यांनी अनेक महत्वाचे निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याची आवश्यकता आहे. कधी नव्हे ती राष्ट्रपतीची राजवट निवडणुकीपूर्वी आपल्या राज्यात लागू झाली. सर्व कारभार अधिकाऱ्यांच्या हातात गेला. त्यानंतर निवडणुका झाल्या. तोपर्यंत देखील कारभार अधिका-यांच्याच ताब्यात होता. आज आपले सभागृह चालू आहे. पण स्थानिक पातळीवर पालकमंत्र्यांची निवड न झाल्यामुळे नियोजन समित्यांच्या बैठक, आराखडा इत्यादी प्रश्न अडून राहिलेले आहेत. सरकारने या बाबतीत दिरंगाई न करता पालकमंत्र्यांची यादी जाहीर करावी. यामध्ये युतीतील दोन पक्षामध्ये काही गुफ्त-गु असेल ते आपण सोडवू शकता. मंत्री महोदय श्री. चंद्रकांत पाटील हे चांगले मध्यस्थी आहेत. तेव्हा या बाबतीत चर्चा करून तातडीने पालकमंत्र्याची घोषणा करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**विरोधी पक्षनेत्यांच्या घोषणेसंबंधी**

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, नवीन सरकार गठीत झाल्यानंतर हे पहिले अधिवेशन आहे. पहिल्या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यातील आजचा पहिला दिवस आहे. दोन दिवसांनी हे अधिवेशन संपेल. अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसापर्यंत प्रत्येक दिवशी विरोधी पक्ष नेत्याच्या घोषणे बाबत मी सरकारचे आपल्या मार्फत नेहमी लक्ष वेधित होतो.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

सभापती महोदय, ही बाब तुम्हा-आम्हाला, कोणालाही भूषणावह नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान देत असताना संसदीय लोकशाही व्यवस्थेची परंपरा उत्तमरित्या उभी केली आहे. हाऊस ऑफ कॉमन्सच्या धर्तीवर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष या दोन गोष्टींची आवश्यकता अधोरेखित केली आहे. अशा वेळेला सभागृहाचे नेते आहेत, उप नेते आहेत, मुख्यमंत्री या नात्याने नेते सुध्दा आहे. पण विधानपरिषदेला विरोधी पक्षनेता नाही ही बाब आपल्या सर्वांना भूषणावह नाही. अधिवेशनाचे दोन दिवस शिल्लक राहिलेले आहेत. हा लोकांचा अधिकार आहे. विरोधी पक्षांचा अधिकार आहे. आज राज्यात जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्या संदर्भात विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा राज्याच्या वेगवेगळया भागात जाऊन त्या भीषण परिस्थितीचे अवलोकन करणे, माहिती जाणून घेणे, शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेणे आणि राज्य सरकारपुढे त्यांचे प्रतिनिधीत्व करणे हा लोकांचा त्या माध्यमातून अधिकार आहे. कोण्या एका व्यक्तीच्या गळ्यात विरोधी पक्षनेत्याची माळ घालावी यासाठी आग्रह नाही.

संसदीय लोकशाही परंपरा जतन करण्यासाठी ही बाब महत्वाची असल्यामुळे जसा मघाशी केळकर समितीचा अहवाल आजच्या आज सभागृहापुढे जाहीर करावा असा आग्रह धरला त्याच धर्तीवर संसदीय लोकशाहीचे महत्व आम्हाला कळले असेल तर विरोधी पक्षनेत्याची घोषणा आजच्या आज झाली पाहिजे अशी पुन्हा एकदा आमच्या पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मागणी करतो.

**उप सभापती** : आपल्या भावना माननीय सभापतींना कळविण्यात येतील.

--------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन 2010-2011 या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----------

श्री.एकनाथराव खडसे (पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन 2013-2014 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2010-2011 या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन 2011-2012 या वर्षाच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2011-2012 या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2012-2013 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2012-2013 या वर्षाचा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन 2012-2013 या वर्षाचा अलग लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अलग लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2012-2013 या वर्षाचा सोळावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन 2012-2013 या वर्षाचा सेहेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.चंद्रशेखर बानवकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2010-2011, 2011-2012 व 2012-2013 या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

नियम 93 अन्वये निवेदने

**पृ. शी./ मु.शी.** : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई
यांच्याकडून शेतकऱ्यांना वेळीच कर्ज न मिळणे
याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स.
यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य सहकारी बँकेकडून शेतकऱ्यांना देण्यात येणारे कर्ज वाढविले पाहिजे अशी भूमिका राज्य व केंद्र सरकारची असताना राज्य सहकारी बँकेने 150 कोटीचे उद्दिष्ट असूनही केवळ 113 कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. याबाबत राज्य शासनाने या बँकेकडून स्पष्टीकरण मागविले आहे काय?

सभापती महोदय, बँकेकडे ठेवी असतील तरच कर्ज मिळेल हे उत्तर योग्य आहे काय? बँकेच्या ठेवी कमी आहेत म्हणून कर्ज दिले नाही ही बँकेची मेहेरबानी नसून कर्ज वाटप करणे ही बँकेची जबाबदारी आहे. त्रिस्तरीय व्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांना कर्ज दिले पाहिजे. राज्य सहकारी बँकेच्या किती अधिकाऱ्यांनी आणि प्रशासकांनी जिल्हा बँकेबरोबर चर्चा केली आहे, जिल्हा बँकेने किती वेळा भेटी दिल्या, ज्या जिल्हा बँकेच्या ठेवींवर राज्य सहकारी बँकेचा कारभार चालतो त्याबाबत राज्य सहकारी बँकेच्या प्रशासक मंडळाला आणि एम.डी.ना शासन योग्य समज देईल काय? प्रशासकाच्या काळात एकूण 12 सहकारी साखर कारखान्यांची लिलावाद्वारे विक्री करण्यात आली. हा व्यवहार संशयास्पद वाटतो. म्हणून या व्यवहाराची शासन चौकशी करणार आहे काय? त्यात काही अधिकाऱ्यांचा आणि प्रशासकांचे आर्थिक हितसंबंध आहेत अशी आमची धारणा आहे. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी शासन करणार आहे काय?

नंतर एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 ची निवेदने .........

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी पीक कर्जासंबंधीचा प्रश्न विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, पीक कर्जासाठी एकूण रक्कम 7500 कोटी रुपये इतकी रक्कम नाबार्डने राज्य सहकारी बँकेला मंजूर केली होती त्यातील 6500 कोटीचे पीक कर्ज वाटप झ ाले असून पुढील काळात हे उद्दिष्ट देखील पूर्ण होईल त्यामुळे मिळालेल्या रकमेपेक्षा कमी कर्ज देतो असे म्हणता येणार नाही. तसेच नाबार्डने आपल्याला लांबचा विचार करुन विहिरी खोदणे अथवा ठिबक सिंचन सारख्या ज्या इन्फ्रास्ट्रक्चरल बाबी आहेत त्यासाठी 2 हजार कोटी एवढी रक्कम देऊ केली. पण त्यावर नाबार्डने 11.85 टक्के एवढा व्याज दर लावल्याने ते शेतकऱ्यांना पेलवणारे नाही म्हणून ही रक्कम आपण वापरलेली नाही. वास्तविक जिल्हा सहकारी बँकांनी यासंबंधीचे मार्केटिंग व्यवस्थित केलेले नाही याचे कारण शेतकरी आजही 36 ते 48 टक्के व्याज दराने विहिरी खोदणे आणि ठिबकसारख्या कामासाठी कर्ज घेत असतात त्या तुलनेत हा 11.85 टक्के व्याजाचा दर खूपच कमी आहे, अशा प्रकारे जिल्हा बँकांना योग्य प्रकारे मार्केटिंग करण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या आहेत.

सन्माननीय सदस्यांनी ज्या 12 सहकारी साखर कारखान्यांचे लिलाव शासनाने केल्याचा मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, या 12 सहकारी साखर कारखान्यांकडून राज्य सहकारी बँकेला मोठ्या प्रमाणात येणी असल्यामुळे राज्य सहकारी बँक अडचणीत आली त्यामुळे बँकेने या कारखान्यांच्या प्रॉपर्टीचा लिलाव करण्यास सुरुवात केली. त्यासाठी आवश्यक असलेली सर्व प्रक्रिया राज्य सहकारी बँक पूर्ण करुन मग त्यात तशा नोटिसेस इश्यू करणे, समाजातील वेगवेगळ्या लोकांना जे असे कारखाने लिलावात घेण्यास उत्सूक आहेत अशा लोकांच्या निविदा भरणे, सर्वात जास्त निविदा भरलेला असतील त्यांनाच ते देणे हे काम सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे ही प्रोसिजर फॉलो करताना त्यात जर भ्रष्टाचार झाला असेल अथवा कोणाला फेवर केले असेल तर त्याबाबतची चौकशी करण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, शासनाने जी प्रक्रिया पार पाडली तीच आम्ही वापरली असता आम्हाला शासनाने नोटिसेस पाठविल्या आणि निविदा वाढवून घेतल्या म्हणून हा व्यवहार संशयास्पद आहे. अशा प्रकारे शासनाचे अधिकारी मात्र खाजगी मालमत्ता असल्यासारखेच

...........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...........

वागतात. आम्ही वर्षानुवर्षे जिल्हा व राज्य सहकारी बँकेत काम करताना जबाबदारी आणि प्रभावीपणे काम केले आहे. आम्ही फॉलो केलेल्या प्रोसिजरला विरोध केला जातो मात्र शासनाकडून तीच प्रक्रिया पार पाडतांना त्याला मान्यता दिली जाते म्हणून याप्रकरणाची चौकशी शासन करणार काय, त्याचबरोबर नाबार्डकडून मिळणाऱ्या 2000 कोटीच्या रकमेवर असलेला 11.85 टक्के व्याज दर जिल्हा बँकांना जास्त वाटतो हे ठरविण्याचा अधिकार एकतर्फी शासनाला कसा आहे याचेही स्पष्टीकरण झाले पाहिजे. त्यासंदर्भात जिल्हा बँकेशी चर्चा करण्याची गरज वाटली नाही काय, आमची रायगड जिल्हा सहकारी बँक ही केवळ राज्यच नव्हे तर देशाच्या पातळीवर नंबर एकची बँक असताना अशा प्रकारे केवळ शासनाच्या पातळीवरच व्याज दराबाबतचा निर्णय घेणे योग्य आहे काय ?

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, 2000 कोटीची रक्कम नाबार्डने आपल्याला ऑफर केली असून शेतकऱ्यांना हा पैसा 12 टक्के व्याज दराने देताना खरे तर जिल्हा बँकांनी प्रो-ॲक्टीव्ह पध्दतीने भूमिका घेण्याची गरज होती पण तशी ती घेतली गेली नाही, तशा सूचना जिल्हा बँकांना देण्यात येतील आणि शेतकऱ्यांना या रकमेचा 12 टक्के व्याज दराने पुरवठा करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. त्यानंतर ज्या 12 सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रोसिजरबाबतचा मुद्दा उपस्थित करुन शासन पातळीवरील संशयास्पद भूमिका विशद केली त्याचीही चौकशी करण्यात येईल व यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

-----------

...........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: राज्यात दुर्बल व मागास जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची रक्कम वेळेवर न मिळणे याबाबत श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी निवेदन क्र. 2 आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन क्र. 2 सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

------------4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, सामाजिक न्याय विभागाकडून मागास जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची योजना राबविली जाते. पण काही विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळते तर लाखो विद्यार्थी आजही या शिष्यवृत्तीपासून वंचित राहतात. याबाबत मंत्री महोदयांनी निवेदनात सांगितले की, काही विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पूर्तता झालेली नसल्याने ते वंचित राहिले आहेत. या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, एकूण ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करावयाचे असते त्यासंबंधीचे नियोजन शासनाने अगोदरच करुन घेणे आवश्यक आहे, तसे शासन करणार काय, तसेच ज्या विद्यार्थ्यांना निधीअभावी शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागते अशांच्या बाबतीत शासन ज्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देय असेल अशा 100 टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम कशी मिळेल याचे नियोजन करणार काय, आणि नोकरी व अन्य प्रवेशासाठी नॉन क्रिमीलेयरची सध्याची 4.50 लाख उत्पन्न मर्यादा आहे ती 6 लाखापर्यंत करण्याचा विचार शासन करणार काय ?

श्री. दिलीप कांबळे : महोदय, अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून दरवर्षी वंचित राहतात हे खरे आहे पण यात प्रामुख्याने शिष्यवृत्ती देय असणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या हे सुध्दा एक कारण म्हणता येईल. मागील वर्षी जेवढे विद्यार्थी पात्र होते त्या पेक्षा पुढील वर्षी ही संख्या वाढलेली असते त्यात काही मुलांची कागदपत्रे अपुरी असतात अशी कारणे आहेत. या निमित्ताने मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, राज्यातील सर्वच ओबीसी व अन्य मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येईल मग त्यात कोणाचे ऑनलाईन अर्ज असोत अथवा फॉर्म भरलेला नसो, जे पात्र असतील अशा सर्वांनाच ही रक्कम देण्यात येईल. त्यानंतर ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी आणि नोकरीत पात्र ठरण्यासाठी नॉन क्रिमीलेयरची मर्यादा 4.50 लाखावरुन 6 लाख एवढी करण्याची मागणी देखील सन्माननीय सदस्यांनी केली त्याबाबत मी सांगू इच्छितो की, यासंदर्भातील निर्णय शासन पातळीवर तातडीने घेण्यात येईल. अशा प्रकारे हे शासन विद्यार्थ्यांच्या बरोबरच असून कोणत्याही प्रकारे त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही.

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, काही महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून अगोदर फी ची रक्कम जमा करुन घेतात, शासनाकडून त्यांना ती रक्कम रिअम्बर्स झाल्यानंतर त्यातील काही महाविद्यालये अशा रकमा परत करतात आणि काही महाविद्यालये त्यांना वाटेल त्यावेळेस परत करतात...........

यानंतर श्री. भारवि------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा हा विषय आहे. मी आपल्या मार्फत सदनाला सांगू इच्छितो की, कुठल्याही महाविद्यालयाने यासंबंधातील आगाऊ फी घेऊ नये. महाविद्यालयांना शासनाचे पैसे हे खात्रीशीरपणे येतात. जर कोणतेही महाविद्यालय पैसे घेत असतील तर त्याची चौकशी करण्यात येईल.

**उप सभापती** : ज्या महाविद्यालयांमध्ये सर्व शासकीय नियम पाळले जातात त्यांना मात्र शासनाच्या धोरणांमुळे भुर्दंड बसतो. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे महाविद्यालयांमध्ये वेळेवर न पोहोचल्यामुळे ते विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नाही. त्याकरिता शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, कोणत्याही महाविद्यालयावर अथवा त्यांच्या प्रशासनावर कारवाई करण्यात येणार नाही. शासनातर्फे सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे संबंधित महाविद्यालयांना वेळेवर पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म.वि.प.नियम 93 अन्वये वरील निवेदनासंबंधी पॉईंट ऑफ प्रोसिजर**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. आपण गुरुवारी माझ्या एका मुद्यासंबंधी शासन सोमवारी निवेदन करील अशा प्रकारचे निदेश दिले होते. या पूर्ण अधिवेशनात म.वि.प.नियम 93 अन्वयेवरील एकच निवेदन आता पर्यंत आलेले आहे. निवेदने वेळेवर येत नाही हे निदर्शनास आणून देण्याची आजची ही तिसरी वेळ आहे. मी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनांपैकी केवळ एकच सूचनेवरील निवेदन आलेले आहे. विरोधी पक्षाची आयुधे न कळत गोठविण्याचा कोणी प्रयत्न करीत असेल तर ते चुकीचे आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांकडून म.वि.प.नियम 93 अन्वये प्रस्तावाची सूचना देण्यात येते ती पीठासीन अधिकारी आम्ही वाचून दाखवितात. आपल्या सूचना विभागाकडे पाठविण्यात आल्या असून त्यावरील निवेदने जसजशी येतील तसतशी ती घेण्यात येतील. तरी देखील मी आपल्या या स्पेसिफिक प्रश्नासंबंधी स्वत: लक्ष घालतो आणि आपणाला उद्या पर्यंत व्यवस्थित उत्तर देतो.

................

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सह्याद्री वाहिनीवरील विधिमंडळ समाचोलन बंद केल्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विधिमंडळ कामकाजाचे समालोचन दर दिवशी सह्याद्री वाहिनीवरून प्रसारित केले जाते. परंतु, त्याचे पैसे राज्य सरकारने न भरल्यामुळे या अधिवेशनात विधिमंडळ कामकाजाचे समालोचन सुरू नाही. हे समाचोलन बंद करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे काय ? ग्रामीण भागामध्ये सह्याद्री वाहिनी वरील बातम्या बघितल्या जातात. त्यामुळे सह्याद्री वाहिनीवर विधिमंडळाचे समालोचन सुरू करण्यासाठी राज्य शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, याची नोंद घेतली असून निवेदन करण्यात येईल.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, दूरदर्शनची किती वर्षापासूनची देयके रखडवून ठेवण्यात आली आहेत यासंबंधातील माहिती उपलब्ध झाल्यावर त्यासंबंधी शासनाला निर्णय घेता येईल.

**उप साभापती** : शासनाने या प्रश्नाची गंभीरपणे नोंद घ्यावी व समालोचन पूर्ववत सुरू होण्यासाठी प्रयत्न करावेत.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, शासनाने या प्रश्नाची नोंद गंभीरपणे घेतली असून विधिमंडळाचे समालोचन पूर्ववत सुरू होण्यासाठी प्रयत्न केले जातील.

........

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : पुण्यातील झोपडपट्टींचा पुनर्विकास करणे याबाबत श्री.अनिल भोसले, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रवींद्र वायकर (गृहनिर्माण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 40 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे शहरात बऱ्याच झोपडपट्ट्या आहेत. या झोपडपट्टीवासियांना पक्की घरे मिळाली पाहिजेत. या दृष्टीने केंद्र व राज्य सरकार वेळोवेळी प्रयत्न करीत आहेत. राजीव गांधी पुनर्वसन योजना व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या मार्फत गृहनिर्माण योजना अस्तित्त्वात आहे. राज्यात तसेच, पुणे शहरात पूर्ण क्षमतेने ही योजना चांगल्या प्रकारे कार्यान्वित होत नसल्याने त्याचा परिणाम पुणे शहरावर झालेला आहे. पुणे शहर अद्यापि झोपडपट्टी मुक्त होऊ शकलेले नाही. सर्व सामान्य लोकांना घरे मिळत नाहीत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन झाले आहे. पण त्याची नियमावली अजून पर्यंत झालेली नाही. मधल्या काळात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, नियमवाली ताबडतोब लागू करण्यात येईल. एवढेच नव्हे तर त्यासाठी नियमावली लवकरात लवकर तयार करून आपल्या समोर सादर करण्यात येईल. सर्वसामान्य लोकांना घरे लवकरात लवकर मिळण्याकरिता ही नियमावली कधी तयार करण्यात येणार आहे व या लोकांना घरे कधी मिळणार आहेत ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी नियम 93 अन्वये अत्यंत चांगली सूचना मांडली आहे. झोपडपट्टीवासियांना चांगले घरकुल मिळावे यासाठी शासनाने एसआरडी अंतर्गत पहिली योजना आखली. यामध्ये झोपडीधारकांना 180 चो.फू.चे घर मिळायचे. त्यानंतर एसआरए म्हणजे ऑथोरिटी निर्माण करण्यात आली. त्यावेळी 224 चौ.फू.जागा देण्याची योजना होती. त्यानंतर शासनाने 269 चौ.फू.चे घर देण्याचा निर्णय घेतला. 70 टक्के लोकांनी सहमती दर्शविली तरच झोपडपट्टी योजना राबविता येते. त्या पद्धतीनेच मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड येथील महानगरपालिकांच्या हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम सुरू होते. पण याला गती मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्या गरिबांचे स्वप्न साकार व्हावयाचे असेल तर गती देणे अत्यंत आवश्यक आहे. यात लोक सहमती का देत नाहीत, दोन विकासकांमध्ये भांडणे का होतात ? या सर्वांना एकत्रित बसवून त्या योजना कार्यान्वित करणे गरजेचे आहे. पुण्यात गेल्या 8-10 वर्षात 201 प्रस्ताव आल्यानंतर फक्त 27 प्रस्तावच मंजूर झालेले आहेत. त्यामुळे मी यात जातीने लक्ष घालणार आहे. सन 1995 च्या नियमानंतर आता दिनांक 11.9.2014 च्या अधिसूचनेनुसार विशेष नियमावलीला शासनाने मान्यता दिलेली आहे. ती आपल्याला देण्यात येईल. झोपडपट्टी पुनर्विकास होण्याच्या दृष्टीने मी स्वत: आपल्या येथे येऊन या योजनेला जास्तीत जास्त प्राधान्य देईन.

.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**तालिका सभापती** : आता लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. लक्षवेधी सूचना क्रमांक 1 नंतर घेण्यात येईल. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 2 घेण्यात येईल.

...7

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील ग्रँटरोड येथील ब्राह्मणवाडीत राहणाऱ्या महिलांना धमकावित असलेल्या गुंडाची तक्रार डी.बी.मार्ग पोलीस ठाण्याने दाखल करून न घेणे

**मु. शी.** : मुंबईतील ग्रँटरोड येथील ब्राह्मणवाडीत राहणाऱ्या महिलांना धमकावित असलेल्या गुंडाची तक्रार डी.बी.मार्ग पोलीस ठाण्याने दाखल करून न घेणे यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक ३० नोव्हेंबर २०१४ रोजी ग्रँटरोड (मुंबई) येथे ब्राम्हणवाडीच्या श्रीमती गुलाब विजय कांगणे व श्रीमती कामिनी किसन सांगले या महिलांचा पाठलाग करुन १० ते १२ गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी त्यांचे राहते घर खाली करण्यासाठी त्यांना केलेली धक्काबुक्की व शिवीगाळ करुन अश्लील हावभाव करणे, सबंधित महिला त्याच दिवशी डी.बी.मार्ग पोलीस स्टेशन येथे तक्रार करावयास गेल्या असता पोलीसांनी त्यांची तक्रार नोंदवून न घेणे, दिनांक १ डिसेंबर, २०१४ रोजी या महिलेचा मुलगा राजु बोडके यांना पोलिसांनी आकसाने पोलीस ठाण्यात घेवून जाणे, त्याला सुध्दा पोलिसांनी दमदाटी करुन व खोट्या तक्रारीत गुंतविण्याची धमकी देवून रात्रीपर्यंत पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवणे, लोकप्रतिनिधी हे स्वत: संबंधित पोलिस स्टेशनमध्ये गेले असता लोकप्रतिनिधींना सुध्दा दाद न देता तक्रार लिहून न घेणे, लोकप्रतिनिधींनी संबंधित पोलीस उपायुक्त यांना दूरध्वनीवरुन संपर्क केला असता त्यांनी सुध्दा दाद न देणे, त्यामुळे तेथील परिसरातील नागरिकांत पसरलेले भीतीचे वातावरण, त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

..8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) (शहरे) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...9/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मला एका अत्यंत गंभीर प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधून घ्यावयाचे आहे. राज्यात महिलांवर अत्याचार होत आहेत. दिल्ली येथे निर्भया प्रकरण झाले त्यावेळी वर्मा कमिशन नेमण्यात आले. त्यानंतर कायदे खूप कडक करण्यात आले. कायदे नुसतेच कडक करून चालत नाहीत तर त्या कायद्याखाली पोलिसांनी पोलीस ठाण्यामध्ये वेळोवेळी गुन्हे नोंदवून घेतले पाहिजेत. असाच एक गंभीर प्रकार मुंबईतील ग्रॅट रोड भागातील ब्राह्मणवाडीत दिनांक 30 नोव्हेंबर 2014 रोजी झालेला आहे, तर दिनांक 1 नोव्हेंबर 2014 रोजी पोलीस ठाण्याने कळस केला आहे. येथे राहणाऱ्या श्रीमती गुलाब विजय कांगणे व श्रीमती कामिनी किसन सांगले या दोन महिला कामानिमित्त बाहेर गेल्या असता 10 ते 12 गुंडांनी त्यांचा पाठलाग केला व त्यांना धक्काबुक्की केली. हा प्रकार ब्राह्मणवाडीतील महिलांना नेहमीचाच आहे. या महिला आपल्या वाडीत पोहोचल्यानंतर ते गुंड त्या महिलांना नुसतीच धक्काबुक्की करत नव्हते तर शिवीगाळ देखील करीत होते. ते काय बोलत होते हे सभागृहाला सांगण्यासारखे नाही. तरी देखील मी ते सांगण्याचा प्रयत्न करते. गुंडगिरी करणारे, धक्काबुक्की करणारी माणसे त्या महिलांना म्हणत होते की, चल एका रात्रीसाठी पाच हजार रूपये देतो येतेस काय ? एवढा अश्लील प्रकार आहे. धक्काबुक्की करताना ज्या बाईच्या साडीला हात त्या गुंडांनी लावला तेव्हा आजूबाजूच्या लोकांनी त्या गुंडांना आवरण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार झाल्यानंतर त्या महिला डी.बी.मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्या तेव्हा पोलिसांनी ती तक्रार नोंदवून घेतली नाही.

**यानंतर श्री.जुन्नरे....**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मला एका अत्यंत गंभीर प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधून घ्यावयाचे आहे. राज्यात महिलांवर अत्याचार होत आहेत. दिल्ली येथे निर्भया प्रकरण झाले त्यावेळी वर्मा कमिशन नेण्यात आले. ŸµÖÖ®ÖÓŸÖ¸ü ÛúÖµÖ¤êü ÜÖæ¯Ö Ûú›üÛú Ûú¸üÞµÖÖŸÖ Ö»Öê. ÛúÖµÖ¤êü ®ÖãÃÖŸÖê“Ö Ûú›üÛú Ûúº†न चालत नाहीत तर त्या कायद्याखाली पोलिसांनी पोलीस ठाण्यामध्ये वेळोवेळी गुन्हे नोंदवून घेतले पाहिजेत. असाच एक गंभीर प्रकार मुंबईतील ग्रॅंट रोड भागातील ब्राह्मणवाडीत दिनांक 30 नोव्हेंबर 2014 रोजी झालेला आहे, तर दिनांक 1 नोव्हेंबर 2014 रोजी पोलीस ठाण्याने कळस केला आहे. येथे राहणाऱ्या श्रीमती गुलाब विजय कांगणे व श्रीमती कामिनी किसन सांगले या दोन महिला कामानिमित्त बाहेर गेल्या असता 10 ते 12 गुंडांनी त्यांचा पाठलाग केला व त्यांना धक्काबुक्की केली. हा प्रकार ब्राह्मणवाडीतील महिलांना नेहमीचाच आहे. या महिला आपल्या वाडीत पोहोचल्यानंतर ते गुंड त्या महिलांना नुसतीच धक्काबुक्की करत नव्हते तर शिवीगाळ देखील करीत होते. ते काय बोलत होते हे सभागृहाला सांगण्यासारखे नाही. तरी देखील मी ते सांगण्याचा प्रयत्न करते. गुंडगिरी करणारे, धक्काबुक्की करणारी माणसे त्या महिलांना म्हणत होते की, चल एका रात्रीसाठी पाच हजार रूपये देतो येतेस काय ? एवढा अश्लील प्रकार आहे. धक्काबुक्की करताना ज्या बाईच्या साडीला हात त्या गुंडांनी लावला तेव्हा आजूबाजूच्या लोकांनी त्या गुंडांना आवरण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार झाल्यानंतर त्या महिला डी.बी.मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्या तेव्हा पोलिसांनी ती तक्रार नोंदवून घेतली नाही.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

सभापती महोदय, या प्रकरणातील वृध्द महिलेचे नाव श्रीमती छबूताई नामदेव बोडखे व या महिलेची सून श्रीमती उमा राजू बोडखे् यांनी मला फोन करुन आम्हाला भयंकर त्रास दिला जात असल्याची माहिती दिली. पोलीस स्टेशनमध्ये जाऊन झाल्या प्रकाराची तक्रार नोंदवा असे मी या महिलांना सांगितले. या प्रकरणातील वृध्द महिलेने मला सांगितले की, माझा मुलगा राजू बोडखे हा शासकीय सेवेत आहे. हा प्रकार ज्या दिवशी घडला त्या दिवशी माझा मुलगा त्या ठिकाणी नसतांनाही माझ्या मुलाला पोलिसांनी जबरदस्तीने धमकावून पोलीस स्टेशनमध्ये नेले असून सकाळी 8 ते सायंकाळी 4-5 वाजेपर्यंत बसवून त्याला खंडणीच्या गुन्हयांमध्ये गोवण्याचा प्रयत्न डी.बी.मार्ग पोलीस स्टेशन करीत असल्याचे तसेच तुम्ही आला नाहीत तर या ठिकाणच्या पोलीस स्टेशनमधील पोलीस त्याच्यावर खोटया केसेस टाकतील असेही सांगितले.

सभापती महोदय, ज्यावेळेस मी पोलीस स्टेशनवर पोहचले तेव्हा तेथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते. या पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माझ्याशी बेफिकिरीने बोलत होते. त्या पोलीस निरीक्षकांनी मला सांगितले की, "मॅडम या प्रकरणाच्या संदर्भात आपण म्हणता त्या प्रमाणे काहीही झालेले नाही". माझ्या सोबत ज्या महिला होत्या त्या महिलांनी तेथे सांगितले की, "साहेब कालपासून आम्ही गुन्हा नोंदविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत परंतु आमच्या गुन्हयांची नोंद सुध्दा घेतली गेली नाही". त्यावेळेस पोलीस निरीक्षकांनी सांगितले की, आपला एफआयआर मी आता नोंदवून घेतो. सदर एफआरआय नोंदवून घेण्याची जबाबदारी संबंधित पोलीस स्टेशनमधील महिला रायटरला देण्यात आली. एफआरआय नोंदविण्यास सांगितले असतांनाही सदर महिला रायटर टंगळमंगळ करीत होती. बायकांनी प्रत्यक्षात जे काही स्टेटमेंट दिले होते ते स्टेटमेंट या रायटरने नोंदवून घेतले नाही. मला या ठिकाणी सभागृहाला विचारावयाचे आहे की, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश उझबन यांनी माझ्या कोणत्याही प्रश्नांना उत्तर दिले नाही. माझ्या समोर ते केवळ 5 मिनिटे बसून बाहेर निघून गेले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोठे गेले याची मी विचारणा केली असता वरीष्ठ पोलीस निरीक्षक कामासाठी बाहेर गेल्याचे मला सांगण्यात आले. श्री. राजू बोडखे याला कोठे नेण्यात आले आहे हे बघण्यासाठी मी पोलीस स्टेशनच्या मागच्या बाजूस गेले असता तेथे एक पीएसआय फुटेज तपासत असल्याचे मला दिसून आले. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्रीमती विद्या चव्हाण .....

त्यामुळे मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, बेजबाबदार उत्तर देणाऱ्या व एफआरआय नोंदवून न घेणाऱ्या अधिकाऱ्यावर आपण कोणती कडक कारवाई करणार आहात ? महिलांना ज्या गुंडानी धक्का-बुक्की केली, अश्लील वर्तन केले त्यांना अटक कधी केली जाणार आहे ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी पहिलेच जाहीर केले आहे की, कोणत्याही परिस्थितीत गुन्हा नोंदवणे आणि गुन्हेगारी कमी करणे यासंदर्भात सेप्रेशन करुन गुन्हा नोंदविण्यासाठी आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेऊन, त्याचे रजिस्टर करुन पुढे तपास करणे व तपासणी,चौकशीमध्ये काही आढळले नाही तर त्याची फाईल करुन ठेवली पाहिजे] अशी भूमिका या सरकारने ठेवलेली आहे.

सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचनेमध्ये दोन भिन्न बाबी आहेत. सन्माननीय सदस्या म्हणत आहेत की, सदर प्रकरणी महिलांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले नाही, या महिलांवर जे अत्याचार झाले त्यासंदर्भातील तक्रार नोंदवून घेतली नाही. दुसरी बाब अशी आहे की, सन्माननीय सदस्या स्वत: पोलीस स्टेशनमध्ये गेल्या असतांना सदस्यांचे ऐकून घ्यावयास पाहिजे होते किंवा त्यांना जो सन्मान मिळावयास पाहिजे होता तो मिळाला नाही. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, सदर घटना 30 नोव्हेंबरची असून यासंदर्भात कंट्रोल रुमला कॉल आल्यानंतर प्रत्यक्ष ठिकाणी पोलीस पोहोचले. शक्ती मिल कंपाऊंडमध्ये सुदैवाने हाय डेफिनेशन सीसी टीव्ही बसविण्यात आलेले आहेत. पोलीस घटनेच्या ठिकाणी पोहचल्यानंतर पोलिसांनी फिर्यादीची नोंद करुन घे्तली. दुसऱ्या दिवशी श्रीमती गुलाब विजय कांगणे व श्रीमती कामिनी किसन सांगले यांनी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार अर्ज दिला. त्यानंतर पोलिसांनी तक्रार अर्ज ठेवून पुढील तपासणी सुरु केली. अर्ज मिळाल्यानंतर सदरचा तपास केला जात असल्याची माहिती कुरिअरद्वारा संबंधिताना त्याच दिवशी दिली गेली व त्या ॲक्नॉलमेंटवर संबंधितांची सही सुध्दा आहे. या प्रकरणातील फोटो आणि सीडी सुध्दा माझ्याकडे आहेत. आपण ज्या महिलांचा उल्लेख करीत आहात त्या महिला सीसीटीव्ही फुटेजमध्ये धक्का-बुक्की करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची पूर्ण चौकशी करण्यास पोलिसांना मी सांगितले आहे. पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील .......

दि.17/12/2014 पर्यंत केली असून त्यानंतर हे प्रकरण फाईल करण्यात आले आहे. पोलीस स्टेशनमध्ये येणारी प्रत्येक तक्रार नोंदवून घेणे हे पोलिसांचे कर्तव्यच आहे. तक्रार अर्जावर काहीही तपास केला नसता तर आपले म्हणणे बरोबर झाले असते. परंतु या प्रकरणामध्ये तक्रारीचा संपूर्ण तपास झाला, तक्रार अर्ज मिळाला असल्याची माहितीही पोलिसांकडे असून पोलीस स्टेशन डायरीमध्ये तशा प्रकारची नोंद सुध्दा आहे. या विषयाच्या संदर्भात पोलीस स्टेशनकडे सीसी टीव्हीचे फुटेजेस आहेत. परंतु असे असतानाही सन्माननीय सदस्या जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये गेल्या असता त्यांना ज्या पध्दतीने वागणूक दिली गेली त्याबद्दल पूर्ण चौकशी केली जाईल. पीआयने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नसेल तर पीआयची सुध्दा पूर्ण् चौकशी केली जाईल.

.श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, मुंबई सारख्या ठिकाणी आज महिला सुरक्षित राहिलेल्या नाहीत. एफआयआर घेण्यामध्ये सुध्दा पोलीस स्टेशनने टाळाटाळ केलेली आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये प्रत्येक गुन्हयांची नोंद झालीच पाहिजे हे मी अगोदरच सांगितले आहे. तक्रारदाराची तक्रार नोंदवून त्या तक्रारीचा तपास झालाच पाहिजे. चार्जशिट पुटअप करीत असताना तथ्य आढळून आले नाही तरच प्रकरण फाईल केले पाहिजे. या प्रकरणात तक्रार अर्ज स्वीकृत होऊन त्याचा संपूर्ण तपास झाला, चौकशी झाली व त्या चौकशीची पोलीस स्टेशन डायरीमध्ये नोंद सुध्दा आहे. या प्रकरणाची पूर्ण तपासणी झाल्यानंतर तक्रारदारांना प्रकरणात तथ्य आढळून आले नसल्याची माहितीही देण्यात आली होती.

श्री. अमरसिंह पंडित : संबंधितांच्या विरोधात कोणती कारवाई केली याची माहिती आम्हाला जाणून घ्यावयाची आहे परंतु तीच माहिती दिली जात नाही. गुन्हेगार अजूनपर्यंत मोकाट फिरत असतील तर तक्रार करुन काय उपयोग ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाचे जे फुटेज आहे ते फुटेज पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, 30 तारखेला जो प्रकार घडला आहे त्या प्रकरणात संबंधित श्री. राजू बोडके याने बॅटने आणि इतर गोष्टीने संबंधितांच्या डोक्यावर प्रहार केल्याचे दिसून येते. ॲम्ब्यूग्युइटि असेल तर जेन्युईननेस सुध्दा बघितले गेलो पाहिजे. या प्रकरणाच्या चौकशीला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील .......

शासनाची मान्यता आहे. परंतु ॲम्ब्यूग्युइटि ठेवून काम करणे योग्य होणार नाही. हा प्रकार घडला त्या ठिकाणी हाय डेफिनेशन कॅमेरे असल्यामुळे सर्व काही रेकॉर्ड झालेले आहे. या फुटेजवरुन आपण प्रिंट सुध्दा काढू शकू एवढे हे फुटेज क्लिअर आहेत. असे असतांना चुकीच्या डायरेक्शनने जाऊन चुकीचा निर्णय घेतल्यापेक्षा माझी अशी विनंती आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी करुनच यासंदर्भातील निर्णय घेतला गेला पाहिजे आपण म्हणत असाल तर या प्रकरणाची चौकशी 7 दिवसात पूर्ण केली जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, राजू बोडके हा सरकारी सेवेत कार्यरत आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या संदर्भात मंत्री महोदय सातत्त्याने उल्लेख करीत आहेत. परंतु हे कॅमेरे कोणी बसवले ? आपल्याला जे फोटो दिलेले आहेत ते कोणी दिलेले आहेत ?

डॉ.रणजित देशमुख : सभापती महोदय, ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या ठिकाणी सुदैवाने हाय डेफिनेशनचे कॅमेरे होते व त्यामध्ये सर्व प्रकार रेकॉर्ड झालेला आहे. आपल्याकडे या घटनेचे सर्व पुरावे उपलब्ध आहेत. मी बायस नाही. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन संबंधितावर कारवाई करण्यास मी तयार आहे.

यानतर श्री.अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण मला या लक्षवेधी सूचनेवर बोलण्यासाठी वेळ द्यावा. माझा प्रश्न आहे की, त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे कोणी लावले आहेत ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कॅमेरा कोणी बसविले त्यावर शूट होण्याचे ठरते काय एवढेच आम्हाला सांगावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, शीतल इस्टेट प्रकरण आजचे नाही. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, माननीय श्री.शरद पवार हे मुख्यमंत्री असताना त्यावेळी श्रीमती मृणाल गोरे त्यांच्याकडे तक्रार घेऊन गेल्या होत्या. दामजी शहा आणि हिरेन शहा यांनी ही इस्टेट विकत घेतली. सन 1993-1994 मध्ये झालेल्या दंगलीचा फायदा घेऊन त्यांनी फेरीवाल्यांचे खोके जाळून टाकले. आज त्या फूटपाथवर पार्किंग केलेले आहे. त्यासाठी त्यांना पोलीस अधिकाऱ्यांनी देखील मदत केलेली आहे. माझा प्रश्न आहे की, सीसीटीव्ही कॅमेरे कोणी बसविले आहेत ? मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये श्रीमती सोनाबाई दराडे या महिलेने दोन-चार दिवस तुरुंगवास भोगला होता त्यांचा त्या ठिकाणी असलेला स्टॉल काढून टाकण्यात आलेला आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन मराठी लोकांसाठी काही करणार असे सांगता. पण मी आपणास भाडेकरुंना हुसकावून लावल्याची अनेक उदाहरणे दाखवून देईन. हे भाडेकरु 100 वर्षापासून राहत आहेत. या महिलांवर असत्य केसेस दाखल केलेल्या असून या प्रकरणातील गुन्हेगारांना पकडण्यात आलेले नाही. मंत्री महोदय सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा उल्लेख करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छिते की, श्री.राजू बोडके हा सीसीटीव्हीमध्ये कुठेही दिसत नाही अशा आशयाचे लेखी उत्तर मला पोलीस अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, फरशी आणि बॅटने मारल्याचे फूटेज दिसत आहे. श्री.राजू बोडके ऑफीसला जात असताना त्यास गुंडांनी मारहाण करुन त्यांना रेल्वे ट्रॅकवर टाकून दिले होते. तेव्हा त्याला मारहाण झाल्याचा हा पहिला प्रसंग नाही. तेथील महिलांना आणि अन्य लोकांना मारहाण करुन 141 भाडेकरुंना हाकलून लावले आहे. त्या ठिकाणी चार एफ.एस.आय.चा फायदा घेण्याचा बिल्डरचा डाव आहे. या प्रकरणातील जे गुन्हेगार आहेत

..2..

श्रीमती विद्या चव्हाण.....

त्यांच्यावर अजून केस दाखल करण्यात आलेली नाही. या संदर्भात डी.सी.पी.श्री.कर्णिक यांना मी फोन केला होता, परंतु त्यांनी फोन उचलला नाही. मी त्यांना एसएमएस केला असता त्याचे देखील उत्तर त्यांनी दिले नाही. मी दुसऱ्या दिवशी त्यांच्या कार्यालयात गेले पण तेथेही कोणी नोंद घेतली नाही. तो बिल्डर सांगतो की, पोलीस स्टेशन माझ्या खिशात आहे.पोलीस स्टेशन बिल्डरच्या खिशात आहे काय याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. महिलांसाठी कायदे बनवून काही होणार नाही. पोलीस स्टेशनमध्ये महिलांची तक्रार नोंदवून घेतली जात नसेल तर त्या पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी सभागृहाला पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, यातील जेन्युइननिटी पहाव्यात. यामध्ये जेन्युइननिटी नाही असे आपणास वाटत असेल तर आपण त्यासाठी ओपन आहोत. सन्माननीय सदस्य पोलीस स्टेशनमध्ये गेल्या, ती घटना आणि त्या ठिकाणी प्रत्यक्ष जी घटना घडली या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. टीव्ही फुटेजमध्ये बंड्या सांगळे, नितीन ठाकूर आणि अन्य व्यक्ती फरशी मारताना, बॅट मारताना दिसत आहेत. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या प्रकरणाची पुन्हा सात दिवसांत चौकशी करण्यात येईल.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रकरणाची चौकशी सात दिवसांत करण्यात येईल आणि त्या संदर्भात कठोर उपाययोजना करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. त्यांच्या उत्तराने सभागृहाचे निश्चितपणे समाधान झालेले आहे असे मला वाटते.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा

**उप सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत "सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर चर्चा" दर्शविण्यात आली आहे. सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या ह्या लोकलेखा समितीने केलेल्या शिफारशी अन्वये सभागृहास शुक्रवार, दिनांक 19 डिसेंबर, 2014 रोजी सादर करण्यात आल्या आहेत. संसदीय प्रथेनुसार या मागण्यांवर चर्चा केली जात नाही.

सभागृहाने सन 2008-2009 या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवर विचार केला.

-------

.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन (अधिक खर्च )विधेयक

L.A. BILL NO. XXXVIII OF 2014.

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2009, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री.सुधीर मुनगंटीवार ( वित्त मंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2014 चे वि.स.वि क्रमांक 38, दिनांक 31 मार्च 2009 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित कामांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून, त्या वर्षांत त्या विवक्षित कामांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या, तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोजनास अधिकृत मंजुरी देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती**: विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3 , अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील वरवटी परिसरात गोरोबा गर्जे या युवकाचा भरदिवसा झालेला निर्घृण खून

**मु. शी.** : बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील वरवटी परिसरात गोरोबा गर्जे या युवकाचा भरदिवसा झालेला निर्घृण खून यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण व अमरसिंह पंडित ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सतीश चव्हाण ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंबाजोगाई, (जि.बीड) तालुक्यातील वरवटी परिसरात दिनांक 10 नोव्हेंबर, 2014 वा त्या सुमारास गोरोबा ऊर्फ काका गर्जे या युवकाचा भरदिवसा निघृणरित्या खून करण्यात येणे, खूनाच्या हत्त्येचे कारण अद्यापही उघडकीस न येणे, पोलिसांनी या प्रकरणी चार आरोपींना अटक केली असली तरी दोन मुख्य सूत्रधार अद्यापही मोकाट असणे, या सूत्रधार मारेकऱ्यांची माहिती, ठावठिकाणा पोलिसांना माहीत असूनही त्यांना अटक करण्यात टाळाटाळ करण्यात येणे, मुख्य सूत्रधार मोकाट फिरत असल्याने मयत गर्जे कुटुंबीयांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, भरदिवसा खून झाल्याने अंबाजोगाई, परळी परिसरातही सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असणे, त्यामुळे या घटनेतील मुख्य सूत्रधार आरोपींना तातडीने अटक करण्याची होत असलेली मागणी, अटकेची कारवाई न करणाऱ्या पोलिसांवरही कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे जनतेत निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कारवाई."

प्रा.राम शिंदे ( गृह राज्यमंत्री (ग्रामीण) ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सदर घटना बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील वरवटी परिसरात घडलेली आहे. निवदेनात म्हटले आहे की, या प्रकरणात चार आरोपींना अटक केलेली आहे. यापैकी तीन आरोपी हे गंगाखेड पोलीस स्टेशनमध्ये स्वत: हजर झालेले आहेत. जे चार आरोपी आहेत 120 (ब) खाली आहेत ते आजही शहरात खुलेआमपणे फिरत आहेत. आमचे नाव आज नाहीतर उद्या वगळण्यात येईल असेही ते सांगत आहेत. या प्रकरणातील 120 (ब) खालील जे चार आरोपी आहेत, जे या गुन्ह्यातील प्रमुख सूत्रधार आहेत त्यांना सोडून देण्याचे आश्वासित केलेले आहे काय, नसेल तर त्या आरोपींना पकडण्यासाठी शासन काय कारवाई करणार ? पोलिसांकडून सांगण्यात येईल की, ते आरोपी फरारी आहेत. पण मी येथे सांगू इच्छितो की, ते आरोपी खुलेआमपणे परळी आणि अंबाजोगाई येथे फिरत आहेत आणि तशा क्लिप्स आहेत. ते अनेक राजकीय कार्यक्रमांना उपस्थित राहत आहेत. माझा प्रश्न आहे की, या चार आरोपींना पकडण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सदर घटना घडल्यानंतर त्यामध्ये चार आरोपींना अटक करण्यात आली. उर्वरित आरोपींना पकडण्यासासाठी विशेष पोलीस पथकाची दोन पथके तयार करण्यात आली असून ते त्यांचा शोध घेत आहेत. या प्रकरणातील आरोपींचा कसून शोध घेण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरिंसह पंडित यांना मी सांगू इच्छितो की, या प्रकरणामध्ये जे कोणी आरोपी असतील त्यांना पकडण्यात येईल आणि जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. शासन आरोपींना पाठीशी घालणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, चारही आरोपींना अटक करण्यात आली आहे. मी त्यांच्या माहितीसाठी सांगतो की, तीन आरोपी स्वत:हून अटक झाल्यामुळे, त्यांना अटक करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, आरोपी दोषी आढळल्यानंतर त्यांना अटक केली जाईल. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, फिर्यादीने आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केल्यानंतर आरोपींवर कलम 120 (ब) खाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, या घटनेतील आरोपींना कधी अटक करण्यात येईल ? ते आरोपी खुलेआम फिरत आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, त्या आरोपींना पकडण्यासाठी दोन टास्क फोर्स स्थापन केले आहेत. या निमित्ताने विचारु इच्छितो की, हे टास्क फोर्स कोणाच्या अखत्यारीत निर्माण केले आहेत ? 120 (ब) खाली गुन्हा दाखल झालेल्या आरोपीने तीन दिवसांपूर्वी स्वत:च्या कार्यालयाच्या मोबाईलवरुन आपल्या मित्राच्या फोटोला लाईक केले आहे. गेल्या आठवड्यात हे सर्व आरोपी परळीमध्ये खुलेआम फिरले आहेत. परळी पोलीस स्टेशनला या बाबतची माहिती असल्यामुळे, आपण त्यांच्याकडून माहिती घ्यावी. 120 (ब) अंतर्गत ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे ते या घटनेचे सूत्रधार आहेत. चारही आरोपी सूत्रधार असल्यामुळे त्यांची दिनांक 10 ऑक्टोबर, 2014 रोजी एका हॉटेलमध्ये अशा प्रकारची घटना करण्यासाठी पहिली बैठक झाली. त्या हॉटेलचे दप्तर पोलिसांनी जप्त केले आहे. त्या हॉटेलच्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यावरुन त्या आरोपींची तेथे ये-जा झाल्याचे दिसून येईल. तसेच दुसऱ्या हॉटेलमध्ये अशाच प्रकारच्या खूनाचे षडयंत्र रचण्यासाठी दुसरी बैठक दिनांक 16 ऑक्टोबर, 2014 रोजी झाली. या बाबतचे पुरावे पोलिसांना देण्यात आलेले आहेत. माझा आरोप आहे की, पोलीस जाणीवपूर्वक या चार आरोपींना अटक करण्यासाठी दिरंगाई करीत आहेत. या निमित्ताने मी विचारतो की, या आरोपींना किती दिवसात अटक करण्यात येईल ? पोलिसांना सुध्दा हे चार आरोपी कोठे आहेत हे माहीत आहे. महोदय, या प्रकरणातील ज्या आरोपींना पी.सी.आर. दिला होता त्यांना पोलीस स्टेशनमध्ये मटण आणि चिकन खाऊ घातले, याचे सुध्दा पुरावे आहेत. आमचा संशय आहे की, या गुन्ह्यातील आरोपी पोलिसांना सोडवायचे आहेत. माझी या माध्यमातून विनंती आहे की, या घटनेतील उर्वरित आरोपींना किती दिवसांत अटक करण्यात येईल, तसेच पुराव्याच्या अनुषंगाने शासन त्यांच्यावर काय कारवाई करणार आहे ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगतो की, स्थानिक गुन्हे अन्वेषण, बीड व ई.डी.एस. बीड व पोलीस ठाणे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, परळी शहर, ग्रामीण पोलीस स्टेशन शिरसाळा यांना आरोपीचा शोध घेण्याबाबत लेखी पत्र दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पोलीस या आरोपींना सोडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत काय. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी जे जे पुरावे दिले असतील ते सर्व पुरावे पुन्हा एकदा तपासून बघितले जातील. तसेच हे सुध्दा सांगतो की, 302 कलम दाखल झ ालेल्या घटनेमध्ये आरोपींना पाठीशी घालण्याचे काम शासन करणार नाही. या आरोपींना किती दिवसात अटक करणार, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, 302 सारख्या घटनेमध्ये एखाद्या आरोपीला जाणीवपूर्वक किंवा त्याची काही चूक नसताना अटक झाली तर गुन्ह्याचा तपास तिसऱ्याच बाजूला जातो. त्यामुळे या घटनेचा तपास कसोशीने आणि कठोरपणे करण्यासाठी दोन्ही-तिन्ही तपास पथकांना कडक शब्दात सूचना देण्यात येतील आणि लवकरात लवकर या गुन्ह्याचा तपास लावण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या घटनेत ज्याचा कोणाचा दोष नसेल तर.... म्हणून मी विचारतो की, यामुळेच तुम्ही या चार आरोपींना बाजूला ठेवले आहे काय ? महोदय, घटनेतील एक आरोपी हनुमंत नागरगोजे याने घटनेच्या दिवशी सकाळी 11.30 वाजता मंत्रालयात असल्याचा पुरावा पोलिसांना दिला आहे. वास्तविक पाहता सर्वसामान्य माणूस 11.30 वाजता मंत्रालयात जाऊ शकत नाही. सर्वसामान्य माणूस 11.30 वाजता मंत्रालयात जात असेल तर तेथील सुरक्षा व्यवस्था सुध्दा तपासली पाहिजे. जर सर्वसामान्य माणूस सकाळी 11.30 वाजता मंत्रालयात गेला असेल तर तो कोणाच्या तरी शिफारशीने गेला असेल. महोदय, हा गंभीर गुन्हा आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावता कामा नये. म्हणून या घटनेतील चारही आरोपींना पकडले पाहिजे. या निमित्ताने माझा आरोप आहे की, या घटनेतील चारही आरोपींना सोडविण्यासाठी पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे, हे खरे आहे काय ? कोणतेही सन्माननीय सदस्य सभागृहात जबाबदारीने बोलत असतात. त्यामुळे त्यांचे म्हणणे खरे आहे असे गृहीत धरुन शासनाने कार्यवाही करावयास पाहिजे. मी सांगितले की, चार दिवसांपूर्वी या आरोपींपैकी एका आरोपीने फेसबुक अकाऊंटवर चॅट केले आहे. ते बघून

..3..



SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:40

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

मोबाईलच्या लोकेशनवरुन त्या आरोपीला पकडले पाहिजे. तो आरोपी अजूनही ऑफीसचा मोबाईल वापरतो. मी या निमित्ताने स्पेसिफिक विचारतो की, या घटनेतील आरोपींना तत्काळ अटक करण्यासाठी शासन कार्यवाही करेल काय ?

प्रा.राम शिंदे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हनुमंत नागरगोजे या व्यक्तीचा पास सकाळी 11.30 वाजता वितरित झाला. वास्तविक पाहता ही घटना दिनांक 10 नोव्हेंबर, 2014 रोजी दुपारी 12 ते 12.15 च्या दरम्यान घडली. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्याच दरम्यान सकाळी 11.30 वाजता हनुमंत नागरगोजे मंत्रालयात होते. एका अर्थाने सन्माननीय सदस्य याबद्दल संशय व्यक्त करीत असल्याचे दिसते.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येता कामा नये.

प्रा.राम शिंदे : महोदय, माझे वाक्य पूर्ण झाल्याशिवाय सन्माननीय सदस्यांचे समाधान होणार नाही. रेकॉर्डवर चुकीचे जाणार नाही याची पूर्ण खबरदारी मी घेईन. या निमित्ताने सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी दिलेले पुरावे तपासून बघितले जातील. या प्रकरणी मी पुन्हा एकदा सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगतो की, पोलीस प्रशासन कोणत्याही आरोपीला पाठीशी घालणार नाही, असा ठाम विश्वास आपल्या माध्यमातून मी सभागृहाला देतो. या प्रकरणी जे जे पुरावे दिले असतील त्या पुराव्यांची तपासणी करण्याचे काम पोलीस करतील.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वर्धा जिल्ह्यातील सेवाग्रामचा विकास आराखडा तयार करण्याची घोषणा करुनही अद्याप विकास आराखडा तयार न करणे

**मु. शी.** : वर्धा जिल्ह्यातील सेवाग्रामचा विकास आराखडा तयार करण्याची घोषणा करुनही अद्याप विकास आराखडा तयार न करणे या संबंधी सर्वश्री राजेंद्र मुळक, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राजेंद्र मुळक (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नियोजन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वर्धा जिल्ह्यातील सेवाग्रामचा विकास आराखडा तयार करण्याबाबत सन 2014 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषणा करण्यात येऊनही विकास आराखडा अद्यापि तयार करण्यात न येणे, यामुळे सदरहू आराखड्याचे स्वरुप, या आराखडयासाठी किती खर्च अपेक्षित आहे व तो किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे याबाबतची माहिती उपलब्ध न होणे, यामुळे सेवाग्रामचा विकास रखडलेला असणे, तेथील जनतेत निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सेवाग्रामचा विकास आराखडा लवकरात लवकर तयार करुन त्याचे स्वरुप, आराखड्याचा खर्च व आराखडा पूर्ण करण्याचा कालावधी याची माहिती उपलब्ध करुन देण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुधीर मुनगंटीवार ( नियोजन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपल्या राज्यासाठी आणि देशासाठी 'सेवाग्राम' हे भूषणावह असे गाव आहे. या ठिकाणी येऊन महात्मा गांधी यांनी देशाच्या स्वातंत्र्यांचा लढा दिला. त्या गोष्टीला 75 वर्षे होऊन गेली आहेत. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पामध्ये सेवाग्रामचा विकास आराखडा तयार करण्यात आला.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक ....

सभापती महोदय, 495 कोटी रूपयांचा सेवाग्राम विकास आराखडा जाहीर करण्यात आला. मी लक्षवेधी सूचनेचे निवेदन वाचले. माननीय वित्त व नियोजन मंत्र्यांनी अत्यंत समर्पक असे उत्तर दिले आहे. परंतु, त्यातून 1-2 प्रश्न निर्माण झाले आहेत. मी त्या प्रश्नांकडे लक्ष वेधू इच्छितो. आराखड्याचे पीएलए अकाऊंट तातडीने उघडणे आवश्यक आहे. कारण या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या निधीत काम होणार नाही. पीएलए अकाऊंट उघडले तर निधी परत जाणार नाही. तो निधी त्या अकाऊंटमध्ये राहील. त्यामुळे या संदर्भात कार्यवाही होईल, असे उत्तरात अपेक्षित आहे. आराखड्यातील 16 कोटी रूपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देणार आहोत, असे उत्तरात म्हटले आहे. 495 कोटी रूपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता एकत्रित देणार का, हा आराखडा कालबध्द पध्दतीने पूर्ण करण्यासाठी या संदर्भात काही कृती आराखडा तयार केला आहे, जेणेकरून सन 2018 पर्यंत या आराखड्याचे उद्घाटन करू शकतो. माननीय नियोजन मंत्र्यांनी या संदर्भात उत्तर द्यावे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, हे खरे आहे की, सेवाग्राम हे विदर्भाच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्याही गौरवशाली परंपरेचा भाग आहे. महात्मा गांधींच्या पावन स्पर्शाने सेवाग्राम निर्माण झाले, म्हणजे सेवेचा मंत्र देणारे ग्राम महात्मा गांधींनी निर्माण केले. जीवन जगण्याची प्रेरणा, जीवन जगण्याच्या संदर्भातील मूलतत्वे तेथून महात्मा गांधींनी शिकविण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन सरकारने दिनांक 20.04.2013 रोजी माननीय राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण केली. परंतु, ज्या वेगाने या कामाकडे लक्ष दिले गेले पाहिजे होते, तसे देण्यात येऊ शकले नाही. दिनांक 20.04.2013 रोजी शासन निर्णय निर्गमित झाला, समिती गठीत झाली आणि आडारकर असोसिएटस् ज्यांना सविस्तर आराखडा तयार करावयाचा होता, त्यांची जुलै, 2014 मध्ये नियुक्ती झाली. साधारणात: 1 वर्ष 2 महिने असा उशीर झाला. वेगाने काम करूशकलो असतो तर आज याचे भूमिपूजन करता आले असते. शासनाच्या वतीने या कामाच्या संदर्भात एक आराखडा निश्चित करून कालबध्द पध्दतीने हा कार्यक्रम होती घेणे आवश्यक आहे. सदर बाबतीत लागणारा नियतव्यय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. सन 2019 मध्ये 150 वर्षे पूर्ण होत आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार ....

150 व्या जयंती निमित्त हा सर्व कार्यक्रम टप्प्याटप्प्याने करणे आवश्यक आहे. टप्पा क्रमांक 1 ला 8 दिवसांत मान्यता देत आहोत, जो आमच्याकडे सादर झाला आहे. जोपर्यंत आराखडा सादर होणार नाही, तोपर्यंत मान्यता देता येणार नाही. मी स्वत: वर्धा जिल्ह्यामध्ये जाऊन या संदर्भातील बैठक घेणार आहे. सन्माननीय सदस्यांना देखील सदर बैठकीस निमंत्रित करण्यात यईल. हा 495.50 कोटी रूपयांचा ढोबळ आराखडा आहे. सदर बाबतीत सविस्तर चर्चा करून ज्येष्ठ विचारवंतांची मते ऐकून त्या दृष्टीने आराखडा व्हावा, कोणत्याही तांत्रिक बाबी उपस्थित होता कामा नयेत, कोणत्याही भावनिक बाबी उपस्थित होता कामा नयेत, सर्वांच्या सहभाग, सर्वांच्या मतांचा सहभाग या आराखड्यात व्हावा, अशी शासनाची भूमिका आहे. लवकरच या संदर्भात बैठक आयोजित करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांना देखील या बैठकीसाठी निमंत्रित करण्यात येईल. आमच्यासाठी, तुमच्यासाठी, जनतेसाठी गौरवशाली असलेल्या परंपरेचे, विचारांचे संवर्धन, जतन करणे ही राज्य सरकारची भूमिका आहे. राज्य सरकारचा त्या भूमिकेतून, विचारातून सन 2019 पर्यंत टप्प्याटप्प्याने विशिष्ट नियोजन करीत हा कार्यक्रम पूर्ण करण्याचा मानस व धोरण राहील.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी त्यांना धन्यवाद देतो.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : उर्दू भाषेतील महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी करण्यात येणे.

**मु.शी.** : उर्दू भाषेतील महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी करण्यात येणे यासंबंधी श्री. विक्रम काळे, डॉ. सुधीर तांबे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री सतीश चव्हाण, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात दिनांक 14 डिसेंबर, 2014 रोजी शिक्षकांसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (महाटिईटी) राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने घेणे, त्यासाठी राज्यातील हजारो नवशिक्षक परीक्षेसाठी प्रविष्ठ होणे, ही परीक्षा विविध माध्यमात घेणे, उर्दू माध्यमातून घेतलेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत हस्तलिखित छपाई होणे, ते हस्तलिखित असल्यामुळे परीक्षार्थींना न समजणे, त्यामुळे गोंधळाची परिस्थिती होणे, प्रश्नच न वाचता आल्यामुळे उत्तर लिहिण्याचाच प्रश्न निर्माण होणे, यामुळे हजारो परीक्षार्थींचे शैक्षणिक भवितव्याचे नुकसान होणे, उर्दू माध्यमाची परीक्षा राज्यभरातून पुन्हा घेण्याची मागणी होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदनानंतर)

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांना लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये काही दुरूस्ती करावयाची आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षकांची पात्रता परीक्षा शिक्षकांच्या दृष्टीने नोकरी लागण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांचे भवितव्य घडविणारी परीक्षा संपूर्ण राज्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक 14 डिसेंबर, 2014 रोजी झाली. सदर परीक्षेत राज्यभरातून लाखोंच्या वर विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. ती परीक्षा मराठी, उर्दू व इंग्रजी माध्यमातून घेतली गेली. उर्दू भाषेची कोणतीही प्रश्नपत्रिका प्रिंट, टाईप केलेली असते. परंतु, शालेय शिक्षण खात्याने कालची प्रश्नपत्रिका चक्क हाताने लिहिलेली होती. ही प्रश्नपत्रिका आहे. प्रश्नपत्रिकेमध्ये हाताने लिहिलेले असल्यामुळे ती जशीच्या तशी झेरॉक्स करून यामध्ये उतरविलेले आहे. त्यामुळे ती प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वाचता आलेली नाही, परीक्षा नीट देता आलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. आपण जनतेचे प्रतिनिधित्व करीत आहोत. आपण लोकांच्या भावनेचा आदर केला पाहिजे. माझी आपणास या संदर्भात विनंती आहे. राज्यभरातून, सर्व उर्दू विभागातून, उर्दू माध्यमातील अल्पसंख्याक विद्यार्थी मोठ्या संख्येने परीक्षेमध्ये प्रविष्ट झाले होते. आता त्यांची मागणी आहे की, ही परीक्षा पुन्हा घेतली पाहिजे. आम्हाला न्याय दिला पाहिजे. त्यांनी याबाबत आपल्याकडेही मागणी केली आहे. वर्तमानपत्रामध्ये अनेक वेळा छापून आले आहे. आपण भावनांचा आदर करावा. तांत्रिक बाबींमध्ये न अडकता याबाबत निर्णय घ्यावा. अधिकारी म्हणतात की, प्रश्नपत्रिका दिली असेल, वाचता येत आहे, तसे झालेले नाही. आम्हाला खात्री आहे की, आपण जनमताचा आदर करता. कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये यासाठी उर्दू माध्यमातून घेतलेली टीईटी परीक्षा पुन्हा घेणार का, ज्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना नुकसानभरपाई देण्याची भूमिका शासन घेणार का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, दिनांक 14 डिसेंबर, 2014 ला शिक्षकांसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आली. त्या परीक्षेला हजारो नवशिक्षक बसले होते. ही परीक्षा मराठी, इंग्रजी, उर्दू या तीन वेगवेगळ्या भाषेत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

घेतली जाते आणि तसे विद्यार्थी परीक्षेला बसतात. उर्दू माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेची छपाई तज्ज्ञांच्या हस्तलिखिताचे स्कॅन करून त्याप्रमाणे करण्यात आली होती. मला परीक्षेच्या दिवशी समजले की, असे स्कॅन केले आहे. मी याबाबत चौकशी केली, त्यावेळी असे समजले की, गेल्या वर्षी अशी परीक्षा झाली होती. उर्दू भाषेत एखादा टिंब, अनुस्वार पुढे-मागे झाला की, त्याचा अर्थ बदलतो. मराठी, इंग्रजी भाषेत अनुस्वार पुढे-मागे झाल्याने अर्थ बदलत नाही, लिहिलेले समजते. पण उर्दू भाषेत तसे झाल्यास समजत नाही. उर्दू भाषेमध्ये जास्त फरक पडतो. त्यामुळे गेल्या वेळी 21 चुका झाल्या होत्या. परिणामी, 21 प्रश्न बाद करावे लागले. त्यामुळे उर्दू शिक्षकांचे तज्ज्ञ समीक्षक आहेत, त्यांनी शिक्षण खात्याला कळविले होते की, हस्तलिखित स्कॅन केले तर बरे होईल. टेक्नोलॉजी प्रगत आहे. स्कॅन प्रिंटिंग केले तर ते अतिशय स्वच्छ अक्षरात असल्यामुळे विद्यार्थ्यांना वाचता येऊ शकते. आपण त्याला जोडून पुन्हा इंग्रजी भाषांतर सुध्दा विद्यार्थ्यांना दिले पाहिजे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्या बाजूला बसले आहेत. त्यांनी ती उर्दू प्रश्न पत्रिका बघावी. स्कॅन करुन प्रिंट केल्यामुळे वाचता येईल, अशी ती आहे. परीक्षा पुन्हा घेण्याची पध्दत नाही. परंतु, मी या संदर्भात माहिती घेतली. समिक्षकांचा किंवा तज्ज्ञांचा असा सल्ला होता की, हस्तलिखित प्रश्न पत्रिका द्यावी. तथापि, मी आता अशा सूचना दिल्या आहेत की, रोज उर्दू वर्तमानपत्र प्रसिध्द होतात किंवा उर्दू भाषेतील अनेक पुस्तके छापली जातात. त्यांचे प्रिंटिंग चांगले असते. यामध्ये थोडा गोपनीयतेचा देखील भाग आहे. त्याकडे लक्ष देऊन तशा प्रिंटिंग प्रेस कडून प्रश्नपत्रिका छापून घेणे आवश्यक राहील आणि तशी प्रश्न पत्रिका देता येईल. त्यामुळे अधिक सुरक्षितता बाळगून हे काम आमचा विभाग नक्की करील.

सभापती महोदय, परीक्षा झाल्यानंतर काही परीक्षार्थींना बोलावून वाचता येण्यायोग्य प्रश्न पत्रिका आहे का किंवा त्यामध्ये काही चुका आहेत का, याबाबतची विचारणा मी केली होती. परंतु, त्यांनी मला असे सांगितले की, "हाथ से लिखा पेपर हमें अच्छा नही लगता." त्यामुळे या प्रिंटेड प्रश्न पत्रिका असल्या पाहिजेत, अशी जी मागणी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी केली आहे, ती योग्य आहे आणि तसे आम्ही करु. तथापि, परीक्षार्थींचे काही नुकसान झाले नसल्यामुळे केवळ हस्तलिखित प्रश्न पत्रिका असल्यामुळे परीक्षा रद्द करण्याचे काही कारण नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, पहिली ते आठवी इयत्तेला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी ही परीक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. परीक्षार्थी शिक्षकांसाठी हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याच्याशी मी सहमत आहे.

सभापती महोदय, प्रिंटेड प्रश्न पत्रिका देण्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. तथापि, मला हे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, वाचण्यायोग्य प्रश्न पत्रिका नसल्याबाबत परीक्षा केंद्रावरील केंद्र प्रमुख किंवा पर्यवेक्षक यांच्याकडे परीक्षार्थींनी तक्रारी नोंदविल्या आहेत का ?

सभापती महोदय, राज्य शासनाकडून फक्त इंग्रजी, मराठी व उर्दू या तीन माध्यमाच्या शाळांतील शिक्षकांसाठी महासीईटी अनिवार्य करण्यात आली आहे. राज्यात इंग्रजी, मराठी व उर्दू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..........

माध्यमांव्यतिरिक्त अन्य माध्यमातील शाळा देखील आहेत आणि त्यामध्ये हिंदी माध्यमाच्या शाळांची संख्या मोठी आहे. त्यामुळे हिंदी माध्यमाच्या शाळातील शिक्षकांना ही परीक्षा अनिवार्य करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी तक्रारी प्राप्त झाल्याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबतही चौकशी केली आहे. स्वाभाविकपणे परीक्षेतील विविध अडचणींबाबत संबंधित केंद्र प्रमुखांकडे किंवा पर्यवेक्षकांकडे परीक्षार्थी तक्रार नोंदवीत असतात. तथापि, या परीक्षेबाबत तशा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. फक्त एकाच परीक्षार्थीने हस्तलिखित प्रश्न पत्रिका का देण्यात आली, अशा प्रकारची तक्रार ई-मेल वर केली होती.

---------------

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : नागपूर व चंद्रपूर येथे होणारे प्रदूषण

**मु. शी**. : नागपूर व चंद्रपूर येथे होणारे प्रदूषण यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यात विदर्भात नागपूर व चंद्रपूर येथील वीज केंद्रातून निघणाऱ्या कोळशाचा धूर, सल्फरडायऑक्साईड उत्सर्जनामुळे ६० टक्के मानवी आरोग्यावर परिणाम होत असल्याचे नासा या अमेरिकन संस्थेने भारत, अमेरिका व चीन मधील औष्णिक विज केंद्राचा उपग्रहामार्फत अभ्यास केला असता दिसून येणे, सल्फरडाय ऑक्साईड हा पर्यावरण आणि आरोग्यासाठी घातक वायू असून या वायुच्या सतत संपर्कामुळे दमा, श्वसनाचे आजार, खोकला, डोळ्यांची जळजळ, विशेषत: लहान मुलांना श्वसनाचा विकार होणे, नागपूर व प्रामुख्याने चंद्रपूर येथील भागात मोठ्या प्रमाणात नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, त्यामुळे जनतेत पसरलेला असंतोष, नागरिकांच्या आरोग्यासंदर्भात शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, भारत प्रदूषणात दुसऱ्या क्रमांकावर असून चंद्रपूर जिल्हा हा प्रदूषणाच्या बाबतीत देशात चौथ्या क्रमांकावर आहे. असे असताना या ठिकाणी प्रदूषण नाही, सर्व व्यवस्थित आहे, असे लेखी निवेदनात म्हटले आहे. तसे पाहिले तर प्रदूषण नियंत्रण मंडळामुळे हे प्रदूषण वाढले आहे. कारण, त्या विभागातील अधिकारी त्यांचे काम योग्य प्रकारे पार पाडत नाहीत. त्यामुळे चंद्रपूर मधील प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे.

सभापती महोदय, नासाच्या क्लायमेट चेंज उपक्रमाअंतर्गत औरा उपग्रह व अर्थ ऑब्झरव्हेटरी मार्फत एक सर्व्हे करण्यात आला होता. त्यानुसार भारत प्रदूषणात दुसऱ्या क्रमांकावर असून सर्वच थर्मल पॉवर स्टेशनमधून सल्फरडाय ऑक्साईड हा पर्यावरण व आरोग्याला घातक असलेला वायू बाहेर पडत असतो. या वायुच्या संपर्कामुळे दमा व श्वसनाचे आजार होत असतात. हे नासाने केलेल्या सर्वेच्या माध्यमातून सांगितले गेले आहे. त्याचप्रमाणे आरगोने नॅशनल लॅबोरेटरीचे वैज्ञानिक श्री.झी फेंग लु यांच्या नेतृत्त्वात काही विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी नासाच्या उपग्रहाच्या माध्यमातून अभ्यास केला आहे. सल्फरडाय ऑक्साईड हा वायू नैसर्गिकरित्या ज्वालामुखीतून बाहेर पडत असतो. त्याही पेक्षा अधिक तो उद्योगातून बाहेर पडतो. 2000 मे.वॅ.ऊर्जेसाठी जवळ जवळ 35 हजार मेट्रीक टन कोळसा रोज जळतो. त्यामधून 15 हजार टन राख व 180 मेट्रीक टन सल्फरडाय ऑक्साईड बाहेर पडतो, असे उपग्रहीय चित्रात दिसते, असेही नासाने सांगितले आहे. हा नासाचा अहवाल दिनांक 6 जानेवारी, 2014 रोजी प्रकाशित झाला आहे. नासाने हा अहवाल आपल्या येथील खगोल व पर्यावरण अध्यक्ष श्री.सुरेश चोपणे यांना ई-मेलव्दारा पाठविला आहे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या सर्व प्रकाराची ताबडतोब चौकशी करुन जनतेला न्याय देण्यात येईल का, संबंधित पॉवर प्लँटवर आणि स्वत:च्या जबाबदारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे का, जनतेची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करणार का ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी सुरुतीलाच एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, अधिकाऱ्यांनी कामचुकारपणा केला असेल, चुकीची माहिती दिली असेल तर त्याबाबत तपासून पाहिले जाईल आणि दोषी अधिकाऱ्यांविरुध्द निश्चितपणे कारवाई केली जाईल.

...5....



श्री.रामदास कदम.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, त्या भागात कोणत्या कारखान्यांमुळे प्रदूषण होत आहे, याची स्पेसिफिक माहिती सन्माननीय सदस्यांनी दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितलेली माहिती खरी मानून कारवाई करावी लागते. हा प्रकल्प आहे, येथे कोळशामुळे प्रदूषण होत आहे, अशी स्पेसिफिक माहिती सन्माननीय सदस्यांनी दिली तर मी आपल्याला सोबत घेऊन त्या ठिकाणी स्वत: व्हिजिट देईन आणि प्रदूषण होत असल्याचे आढळून आले तर तेथील अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याशिवाय मी राहणार नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, नासाने खगोल व पर्यावरण अध्यक्ष श्री.सुरेश चोपणे यांना अहवाल पाठविलेला आहे. तो वाचून शासन संबंधितांवर कारवाई करु शकते. त्याचप्रमाणे नासाने पाठविलेल्या अहवालावर श्री.सुरेश चोपणे यांचे अभिप्राय घेऊन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अहवालापेक्षाही सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताईंचा अभ्यास चांगला आहे आणि ताईंवर भाईंचा पूर्ण विश्वास आहे. याबाबत निश्चितपणे चौकशी केली जाईल, अधिक माहिती घेतली जाईल आणि योग्य ती कारवाई देखील केली जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला आहे. जागतिक पातळीवर प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणांचा वापर केला जात असावा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहकार्य घेऊन चंद्रपूर या इको-सेंसेटिव्ह भागासाठी एक स्वतंत्र प्रयोगशाळा स्थापन करण्यात येईल का ? याबाबतचा अभ्यास करुन अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्याला त्याचा चांगला उपयोग होईल. शासनाने निवेदनात असे म्हटले आहे की, "जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर यांचे अहवालानुसार त्यांच्या अखत्यारीत 9 ग्रामीण रुग्णालये व 2 उप जिल्हा रुग्णालये असून रुग्णांना औषधोपचार करुन वेळोवेळी औषधांचा पुरवठा करण्यात येतो. मात्र, प्रदूषणामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ झाली असल्याचे उपरोक्त दोन्ही अहवालात नमूद करण्यात आलेले नाही." परंतु, वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी असण्याची फार मोठी शक्यता निश्चितपणे आहे. विजेसाठी हे कारखाने अखंडपणे सुरु राहणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शेकडो टन राख आणि वायू या माध्यमातून सोडला जात आहे. सामान्य माणसाचे जीवन त्यामुळे अधिक कष्टमय होत जाणार आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.........

अस्धारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

ही सर्व शक्यता लक्षात घेऊन आतापर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ज्या योजना आहेत, त्या पुरेशा यशस्वी झाल्या नाहीत, असा निष्कर्ष निघाला तर पुढचे पाऊल म्हणून अधिक कार्यक्षम यंत्रणा कशा निर्माण करता येतील या दृष्टीने विभागाला सूचना देण्यात येतील काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जी व्यथा सांगितली ती चुकीची आहे असे मी म्हणणार नाही. तुमच्या म्हणण्यात तथ्य असू शकेल. पंरतु याबाबत आताच घाईघाईने प्रयोगशाळा करण्याची आवश्यकता नाही. याबाबत मी स्वत: चंद्रपूरला जाऊन जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक घेणार आहे. तेथील काही औष्णिक प्रकल्पांना मी भेटी देणार आहे. मी कमी कालावधीत बरीच माहिती घेतली आहे. केंद्रीय पर्यावरण मंडळाने ज्या अटी व शर्ती घातल्या होत्या त्या देखील पाळल्या जात नाहीत, अशी माझी माहिती आहे. तेथे जे खड्डे खोदण्यात आले त्यांना कंम्पाऊंडची आवश्यकता आहे. काम झाल्यावर खड्डे बुजविणे आवश्यक आहे ते काम केले जात नाही. गाड्या कोळसा घेऊन जाताना त्याच्यावर ताडपत्री टाकली पाहिजे, ती टाकली जात नाहीत, अशा अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. मोठ्या प्रमाणात विजेचे उत्पादन करतांना स्थानिक जनतेला त्रास होत असेल तर शक्य तेवढ्या लवकरात लवकर तेथील प्रदूषण थांबविण्याचे काम करण्यात येईल.

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता असे सांगितले की, केंद्रीय पर्यावरण विभागाने घातलेल्या अटी देखील पाळल्या जात नाहीत, ही बाब बरोबर आहे. सल्फरडाय ऑक्साईड नियंत्रण करण्यासाठी जे संयंत्र लावण्यात येतात त्याचे टेक्निकल नाव मला आता आठवत नाही. पंरतु कोराडी व खापरखेडा येथे नवीन पॉवर प्रोजेक्ट झाले आहेत. त्यांना पर्यावरणाची मंजुरी काही अटींच्या अधीन राहून मिळाली होती. परंतु आता त्या अटींची पूर्तता न करता सल्फरडाय ऑक्साईड कमी करण्यासाठी जी संयंत्रे लागतात त्यांची किंमत 300 ते 400 कोटी रुपये आहे. पॉवर प्रोजेक्टची किंमत वाढते त्यामुळे प्रोजेक्ट फिजिबल होत नाही, अशी पळवाट काढून महाजेनको कंपनी सयंत्र न लावता नागपूर येथे सल्फरडाय ऑक्साईडचा एक प्रकारे पुरवठा करीत आहे. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, ही संयंत्र लावण्याचे बंधन या कंपन्यावर घालण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, होय, ज्या उद्योजकांनी अशा पध्दतीने संयंत्र लावले नाहीत त्यांना ही संयंत्रे लावण्याच्या सूचना तातडीने देण्यात येतील. जे प्रकल्प अशी सयंत्र लावणार नाहीत किंवा ज्यांनी लावले नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विचारेल्या प्रश्नाला दिलेल्या मागील उत्तरात मी थोडी सुधारणा करतो. सन्माननीय सदस्यांनी प्रयोगशाळा उभारण्याचा उल्लेख केला होता. अशा प्रकारची प्रयोगशाळा चंद्रपूर येथे आहे. ही प्रयोगशाळा कोणत्या परिस्थितीत आहे याची पाहणी करण्यात येईल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भातील मिहान प्रकल्पाच्या कामांना होत असलेला विलंब.

**मु.शी.**: विदर्भातील मिहान प्रकल्पाच्या कामांना होत असलेला विलंब यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"विदर्भातील सर्वात महत्वाचा असा मिहान प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याकरिता शासनाने जलदगतीने पावले उचलण्यास केलेली सुरूवात, यात मिहान प्रकल्पासाठी १५ गावांतील जमिनीचे अधिग्रहणाचे काम सुरू करण्यात येणे, यामध्ये शासकीय तसेच झुडपी जंगल आदिंचा समावेश असणे, त्याचबरोबर या प्रकल्पाकरिता विजेचा प्रश्न अत्यंत महत्वाचा असून एमएडीसी यांच्या नावे वीज निर्मितीचे लायसन्स असल्यामुळे महाराष्ट्र वीज वितरण कंपनी व एमएडीसी यांचा संयुक्त करार करून महाराष्ट्र वीज वितरण कंपनीकडून कमी दराने खरेदी करून तीच वीज एमएडीसीने रूपये ४ ते ४.३० प्रति युनिट या दराने वीज उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय, सदरचा प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्याकरिता शासनाकडून सुरू असलेले प्रयत्न, तसेच सदर प्रकल्प हा सन २०१२ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्यापि प्रकल्पाचे काम प्रलंबित असणे, परिणामी प्रकल्पाच्या कामास विलंब होत असल्याने विकास कामांना बसलेली खीळ, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून उक्त प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व भूमिका."

डॉ.रणजित पाटील : (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. माझ्याकडे बऱ्याच ग्रामसभा, नागपूर जिल्हा संयोजन समिती, नागपूर जिल्हा शेतकरी समिती व इतरांनी केलेली निवेदने आहेत. याबाबत मंत्री महोदयांना माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, या लक्षवेधी सूचनेला माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी उत्तर दिले असते तर जास्त बरे झाले असते. ही लक्षवेधी सूचना नगर विकास विभागाला मार्क झालेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाच्या पान क्रमांक दोन वरील परिच्छेद दोन मध्ये विद्युत निर्मितीच्या संदर्भात असे नमूद केले आहे की, 246 मेगावॅट क्षमतेचा विद्युत निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला असून दुर्दैवाने प्रकल्प उभारणाऱ्या एएमएनईपीएल कंपनीने वीज निर्मिती व वितरणाबाबत केलेला करार रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी काय पर्यायी व्यवस्था केली याची विचारणा करण्यात आली आहे. माझा प्रश्न असा आहे की, हे दुर्दैव नक्की काय आहे. दुर्दैवाची नक्की कारणे काय आहेत, या कंपनीने कशामुळे निर्मिती व वितरणाचा करार रद्द केला आहे ? यामुळे विजेबाबत हे सर्व प्रश्न निर्माण झाले आहेत.

दुसरा प्रश्न असा आहे की, सन 2013 मध्ये शासनाने जे निर्णय घेतले, त्या शासन निर्णयात असे नमूद केले आहे की, विकास खर्च कसा काढावयाचा याबाबत वेगवेगळे निर्णय घेतले आहे. यामध्ये वानखेडे परिवाराने माझ्याकडे जी माहिती कळविली आहे, त्याबाबत त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना 20 लाख रुपयांचा मोबदला मिळाला आहे आणि त्यांना विकास शुल्क 24 लाख रुपये भरावे लागणार आहे. याबाबत या संघटना सातत्याने आवाज उठवित आहेत. साडेबारा टक्के जमीन प्रकल्पग्रस्तांना मिळायला पाहिजे. प्रति हेक्टरी जी रक्कम त्यांना मिळाली आहे. त्यापेक्षा जास्त रक्कम भूखंड विकसित करण्यासाठी त्यांना देण्याची वेळ आलेली आहे. आता जमिनीचे भाव वाढल्यामुळे विकसित भूखंडासाठी जास्त रक्कम देण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. माझ्या माहिती प्रमाणे याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी काही बैठका घेतल्या आहेत. या शेतकऱ्यांना शासन कोणत्या पध्दतीने दिलासा देणार आहे. अन्यथा हे विकसित भूखंड फक्त नावापुरते राहतील. त्यामुळे साडेबारा टक्के शुल्काबाबत शासन काय मार्ग काढणार आहे असे माझे दोन प्रश्न आहेत.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, विदर्भाच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या प्रकल्पाला सन 2002 मध्ये शासनाने मान्यता दिल्यानंतर अधिसूचना काढून एमएडीसीला स्वतंत्र प्राधिकरण म्हणून मान्यता देण्यात आली आहे. कालांतराने एएमएनईपीएल व एमएडीसी यांचे जॉईन्ट व्हेंचर झाले आहे. यामध्ये 74 टक्के समभाग एएमएनईपीएल यांचा असून 26 टक्के समभाग एमएडीसीचा आहे. याबाबत एक करारनामा झाला असून पीपीपी साईन करण्यात आले होते. बेसीक रेट व ॲव्हरेज एक्सपेन्डीचर मिळून प्रतियुनिट 4 रुपये प्रमाणे वीज द्यावी असा करारनामा झाला होता. सुरुवातीला फक्त 50 मेगावॅट क्षमतेचे कोळशावर चालणारे थर्मल पॉवर स्टेशन उभे करावे व त्यानंतर टप्प्याटप्याने 50 मेगावॅटचे चार प्रकल्प उभारुन 200 मेगावॅट कॅपेसिटी वाढवित न्यावी असे करारनाम्यात अंतर्भूत होते. त्यापैकी एएमएनईपीएल या कंपनीने 61.5 मेगावॅटचे चार प्रकल्प उभे केले. त्यानुसार 31 मार्च 2013 पासून दिनांक 4.11.2013 पर्यंत त्या प्रकल्पांना नियमित विद्युत पुरवठा करण्यात आला. त्यानंतर दिनांक 5.11.2013 रोजी त्यांना पुरवठा बंद करण्यात आला. डीजेसेठ यांना दिनांक 5.11.2013 पासून 16 एप्रिल, 2014 पर्यंत सुध्दा हा विद्युत पुरवठा चालू होता. परंतु लिकेंजेसमधून कोळसा मिळत नाही, कोळसा महाग मिळतो. म्हणून दुर्दैव या शब्दाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यानंतर करारनामा रद्द करण्याची नोटीस देण्यात आली होती. आता हे प्रकरण लवादाकडे आहे व हायकोर्टात गेलेले आहे. या प्रकरणाची आजपर्यंतची ही परिस्थिती आहे. आता आपण वीज Day ahead तत्वावर इंडियन एनर्जी एक्सचेंजकडून तत्वाने घेत आहोत. तेथील स्थानिक लोकांची मागणी 2 मेगावॅट ते साडेचार मेगावॅट इतकी आहे. महावितरण कंपनीमार्फत आम्हाला जो विद्युत पुरवठा होत होता, त्यापेक्षा जास्त दराने एएमएनईपीएल कंपनीकडून वीज घ्यावी लागते असे तेथील लोकांचे दुखणे आहे. हे प्रकरण लवादाकडे व हायकोर्टात असल्यामुळे याबाबत शासनाला वेट ॲन्ड वॉच भूमिका घ्यावयाची आहे. मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत स्वत: लक्ष घातले असून यातून काही सकारात्मक निघते काय यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील...

सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, 2002 सालापासून 2008 सालापर्यंत जे भूसंपादन करण्यात आले होते त्याचा मोबदला रेडिरेकनर प्रमाणे देण्यात आला होता. त्यानंतर 12.5 टक्के विकसित भूखंड देऊन त्यांना मोबदला देण्यात आला. ज्याना अतिशय नाममात्र दराने मोबदला मिळालेला आहे त्यांच्या आजही ग्रीव्हन्सेस आहेत. त्यांच्यासाठी एक विशेष पॅकेज देण्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी एक बैठक लावलेली आहे. याबाबतीत सरकार सहानुभूतीने आणि सकारात्मक दृष्टीने विचार करीत आहे. शहरी आणि ग्रामीण भागामध्ये जे पुनवर्सन होते त्याबाबतीत अधिका-यांनी 10-15 दिवसाने जातीने लक्ष द्यायला पाहिजे. या कामाशी संबंधित असलेला अधिकारी मुंबईच्या कार्यालयामध्ये बसतो. यापुढे या अधिकाऱ्यांना सात दिवसातून 3 दिवस प्रत्यक्ष जागेवर काम करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

डॉ. नीलम गो-हे : वीज कंपनीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. आपण आर्बीट्रेशनमध्ये गेलो आहे. त्या कंपनीने करार रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आपले म्हणणे ग्राह्य धरून कंपन्यांशी केलेला करार रद्द करता येणार नाही असे कोर्टाने सांगितले तर ग्राहकांवर जो अतिरिक्त भार पडत आहे त्या बाबतीत दिलासा देणारे कोणते पॅकेज आपण जाहीर करणार आहात ? कंपन्याकडे मोठमोठी वकील मंडळी असतात. त्यामुळे वर्षानुवर्षे खटले चालत असतात. मध्यंतरीच्या काळामध्ये ग्राहकाला तसदी बसते. ग्राहकाला दिलासा का दिला जात नाही ? सरकार जे धोरण ठरविते त्यानुसार अधिकारी निर्णय घेत असतात. साडेबारा टक्के विकास शुल्काबद्दल शासन काय दिलासा देणार आहे ?

डॉ. रणजित पाटील : हे सत्य आहे की, सध्या ज्या करारनाम्यानुसार या उद्योजकांना वीज मिळाली पाहिजे होती त्या दराने त्यांना आज वीज मिळत नाही. आज एक्स्चेंजमधून मिळणाऱ्या विजेचा दर आणि करारनाम्यातील दर यामध्ये तफावत आहे. यामुळे उद्योजकांमध्ये नाराजी आहे. पहिल्यांदा जास्त दराने वीज दिली जात होती. परंतु आज उद्योजक समाधानी आहेत. उद्योजकांचा सहानुभूतीने विचार करून त्यांना कमी दराने वीज देण्यात येत आहे. आजच्या वीज दराबाबत ते समाधानी आहेत. कमर्शियल दरापेक्षा बऱ्याच सबसिडाईज दराने उद्योजकांना वीज देण्यात येत आहे. हे कायमचे सोल्युशन नाही. करारनामा रद्द केला असला तरी त्यांनी बरेचसे इन्व्हेस्टमेंट केलेले असल्यामुळे त्याबाबतीत शासन उपाययोजना करील. 2008 सालापासून आपण साडेबारा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. व्ही.खर्चे 14:20

डॉ.रणजित पाटील....

टक्के विकसित भूखंड दिले. आज अशी परिस्थिती आहे की, विकसित भूखंडाचा विकास करण्यासाठी जे शुल्क लागते ते त्यांना मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा जास्त आहे. त्यासाठी देखील शासन विचार करीत आहे. याबाबतीत बैठक घेऊन त्याना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. प्रकल्प 15-15 वर्षे चालू राहतात आणि त्यामुळे हा प्रश्न निर्माण होतो. जमिनीचा मोबदला अतिशय कमी होता. या बाबतीत कोर्टात अनेक प्रकरणे आहेत. याबाबतीत कोर्ट देखील सहानुभूतीने विचार करुन तिप्पट चौपट मोबदला देते. उद्या अशा प्रकरणी कोर्टाच्या निर्णयानंतर जास्त मोबदला देण्याची वेळ आली तर तो देण्याची सरकारची तयारी आहे.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXXVII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

डॉ. रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि. स. वि. क्रमांक 37, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

सभापती महोदय, ग्रामीण भागाचा मोठया शहराला लागून असलेल्या पेरिअर्बन एरियाच्या संदर्भात सकाळी प्रश्न उपस्थित झालेला होता. शहरे मोठी होत आहेत, शहरीकरण वाढत आहे. एकेकाळी ग्रामीण आणि शहरी भागाचे 70:30 असे जे गुणोत्तर होते ते आज 50:50 टक्यापर्यंत आलेले आहे. शहरे झपाटयाने वाढू लागल्यानंतर डीपी मंजूर होत नव्हते. शासन 10-10 वर्षे निर्णय घेत नव्हते. अशा वेळी पेरिअर्बन एरियाला म्हणजे शहरी भागाला लागून असलेल्या ग्रामपंचायतीच्या भागामध्ये जी बांधकामे होत होती त्यावर कोणताही निर्बंध राहिलेला नव्हता. कारण त्याच्या नियोजनासाठी प्राधिकरणच नव्हते. म्हणून अशा पेरिअर्बन एरियामध्ये अनधिकृत बांधकामाचा प्रघातच सुरु झाला. याबाबतीत काय उपाययोजना करावी की जेणेकरुन ही कृती कमी होईल यासाठी शासनाने एक कमिटी नेमली. या कमिटीने कायदेशीर सुधारणा सुचविल्या त्या आधारावर ब-याच गोष्टीबाबत या विधेयकामुळे ग्रामपंचायती,जिल्हापरिषद आणि जिल्हाधिकारी यांना अधिकार प्राप्त होत आहेत. शहरी भागात बांधकाम करताना शहर नियोजन आणि विकास प्राधिकरण असते. परंतु ग्रामीण भागामध्ये असे बांधकाम करताना ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळविणे, जिल्हाधिका-यांचे प्रमाणपत्र मिळविणे, एन.अे. करणे, या सर्व गोष्टी इतक्या क्लिष्ट होत्या की, त्या भानगडीत न पडता सरळ बांधकाम करुन ग्रामपंचायतीच्या सरपंचाकडून ना

..4..



MSS/ पूर्वी श्री. व्ही.खर्चे 14:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील....

हरकत प्रमाणपत्र घेण्याची प्रवृत्ती वाढली. ही प्रवृत्ती कमी होण्यासाठी हे विधेयक शासनाने आणलेले आहे. गावाच्या शिवारामध्ये जी बांधकामे होतात त्याचे संपूर्ण अधिकार ग्रामपंचायतीना दिलेले आहेत. एवढेच नाही तर जेथे जेथे अनधिकृत बांधकामे असतील ती पाडण्याचे अधिकार पहिल्यांदा ग्रामपंचायतीला, सरपंचांना, जिल्हाधिकाऱ्यांना नव्हते, ते अधिकार आता त्यांना या विधेयकान्वये प्रदान करण्यात येत आहेत. पेरिअर्बन एरियामध्ये राहाणारे लोक टॅक्स भरत नसल्यामुळे शहरी भागातील लोकांवर त्याचा बोजा पडतो. पेरिअर्बन एरियामध्ये राहाणारे लोक महापालिकेच्या सर्व सोयीसुविधांचा फायदा घेत असताना ते टॅक्स भरत नाहीत. आता त्यांना देखील टॅक्सच्या ॲम्बीटमध्ये आणण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीला अधिकार प्रदान करण्यासंबंधीचे हे विधेयक मी मांडलेले आहे.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

डॉ. रणजित पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि. स. वि. क्रमांक 37, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

..नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक -37 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये आज ग्रामपंचायती आहे. ब, क व ड वर्ग नगरपालिकांच्या माध्यमातून नियोजनाचे प्राधिकरण नगररचना विभागामार्फत अस्तित्वात आहे. संपूर्ण राज्यातील काही मोजक्या जिल्हयांमध्ये रिजनल डेव्हलपमेंट प्लॅन अस्तित्वात आलेला नाही, अशा प्रकारचा प्लॅन अस्तित्वात आलेले जिल्हे महाराष्ट्रात खूप मोठया संख्येने आहेत असा भाग नाही. ज्या ठिकाणी नागरीकरण झाले आहे ते जिल्हे मुंबईच्या जवळचे आहेत, पुण्याच्या जवळचे आहेत, नागपूर सारख्या उपराजधानीच्या जवळचे जिल्हे आहेत. अशा जिल्हयांमध्ये रिजनल डेव्हलपमेंट प्लॅन गेल्या अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनजीवन दिवसेंदिवस बदलल्याचे चित्र पहावयास मिळते.

सभापती महोदय, स्वातंत्र्यानंतर खेड्याकडे चला असा मूलमंत्र महात्मा गांधीजींनी दिला. खेड्यातील माणसे रोजगाराच्या निमित्ताने, शिक्षणाच्या निमित्ताने शहराकडे वळल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळाले. अनेक तालुका स्तरावर आज नगरपालिका आहेत. मधल्या काळात लोकशाही आघाडीच्या सरकारने निर्णय घेतला होता. महाराष्ट्रामध्ये जवळपास 100 ठिकाणी नगरपालिका, नगर पंचायती नाहीत त्या ठिकाणी नगर पंचायती किंवा नगरपालिका निर्माण करण्यात याव्यात. महाराष्ट्रातील तालुका मुख्यालय असलेल्या मोठया संख्येच्या ग्रामपंचायती आहेत. त्या ठिकाणी शहरे विकसित होत असताना एका बाजूला अनधिकृत बांधकामे वाढत आहेत, झोपडपट्टया मोठया प्रमाणात वाढत आहेत. साहजिकच याचा ताण तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांवर येऊन पडतो. पिण्याच्या पाण्याची समस्या, ड्रेनेज व्यवस्था नसल्यामुळे साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो.

सभापती महोदय, मी नगरविकास राज्यमंत्री असताना नगरपालिकांना मिळणारे अनुदान केवळ युडी-6 अंतर्गत मिळत होते. जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून होणारी तरतूद अपुरी असल्याने क वर्ग नगरपालिकांना कर्ज घ्यावे लागायचे. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांच्या मी ही बाब निदर्शनास आणून दिली. ग्रामीण भागातील माझ्यासारख्या कार्यकर्त्याला ब व क वर्ग नगरपालिकांची आवश्यकता लक्षात घेऊन त्यांना वाढीव अनुदान दिले पाहिजे असे

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे............

सातत्याने वाटत होते. त्यातून रस्ते अनुदानाची योजना, वैशिष्ट्यपूर्ण अनुदान शहरामधील वेगवेगळ्या योजनांसाठी देण्याची भूमिका घेतली गेली. केंद्र सरकारने वित्त आयोग निर्माण केला. वित्त आयोगाकडून लोकसंख्येच्या आधारे प्रत्येक राज्यांना निधी दिला जात होता. राज्यात ज्या ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात लोकसंख्या आहे त्या ठिकाणच्या जिल्हा परिषदा, नगरपालिका व महानगरपालिकांना वित्त आयोगाचा निधी मिळतो. ज्या विभागात शहरे असतील त्या विभागाला निधी उपलब्ध होत नव्हता ही बाब मी तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. राज्यात मोठया प्रमाणात नागरीकरण होत आहे. आज या महाराष्ट्रात जवळपास 50 टक्क्याच्या आसपास नागरीकरण पोहोचले आहे. पुढील काही वर्षात हे प्रमाण 55 टक्क्यावर जाईल. सुनियोजित शहरे आणि मोठया प्रमाणात असलेल्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती या दृष्टीने नियोजनाची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज आपण पाहतो की, काही महापालिकांमधील गावे वगळली गेली किंवा काही गावांचा अंतर्भाव झाला त्यावेळी तेथील नागरिकांनी मोठया प्रमाणात विरोध केला होता. याचे कारण असे की, महापालिकेच्या क्षेत्रात गेल्यानंतर कर वाढतात. कराची आकारणी होते. बांधकामाच्या बाबतीत बंधने येतात. उपलब्ध असलेल्या भूखंडावर बांधकाम करावयाचे असेल तर नियमावलीच्या आधीन राहून बांधकाम करावे लागते. म्हणून ग्रामीण भागात गावे वगळण्यासाठी मोठया प्रमाणात आंदोलने सुध्दा झाली. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या क्षेत्रातील 27 गावे वगळण्याच्या संदर्भात खूप मोठया प्रमाणात संघर्ष झाला. आज ग्रामीण भागात आणि खेडयापाडयात सुध्दा मोठया प्रमाणात नागरीकरण वाढत आहे. कुटुंबामध्ये होणारी नैसर्गिक वाढ लक्षात घेऊन 5-25 घरे नवीन बांधली जातात. गावांमध्ये गावठाणे असतात. त्या ठिकाणी बांधकाम करावयाचे असेल, घर बांधायचे असेल तर ग्रामपंचायतीला परवानगी देण्याचे अधिकार होते. मधल्या काळात गावठाण विस्ताराची योजना सरकारने बंद केली. माझी या विधेयकाच्या माध्यमातून सरकारला विनंती आहे की, गावातील गावठाण विस्तार योजना पुन्हा सुरु करावी लागेल. गावठाणाच्या विस्तार तुम्ही केला नाही, त्यासाठी जमीन संपादित केली नाही तर उपलब्ध असलेल्या जागेवर मोठया प्रमाणात अतिक्रमणे होत आहेत, त्यामुळे दोन घरांमध्ये जे सामाईक अंतर सोडावे लागते ते सोडले जात नाही. पूर्वीच्या काळातील माणसे हुशार होती. दोन घरांमध्ये

...3..



SGB/ 14:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंतर असायचे, आपल्या घराच्या पागोळ्यामधून पडणारे पावसाचे पाणी दुसऱ्याच्या अंगणामध्ये पडणार नाही याची खबरदारी घेणारी जागृत माणसे कोकणामध्ये होती. एमआरटीपी कायदा त्यावेळी अस्तित्वात नव्हता. व्यवहाराची जाण असणारी माणसे जास्त शिकलेली नव्हती. परंतु दोन घरांमधील अंतर व्यवस्थित असेल तर अनेक गोष्टींवर उपाय निघू शकतो अशा प्रकारची जाण असलेले नेतृत्व गावागावांमध्ये होते.

सभापती महोदय, आज परिस्थिती बदलली आहे. आज लोकसंख्या प्रचंड वाढली आहे. अंगाखालची असलेली जमीन दिवसेंदिवस कमी होत गेली आहे. उपलब्ध असलेल्या जागेवर बांधकाम करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. मधल्या काळात गुंठेवारीचे विधेयक आणून झालेली बांधकामे नियमित करण्याचा प्रयत्न केला गेला. शहरांच्या भोवती 2-3 गुंठे जमीन घेऊन आपले स्वत:चे घर असावे हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बांधकाम करण्याचा प्रयत्न त्या काळात झाला. गुंठेवारीचा कायदा आपण मंजूर केला. त्यातून त्यावेळी त्यांनी केलेले बांधकाम अधिकृत कसे होईल हे पाहिले गेले. त्यामधून सरकारकडे कर जमा झाला. परंतु अनधिकृत बांधकाम म्हणून त्याच्यावर असलेली टांगती तलवार संपुष्टात आणण्याचे काम लोकशाही आघाडीच्या सरकारने केले. आज या विधेयकाच्या माध्यमातून जी कल्पना आपण करीत आहात, ती अत्यंत योग्य आहे. मी दोन-तीन महत्वाचे प्रश्न मांडणार आहे.

सभापती महोदय, आज माझ्या रायगड व शेजारच्या रत्नागिरी जिल्हयामध्ये रिजनल डेव्हलमेंट प्लॅन अस्तित्वात आहे. परंतु दोन्ही जिल्हयांच्या सीमेवर असलेल्या दोन गावांमध्ये वेगवेगळी परिस्थिती आहे. बिनशेतीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे तर सीमेवर असलेल्या गावांमध्ये हे अधिकार तेथील तहसीलदार किंवा मधल्या काळात प्रांत अधिकाऱ्यांकडे दिले गेले आहेत. रिजनल डेव्हलपमेंट प्लॅन मंजूर असलेल्या ठिकाणी अशी व्यवस्था असताना टाऊन प्लॅनिंगची मंजुरी अभिप्रेत असते. ग्रामपंचायतीला आपण अधिकार दिलेले आहेत. त्या गावांमध्ये एखाद्याला घर बांधायचे असेल तर घराच्या बांधकामाच्या नकाशावर सरपंचाचा किंवा ग्रामसेवकाचा शिक्का बसल्यानंतर ते बांधकाम करण्यास मुभा होती. आज या विधेयकाच्या निमित्ताने आपण नियंत्रण आणीत आहात. भविष्यात घडणाऱ्या अनेक गोष्टींवर नियंत्रण आणण्यासाठी उचललेले

...4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

चांगले पाऊल आहे. याचे परिणाम 20-25 वर्षानंतर आपल्याला दिसतील. या विधेयकाचे स्वागत करीत असताना शेतकऱ्यांना अडचण निर्माण होणार नाही याची हमी राज्य सरकारने दिली पाहिजे. खेडयापाडयामध्ये राहणारा माणूस त्याच्या घराचे बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करेल, तो अर्ज टाऊन प्लॅनिंगकडे पाठविण्याची व्यवस्था नाही, जिल्हयाच्या नगररचना विभागाकडे पाठविला जाईल. टाऊन प्लॅनिंगकडे फाईल गेल्यानंतर किती काळात प्लॅन मंजूर होईल याची निश्चित कालमर्यादा या बिलामध्ये नाही. खेडयापाडयामध्ये राहणारा माणूस त्याच्या घराचे बांधकाम असेल, गुरांच्या गोठ्याचे बांधकाम असेल या प्रक्रियेतून त्याला जावे लागणार आहे. त्याच्या घराच्या बांधकामासाठी किती वर्षांनी परवानगी मिळेल या संदर्भातील बंधने ग्रामपंचायतीमध्ये आहेत. परंतु जिल्हयाच्या ठिकाणी असलेल्या जिल्हा कार्यालयामध्ये तुमचा एक सह संचालक असतो, त्याच्या हाताखाली आरेखक असतो त्यांच्याकडे जिल्हयाचा कारभार असतो.

नंतर डब्ल्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ------------

ज्यावेळी त्यांच्याकडे हे नकाशे मंजुरीसाठी जातील तेव्हा ते बराच काळ प्रलंबित राहण्याची शक्यता असते, काही बाबतीत त्यांना विशिष्ट पध्दतीच्या रकमेची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याउलट एखादा बांधकाम व्यावसायिक असेल तो अशा मागण्या पूर्ण करु शकतो पण स्वत:चे घर बांधण्यासाठी असा नियोजन आराखडा मंजूर करावयाचा असेल त्याच्या गळ्याला फास आवळण्याची पाळी येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. म्हणून यात लोकसंख्येचा स्तर ठरविणेही आवश्यक आहे. ज्याप्रमाणे "क" वर्ग नगरपालिकेला 30 ते 35 हजार लोकसंख्या, "ब" वर्ग नगरपालिकेला 50 ते 60 हजार लोकसंख्येची मर्यादा ठरविलेली असते पण जसजसे उत्पन्न आणि लोकसंख्या वाढते त्यानुसार या नगरपालिकांचे महानगर पालिकांमध्ये रुपांतर होते अशा प्रकारची ही वर्गवारी केली आहे. मधल्या काळात शासनाच्या कायद्यात बदल झाल्याने लातूर आणि धुळेसारख्या "क" वर्ग महानगरपालिका निर्माण करण्यात आल्या अशाच प्रकारे ही खेडी अथवा वस्त्या नियोजनाच्या माध्यमातून जोडत असताना त्यांचीही वर्गवारी केली पाहिजे अन्यथा 5-25 घरांची एखादी वस्ती अथवा तांडा असेल त्यांनाही हे नियम लागू केले तर अशा वस्त्या व तांडा पस्त्यांवर राहणाऱ्या लोकांवर तो अन्याय होण्याची शक्यता नाकारता येणार नाही यासाठीच ही वर्गवारी केली जावी अशी माझी मागणी आहे. ही वर्गवारी करताना त्यासाठी लोकसंख्येचे प्रमाण देखील निश्चित करावे. ठराविक लोकसंख्येसाठी नियोजन मंजूर करण्याची तरतूद अशा प्रकारे हे निश्चित करणे आवश्यक आहे.

महोदय, मधल्या कालावधीत 5-50 शहरांचे विकास आराखडे मंजूर करण्याचे राहून गेले होते. त्यावेळेस तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. सुशीलकुमार शिंदे आणि मी राज्य मंत्री होतो. आम्ही हातात सूत्रे घेतल्यानंतर हे विकास आराखडे मंजूर केले होते. मला आठवते की, मुंबई महानगर पालिकेचा सुधारित आराखडा मंजूर करणेही प्रलंबित होते. अशा प्रकारे शहरांचे विकास आराखडे सुध्दा मंजूर करीत असताना त्यासंबंधी ज्या हरकती व सूचना मागविण्यात येतात त्या मान्य झ ाल्यानंतर देखील मंत्रालयात बराच काळ असे आराखडे पडून असतात. या निमित्ताने मी अशी सूचना करणार आहे की, अशा प्रकारचे विलंब लागू नयेत म्हणून नियमात स्पष्ट तरतूद करण्यात यावी.

------------2

श्री. सुनील तटकरे ------------

महोदय, अकृषक परवान्याच्या संदर्भात अर्ज केल्यापासून 6 दिवसात परवाना मिळाला पाहिजे असे शासनाने म्हटले असले तरी शासकीय स्तरावर नेमक्या 7 व्या दिवशी एखादी छोटीसी त्रुटी समोर करुन प्रकरण प्रलंबित ठेवण्याचे प्रकार वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण मी या निमित्ताने अशी सूचना करणार आहे की, अर्जदाराने अर्ज केल्यानंतर त्याला निश्चित कालावधी ठरवून त्या काळात त्याला अशी परवानगी मिळालीच पाहिजे, अन्यथा डीम्ड टू बी एन.ए. अशी तरतूद करावी. तसेच ग्रामीण स्तरावर असे आराखडे अथवा नियोजन करीत असताना एखाद्याची जमीन असेल आणि काही कारणासाठी ओपन स्पेस म्हणून ठेवली असेल ती आरक्षणात घेतली जाणार नाही याचीही दक्षता घ्यावी अन्यथा अशा छोट्या गावांमध्ये नागरिकांवर हे अन्यायकारक होणार आहे. "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रात विकास आराखडा होऊ शकतो परंतु खेड्यातील परिस्थिती दिवसेदिवस अत्यंत विदारक होत चालली आहे कारण खेड्यात लोक राहत नसल्याने खेड्यांची लोकसंख्या कमी होऊन जवळच्या "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रांची लोकसंख्या वाढत चालली आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे ही बंधने येतील त्यासाठी कायद्यातील स्पष्टता असणे आवश्यक आहे. तसेच खेड्यापाड्यातील लोक सुध्दा अडचणीत येऊ नये याचीही खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे.

महोदय, अशा प्रकारचे नियोजन ज्यावेळी आपण ग्रामपंचायतींना लागू करतो त्यावेळी त्या त्या ग्रामपंचायतींना सुध्दा विकास निधी मिळण्याची व्यवस्था शासनाला करावी लागणार आहे. याचे कारण गावात भूमीगत गटारे आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली पाहिजे. त्याचप्रमाणे खेड्यात आपल्या वाढत्या कुटुंबाचा विस्तार विचारात घेऊन घर बांधण्याचे नियोजन केले जाते पण या कायद्यानंतर मात्र त्याने स्वत:चे घर बांधताना किती एफएसआय वापरावा आणि कसे घर बांधावे अशी अनेक बंधने या शेतकऱ्यावर येऊ शकतात. त्यावेळी निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा हा खेड्यातील माणूस एमआरटीपी ॲक्टमुळे एका बंदिस्त फ्लॅट सिस्टममध्ये जाण्याची शकयता आहे. भविष्यकाळात नागरिकरण झपाट्याने वाढते त्यानुसार रोजगार निर्मिती सुध्दा होईल आणि नैसर्गिक पध्दतीने वाढणारे कुटुंब या सर्व बाबींचा विचार करता ग्रामीण भागातील माणूस यात भरडला जाणार नाही तसेच गावातील लहान आराखडा मंजूर करताना त्याच्यावर बंधने येऊन तो पुन्हा

...........3



PFK/ पूर्वी श्री. भोगले.......... 14:40

श्री. सनील तटकरे............

कर्जाच्या खाईत लोटला जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही या सर्व गोष्टींचा विचार शासनाने करावा व अशा परवानग्यांसाठी ठराविक कालमर्यादा ठरवून देण्याची गरज आहे.

महोदय, माझी अशीही सूचना आहे की, अशा परवानग्यांसाठी खेड्यातील माणसाला जिल्ह्याच्या ठिकाणी अेडीटीपीकडे जावे लागणार असून ते देखील जिकीरीचे होणार आहे म्हणून तालुका स्तरावर नगररचना कार्यालयाची स्थापना करुन तेथे पुरेसा कर्मचारीवृंद भरण्याची गरज आहे. तसेच लोकसंख्येनुसार वर्गवारी करण्यात यावी व त्यांचाच गाव विकास आराखडा जाहीर करावा. तसेच अशा परवानग्या देत असताना मंजूर आराखड्यानुसार ती मिळते की नाही याचीही स्पष्टता येऊ शकेल. राज्यात ज्या झपाट्याने नागरिकरण होत आहे त्याचा विचार करता अशा प्रकारच्या नियोजनाची भविष्यात आवश्यकता होती परंतु अशी परवानगी देत असताना जे जे मुद्दे उपस्थित केले त्यांची पूर्तता करताना या खेड्यातील माणसाला अतोनात त्रास सहन करावा लागणार आहे, याचीही खबरदारी घेण्यात यावी. जिल्हा केंद्रबिंदू मानून अनेक वेळा आराखडा जाहीर होतो त्यावेळी बाकीच्या ठिकाणी सुध्दा नगररचना कार्यालय आणि त्यानुसार सेवक वर्ग उपलब्ध करुन द्यावा. अन्यथा मंडणगडसारख्या तालुक्याच्या ठिकाणाहून रत्नागिरीला लोकांना जावे लागणार म्हणून तालुक्याच्या ठिकाणी अशी कार्यालये निर्माण करावीत. यामध्ये शासनावर भार पडणार हे मान्य आहे पण लोकांवर भार टाकून शासनावरील भार कमी करण्याचा हा प्रयत्न दिसतो म्हणून यासाठी ठराविक कालमर्यादा ठरवावी व मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात या सर्व मुद्यांचे स्पष्टीकरण करावे अशी अपेक्षा व्यक्त करुन भविष्यात अशा प्रकारच्या सुधारणांसाठी लोकांचा त्रास कमी कसा होईल, चांगली गांवे व चांगली शहरे कशी तयार होतील याचा विचार शासनाने करावा. तसेच या नवीन गावांच्या विकासासाठी निधीची मागणी मी करतो आणि या विधेयकाला काही अटींवर पाठिंबा देऊन माझे विचार पूर्ण करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

---------

यानंतर श्री. भारवि............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, 2014 मांडण्यात आले असून त्याचे स्वागत करण्यासाठी मी उभी आहे. गेली अनेक वर्षे आम्ही वेगवेगळी मागणी करीत होतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे बिल आपण अचानक घेतलेले आहे. आताच माझी एक बैठक सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांच्याकडे होती. ती रद्द झाली. मी एक गोष्ट सातत्याने अधिवेशनामध्ये मांडतो. ती मांडल्यानंतर आपला अवमान होते असे आपल्याला वाटते. आम्ही सभागृहाच्या बाहेर गेल्यानंतर लगेच बिल घेण्यात आलेले आहे. ती बैठक रद्द केल्यामुळे मी येथे लगेच धावत आलो. हे एक महत्त्वपूर्ण बिल आहे. या बिलावर आम्हाला बोलावयाचे आहे. माझी अशी सूचना आहे की, आपण कार्यक्रमपत्रिकेनुसार कामकाज करणार आहात की नाही. या अधिवेशनात कामकाज पत्रिकेनुसार कामकाज न घेण्याचा जणू काही विक्रमच झालेला आहे. आपण कधी विशेष उल्लेख घेता, तर कधी दुसरे कामकाज घेतात. हे आमचे दुःख आहे. माझ्या या मताशी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप सहमत असतील. त्यामुळे आपण कोणते कामकाज घेणार आहात हे सदनाला कळले पाहिजे. तसे जर कळले तर मग आम्ही येथेच थांबून राहू. तेव्हा ही बाब आपण सौम्य न घेता धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. आपण कधीही कोणते कामकाज घेत आहात. हे काय चालले आहे ? त्यामुळे माननीय मंत्री महोदय देखील गोंधळून जातात. पूर्वी प्रश्नोत्तराच्या तासाला शेवटच्या दहा मिनिटांमध्ये कोणताही एक प्रश्न घेतला जात असे. त्यामुळे सर्व माननीय मंत्री सभागृहात उपस्थित असायचे. ती पद्धत आता बदलण्यात आली आहे. असे करून चालणार नाही. आपण आम्हाला विश्वासात घेणार आहात की नाही ? आम्हाला असे वाटले होते की, बिल शेवटी घेणार असून तत्पूर्वी दोन प्रस्ताव होतील. प्रस्तावावर दोन-तीन तास चर्चा होईल असे वाटले होते आणि त्यानंतर बिल येईल अशी आमची अपेक्षा होती. कामकाज समितीमध्ये आपण आमच्यावतीने उपस्थित असतात. त्यामुळे आम्हाला असे बोलायला देखील खेद होत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माननीय सभापतींनी बिल सुरू केलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : आपण पीठासीन अधिकाऱ्याच्या आसनावर आम्हाला न्याय देण्यासाठी बसलेले आहात.

**तालिका सभापती** : नक्की

.श्री.जयंत प्र.पाटील : त्यामुळे मंत्री महोदय आणि आम्हाला सांगावे की, कुठलीही बैठक घ्यायची नाही. कोणीही बोलायचे नाही. यासंबंधी काही तरी ठरले पाहिजे. हे काय चालले आहे हे आम्हाला कळत नाही. जे काय चालले आहे ते बरोबर नाही. यासंबंधी कुठे तरी स्पष्ट बोलले पाहिजे. येथे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांच्या सारखे गोलगोल बोलून चालणार नाही. यात स्पष्टता ही आणलीच पाहिजे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना विचारू इच्छितो की, आपल्याला हे बिल घ्यावयाचे नाही काय ?

श्री.जयंत प्र.पाटील : हे बिल चर्चेसाठी घ्यावे. आम्हाला या बिलावर चर्चा करावयाची आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले विचार मांडावेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एका मिनिटामध्ये एक माणूस ब्रह्मास्त्र कसे मांडू शकतो हे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या बोलण्यावरून दिसून येते.

सभापती महोदय, मी या बिलाचे स्वागत करते. पुणे, कोल्हापूर, पिंपरी-चिंचवड, सांगली, औरंगाबाद, लोणावळा सह अनेक शहरातील व गावांतील परिस्थिती पाहिली तर तेथे राहणाऱ्या लोकांची व्यथा वेगळी आहे. केंद्रीय नियोजन मंडळाची नगरविकास संबंधात समिती आहे. त्यांची सर्व राज्य सरकारना सूचना होती की, जे लोक शहरामध्ये कामासाठी येतात त्यांना राहण्यासाठी त्या शहराच्या लगत निवासी व्यवस्था केली तर शहरांवर पडणारा अतिरिक्त ताण कमी होऊ शकेल. परंतु, त्याची अनेक वर्षामध्ये अंमलबजावणी न झाल्यामुळे प्रत्येक शहराच्या आसपास असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये लोकांनी स्वत:च्या जागेत घरे बांधायला सुरूवात केली. या प्रश्नासंबंधी माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सभागृहात उत्तर दिले होते. आता हे बिल सभागृहामध्ये

...3



BGO/ 14:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंजुरीसाठी आलेले आहे. या बिलासंबंधात माझे पाच मुद्दे असून ते मी आपल्या समोर मांडणार आहे.

सभापती महोदय, गावांमध्ये पूर्वपरवानगी शिवाय कोणतेही बांधकाम करता येणार नाही अशा प्रकारची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. यासंबंधीची परवानगी आहे किंवा नाही यांसंबंधात काहीच कळविले नाही तर अर्जदाराला परवानगी देण्यात आली आहे असे गृहीत धरण्यात येईल अशी देखील तरतूद आहे. त्यामुळे त्या ग्रामपंचायतीला नियम काय आहेत हे माहीत असणे आवश्यक आहे. ते जर माहीत नसतील तर आपण कशासाठी कोणाला परवानगी दिली हेच ग्रामपंचायतीला कळणार नाही. आज देखील संपूर्ण नियम धाब्यावर बसविले जात आहेत. मी आपल्याला पुण्यातीलच एक उदाहरण देते. पुण्यातील वाघोली नावाच्या गावामध्ये माया नावाचा बार असल्याचे उघडकीस आले. त्यावेळी असे लक्षात आले की, त्या ग्रामपंचायतीने या बारला परवानगी दिली नव्हती. त्यांना फक्त खाद्य-पदार्थाच्या एका छोट्या रेस्टॉरंटसाठी परवानगी होती. ती परवानगी बदलून हॉटेलच्या आतील बांधकामामध्ये फेरफार करून मोठा बार तयार केला. एवढेच नव्हे तर ते प्रांगण मोठ्या पार्टीसाठी देखील देण्यात येत होते. हे सर्व करीत असताना त्यांनी ग्रामपंचायतीचे नियम पूर्णपणे धाब्यावर बसविले होते. दोन महिन्यात काहीच कळविले नाही तर बांधकामाला परवानगी देण्यात आली असे आपण गृहीत धरणार आहोत. लोकांनी चुकीची बांधकामे केली किंवा ज्या कामासाठी परवानगी दिली आहे त्या ऐवजी तिसरेच बांधकाम केले तर अशा वेळी आपण काय करणार आहात. अतिक्रमणासंबंधी ग्रामपंचायतीला कोणते अधिकार असतील हे आपण प्रस्तावित केले असले तरी ग्रामपंचायतींना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून द्यावी लागेल असे मला येथे सांगावेसे वाटते.

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गुंठेवारीचा प्रश्न आहे. सोलापूर सारख्या शहरात हद्दवाढीचा प्रश्न आहे. शहरा लगतची बांधकामे नियमित करण्यासाठी वेळ जात आहे. नंतर मग ती गावे महानगरपालिकेच्या हद्दीत घेतली जात आहेत. अनेक ग्रामपंचायतीचे नगरपालिकांमध्ये रूपांतर

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होत आहे. ड्रेनज, पाणी पुरवठा, स्वच्छतेची यंत्रणा त्या ग्रामपंचायतीने करणे आवश्यक आहे. आज आम्ही अनेक ठिकाणी घरा समोर मागच्या घराचा मैला येत असल्याचे बघतो आहोत. त्यावरून देखील वादविवाद होतात. याबद्दलचे गंभीर उदाहरण म्हणजे पुण्यातील सर्व मैला चंद्रभागा नदीत सोडला जातो व तो पुढे उजनी पर्यंत जाऊन नदी प्रदूषित करतो. तेव्हा ग्रामपंचायतीला अधिकार देत असताना तेथील मलनिस्सारण व स्वच्छता कशा प्रकारे होणार आहे याकडे लक्ष दिले पाहिजे. यासाठी आपण मास्टर प्लॅन तयार केला नाही किंवा त्याची अंमलबजावणी झाली नाही तर मोठे अडचणीचे होईल. या बिलामुळे अगोदर ज्यांनी घरे बांधली आहेत त्यांना दिलासा मिळणार असला तरी जी धोकादायक बांधकामे आहेत त्याकडे लक्ष देण्यासाठी यंत्रणा उभी करावी लागेल. शेवटच्या कलम 10 व 11 मध्ये आपण म्हटले आहे की, राज्य शासनाकडे हे अधिकार घेण्यात येत आहेत. गुंठेवारी विकास नियमाधीन करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. आपण कलम 12 संबंधी उद्देशामध्ये म्हटले आहे की, विशेष विकास नियंत्रण विनियमन करण्याकरिता अतिरिक्त अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात येत आहेत. ते अधिकार कशा प्रकारे घेण्यात आले आहेत याचे स्पष्टीकरण ग्रामपंचायतींना मिळणे अत्यावश्यक आहे. पुण्यातील शिंदे वाडी येथे घडलेली घटना देखील मी आपल्याला सांगणार आहे. ग्रामपंचायतीने विजेसाठी परवानगी दिली असताना तेथे शोरूम बांधण्यात आली. असे प्रकार होतात. त्यामुळे लोकांना देखील नियमावली माहीत असणे आवश्यक आहे. कोणत्या गोष्टीला परवानगी देणे आवश्यक आहे व कोणत्या गोष्टीला परवानगी नाकारायची आहे यासंबंधातील प्रशिक्षण ग्रामपंचायतीला देणे आवश्यक आहे. काही वेळा हित संबंध देखील येतात. त्याकडे अन्य यंत्रणा कानाडोळा करते. त्याचा परिणाम नरे गावात होऊन खाणीवर बांधलेली इमारत कोसळून त्यात अनेक जण मृत्युमुखी पडलेले आहेत. गावा लगतची बांधकामे नियमित करीत असताना हा कायदा येणे ही काळाची गरज होती. त्यासाठी सरकारने सकारात्मक पाऊल उचलले आहे. त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते. या कायद्याची नियमावली लवकरात लवकर लागू करून महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींना सर्व ग्रामसभेद्वारे त्याची माहिती द्यावी. तसेच प्रत्येक

..5



डॉ.नीलम गोऱ्हे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्हानिहाय आराखडा देखील जनतेसमोर मांडला पाहिजे. मोठ्या शहरांचे विकास आराखडे प्रलंबित आहेत त्यासंबंधी देखील राज्य शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावेत, लोकांच्या आक्षेपांना न्याय द्यावा याकडे मी आपले लक्ष वेधते आणि या विधेयकाचे समर्थन करते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

................

यानंतर श्री.जुन्नरे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक या ठिकाणी आणले गेले आहे. या बिलाचे मी स्वागतच करतो. अशा प्रकारचे बिल आणणे ही काळाची गरज होती. वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक होते व हा विचार हे सरकार करीत असल्यामुळे मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्रात जिल्हावार ज्या वेगवेगळया रचना आहेत त्या रचना समजून घेऊन तशा प्रकारचे कायद्यात बदल करीत असतांना त्यामध्ये आपल्याला काही परंतुक टाकावे लागतील हे मला येथे सांगावेसे वाटते.

सभापती महोदय,या ठिकाणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी चांगले मुद्दे उपस्थित केले असून मी ते मुद्दे रिपीट करुन सभागृहाचा वेळ घेणार नाही. त्यांनी सांगितले होते की, काही जिल्हयांमध्ये नगररचनेच्या संदर्भात डीपी असतील किंवा बाकीच्या ज्या काही गोष्टी आहेत त्या झालेल्या आहेत. परंतु राज्यामध्ये असे अनेक तालुके आहेत. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मंडणगडचा उल्लेख केला असून मंडणगड हे माझे गाव असून तेथे माझे घर आहे. मंडणगड हा डोंगरी भाग आहे. या ठिकाणची परिस्थिती वेगळी आहे. या ठिकाणची परिस्थिती अशी आहे की, या तालुक्याच्या लगत असलेली ग्रामपंचायत ही केवळ ग्रामपंचायत नाही तर ती ग्रुप ग्रामपंचायत आहे. ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये अनुचित प्रकार चालतो असे मी म्हणणार नाही परंतु एखाद्याच्या हातामध्ये वारेमाप अधिकार दिले तर गावपातळीवर ज्या काही भाऊबंदकी सारख्या गोष्टी असतात त्यांना एका अर्थाने खतपाणी दिल्यासारखे होत असते. याचा सगळयात मोठा फटका मला बसला असून त्याचे उदाहरण मी या ठिकाणी देऊ इच्छितो.

सभापती महोदय, हा प्रकार मंडणगड तालुक्यामध्ये घडलेला आहे. या तालुक्याच्या शेजारी असलेल्या ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये मी ज्यु.कॉलेज आणि शाळेच्या बांधकामासाठी परवानगी मागितली होती. परंतु 16 वर्षानंतर पॅनल बदलले आणि भाई जगतापांचे पॅनल आले म्हणून मला जवळ जवळ 2.5 वर्षे परवानगीच देण्यात आली नाही. या ठिकाणी पाऊस भयानक पडत असतो. पावसामध्ये कौले उडून लहान मुले जखमी होण्याच्या अनेक घटना या ठिकाणी घडलेल्या आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप........

परंतु असे असतांनाही येथील ग्रामपंचायत हलली सुध्दा नाही. त्यामुळे हे विधेयक येथे आले असतांना या विधेयकामध्ये अशा सर्व गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे असे मला वाटते. ग्रामपंचायतींना अधिकार दिलेच पाहिजेत. आपल्याकडे शहरीकरणाचा विळखा वाढत चालला आहे. त्यामुळे वाढत्या शहरीकरणामध्ये गाव कोठे राहणार आहे याचाही विचार होणे आवश्यक आहे. आपल्या राज्यात सर्वात जास्त शहरीकरण होत आहे. आपल्या राज्यात आज जवळ जवळ 47 ते 48 टक्के शहरीकरण झालेले आहे. अजून 5-25 वर्षानंतर शहरीकरण किती होईल हे मला सांगता येणार नाही. परंतु ही प्रक्रिया फार वेगाने होणार आहे. या कायद्यामध्ये सुधारणा करीत असताना आपण गावपण जपणार आहोत की, नाही याचा देखील विचार होणे आवश्यक आहे. या बिलामध्ये आपण ग्रामपंचायतींना अधिकार प्रदान करण्यास निघालो आहोत, त्या अधिकाराच्या संदर्भात मी फार मोठे वक्तव्ये करणार नाही परंतु या बिलाचे दुष्परिणाम काय होऊ शकतील याबाबत कायद्यामध्ये सुधारणा केल्या तर खऱ्या अर्थाने सर्वकष असा हा कायदा तयार होईल व खऱ्या अर्थाने तेथील नागरिकांना या विधेयकाचा फायदा होईल. विधेयकाच्या (2अ) मध्ये असे म्हटले आहे की, "जर पंचायतीने अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसाच्या आत, किंवा पंचायतीकडून तत्संबंधी कोणतीही मागणी करण्यात आल्यास, त्याबाबतीत अर्जदाराकडून उत्तर मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसाच्या आत, यापैकी जे नंतर घडेल तेव्हा, तत्सबंधी तिची परवानगी अथवा नकार कळविला नाही तर, उक्त साठ दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतरच्या लगेचच पुढच्या दिवशी अर्जदाराला अशी परवानगी देण्यात आली असल्याचे मानन्यात येईल".

परवानगी मिळण्यासाठी जी काही मागणी लागते त्यासाठी आपल्याला स्टँडर्ड फॉरमॅट बनवावा लागेल व त्या फॉरमॅटनुसार सदर माहिती सांगून अजून साठ दिवस किंवा अजून एखादा कागद मागून अजून साठ दिवस असे करीत राहिलो तर त्याचा काही एक उपयोग होणार नाही. आपल्याला हा अनुभव जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीमध्ये येत असतो. शेतकऱ्याला केवळ मला माझ्या शेतात घर किंवा गोठा बांधावयाचा आहे एवढेच त्याला दिसत असते. सरपंच काही तरी कारणे काढून कागदपत्रांची मागणी करून साठ-साठ दिवसांचा कालावधी मागतच राहिला तर त्यामुळे एक दुष्ट चक्र तयार होईल. त्यामुळे ज्याला कोणाला परवानगी घ्यावयाची असेल तर

श्री. भाई जगताप........

त्यासाठी एक स्टँडर्ड फॉरमॅट असण्याची आवश्यकता असून अशा प्रकारचा फॉरमॅट आपल्याला करता येऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्याला जे काही करावयाचे असेल ते त्याला एकाच फॉरमॅटने बहाल केले जावे किंबहुना ग्रामपंचायतीमध्ये नियमावली लावणे बंधनकारक करावे लागेल. जेणेकरून गावातील कोणत्याही नागरिकाला घराची किंवा गोठयाची परवानगीसाठी काय काय करावे लागणार आहे हे त्याला समजेल.

सभापती महोदय, विधेयकाच्या (2ब) मधील तिसऱ्या ओळीत असे म्हटले आहे की, "कळविल्याच्या दिनांकापासून चाळीस दिवसांच्या आत, जिल्हा परिषद येथे पदस्थापित केलेल्या, नगररचना विभागाच्या जिल्हा प्रमुखाकडे अपील दाखल करता येईल. ते अपील विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात असेल आणि त्यासोबत विहित करण्यात येईल अशी न्यायालय-फी भरलेली असेल".

सभापती महोदय, कायदा तयार करीत असतांना एखाद्यावर अन्याय झाला असेल तर अशा व्यक्तीला अपील करण्याची संधी असली पाहिजे. घर बांधणाऱ्या माणसाला ग्रामपंचायतीमध्ये होणारा त्रास, अपीलमध्ये जाण्याचा त्रास ही जी काही प्रक्रिया आहे ती प्रक्रिया आजघडीला तरी क्लिष्ट वाटते. त्यामुळे ही प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी आपल्याला अजून काय करता येईल यासाठी या कायद्यामध्ये अधिकचे परंतुक टाकता आले तर ते आपण टाकलेच पाहिजे. देशातील राज्याने पंचायत राजचा स्वीकार करुन ग्रामपंचायतीला मोठा सन्मान दिलेला आहे. गेल्या 8-10 वर्षाच्या काळात युपीए सरकारने अनेक चांगले क्रांतीकारक निर्णय घेतलेले आहेत. पंचायत राजमुळे गाव-खेडयातील ग्रामपंचायतीला एक चांगले महत्व मिळाले आहे. खरे म्हणजे ग्रामपंचायतीला अधिकचे अधिकार मिळणे हे काळानुसार आवश्यक होते. कायद्यामध्ये सुधारणा करीत असतांना मागील आलेले वाईट अनुभव आणि भविष्यात येणाऱ्या अडचणींचा समावेश बिलामध्ये करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 3, खंड 3 मध्ये असे म्हटले आहे की, "ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम 53 मधील, पोट-कलम (1) मध्ये"गावाच्या सीमेतील"या मजकुराऐवजी "गावाच्यागावठाण क्षेत्राच्या सीमेतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सभापती महोदय, आज अनेक गावांमध्ये गावठाण डिफाईन केलेली नाहीत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप........

मंत्री महोदय श्री. सुधीर मुंनगटीवार यांनी मागच्या काळात जी काही भाषणे केलेली आहेत ती भाषणे आम्ही वाचत असतो. जर गावठाण डिफाईन केले नसेल तर या विधेयकातील बदलांचा आम्ही कोणता अर्थ लावायचा, गावकऱ्यांनी कोणता अर्थ लावावयाचा ? गावठाणाची व्याख्या सुस्पष्ट असल्याशिवाय खंड 3 मधील वाक्याला काहीही अर्थ् राहणार नाही. मी अगोदर सांगितल्या प्रमाणे 60 दिवसाच्या नियमावर बोट ठेवून संबंधिताला पत्र देण्यात येईल.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...........

तुमचे ते सीमेबाहेर आहे, सीमेच्या आत आहे अशा पद्धतीने त्या शेतकऱ्याला, जो अशिक्षित आहे त्याला त्रास होऊ लागला तर ते कायद्याला अभिप्रेत नाही. आपल्या सर्वांना ते अभिप्रेत नाही. आम्ही सुरुवातीलाच या बदलाचे स्वागत केलेले आहे. पण हे बदल अधिक तीव्र रितीने व सुस्पष्ट असणे आवश्यक आहे कारण एखाद्या अधिकाऱ्याने,सरपंचाने किंवा एखाद्या सभासदाने अयोग्य रित्या वापर करण्याचा प्रयत्न केला तर तो होऊ नये एवढेच मला सांगायचे आहे.

सभापती महोदय, खंड 4 मध्ये काय नमूद केले आहे ते मी वाचून दाखवितो. "(बारा-1अ) कलम 52 ची पोट-कलमे (1) च (1अ) अन्वये ज्या रीतीने कोणतीही इमारत उभारण्याची किंवा पुन्हा उभारण्याची किंवा उभारण्यास किंवा पुन्हा उभारण्यास सुरुवात करण्याची परवानगी प्राप्त करण्यात येईल ती रीत विहित करणे, आणि त्याच्या पोट-कलम (2ब) अन्वये अपिलाचा नमुना व अपिलासोबत भरावयाची न्यायालय -फी विहित करणे." आपण गावाला केंद्रीभूत ठेवून सुधारणा करीत आहोत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. गाव शहरीकरणाच्या सीमेजवळचे आहे, किंवा शहरीकरण वाढून ते गावापर्यंत येत आहे हे देखील खरे आहे. परंतु या सर्वांचा अर्थ सामान्य शेतकऱ्याला लावायला सांगितला तर तो कसा लावणार आहे ?

सभापती महोदय, आपण सर्व अधिकार ग्रामपंचायतीला देणार आहोत असे येथे सांगण्यात आले. तसा अधिकार देणे आवश्यक आहे. पंचायत राज्याची निर्मिती झाली त्यावेळी गाव हे मूळ घटक समजून आपण देशापर्यंत जाणार आहोत आणि ते लोकशाहीला अभिप्रेत आहे. परंतु हे सर्व करीत असताना कलमे किंवा परंतुके असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, आपण ग्रामपंचायतीला सर्व अधिकार देणार आहोत. परंतु यामध्ये प्रश्न निर्माण होतो की, आता पर्यंत जी बांधकामे झाली आहेत त्याबाबत आपण काय निर्णय घेणार आहात ? आतापर्यंत गावठाण्याच्या हद्दीमध्ये झालेली बांधकामे, होऊ घातलेली बांधकामे याबाबत काय धोरण घेणार आहात ? कारण आपण ग्रामपंचायतीकडे डिमॉलिशनचे अधिकार देत आहात. गावामध्ये भावबंधकी, गट-तट असे प्रकार खूप चालतात. अशावेळी एखाद्याने चुकून गैरफायदा घेतला तर ज्याने आयुष्यामध्ये बांधलेले घर डिमॉलिश झाले तर तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होईल याची सुद्धा दखल घेणे आवश्यक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...........

आपण डिमॉलिशनचे अधिकार देत असताना ती यंत्रणा कशी उभी करणार आहात, त्यासाठी लागणारा स्टाफ कसा उभा करणार आहात, यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद कायद्यामध्ये करावी लागेल. पंचायत राज पद्धतीच्या माध्यमातून गावापर्यंत निर्वेधपणे निधी पोहोचतो त्याप्रमाणे येथे तरतूद केली पाहिजे असे मी येथे सुचवू इच्छितो.

सभापती महोदय, आज सुद्धा पंचायत समिती, जिल्हापरिषद, "क"वर्ग महानगरपालिका,नगरपरिषद किंवा नगर पंचायत या ठिकाणी नियमावली आहे. नगरपरिषद ही देखील केव्हा तरी ग्रामपंचायत होती आणि त्या ठिकाणी असणारे नियम आपण तसेच पुढे लावले तर ते प्रॅक्टीकल होणार नाही. आपणास गावाचा बाज लक्षात ठेवूनच नियमावली तयार करावी लागेल. आपण तशी नियमावली तयार कराल याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी मंडणगड गावाचे उदाहरण दिले. मंडणगडमध्ये अजून ग्रामपंचायत आहे. त्या ग्रामपंचायतीच्या बाजूला वाड्या आहेत. त्या वाड्यामध्ये 30-40 घरे असतात आणि अशा आठ-दहा वाड्या मिळून ग्रुप ग्रामपंचायत होते. अशा वेळी आपण काय करणार आहात ? आपणास विकास नियमावली करताना अशा बाबींवर कस लागणार आहे. आपणास गावपण जपले पाहिजे. ग्रामपंचायतीला अधिकचे अधिकार द्यायचे आहेत. त्याच बरोबर कोणावर अन्याय होऊ नये हे देखील पहावयाचे आहे. गावामध्ये एखाद्याला त्रास द्यायचे ठरविले तर त्याला प्रचंड त्रास होईल. मंत्री महोदया या ग्रामीण भागातून आलेल्या असल्यामुळे त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

सभापती महोदय, कोकण विभागात गावांची रचना वाड्यावरची आहे. मग एखादा मुस्लिम मोहल्ला असेल, कुणबी वाडी असेल, सुतार वाडी असेल कोकणामध्ये अशीच वाड्यांची नावे आहेत आणि अशा वाड्यांचा मिळून गाव होते, अशी कोकणात रचना आहे. आपणास अशी रचना लक्षात घेऊन नियमावलीमध्ये बदल करावा लागेल. अशाप्रकारे त्या घटकाला न्याय मिळणे हे आम्हाला अभिप्रेत आहे.

सभापती महोदय, हे विधेयक मागील सरकारच्या काळातील आहे. या विधेयकावर आपण सर्वांनी भाषणे केलेली आहेत. फरक एवढाच होता की, आम्ही त्यावेळी सत्ताधारी बाकावरून भाषण

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...........

केले होते आणि आज विरोधी बाकावरुन भाषण करीत आहोत. परंतु कायदा तोच आहे.

सभापती महोदय, कायदे कालबाह्य झालेले आहेत असे आपण येथे अनेकदा बोलतो. कायद्यामध्ये विधायक सुधारणा करणे आवश्यक आहे. विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवून त्याची अंमलबजावणी होण्यास अधिक वेळ लावण्याचे काम मी करणार नाही. आपणास ते काम करावयाचे असेल तर जरूर करावे, तो आपला अधिकार आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्याचा तसा अधिकार आहे. मी या ठिकाणी ज्या काही मौलिक सूचना केलेल्या आहेत त्याचा साकल्याने विचार झाला पाहिजे. कायदा करीत असताना फक्त शहरीकरणाला प्राधान्य देत आहोत, गावाचे गावपण उदध्वस्त होत आहे, असा चुकीचा संदेश जाऊ नये असे मला येथे मुद्दाम नमूद करावयाचे आहे. मी या विधेयकाला पाठिंबा देत आहे. मंत्री महोदयांकडून खूप चांगले काम होत आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

माननीय राज्यमंत्री यांचे हे पहिलेच अधिवेशन आहे असे वाटत नाही. इतका चांगला त्यांचा परफॉर्मन्स आहे. कारण शेवटी राज्याचा रहाटगाडा हा असाच चालणार आहे. कधी तुम्ही सरकारमध्ये असाल, तर कधी आम्ही सरकारमध्ये असू. या विधेयकान्वये बदल करीत असताना फार गांभीर्याने आणि बारकाईने सर्व बाबी पहाव्या लागतील. म्हणून या विधेयकाच्या अनुषंगाने मी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा अंतर्भाव विधेयकात करणे आवश्यक आहे. माझ्या सूचनांचा अंतर्भाव विधेयकात करण्यात येईल असे गृहीत धरुन मी या विधेयकाला सशर्त पाठिंबा देतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 15:20

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक-37 महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या विधेयकावर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, काही विधेयके अशी असतात की ती सभागृहात मांडण्यापूर्वी त्या विधेयकांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांसोबत चर्चा करणे आवश्यक असते. मला वाटते विधिमंडळाच्या कामकाजामध्ये आपल्याला बदल करावा लागेल. 73 वी घटना दुरूस्ती आपण स्वीकारली आहे. तसेच 97 व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने गठीत केलेल्या चिकित्सा समितीवर मी काम केले होते. 97 वी घटना दुरूस्ती चिकित्सा समितीच्या प्रतिवृत्तानुसार स्वीकारली. त्यानुसार आपण सहकार कायद्यात बदल केला. सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांनी यामध्ये चांगल्या प्रकारचे योगदान दिले होते. त्यावेळी आपण एवढ्या टप्प्यात आलो होतो की, केंद्र सरकारने केलेला कायदा जसाच्या तसा न स्वीकारला राज्य सरकारने तो थोडा मॉडीफाय करून स्वीकारला. या ठिकाणी माननीय संसदीय कार्य मंत्री उपस्थित नाहीत. मी त्यांच्याकडून एवढीच अपेक्षा व्यक्त करतो की, जे सन्माननीय सदस्य विधेयकावर अभ्यासपूर्ण बोलतात त्यांच्यासोबत विधेयक सादर करण्यापूर्वी चर्चा करावी. कारण राज्य सरकारचा कोणतेही विधेयक आणण्यामागील उद्देश हा जनतेच्या हिताचा असतो. परंतु अनेकदा वेळेच्या मर्यादा लक्षात घेता आम्ही काही गोष्टी मांडू शकत नाही आणि मंत्री सुध्दा या ठिकाणी जास्त वेळ बसू शकत नाहीत. हे विधेयक अतिशय महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण विकास आणि नगर विकास या दोन्ही विभागामध्ये महत्त्वपूर्ण असे बदल या विधेयकाच्या माध्यमातून करण्यात येत आहेत.

महोदय, ग्रामीण विकासावर बोलत असताना सांगू इच्छितो की, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी जिल्हा परिषदेचा कायदा आणि ग्रामीण विकासाचा उद्देश समोर ठेवून सत्तेचे विकेंद्रीकरण केले. परंतु आता आपण केंद्रीकरण करीत चाललो आहोत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत होते की, सर्वसामान्य शेतकरी मंत्रालयात न येता, त्याने जिल्हा परिषदेत बसून मंत्रालयाचे काम करावे. पण आता तसे होत नाही. कारण आता शासन केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न करीत

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आहे. मला वाटते हे खऱ्या अर्थाने थांबले पाहिजे. आज सर्वच विभागांचे केंद्रीकरण होत आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत.

महोदय, मी वयाच्या 17 व्या वर्षी जिल्हा परिषदेमध्ये काम केले आहे. त्यावेळी मतदानाचा अधिकार 21 वर्षांवरील लोकांना होता. परंतु माझे नाव चुकून मतदार यादीत आले. त्यामुळे मी 17 व्या वर्षीच जिल्हा परिषदेत काम करण्यास सुरुवात केली. महोदय, मी 13 वर्षे पंचायत समितीमध्ये काम केले. परंतु आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांमध्ये किती बदल होत चालले आहेत ते मी सांगतो. एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, मी पंचायत समिती सदस्य असताना त्या ठिकाणी काम करण्यात मला जो आनंद मिळत होता, तो आनंद विधिमंडळात काम करताना मिळत नाही. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी सुध्दा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम केलेले आहे. पंचायत समितीमध्ये सदस्य म्हणून काम करताना अधिकारी विकास कामांच्या बाबतीत ज्याप्रमाणे प्रतिसाद देत होते त्याप्रमाणे आज त्यांच्याकडून प्रतिसाद मिळताना दिसत नाही. जिल्हा परिषदेमध्ये दोन वर्षे काम केल्यानंतर मी आमदार झालो. आज त्या जिल्हा परिषदेमध्ये सर्व काम प्रशासनाच्या ताब्यात जात आहे. माझ्या वडिलांनी प्रभावी अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषदचा कारभार केला. महाराष्ट्रातील अनेक कायदे आणि उच्च न्यायालयाचे निर्णय बघितले तर रायगड जिल्हा परिषदेच्या बाबतीत, माझ्या वडिलांनी केलेले 13 वर्षाचे कामकाज उल्लेखनीय असल्याचे दिसून येईल. रायगडचे राजकारण कशा प्रकारचे आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे.

**तालिका सभापती** : या विधेयकावर अजून चार-पाच सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना विचारु इच्छितो की, त्यांना या विधेयकावर बोलण्यासाठी अजून किती वेळ लागणार आहे ?

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, या विधेयकावर बोलण्यासाठी मला एक तास लागणार आहे. मी माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांचा आदर्श घेऊन या विधेयकावर बोलणार आहे.

..4..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आपणांस जेवढे बोलायचे असेल तेवढे बोलावे. मला वाटते आता मध्यंतर घेऊ या. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील या विधेयकावर ऑन लेग राहतील.

मी आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी 4.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(दुपारी 3.27 ते 4.00 वाजेपर्यंत मध्यंतर.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव)**

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण विधेयकावर ऑन लेग आहात. आपण आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेऊ. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील विधेयकावरील भाषणास सुरुवात करतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आपण विशेष उल्लेखाच्या सूचना उद्या घ्याव्यात.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आता विधेयकावर चर्चा सुरु होती. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील ऑन लेग होते. त्यांना ऑन लेगच राहू द्यावे. आपण विधेयकावरील चर्चा उद्या सकाळी घ्यावी. जवखेडा येथील दलित हत्याकांडाचा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. मराठी भाषेचा विषय देखील महत्त्वाचा आहे. आपण ते अगोदर घ्यावे. आपण विधेयकावर उद्या चर्चा करावी. आमचा विधेयकाला पाठिंबा आहे. आमचे विधेयकाला समर्थनच आहे.

**तालिका सभापती** : आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**पृ.शी./मु.शी.** : राज्य शासनाकडून लाचखोरीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालयांची स्थापना करणे याबाबत श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात लाचखोरांच्या विरोधातील कारवाई मोठ्या प्रमाणात सुरू असताना दुसरीकडे प्रलंबित खटल्यांची संख्या वाढत चालली असणे, राज्यात ऑक्टोबर, 2014 अखेरपर्यंत 2800 प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित असून त्यामध्ये पुणे विभागात लाचखोरांची सर्वाधिक 520 प्रकरणे प्रलंबित असणे, राज्यात विविध न्यायालयांत 20 वर्षांपूर्वी लाच घेणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या खटल्यांचा निकाल अद्यापही लागलेला नाही. राज्य शासनाकडून लाचखोरीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना केली असणे, परंतु, न्यायाधिशांकडे इतर खटल्यांची कामे असल्याने ही प्रकरणे प्रलंबित असणे, यामुळे लाचखोर अधिकाऱ्यांना तातडीने शिक्षा होण्यासाठी जलदगती न्यायालये सुरूकरण्यात यावीत."

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मच्छीमारांना डिझेल परताव्याची रक्कम वेळेत मिळणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात सुमारे 15 हजार मच्छीमारी नौकांच्या माध्यमातून मच्छीमारी व्यवसाय केला जात असणे, या व्यवसायात मच्छीमारांना काहीसा हातभार म्हणून शासनाकडून डिझेल परताव्याच्या निमित्ताने लिटरमागे सुमारे 7 ते 8 रुपयांचा परतावा दिला जात असणे, याचा सर्वाधिक लाभ कोकण किनारपट्टीवरील ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांतील मच्छीमारांना होत असणे, मागील 15 महिन्यांपासून ही परताव्याची रक्कम दिली गेली नसल्याने मच्छीमारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण होणे, राज्याला दरवर्षी सुमारे 22 हजार कोटी रुपयांचे परकीय चलन मिळवून देणारा व्यवसाय म्हणून मच्छीमारी व्यवसाय ओळखला जात असणे, या पार्श्वभूमीवर मच्छीमारांची देणे थकविली जात असल्याने मच्छीमार हवालदिल होणे, या डिझेल परताव्याच्या रकमेवर खलाशांचाही अधिकार असणे, त्यामुळे ही रक्कम मिळत नसल्याने नौकांवर जाताना खलाशीही नाखुशी दाखवितात. तरी शासनाने डिझेल परताव्याचा प्रश्न गांभीर्याने घेण्यासंबंधी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो."

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : बीड जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाई परिस्थिती लक्षात घेता 700 कोटी रूपये खर्च होऊनही प्रलंबित असणाऱ्या योजना तत्काळ कार्यान्वित करणे याबाबत श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"बीड जिल्हा परिषदेंतर्गत 431 पाणी पुरवठा योजना मंजूर असणे, यापैकी 243 योजनांची कामे अद्याप सुरू न होणे तर 135 योजनांची कामे वर्षानुवर्षे रखडलेली असणे, अनेक सुधारित प्रशासकीय मान्यता व दरडोई बाबतचे प्रस्ताव मंत्रालयीन स्तरावर प्रलंबित असणे, जिल्ह्यातील तीव्र पाणी टंचाई परिस्थती लक्षात घेता सुमारे 700 कोटी रूपये खर्च होऊनही प्रलंबित असणाऱ्या योजना तत्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

----

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : पुणे येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 वर अनेक प्रकारच्या असलेल्या त्रुटी दुरूस्त करणे याबाबत श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. आनंदराव पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"पुणे बेंगलूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 वर दिनांक 16.11.2014 रोजी वा त्या सुमारास पुण्याकडे येताना खंडाळ्यालगत पारगाव जवळ बसची वाट पाहत उभ्या असलेल्या प्रवाशांच्या अंगावर कंटेनर पलटी झाल्यामुळे 8 जणांचा मृत्यू होणे, पारगावच्या ठिकाणी इंग्रजी एस मुळाक्षरासारखे आडवळण असल्याने हे वारंवार घडणारे अपघात टाळण्यासाठी त्या ठिकाणी सरळमार्गाचे बांधकाम होणे गरजेचे असणे, या राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी वारंवार अपघात होणाऱ्या धोक्यांच्या वळणांवर फलक नसणे, या ठिकाणी क्रॉसिंगवर गतीरोधक नसणे, काही अनावश्यक ठिकाणी गतीरोधक असल्याने अपघातांची संख्या वाढणे, पेट्रोलिंगसाठी पोलिसांचे गस्त पथक पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसणे, मालवाहतूक करणारे ट्रक ओव्हरलोड असणे, विशेषत: मोठ्या गाड्यांच्या कंटेनरच्या चालकांसाठी अल्कोहोल टेस्ट बंधनकारक करणे व काही ठिकाणी सर्व्हिस रोड बनविणे गरजेचे असणे, पुणे बेंगलूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 वर अशा अनेक प्रकारच्या त्रुटी दुरूस्त करण्याची गरज असल्याने प्रवाशांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावी, ही विनंती."

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : वन मजुरांना वन अधिकाऱ्यांच्या दबावामुळे त्यांच्या घरातील कामे करावी लागत असल्याचे माहे डिसेंबर, 2014 च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीस आल्याने याबाबत चौकशी करून दोषी वन अधिकाऱ्यांवर कारवाई करणे याबाबत श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"विदर्भासह राज्यातील वाघांच्या शिकारीमुळे सध्या वन विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीवर प्रश्न चिन्ह निर्माण झालेले असणे, भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या दिमतीला 90 वन मजूर कार्यरत असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, सरकारने वन व वन्य जीवांच्या संरक्षणावर भर देण्यासाठी गेल्या 3 वर्षांत सात ते आठ हजार हंगामी वन मजुरांना कायम केलेले असणे, त्यांना मासिक अठरा हजार रुपये पगार मिळत असणे, वन संरक्षणाचे काम सोडून या वन मजुरांना वन अधिकाऱ्यांच्या दबावामुळे भांडी धुणे, भाजी आणणे, कपडे धुण्यास लागणे अशी कामे करावी लागत असल्याचे माहे डिसेंबर, 2014 च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीस येणे, याबाबत सखोल चौकशी करून सदर वन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सांगोला पोलीस ठाण्याच्या भव्य इमारतीचे बांधकाम सन 2011 मध्ये सुरू होऊन निधीच्या अभावामुळे सुमारे पावणे दोन वर्षांपासून इमारतीचे बांधकाम बंद असणे याबाबत श्री. दीपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सोलापूर जिल्ह्यातील सांगोला-पंढरपूर रोडवरील पोलीस वसाहतीच्या भव्य आवारात सांगोला पोलीस ठाण्याच्या भव्य इमारतीचे बांधकाम सन 2011 मध्ये सुरु होऊन इमारतीच्या बांधकामासाठी आतपर्यंत 40 लाख रूपये खर्च झाले आहेत. मात्र निधीच्या अभावामुळे सुमारे पावणे दोन वर्षांपासून इमारतीचे बांधकाम बंद आहे. सदर इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर व्हावे व नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून या पोलीस ठाण्यासह जिल्ह्यातील अन्य पोलीस ठाण्याच्या अपूर्ण असलेल्या पोलीस ठाण्याच्या इमारतींना तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रहाची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : शेतीला जोड व्यवसाय म्हणून प्रोत्साहनात्मक काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना शासनाने आर्थिक पाठबळ देणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"खरीप गेले, रब्बीचा पेराच नाही, गेल्याही वर्षी गारपिटीने होत्याचे नव्हते केले. साऱ्यांचेच सरकारी मदतीकडे डोळे लागले आहेत. हा सर्व आशा निराशेचा खेळ पुढच्या जून-जुलैपर्यंत संपणार नाही, पुन्हा पावसाची प्रतीक्षा, पुन्हा जीवघेणे दुष्टचक्र, परंतु यातून सुटका म्हणजे मृत्यू नव्हे, आत्महत्या नव्हे असा संदेश देण्यासाठी शेतकरीच पुढे येऊ लागले आहेत. नांदेड जिल्ह्यातील सांगवी गावाचे माधवराव गुंडुरे, भोकर परिसरातील मारोती खुपसे, देवणी तालुक्यातील कामालवाडीतील तेलंग शेतकरी परिवार ही त्यातली बोलकी उदाहरणे आहेत. शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, शेळीपालन वाढवायला हवेत. किनवट तालुक्यातील शिवराम खेड्यांच्या आदिवासींनी 12 क्विंटल मध संकलन करून त्याची विक्री केली. या सर्व प्रोत्साहनात्मक काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना शासनाने आर्थिक पाठबळ द्यावे. आपण दुष्काळाचे पॅकेज देणार आहात, त्या व्यतिरिक्त प्रोत्साहनपर काही तरी देण्यात यावे. कारण काऊन्सिलिंगचे फार महत्त्वाचे काम शेतकरी वर्गामध्ये असे लोक करीत असतात, त्यांना अधिक प्रोत्साहित करण्यासाठी आर्थिक पाठबळ द्यावे, अशी विनंती मी ह्या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----

..9

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : गोंदिया येथील रेल्वे स्थानक बस स्थानक यासारख्या सार्वजनिक ठिकाणी बेवारस मुलांची संख्या वाढत असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरणे याबाबत श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"गोंदिया येथील रेल्वे स्थानक व बस स्थानक यासारख्या सार्वजनिक ठिकाणी अल्पवयीन बेवारस मुले आश्रम घेत असणे, भिक्षा मागणे, रेल्वे गाड्यांची साफसफाई करणे, केरकचरा जमा करणे अशी कामे ही मुले करीत असणे, परंतु त्यांना निवाऱ्याची सोय नसल्यामुळे ते रेल्वे स्थानक व बस स्थानक यांवर रात्री आश्रय घेत असणे,

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र जैन.......

त्यामुळे ही मुले व्यसनांच्या आहारी गेल्यामुळे अवैध काम करण्यास प्रवृत्त झाली असल्याचे निदर्शनास येणे, एकीकडे गोंदिया जिल्ह्यातील काही सामाजिक संस्थांच्या मदतीने गोंदिया, तिरोडा, नवेझरी व देवरी येथे शासनातर्फे बालगृहांना मंजुरी देण्यात आली असणे, परंतु गोंदिया व तिरोडा येथील बालगृहे कायमची बंद पडली असून उर्वरित बालगृहे ऑक्सिजनवर सुरु असणे, ही बालगृहे बंद पडल्यामुळे बेवारस मुलांच्या संख्येत जिल्ह्यात वाढ असल्याचे निदर्शनास आले असणे, त्यामुळे रेल्वे स्थानकांवर व बस स्थानकावरील प्रवाशांमध्ये व शहरातील नागरिकांमध्ये सुध्दा भीतीचे वातावरण निर्माण होणे, त्यामुळे जिल्ह्यातील बेवारस मुलांच्या आश्रयासाठी बंद पडलेली बालगृहे पुन्हा सुरु करावीत, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास करीत आहे.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मागासवर्गीय आणि दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या प्रलंबित असलेल्या रकमेची प्रतिपूर्ती यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाने शिक्षण हक्क कायदा तयार केला आहे. या कायद्यानुसार सर्व शाळांमध्ये मागासवर्गीय आणि दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी 25 टक्के जागा राखून ठेवण्याचे आणि त्यांना प्रवेश देण्याचे बंधन सर्व संस्थांवर घालण्यात आले आहे. संस्था चालक 25 टक्क्यांप्रमाणे या विद्यार्थ्यांना प्रवेश देत आहेत. त्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क घेऊ नये, अशा प्रकारचे बंधनही कायद्यानुसार संस्थांवर आहे. त्यामुळे ते कोणत्याही प्रकारचे शुल्क विद्यार्थ्यांकडून घेत नाहीत. परंतु, शासनाने या रकमेची प्रतिपूर्ती संस्थांना गेल्या 3 वर्षांपासून केलेली नाही. सन 2011 मध्ये 9000, सन 2012-2013 मध्ये 34000 आणि सन 2013-2014 मध्ये 47 हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीची रक्कम 100 कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहोचली आहे. ही प्रतिपूर्ती न झाल्यामुळे संस्था चालक अडचणीत आले आहेत. त्यांची ही रक्कम शासनाकडे प्रलंबित आहे. ज्या प्रमाणे शिक्षण हक्क कायद्यानुसार 25 टक्के जागांवर या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक आहे, त्याप्रमाणेच त्यांच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती संस्थांना करण्याचे बंधन शासनावर आहे. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मला अशी विनंती करावयाची आहे की, गेल्या 3 वर्षांपासून प्रलंबित असलेली शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी.

--------------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यात एमडीआर टीबीच्या रुग्णात होत असलेली वाढ यासंबंधी प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, एका अत्यंत जीवघेण्या आजाराकडे मी शासनाचे लक्ष वेधणार आहे. नागपूर, मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद तसेच राज्यातील 23 जिल्ह्यामध्ये एमडीआर टीबी हा रोग पसरत असून दररोज या आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. नागपूर येथे सन 2004 च्या पहिल्या आठवड्यात हा आजार उघडकीस येणे, जागतिक आरोग्य संघटनेने एमडीआर टीबी या आजाराबाबत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचे नमूद केले आहे. एमडीआर टीबी या आजाराने वैद्यकीय यंत्रणेपुढे एक आव्हान उभे केले आहे. क्षयरोग या जीवाणूजन्य आजाराने फुफ्फुसांना बाधा होत असून सहा महिन्यांच्या उपचाराने देखील हा आजार बरा होत नाही, असे निदर्शनास आलेले आहे. सध्याच्या वर्षात सप्टेंबर, 2014 पर्यंत राज्यात 68751 क्षय रुग्णांवर उपचार करण्यात येऊन वर्षभरात सुमारे 13 लाख पेक्षा जास्त रुग्ण उपचार घेत आहेत. या जीवघेण्या आजारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे, दहशतीचे व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे एमडीआर टीबी या आजारावर तातडीने नियंत्रण आणण्याची आवश्यकता असून शासनाने याबाबत युध्दपातळीवर कार्यवाही करावी, अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कोकणातील रत्नागिरी व ठाणे जिल्ह्यातील लघुसिंचनाची कामे त्वरित सुरु करणे यासंबंधी ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, कोकण लघुसिंचन जलसंधारण मंडळ, ठाणे या मंडळाच्या अखत्यारीत असलेले दोन विभाग रत्नागिरी जिल्ह्यात येत असून यामध्ये रत्नागिरीत 35 लघुसिंचनाचे प्रकल्प व ठाणे जिल्ह्यात 13 प्रकल्प असे एकूण 48 प्रकल्प आहेत. या प्रकल्पांसाठी विभागामार्फत निविदांची प्रक्रिया सुरु करण्यात येणे, परंतु शासनामार्फत ही प्रक्रिया थांबविण्यात येणे, त्यामुळे कोकणातील जिल्ह्यांमध्ये सिंचनाची क्षमता कमी होणे, कोकणातील हे प्रकल्प मार्गी लावले तर भविष्यात कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे सिंचन व्यवस्था वाढीस लागणे, कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात प्रगती करण्याची संधी मिळणे, कोकणातील प्रकल्प मार्गी लावण्याबाबत शासनाने त्वरित या सिंचन प्रकल्पांच्या निविदा काढाव्यात व या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला करीत आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : दूध भुकटीच्या निर्यातीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणे यासंबंधी डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. गारपीट झालेली आहे. या सर्व परिस्थितीमध्ये शासनाने शेतकऱ्यांना वेगवेगळी पॅकेजेस जाहीर केलेली आहेत. राज्यात कमी शेती असलेला शेतकरी, अल्पभूधारक किंवा शेत मजूर यांच्या माध्यमातून दूध उत्पादन होत असते. परंतु, दुधाचे भाव मोठ्या प्रमाणात कोसळल्यामुळे, भुकटीच्या निर्यातीबाबत प्रश्न निर्माण झाल्यामुळे ते प्रचंड अडचणीत सापडले आहेत. यापूर्वीच्या काळात दूध भुकटीच्या निर्यातीसाठी 5 टक्के एवढे विशेष अनुदान केंद्र शासनातर्फे दिले जात होते. ते पुन्हा सुरु करुन त्यामध्ये 10 टक्के वाढ करावी, अशा प्रकारची विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

---------------

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : देवनार, मुंबई येथील रचना महिला संस्थेला देण्यात आलेला शालेय पोषण आहाराचा ठेका रद्द करणे यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, राज्य शासनातर्फे शालेय पोषण आहार देण्याची घोषणा करुन त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, त्यानुसार मुंबई, देवनार येथील पालिकेच्या एका हिंदी शाळेतील शालेय पोषण आहार पुरविण्याचा ठेका रचना महिला संस्थेला देण्यात येणे, शालेय पोषण आहाराबाबत अनेक तक्रारी असून आहारात सातत्याने अळ्या सापडत आहेत. याबाबत सदर संस्थेच्या शालेय पोषण आहाराचा ठेका तत्काळ बंद करण्यात यावा. परंतु, तसे न होता या संस्थेला फक्त 5 हजार रुपयांचा दंड करण्यात आला, काळ्या यादीत टाकण्यात आले, असे शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री.विनोद शेलार यांनी सांगितले. या खिचडीचे नमुने पालिकेच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविलेले आहेत आणि त्यानंतरच कारवाई करण्यात येणार आहे. वारंवार अळ्या निदर्शनास येत असल्यामुळे हा ठेका तातडीने बंद करण्यात यावा, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाला करीत आहे.

-------------

...7.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजाबाबत**</u>

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सभागृहाच्या आजच्या कामकाज पत्रिकेत थोडा फेरबदल करुन विधेयक चर्चेसाठी घेण्यात आले आहे. या विधेयकाला आमचा पाठींबा आहे, विरोध असण्याचे काही कारण नाही.

सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 5 (क) व (ख) अन्वये अल्पकालीन चर्चा दाखविलेली आहे. माझी विनंती अशी आहे की, या विधेयकावर आपण उद्या सकाळी चर्चा घ्यावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे ऑन लेग आहेत. अन्य सन्माननीय सदस्यांनाही या चर्चेत भाग घ्यायचा आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना विनंती केली आहे. ते आमचे मित्र व आदरणीय नेते आहेत. त्यांना मी विनंती केली की, त्यांनी ऑन लेग रहावे आणि या चर्चा होऊ द्याव्यात. त्यांनीही त्यास होकार दिला आहे.

**तालिका सभापती** : आपली विनंती मी सभापती महोदयांच्या कानावर घालतो. ते त्याबाबत आपल्याला मार्गदर्शन करतील. तोपर्यंत विधेयकावरील चर्चा आपण सुरु करु.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

-------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXXVII OF 2014

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)

(चर्चा पुढे सुरु...........

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आपण जिल्हा परिषदेच्या कारभाराचा दर्जा कसा घालवत आहोत आणि अधिकारांचे केंद्रीकरण कसे होत आहे. माझे वडील 13 वर्षे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी गाव पातळीवर काम केले आणि अधिकाऱ्यांबरोबर समन्वय साधण्याचेही काम केले आहे. माझे वडील जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना देशाचे अर्थ तज्ज्ञ श्री.नरेंद्र जाधव हे सचिव म्हणून वडिलांना भेटावयास आले. माझे वडील आक्रमक होते. त्यांच्यामध्ये वादविवाद झाला. त्यानंतर ते आमच्या घरी जेवणासाठी आले. त्यांना असे वाटले होते की, पाटील साहेब मराठा असल्यामुळे माझ्यावर हल्ला करीत आहेत. त्यावेळी मी लहान होतो. आमच्या घरात माझ्या आजोबांचा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे असे फक्त दोन फोटो आहेत. अन्य कोणतेही फोटो आमच्या घरात लावलेले नाहीत. त्यांनी ते सर्व बघितले. वडिलांशी चर्चा केली आणि मग ते असे म्हणाले की, तुमच्या सारखा नेता व्यक्तीगतरित्या ग्रामीण भागात जातो आणि योजनेत आमूलाग्र बदल घडवितो. शासकीय योजनांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी लोकप्रतिनिधी आहेत.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

नाही तर मग सचिव, मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी कारभार चालवतील. म्हणून नियमात बदल करून कारभार करायला पाहिजे. जिल्हा परिषदेमधील रस्त्यांना डांबरीकरण करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला नव्हता. त्यावेळी आपले वडील देखील आमदार होते. त्यावेळी हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होते. त्यामुळे अधिकार मिळत नव्हते. परंतु पहिला डांबरी रस्ता रायगड जिल्हयात करण्यात आला त्यावेळी रायगड जिल्हा परिषदने त्यासंदर्भातील सूत्र तयार केले होते. हा उल्लेख मी एवढ्यासाठी करतो की, परवाच्या दिवशी श्री.नरेंद्र जावध यांना नेपोलियन बोनापार्ट हा पुरस्कार फ्रान्स सरकारकडून सन्मानपूर्वक देण्यात आला. ते अर्थतज्ज्ञ आहेत, त्यांचे भाऊ महाराष्ट्र शासनाच्या सेवेत सचिव होते. पुरस्कार स्वीकारल्यावर त्यांनी असे म्हटले होते की, या कार्याचे सर्व श्रेय मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व ग्रामीण विभागात विकासाचे काम करणारे रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रभाकर पाटील यांना देतो. 'मी आणि माझा बाप' या पुस्तकांचे जगातील दहा भाषेत भाषांतर करण्यात आले आहे. या पुस्तकात त्यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या कामकाजाचे एक प्रकरण नमूद केले आहे. असे पुरोगामी असलेले राज्य आज कोणाचे झाले आहे. जिल्हा परिषदेमध्ये व पंचायत समितीमध्ये चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आहेत काय ? वैचारिक विचारसरणी असणारे कार्यकर्ते आहेत काय ? याचे उत्तर नाही असे आहे. आज त्या ठिकाणी कोण आहेत याबाबत मी सर्वांची माफी मागून सांगतो की, जिल्हा परिषदेमध्ये आज एक वेगळा वर्ग येऊन काम करीत आहे. हे चित्र बदलावयाचे असेल तर कायदा करताना या बाबींचा विचार करण्याची आवश्यकता आहे. कायदे तयार करतांना एक वेगळी भूमिका आपणा सर्वांना घ्यावी लागेल. विधिमंडळात कायदे तयार करतांना त्यासाठी जास्त वेळ दिला पाहिजे. कायदा करताना त्यावर जास्त चर्चा झाली पाहिजे. तरच राज्यातील प्रशासनावर लोकप्रतिनिधी यांची पकड राहील असे मला वाटते. कायदा तयार करतांना ग्रामपंचायतीला जे अधिकार देण्यात येतात, त्याबाबत आपणाला पुनर्विचार करावा लागेल, नाही तर प्रशासन बदलावे लागेल.

महोदय, मंत्री महोदयांना मी काल सूचना केली होती की, आता अर्थमंत्री महोदय सभागृहात नाहीत. त्यांना मी विचारले होते की, यासंदर्भात ऑर्डर कधी काढणार आहात. त्यांनी सांगितले होते की, 73 व्या घटनादुरुस्तीमुळे ते आता करता येत नाही. सचिवांनी नोटीस दिली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.जयंत प्र.पाटील..

की, ग्रामपंचायतीची एनओसी पाहिजे. आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, शेतकरी कामगार पक्षाचा सरपंच असेल तर शिवसेना पक्षांच्या लोकांना एनओसी मिळत नाही. शिवसेना पक्षाचा सरपंच असेल तर कॉग्रेस पक्षाच्या लोकांना एनओसी मिळत नाही. त्यामुळे आमदारांचा विकास फंड तसाच पडून राहतो. नियोजन मंडळाची विकास कामे तशीच राहतात.

महोदय, 73 व्या घटना दुरूस्तीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना जास्तीत जास्त अधिकार द्यावेत असे नमूद केले आहे. आघाडीच्या सरकारने काय केले आहे. जिल्हा परिषदेतील कृषी खात्याबाबत मी सांगतो. ग्रामीण भागात जनतेशी डायरेक्ट संबंध असणारे कृषी खाते आहे. 73 व्या घटना दुरूस्तीमध्ये असे नमूद केले आहे की, राज्य सरकारकडून कृषी खाते काढून ते अधिकार जिल्हा परिषदेतील कृषी खात्याला द्यावेत. राज्य शासनाकडे कृषी खाते ठेवण्यात येऊ नये असे स्पष्ट सांगितले आहे. जिल्हा परिषदेतील कृषी खात्याची काय परिस्थिती आहे, या खात्यासाठी आता फक्त व्यक्तिगत लाभाच्या योजनांसाठी तरतूद करण्यात येते. इतर सर्व अधिकार राज्य शासनाच्या कृषी खात्याला देण्यात आले आहेत. या विधेयकाच्या माध्यमातून शासनाला हे अभिप्रेत आहे काय ?

महोदय, माननीय यशवंतराव चव्हाण यांनी विकेंद्रीकरणाचे धोरण राबविले होते. ते आपण सर्व लोकप्रतिनिधी विसरत चाललो आहोत. काही वर्षानंतर लोक म्हणतील की, यशवंतराव चव्हाण कोण होते. या देशात क्रांतिकारक निर्णय घेण्यात आला होता. या देशात पहिल्या जिल्हा परिषदेची स्थापना 1962 मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी केली आहे. ग्रामीण भागात वेगळ्या तऱ्हेचे निर्णय घेण्यात आले आहेत. अगोदर लोकल बोर्ड होते. त्यामध्ये जास्त अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना होते. हे अधिकार कमी करुन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना द्यावयाला पाहिजेत. जिल्हा परिषदेमधील कोणत्याही कामासाठी अंतिम सही जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची असायला पाहिजे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना विचारण्यास तयार नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणतात की, मीच पालक आहे. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना मला विनंती करावयाची आहे की, दिल्लीवरुन सचिव नियुक्त करण्याची पध्दत बंद करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

एक सचिव एकाच ठिकाणी आठ ते दहा वर्षे काम करतात, त्यामुळे सचिव मंत्री महोदयांना देखील विचारात नाहीत, अशी परिस्थती आहे. सचिवांची नियुक्ती दिल्लीवरुन होत होती व त्याचा भाव देखील भरपूर होता. परंतु हे खरे नसेल असे मला वाटते. याबाबत मला काही माहिती नाही. ही पध्दत या सरकारने बंद केली पाहिजे. एका खात्यात एका अधिकाऱ्यांना किती वर्षे ठेवावे हे ठरविले पाहिजे. या विधेयकाच्या माध्यमातून वेगळी भूमिका घेतली पाहिजे.

महोदय, संसदीय कार्य मंत्री मघाशी सभागृहात नव्हते त्यामुळे तो विषय मी पुन्हा मांडतो. मंत्री महोदय श्री.गिरीष बापट साहेब आपण अनेक समित्यांवर एकत्रित काम केले आहे. विधेयकाचा मसुदा तयार करताना सभागृहातील जे सन्माननीय सदस्य विधेयकावर चर्चा करतात, विधेयकावरील कामकाजात भाग घेतात त्यांना आपण अगोदर बोलवून घेतले पाहिजे. हे विधेयक अत्यंत सुंदर आहे. या विधेयकातील त्रुटी भरुन काढण्यासाठी सभागृहात वेळ कमी असतो. विधिमंडळाच्या कामकाजात वेळ अपुरा असतो. मघाशी मी उल्लेख केला की, सहकार विधेयक तयार करताना ज्या पध्दतीची कामे लोकप्रतिनिधी यांनी केली त्यामध्ये माजी सन्माननीय सदस्य श्री.विलास पाटील, सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख होते. त्यांनी खरोखर चांगले काम केले आहे. संसदीय कार्य मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, काही प्रथा आपण नवीन पाडल्या पाहिजेत. काही जुन्या प्रथा मोडल्या पाहिजेत. हे विधेयक अत्यंत चांगले आहे ते पुढील अधिवेशनात आणले तर त्यावर आणखी जास्त वेळ चर्चा करता येईल. हे विधेयक ग्रामीण व शहरी भागातील समस्यांशी निगडीत आहे. हे विधेयक आज मंजूर केले तरी या संदर्भातील त्रुटी आपणाला पुन्हा दुरूस्त कराव्या लागतील. आता खूप झपाट्याने नागरीकरण होत आहे. इमारती व बैठ्या चाळींचे बांधकाम मोठ्या प्रमाणात होत आहे. याबाबत कोणतेही नियोजन करण्यात आले नाही. नगर विकास खात्याने गावठाण बांधकामाचे अधिकार ग्रामपंचायतीला दिले आहेत.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील..

गावठाणाच्या बाहेरील बांधकामाच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार दिलेले आहेत. राज्यमंत्री महोदयांच्या अकोल्यामध्ये काय परिस्थिती आहे ते मला माहीत नाही. परंतु सर्व ठिकाणी परिस्थिती सारखीच आहे. यामध्ये बदल झाला पाहिजे. गावठाणाचा विस्तार करण्याचे अधिकार प्रांताला आहेत. ब्रिटीश काळामध्ये 100 वर्षाचा विचार करून गावठाणे ठेवली होती. आज परिस्थिती काय आहे ? गावठाणे संपलेली आहेत. नवीन गावठाणाची मागणी केली की प्रांताधिकारी सांगतात जिल्हाधिकाऱ्यांकडे जा, जिल्हाधिकारी सांगतात आयुक्तांकडे जा आणि आयुक्त सांगतात यासंबंधीचे अधिकार मंत्र्यांना आहेत. मंत्री महोदयांकडे फाईल गेली पाहिजे. गावठाणासाठी किती एफ.एस.आय.देण्यात येणार आहे, किती मजली इमारत बांधण्यास परवानगी देण्यात येणार आहे ? तेथे 7 मजली इमारत बांधली तर फायर ब्रिगेडची सोय, ड्रेनेजची सोय आहे काय ? या गोष्टींचा विचार झाला पाहिजे. ग्रामपंचात ही सक्षम यंत्रणा आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे. ज्या सरकारी अधिकाऱ्यांनी रायगड जिल्ह्यामध्ये जागा घेतल्या त्याकडे आपण जरा लक्ष द्या. गावाठाणापासून 300 ते 500 मीटर पर्यंत एन.ए. करण्यासाठी लगेच परवानगी मिळते. रायगड, ठाणे जिल्हयामध्ये ज्या ज्या ठिकाणी गावठाण विस्तार झालेले आहेत त्याच्या बाजूला कुणाच्या जागा आहेत हे शासनाने पहावे, म्हणजे शासनाला सर्व काही दिसून येईल. ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने हे विधेयक अत्यंत महत्वाचे असून या विधेयकावर एक-दोन दिवस चर्चा व्हायला पाहिजे.

सभापती महोदय, चीनमध्ये पुढील 25-30 वर्षाचा विचार करून ग्रामीण भागाचा विकास केला जातो. चीनमधीन नवीन विकसित झालेले खेडे पहा. त्या ठिकाणी पुढील 20-25 वर्षाचा विकास डोळयासमोर ठेवून सर्व गोष्टी केलेल्या असतात. नवी मुंबईमध्ये सिडकोने बांधलेल्या इमारती पाडून त्याठिकाणी टॉवर बांधले जात आहेत. वाशीमध्ये नवीन एफएसआय अंतर्गत किती मजली इमारती बांधायच्या याला काही बंधनच राहिलेले नाही.

सभापती महोदय, नियोजन करताना ग्रामपंचायतीची वर्गवारी केली पाहिजे. तत्कालीन ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील यांनी सांगितले होते की, सन्माननीय सदस्य सांगतात ते

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

बरोबर आहे, शासन त्याचा जरूर विचार करील. खारघर ग्रामपंचायतीचे बजेट 30 ते 40 कोटी रूपये आहे. तेथे अधिकारी वर्ग नाही. तेथील स्टाफिंग पॅटर्नमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. ग्रामविकास खात्याचा ग्रामसेवक 7वी पर्यंत शिकलेला असतो. तो खारघर किंवा कामोठे ग्रामपंचायतीचा ग्रामसेवक झाला तर त्याला काय कळणार आहे ? म्हणून ग्रामपंचायतीचे अ, ब, क, ड असे ग्रेडेशन करण्याची आवश्यकता आहे. राज्यमंत्री महोदयांनी या अधिवेशनामध्ये आपली जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडलेली आहेत. अकोला हा मी ग्रामीण भागच मानतो. त्याठिकाणी काय परिस्थिती आहे ? अलिबाग ही "क" वर्ग नगरपालिका आहे. ते जिल्ह्याचे ठिकाण आहे. परंतु त्याच्या बाजूला शेंद्रे ग्रामपंचायत आहे. त्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या नगरपालिकेपेक्षाही जास्त आहे. त्या ग्रामपंचायतीमधील नागरिकांचा बोजा हा अलिबाग नगरपालिकेवर पडतो. परिणामी अलिबाग नगरपालिका खिळखिळी झालेली आहे. याबाबतीत नगरविकास मंत्री महोदयांनी लक्ष घालून कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदयांकडे प्लॅन मजूर करण्याची नस्ती येते. नस्तीच्या बाबतीत आता अधिकाऱ्यांना जास्त महत्व आलेले आहे. लोक असे म्हणतात की, मंत्र्यांची सही कशीही घेता येते, पण सचिवाची सही होणे कठीण असते. एक अधिकारी स्वत:कडे किती दिवस फाईल ठेवू शकतो यावर काही बंधन असले पाहिजे. फाईलची मूव्हमेंट लोकांना संगणकावर दिसली पाहिजे. आता फाईल कुठे आहे हे शोधायला पैसे द्यावे लागतात.

श्री. विनोद तावडे : सामान्य माणसाच्या फाईलची मुव्हमेंट कशी चालू आहे याची माहिती संगणकावरच नाही तर त्या माणसाच्या मोबाईलवर देखील उपलब्ध करून देता आली पाहिजे या दृष्टीने आमचे प्रयत्न राहील. फाईलच्या मूव्हमेंटमध्ये पारदर्शकता आणू.

श्री. जयंत प्र. प्राटील : मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. आमच्याही त्याच अपेक्षा आहेत. मंत्री महोदयांकडून आमची तीच अपेक्षा आहे. कामे इझी झाली पाहिजेत. मला या विधेयकावर खूप वेळ बोलायचे होते. परंतु आपण आसनस्त झाल्यावर माझी अधिक वेळ बोलण्याची हिंमत होत नाही. आमच्या मनातील भावना मंत्री महोदयांनी ओळखल्या पाहिजेत.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, ग्रामविकास व नगरविकासाच्या दृष्टीने चांगले विधेयक याठिकाणी मांडले आहे. त्यातील त्रुटी मी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. शासनाने त्या अनुषंगाने सुधारणा करावी अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शासनाने ग्रामपंचायती आणि नगरपालिकांच्या संदर्भात विविध सुधारणांचे विधेयक आणले आहे त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, असंख्य गोष्टी यामध्ये अंतर्भूत करणे बाकी आहे. माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी विस्ताराने भूमिका मांडली आहे. ज्या ग्रामपंचायती शहराच्या लगत आहेत, 5 कि.मी.च्या आत आहेत तेथील नगरपालिकांचा ले-आऊट प्रांत अधिकारी मंजूर करतो त्याकरिता त्या नगरपालिकांकडून एनओसी घेणे बंधनकारक केले पाहिजे. शहराच्या ले-आऊटमध्ये रस्ता असतो, परंतु ग्रामपंचायतीचा आराखडा आणि ले-आऊट मॅच होत नाही. त्या रस्त्यामध्ये घरे येतात. ग्रामीण भागामध्ये अशा असंख्य अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्या नगरपालिकांच्या संदर्भात ज्या ग्रामपंचायती शहरालगत आहेत तेथील ले-आऊट मंजूर करताना प्रांत अधिकाऱ्यांना नगरपालिकेकडून एनओसी घेणे बंधनकारक करण्यात यावे.

सभापती महोदय, अ, ब व क नगरपालिकांमधील अतिक्रमणांच्या संदर्भात प्रश्नोत्तराच्या तासामध्ये माननीय सभागृह नेत्यांनी विधेयक आणतो असे सांगितले होते. अतिक्रमणाच्या संदर्भात कोणतीही ठोस तरतूद या बिलामध्ये दिसून येत नाही. अ, ब व क नगरपालिकांमध्ये थोड्याफार प्रमाणात बांधकाम झाले असेल, मध्यमवर्गीयांनी घराचे वाढीव काम केले असेल, नोकरदारांनी पोर्चचे काम केले असेल, लॅटरीन-बाथरुमचे काम केले असेल, त्या संदर्भात रेडी रेकनरचा दर लावून अधिकृत करण्याच्या संदर्भात निर्णय घेतला पाहिजे. प्रत्येक नगरपालिकांमध्ये 3-4 हजार घरे आहेत, ज्या घरांना पूर्णत्वाचा दाखला नाही, त्यामुळे त्यांना कर्जाचा अंतिम हप्ता मिळत नाही. मध्यंतरीच्या काळात महापालिका क्षेत्रातील अशी बांधकामे दंडात्मक कारवाई करुन रेग्युलराईज करण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला. त्याच धर्तीवर नगरपालिका क्षेत्राबाबत कायदा करुन तसे अधिकार नगरपालिकेला द्यावेत अशी आमची विनंती आहे.

सभापती महोदय, अनधिकृत बांधकामे होत असताना त्यात प्राधिकरणाचा दोष असतो असे मी मानत नाही. मुख्याधिकारी, अभियंता यांची ती जबाबदारी असते. अनेक ठिकाणची अतिक्रमणे हायकोर्टाच्या आदेशाने निष्कासित केली जातात. परंतु नगरपालिकांकडून प्रामाणिकपणे कारवाई होत नाही. शासनाने अतिक्रमणे निर्मूलनाच्या संदर्भात कायद्यामध्ये तरतूद केली तर भविष्यात प्रत्येक शहरांचे रुप बदलल्याशिवाय राहणार नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

सभापती महोदय, 37 च्या प्रस्तावामध्ये म्हटले आहे की, नगरपालिकेने 37 चा प्रस्ताव केला तर एका वर्षाच्या आत तो शासनाला सादर केला पाहिजे. अन्यथा तो प्रस्ताव व्यपगत होईल. नगरपालिकेने एका वर्षाच्या आत प्रस्ताव शासनाला सादर केला तर शासनाने सुध्दा तो किती काळात मंजूर केला पाहिजे याचे दिग्दर्शन विधेयकामध्ये होणे आवश्यक होते. शासन स्तरावर नगरपालिकेचा प्रस्ताव आला आणि तो योग्य असेल तर त्या प्रस्तावाला एका वर्षाच्या आत शासनाने मंजुरी दिली पाहिजे अशी छोटी सुधारणा यामध्ये झाली तर ते अधिक सुकर होईल.

सभापती महोदय, आरक्षणाचा विषय प्रत्येक नगरपालिकांमध्ये महत्वाचा बनलेला आहे. डीपी तयार होऊन 20-20 वर्षे झाली. डीपीमध्ये मोठया प्रमाणात आरक्षणे ठेवली गेली. कलम 27 अंतर्गत जमीन मालकाला नोटीस दिली जाते. नोटीस मिळाली की प्रोसेस सुरु होते. कोणतीही नगरपालिका जमीन अधिग्रहण करु शकत नाही. कारण नगरपालिकेचे उत्पन्न कमी असते, बजेट कमी असते. हा फार मोठया प्रमाणातील फ्रॉड आहे. हे बंद करायचे असेल तर शासनाने नगरपालिकेला अनुदान द्यावे. आमची नगरपालिका आरक्षणाची जमीन अधिग्रहण करु शकत नाही. आम्हाला जमीन नको असा ठराव केला तर आमची चौकशी सुरु होते. तुम्ही का ठराव केला? अशी विचारणा केली जाते. आमच्याकडे पैसे नाहीत. त्यामुळे शासनाने मदत दिली पाहिजे. शासनाने मदत दिली तर आरक्षणाच्या जागा खरेदी करता येतील. अन्यथा ती आरक्षणे मुक्त केली पाहिजेत किंवा शासनाने नवीन नियमावली तयार करुन 50 टक्के जागा नगरपालिकांना दिली पाहिजे. शॉपिंग सेंटरबाबत 15 टक्के बांधकाम करुन नगरपालिकेला द्यावे अशी सुधारणा केलेली आहे. परंतु मुख्याधिकारी यांच्याकडे विचारणा केली तर टीडीआरच्या संदर्भातील आदेश नगरपालिकेपर्यंत पोहोचले नाहीत. एकही मुख्याधिकारी टीडीआरच्या संदर्भात सर्वसाधारण सभेमध्ये भूमिका स्पष्ट करु शकत नाही, हे दुर्दैव आहे. या संदर्भात स्पष्टता असली पाहिजे. टीडीआरचा विषय शहरामध्ये आला तर थोड्याफार प्रमाणात आरक्षणाचा विषय सुटू शकेल.

सभापती महोदय, प्रत्येक नगरपालिकेमध्ये टीपीचे पद मंजूर केले पाहिजे. नगरपालिका शिफारशीकरिता प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविते. ती फक्त प्रोसीजर आहे. नगरपालिकेचे अभियंता किंवा मुख्याधिकारी स्वत:वर जबाबदारी नको म्हणून टीपीचे मत मागवितात. त्यावर भूखंडाचे नाव लिहून मार्गदर्शनासाठी प्रस्ताव पाठवितात. शेवटी नगरपालिकेला कळविले जाते

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

की, आपल्या अधिकारात निर्णय घ्यावा. हे बंद व्हावयाचे असेल, शहरांचा विकास चांगला झाला पाहिजे असे वाटत असेल तर ब व क वर्ग नगरपालिकांमध्ये टाऊन प्लॅनिंगचे पद निर्माण केलेच पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, आमदार, खासदार किंवा लोकप्रतिनिधींच्या विकास निधीसाठी एनओसी दिली जात नाही. कायद्यात बंधनकारक तरतूद केली पाहिजे. कोणत्याही पक्षाचा आमदार, खासदार वा लोकप्रतिनिधी असो, गावाच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला असेल तर 30 दिवसांच्या आत एनओसी दिली पाहिजे किंवा सबळ कारण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविले पाहिजे. बरेच दिवस विषय प्रलंबित राहिल्यामुळे लोकप्रतिनिधींनी गावासाठी दिलेला निधी अखर्चित राहतो. ही बाब योग्य नाही. अशा असंख्य विषयावर भविष्यात सरकारने बिलाच्या माध्यमातून स्पष्टता द्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि नगरपालिकांच्या क्षेत्रातील बांधकामे रेग्युलराईज करण्याच्या संदर्भात योग्य तो निर्णय शासनाने लवकर घ्यावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----

नंतर 2जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियाजन व नगररचना (सुधारणा) विधेयक 2014 या विधानसभा विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी व या विधेयकाला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, खरे पाहिले तर अशा प्रकारचे विधेयक यापूर्वीच यायला पाहिजे होते पण उशिरा का होईल ग्रामपंचायत भागात, गावातील सुविधा तसेच गावठाणाच्या जमिनीवर सुधारणा करण्यासाठी हे विधेयक निश्चितच उपयोगी ठरणार आहे. आताच सभागृहात यापूर्वीच्या सन्माननीय सदस्यांनी अनेक उपयुक्त अशा सूचना केल्या आहेत त्यासंबंधात शासनाने थोडीसी काळजी घेतली तर हा कायदा अधिक सक्षम, सुलभ आणि सरळ व सोपा होईल. मागील काळात ज्याप्रमाणे सरळ फॉर्म निघाले होते त्याच पध्दतीने ग्रामीण भागातील लोकांना कळला पाहिजे असा सरळ हा कायदा लागू करावा. ग्राम पंचायत स्तरावर आता ग्रामसभा निर्माण झाल्या त्याचप्रमाणे तंटा मुक्ती समित्याही निर्माण झाल्या पण अशा प्रकारे वेगवेगळ्या व पर्यायी यंत्रणा शासन कसे राबवू शकते, त्यामुळे अडचणी निर्माण होण्याची शकयता असते. म्हणून एक तर ग्रामपंचायत ठेवा किंवा ग्रामसभाच ठेवावी अशी माझी सूचना आहे.

महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे आज जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना जुमानत नाहीत म्हणून अध्यक्षांना अधिकार द्यावयाचे की मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना द्यावयाचे हे शासनाने एकदा ठरविले पाहिजे. तीच परिस्थिती नगरपालिका आणि महानगर पालिकांच्या बाबतीत आहे. नुकताच नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांविरुध्द अविश्वासाचा ठराव आणला गेला व नंतर त्यांची बदली करण्यात आली. अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा परिषदांचे पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांमध्ये समन्वय राखण्याच्या दृष्टीने या विधेयकाच्या माध्यमातून दिशानिर्देश देणे आवश्यक आहे. या विभागाचे मंत्री महोदय तसे सक्षम आहेत व ते सभागृहाचे समाधान करीत असतात याचा आमच्यासारख्यांना अभिमान आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, ग्रामीण भागात शहराच्या लगत असलेला जो ग्रामीण भाग आहे त्या ग्रामपंचायतींची एनओसी घर बांधण्यासाठी घेतात पण काही लोक त्याचा दुरुपयोग करुन कमर्शिअल वापर करतात याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. कायदा आणि सरकार कसे असले पाहिजे याचे उत्तम उदाहरण म.ज्योतिबा फुले यांनी दिलेले आहे. ते म्हणत

.............2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ............

होते की, सरकार हे आरशासारखे असले पाहिजे, आरसा ज्याप्रमाणे खोटे बोलत नाही त्याप्रमाणेच सरकारचा कारभार देखील पारदर्शी असला पाहिजे आणि ज्याप्रमाणे सावली आपली पाठ सोडत नाही त्याप्रमाणे सरकारने सुध्दा जनतेला सोडू नये अशी माझी सूचना आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या कास्तकारांना कायद्याची भाषा कळत नाही त्यांचा गैरफायदा कोणी घेणार नाही याकडेही या कायद्याची अंमलबजावणी करताना कटाक्षाने लक्ष देण्याची गरज आहे. ग्रामीण स्तरावर साधा ग्रामसेवक ज्याला आपण ग्राम अधिकारी म्हणतो तो सुध्दा सरपंचांना मूर्ख बनवून आपली कामे करुन घेण्याचे नेहमीच प्रयत्न करतो त्यावर नियंत्रण ठेवण्याची तरतूद असली पाहिजे. शासनाने या विधेयकाच्या निमित्ताने एक प्रकारचे व्हिजन डाकुमेंट आणले त्याचे मी स्वागत करतो पण सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या महत्वाच्या सूचना केल्या त्यांचाही समावेश या विधेयकात केला तर हा कायदा अधिक सक्षम आणि गरिबांना न्याय मिळवून देणारा होईल. तसेच ज्या क्षणाला हा कायदा लागू होईल त्या क्षणापासूनच या कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई होईल असे त्यात उल्लेखित करावे. भूतलक्षी प्रभावाने जर लागू केला तर शहरात व ग्रामीण भागातील असंख्य घरे उद्ध्वस्त होतील म्हणून शासनाने याबद्दलची काळजी घ्यावी अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून या विधेयकाला पाठिंबा व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

...........3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियाजन व नगररचना (सुधारणा) विधेयक 2014 या विधानसभा विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या विधेयकात खरे तर दोन मोठ्या सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत. त्यात एक म्हणजे नगररचना विभाग, जो माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे दुसरा विभाग ग्रामविकास मंत्र्यांकडे आहे. अशा दोन्ही कायद्यांची सरमिसळ या विधेयकाच्या अनुषंगाने का केली हे मला समजले नाही, त्याचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी करावे. सभागृहात ज्यावेळेस शासन एखादे विधेयक मान्यतेसाठी सादर करते तेव्हा त्या विधेयकातील अथवा कायद्यातील तरतुदींचा दूरगामी परिणाम होणारा असतो. यात देखील नगरपरिषदेच्या हद्दीत जी गावे येतात तीच या कायद्यात समाविष्ट व्हायला पाहिजे होती. असा विचार केला तर याचे तीन भाग करणे आवश्यक होते. त्यातील पहिला भाग म्हणजे जी गांवे शहराच्या हद्दीत येतील ती गांवे, ज्या छोट्या ग्रामपंचायती असतील त्या आणि तिसरा भाग म्हणजे चार-पाच वाड्या अथवा वस्त्यांच्या मिळून बनलेल्या गट ग्रामपंचायती. पण तसे न करता यात अशी चूक झालेली दिसते आणि अशा प्रकारे दोन कायदे एकत्र केले असतील तर ती का करण्यात आली याचाही खुलासा झाला पाहिजे. तसेच ज्यावेळेस आपण दोन अधिनियम एकत्र करण्याचा प्रयत्न करीत आहात तेव्हा त्यातील कोणता अधिनियम रद्द करण्यात आला याचाही खुलासा होणे क्रमप्राप्त आहे. खरे म्हणजे गावात निर्मळ व स्वच्छंदी जीवन जगणारे आणि वाड्या व तांड्यांवर राहणाऱ्यांची एक वेगळीच संस्कृती असते. या देशात बंजारा तांडे अनेक आहेत. अशा बंजारा समाजात एक नाईक असतो, एक कारभारी देखील असतो. शिवसेना पक्षाच्या शाख तरी नंतर निर्माण झाल्या पण त्यापूर्वी हजारो वर्षांपासून बंजारा समाजाच्या शाखा कार्यरत असून त्यात नाईक, कारभारी आणि संघचालक असे लोक सर्व गुण्या-गोविंदाने नांदतात. आदिवासींसाठी नंतरच्या काळात कायदा आला, त्यांचे आरक्षण, महिलांसाठी आरक्षण, ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण अशी विविध आरक्षणे आली. अशा आरक्षणानुसार आमच्या बंजारा अथवा आदिवासी समाजाचा सरपंच झाल्यानंतर तो लंगोटी घालून कोठे जाणार आहे, त्याला काहीच कळत नाही म्हणून माझी या विधेयकाच्या निमित्ताने अशी सूचना राहील की, या कायद्याची अंमलबजावणी करताना सुरुवातीला नगरपरिषद हद्दीतील गांवे समाविष्ट करावीत त्यानंतर पुढील

.........4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड ...........

विचार करावा. तसेच आपण हा कायदा मंजूर झाल्यानंतर तातडीने अंमलात आल्यानंतर तातडीने लागू होईल असेही यात म्हटले आहे. पण ज्या ग्रामपंचायतींना हा कायदा लागू होणार आहे त्यात मॅट्रिक पास असणाऱ्या ग्रामसेवकाला या कायद्याची नियमावली कळणार आहे काय, आपल्या मंत्रालयात सर्व विषयांमध्ये कठीण विषय म्हणजे नगररचना.

यानंतर श्री. भारवि .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव)**

श्री.हरिसिंग राठोड....

म्हणूनच कदाचित माननीय मुख्यमंत्री तो विषय आपल्याकडे ठेवतात. आपण टाऊन प्लानिंगचा नियम ग्रामपंचायतींना लागू करणार आहात, याचा कुठे तरी विचार करायला पाहिजे. हा कायदा लागू करण्यामध्ये घाई करू नये असे मला वाटते. आज जी गावे, तांडे, वस्त्या, गुण्यागोविंदाने नांदत आहेत, त्यांच्यामध्ये भांडणे लावण्याचे काम या विधेयकातून होणार आहे. काही तांडे, वाडे यांचे स्वत:चे अलिखित नियम आहेत. ते त्यांनी स्वत:वर लादून घेतले आहेत. तेथे आपण हा कायदा आणणार आहात म्हणूनच माझी शासनाला विनंती आहे की, हा कायदा लागू करण्यामध्ये घाई करू नये. यावर चर्चा झाली पाहिजे. महाराष्ट्रातील एन.जी.ओ.यांच्याशी चर्चा केली पाहिजे व त्यानंतर हा कायदा आणला पाहिजे, असे मला प्रामाणिकपणे वाटते. येथे मी ज्या शंका उपस्थित केल्या आहेत त्याला माननीय मंत्री महोदय उत्तरे देऊन समाधान करतील आणि मग पुढे जातील असे मी समजतो. धन्यवाद.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक 2014 यावर अतिशय मौलिक चर्चा करण्यात आली आहे. हा सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रश्न होता. या प्रश्नासंबंधी आपण वेगवेगळ्या आयुधांमार्फत सभागृहात चर्चा घडवून आणलेली आहे. या सभागृहात ज्यांनी वर्षानुवर्षे काम केले आहे व ज्यांचा प्रवास स्थानिक स्वराज्य संस्थांपासून सुरूहोऊन मंत्री होण्यापर्यंत सुकर झाला आहे अशांचा ह्या जणू काही ते त्या विद्यापीठातूनच तयार झाले आहेत काय असे वाटावे अशा सूचना आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री.सुनील तटकरे, भाई जगताप, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील, चंद्रकांत रघुवंशी, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी आपले मत व्यक्त केले आहे. या बिलाच्या सुरूवातीला लिहिले आहे की, या विधेयकाचे अधिनियमामध्ये रूपांतर झाल्यानंतर ते शासन राजपत्रात अधिसूचित होईल व त्या तारखेपासून त्याची अंमलबजावणी सुरू होईल. त्याही पेक्षा याच्या वेगवेगळ्या कलमांसाठी वेगवेगळ्या कालावधीत ते अंमलबजावणीमध्ये आणू शकतो असे आपण या बिलाच्या सुरूवातीलाच नमूद केलेले आहे. कलम 158 आपणाला अधिकार प्रदान करते. त्या अनुसार आपल्याला नियमावली तयार करता येते. या बिलावर चर्चा करीत असताना अतिशय मौलिक अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, येथे दोन अधिनियमांचा मिळून एक अधिनियम केला आहे.

डॉ.रणजित पाटील : ग्राम पंचायतीच्या भागात पेरी अर्बन व्हिलेजेस असतात. त्यामुळे टप्प्याटप्प्याने हे करायला पाहिजे होते अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, येथे दोन अधिनियम स्वतंत्र असताना आपण ते एकत्रित करीत आहात. माझी अशी सूचना आहे की, आपण दोन अधिनियमांसाठी दोन स्वतंत्र विधेयके येथे मांडायला पाहिजे होती.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, दोन विधेयके वेगळी मांडायची असती तर ती वेगळीच मांडली गेली असती. पण ती एकत्रितपणे मांडण्याची तरतूद सुद्धा आहे. त्यामुळे ती आपण एकत्रितपणे मांडली आहेत. प्रश्न हे एकमेकला रिलेटेड असून इंटिग्रेटेड आहेत. त्यामुळेच हे बिल एकत्रित करून मांडले आहे. ते आपण सेपरेट करू शकत नाही. एखादी ग्रामपंचायत शहराच्या लगत असेल आणि तिच्या सेवा-सुविधांवर ताण पडत असेल तर अशा ग्रामपंचायतीत सोयी सुविधा एकत्रितपणे निर्माण करण्याच्या दृष्टीनेच हे येथे विधेयक एकत्रितपणे मांडण्यात आले आहे.

सभापती महोदय, एकाच अधिनियमातून एकापेक्षा अधिक नियमांना सुधारणा करता येऊ शकते. येथे अनेक शंका आणि सूचना उपस्थित करण्यात आल्या आहेत. आज देखील अनेक कार्यालयांमध्ये कर्मचारीवर्ग कमी आहे. असे असताना आज आपण जिल्हाधिकाऱ्याला अधिकार प्रदान करीत आहोत. ग्रामपंचायतीच्या आतील आणि बाहेरील कुठलेही बांधकाम असेल तर ते पाडायला देखील आपण परवानगी देत आहोत. त्याचा शासनाने साकल्याने विचार केलेला आहे. यासाठी आम्ही हाय लेव्हल समिती देखील गठित केलेली आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी टाऊन प्लानिंग ऑफिसर कसा देता येईल याचा सुद्धा विचार करण्यात आलेला आहे. तसेच यासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने रोड मॅप देखील तयार केला आहे.

येथे निधी संबंधी देखील शंका उपस्थित करण्यात आली आहे. सुरूवातीलाच सांगण्यात आले आहे की, ग्रामपंचायतीला बांधकामाच्या रूपाने टॅक्स गोळा करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. जेणे करून ग्रामपंचायतीला आपल्या स्वायत्तेबरोबर प्रपंच देखील भागविता येईल. ग्रामपंचायतीला स्वत:चा प्रपंच भागविण्यासाठी त्रास होत होता. त्यामुळे त्यांना आता थोडी आर्थिक स्वायत्तता देखील दिलेली आहे. आज माझ्या गावाच्या बाजूला असलेल्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न नगरपालिकेच्या समान होऊ शकते. आज तेथे तेवढ्या प्रमाणात लोकसंख्या आहे. पण ग्रामपंचायत तेथे पायाभूत सुविधा देखील निर्माण करू शकत नाही. आज त्या ग्रामपंचायतींना टॅक्स घेण्याचा देखील अधिकार नाही. तेथील सगळी वस्ती रस्ता, गटारे इत्यादी सगळ्या सोयी-सुविधांचा लाभ

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

घेते. त्यामुळे त्यांना देखील त्याच्या अँबिटमध्ये आणले पाहिजे असा हेतू होता. आपण नागरिक या नात्याने सुख-सुविधा घेत असतो त्यामुळे काही तरी देणे लागतो, या विचाराने ग्रामपंचायतींना सुद्धा कर वसूल करण्याचे अधिकार या बिलाच्या आधारे प्राप्त करून दिलेले आहेत. उलट यामध्ये ग्रामपंचायतींचा फायदा आहे.

सभापती महोदय, येथे अनेक सूचना करण्यात आल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी गावठाण विस्तार योजने अंतर्गत जे पुढे प्रश्न निर्माण होणार आहेत त्यासंबंधी शंका व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांवर व तेथे राहणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तीवर ताण पडेल यासंबंधातील शंका देखील त्यांनी उपस्थित केली आहे. त्यांनी मनुष्यबळ व निधी संबंधी देखील शंका उपस्थित केली आहे. मी पुन्हा आपणास सांगू इच्छितो की, या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल तेव्हा त्याची नियमावली तयार करण्याचे अधिकारसुद्धा ठेवलेले आहेत. येथे आपल्या अनुभवातून ज्या सन्माननीय सदस्यांनी विधायक सूचना मांडल्या आहेत त्या सगळ्या आपण यात अंतर्भूत करून घेणार आहोत. या बिलावर बोलताना ज्यांनी आपली सूचना मांडली आहे किमान त्यांनी तरी येथे उपस्थित रहावे अशी माझी अपेक्षा होती. यासंबंधी सर्व सन्माननीय सदस्यांची माननीय मुख्यमंत्र्यांसोबत एकत्रित चर्चा घेण्याची शासनाची तयारी आहे. सदर बैठक माननीय मुख्यमंत्र्यांना विचारून निश्चितच आयोजित करण्यात येईल. आताच येथे सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी दोन विधेयके एकत्र करून एकच विधेयक का मांडण्यात आले अशी विचारणा केली आहे. आपण या विधेयकाच्या अनुषंगाने ज्या काही सूचना केल्या आहेत त्या या विधेयकात अंतर्भूत करण्यात येतील. आज राज्यातील काही भागात स्फोटक परिस्थिती निर्माण झाली आहे. आज कोणत्याही शहरात गेल्यानंतर त्याच्या हद्दी पेक्षा बाहेरच्या हद्दीत नागरीकरण झपाट्याने होत असल्याचे दिसून येत आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हरिसिंग राठोड यांना मी सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात मंत्री महोदय एक बैठक घेणार असून या बैठकीत आपल्या ज्या काही सूचना असतील त्यासूचना आपण बैठकीत मांडाव्यात.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हरिसिंग राठोड यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचना त्यांनी लिखित स्वरूपात दिल्या तर त्यांच्या सर्व सूचनांचा साकल्याने विचार होईल. या विधेयकाला सभागृहाने संमती द्यावी अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल

खंड 2 ते 17 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 37 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 37 संमत झाले आहे.

--------------

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्यूनगंड दूर करणे.
मु.शी.: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्यूनगंड दूर करणे या विषयावर सर्वश्री हेमंत टकले, सुनिल तटकरे, राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री आनंद ठाकूर, अमरसिंह पंडित, रामराजे निंबाळकर, प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, ख्वाजा बेग, प्रभाकर घार्गे वि.प.स.यांनी उपस्थित केलेली नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती (जयवंतराव जाधव)** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी व उत्तरासाठी मी एकंदर १ तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम ९७ अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षांसाठी मराठी भाषा विषयक धोरण २०१४ या संदर्भात मसुदा उपलब्ध करुन देण्यात आलेला असणे, या धोरणाविषयी सूचना, सुधारणा, हरकती १५ डिसेंबर, २०१४ पूर्वी मागविण्यात येणे, मराठी भाषेची सद्य:स्थिती, मराठी भाषा विषयक धोरणाची उद्दिष्टे व या धोरणासंबंधीच्या शिफारशी ह्या मसुद्यामध्ये समाविष्ट करण्यात येणे, तसेच शिफारशींच्या अंमलबजावणीचा कालबध्द कार्यक्रमही दाखविण्यात आलेला असणे, दिनांक १ मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचनेनुसार महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्याला ५० वर्षे उलटून गेल्यानंतर सुध्दा जीवनाच्या वेगवगेळया क्षेत्रात मराठी भाषेचा वापर ज्या प्रमाणात व्हावयास पाहिजे होता त्या प्रमाणात होताना दिसत नसणे, भारतातील विविध राज्यात त्यांच्या राज्यभाषेचे संवर्धन करण्यासाठी स्वतंत्र विद्यापीठे संबंधित राज्यांनी स्थापित करणे, त्याचअनुषंगाने महाराष्ट्रात मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी मराठी भाषेचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मराठी भाषा विद्यापीठ कायदा करण्याची आवश्यकता, ह्या विद्यापीठातून सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विषय समाविष्ट करणे, न्यायालयीन कामकाजात मराठीचा वापर नगण्यच राहिलेला असणे, त्याचप्रमाणे प्रशासनातील पत्रव्यवहार, शासकीय टिपण्या व त्यावरील आदेश हा देखील पूर्णपणे मराठी भाषेतच होण्याची आवश्यकता, भाषा आणि संस्कृती यांचे अतूट नाते लक्षात घेवून प्रसार माध्यमांचा योग्य वापर करण्याची आवश्यकता, मराठी भाषेचा प्रसार जगभर होण्यासाठी मराठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले........

माणसाला नव्या तंत्रज्ञानाचा पूर्ण परिचय करुन देणे अत्यावश्यक असणे, संगणकीय तंत्रज्ञान व साधनसामुग्रीची उपलब्धी ही महत्वाची असल्याने मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असणारा न्यूनगंड दूर होईल असे वातावरण शासनाने निर्माण करण्याची आवश्यकता, मराठी भाषा सर्वार्थाने समृध्द होण्यासाठी व भाषा संवर्धनासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा करण्यात येवून त्यासाठी आवश्यक त्या सर्व निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्रासाठी अतिशय जिव्हाळयाचा आणि आत्मीयतेचा विषय या ठिकाणी मी उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मला कल्पना आहे की, चर्चेची सुरुवात करतांना या सभागृहाचे काही नियम आहेत. सभागृहात मोबाईल फोन आणू नये असे मी आज एका वर्तमानपत्रात वाचले आहे. परंतु असे असताना मी आज आपल्या परवानगीशिवाय या सभागृहात माझा मोबाईल आणलेला आहे. दोन दिवसापूर्वी पश्चिम रेल्वेचा एसएमएस महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाला आला होता तो मी या ठिकाण्ी वाचून दाखवतो. "तमारा पोताना तमारी राह जोओ छे. रेल्वे क्रॉसिंग सावधानी थी पार करो," पश्चिम रेल्वे.

सभापती महोदय, पश्चिम रेल्वेचे मुख्यालय मुंबईतून हलवण्याची योजना मध्यंतरी कानावर आली होती. त्यामुळे पश्चिम रेल्वेचे मुख्यालय हलविण्याबरोबर महाराष्ट्रातून मराठीलाही हद्दपार केले जाणार आहे की, काय असे आता वाटू लागले आहे. या दुर्दैवी गोष्टीचा या ठिकाणी उल्लेख करुन या चर्चेला सुरुवात करतो.

सभापती महोदय, सन्माननीय मराठी भाषा विभागाचे मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. ते जेव्हा विरोधी पक्षात होते तेव्हा मराठी भाषेविषयी, या विभागाविषयी जी जी वक्तव्ये त्यांनी केलेली आहेत त्याचा संदर्भ कृपया आपण लक्षात घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, ही चर्चा सुरु असताना काही गोष्टीचा उल्लेख करण् मला या ठिकाणी क्रमप्राप्त वाटते. आजच्या एका दैनिकामध्ये अशी बातमी आलेली आहे की, महाराष्ट्र सरकारकडून

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले........

माय मराठी भाषेची अवहेलना सुरु असून जवाहरलाल नेहरु विद्यापीठात मराठी विषयाचा विभाग सुरु करण्याचा प्रस्ताव तब्बल सहा वर्षापासून मंत्रालयात धूळखात पडत असल्याची खळबळजनक माहिती या वृत्तपत्राच्या हाती आलेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी लोकसभेत मागणी होत असताना आपल्या राज्यकर्त्यानी मराठी भाषेचा विभाग जवाहरलाल नेहरु विद्यापीठात सुरु होण्यासाठी जे प्रयत्न करावयास पाहिजे होते ते केले नाहीत. एवढेच नाही तर हा प्रस्ताव सन 2008 सालापासून धूळ खात पडला असून महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेचा विभाग जवाहरलाल नेहरु विद्यापीठात सुरु होण्यासाठी जेएनयनुला आजपर्यंत 1.5 कोटी रुपये दिलेले असतांनाही त्यामध्ये आजपावेतो कोणतीही प्रगती झालेली नाही.

सभापती महोदय, या विषयाकडे आपण सर्वांनी आत्मीयतेने बघण्याची गरज आहे. सभागृहात वेगवेगळया विषयांची चर्चा करीत असताना आपण म्हणत असतो की, प्रत्येक राज्याची संस्कृती, संवर्धन या सर्व गोष्टी केवळ बोलणाऱ्या भाषेमुळे नव्हे तर त्या भाषेतून मुळात विचार व्यक्त होत असेल आणि त्यामुळे जर भाषा वाढत असेल तर त्याचा उपयोग निश्चितपणे होण्याची शक्यता असते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून खूप प्रयत्न सुरु आहेत.पूर्वी यासाठी रंगनाथ पाठारे समिती नेमण्यात आली होती. प्राचीन मराठी ग्रंथ संपदा इसवीसनापूर्वी पासूनची आहे असे दाखले या समितीने संशोधन करुन दिलेले आहेत. संस्कृत आणि तामिळ या भाषा स्वतंत्र आणि मूलगामी परिणाम करणाऱ्या भाषा आहेत असेही या संशोधनातून सिध्द झालेले आहे. यासंदर्भात विचार करीत असतांना आपण याचा सुध्दा विचार केला पाहिजे की, आपण या विषयाची जोडणी केवळ मराठी भाषेचे साहित्य संमेलन, त्या साहित्य संमेलनाला शासनाकडून मिळणारा उदार राजाश्रय आणि त्या निमित्ताने साहित्य संमेलन आणि नाटय संमेलनाला दिली जाणारी आर्थिक मदत एवढे दिले म्हणजे आपला कार्यभार संपला की, काय अशा पध्दतीची एक भावना तयार होते त्याकडेही मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, परवा मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून गोंडवाना विद्यापीठाचा उल्लेख केला होता. गोंडवाना विद्यापीठ तीन वर्षापूर्वी स्थापन झाले असून त्या विद्यापीठात मराठी भाषेचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले........

विभाग आजतागायत सुरु करण्यात आलेला नसून शासन याबद्दल आजही उदासीनच आहे. भाषेचा विषय आपल्यापर्यंत जणू पोहचतच नाही अशा पध्दतीचा विचार या निमित्ताने आपल्या सर्वांना अस्वस्थ करीत असतो. निजामाच्या राजवटीत म्हणजे 200 वर्षापूर्वी त्यांच्या विद्यापीठात विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल हे विषय उर्दू भाषेतून उस्मानिया विद्यापीठातून शिकवले जात होते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 17:20

श्री.हेमंत टकले.....

आपणासमोर नेहमी एक प्रश्न असतो की, मराठी शाळांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. मराठी भाषा शिकण्यास कोणी तयार नाही. पुढील येणारी पिढी या भाषेपासून तुटते की काय अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपण एकप्रकारची अपरिहार्यता म्हणून दुसऱ्या भाषेचा स्वीकार करतो आणि आपल्या भाषेला दुय्यम स्थान देण्याकडे आपल्या सर्वांचा कल राहतो.

सभापती महोदय, या सरकारने मुंबई शहरामध्ये "मराठी भाषा भवन" निर्माण करण्याची महत्वाकांक्षी योजना जाहीर केलेली आहे. औपचारिकता का होईना, आपण कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा 27 फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा दिन " म्हणून साजरा करतो. या मराठी भाषा दिनी आपण नेमके काय करतो याचा विचार शासन कधी करणार आहे काय ?

सभापती महोदय, कथा, कादंबरी आणि कविता म्हणजे मराठी साहित्याची निर्मिती अशी आपण गल्लत करतो. सर्व गोष्टी मराठी भाषेत होतात तेवढ्या मर्यादेपुरता आपण मराठी भाषेचा विचार करतो. पण आता काळ बदलत चालला आहे. गेल्याच आठवड्यात साहित्य अकादमीचा पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर यांनी मराठीतून लिहिलेल्या पुस्तकाला मिळाला आहे. डॉ.जयंत नारळीकरांनी विज्ञानासारख्या विषयात फार मोठी उंची गाठलेली आहे. त्यांना आपला विचार प्रकट करावयाचा असतो तेव्हा ते मराठी भाषेत करतात. त्यामुळे रुढार्थाने त्यांची साहित्यिक म्हणून गणना झाली नाही तरी साहित्य अकादमी सारख्या संस्थेने त्यांच्या पुस्तकाला पुरस्कार द्यावा हा एकप्रकारे मराठी भाषेचा सन्मान आहे.

सभापती महोदय,आपल्याकडील पारंपारिक विद्यापीठे वेगवेगळ्या कारणांनी वेगवेगळ्या बंधनात अडकली आहेत. मराठी भाषेचे धोरण स्वीकारताना राज्यात मराठी भाषेचे विद्यापीठ असावे अशाप्रकारचा विचार आपण करु त्यावेळेला आपल्याला निश्चितपणे बदल झाल्याचे लक्षात येईल. आपण तो बदल करु शकू. मराठी विद्यापीठात मराठी भाषा अध्यासनाची निर्मिती करण्यात येईल असेही आपल्या धोरणात नमूद केले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, कला या विषयांचा इतिहास मराठी भाषेतून शिकवला जावा अशी शिफारस समितीने केलेली आहे. पारंपारिक विद्यापीठासारखी प्रशासकीय यंत्रणा असलेली परंतु त्याचा शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गाभा असणारे एक वेगळे विद्यापीठ या राज्यात निर्माण झाल्यास मराठी भाषेला खऱ्या अर्थाने चालना मिळेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

सभापती महोदय, आपण मराठी विद्यापीठाचे जे कार्यक्षेत्र ठरविणार आहोत त्यामध्ये मराठी भाषेचा विकास करण्यासाठी मराठी भाषेचे कार्यक्षेत्र भारताबाहेर नेण्याची आवश्यकता आहे. आपण त्या दृष्टीने व्यापकतेने विचार केला पाहिजे. पुणे विद्यापीठ म्हणजे आताचे सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांनी एक प्रयोग केला होता. त्यांनी या विद्यापीठाचे एक केंद्र दुबई येथे सुरु केले होते. मराठी भाषिकांसाठी रोजगार निर्मिती करु शकतील असे अभ्यासक्रम मराठी विद्यापीठ घेण्याची आज नितांत आवश्यकता निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, मराठी राजभाषा होऊन अर्ध शतक उलटून गेले आहे. आपण मराठी भाषा विषयक धोरणाचा मसुदा तयार केला आहे. त्यासाठी अंतिम मुदत 15 डिसेंबरपर्यंत जाहीर केली होती. आपल्याकडे ज्या काही सूचना आणि प्रस्ताव आले असतील त्याबाबतचे एक व्यापक व्हीजन डॉक्युमेंटस् किंवा आपण जाहीरनाम्यामध्ये जो शब्द वापरला होता त्याचा येथे आपणास मुक्तपणाने वापर करता येईल. आपण मराठी भाषेसाठी नक्की काय करणार आहोत हा विचार अतिशय महत्वाचा आहे. आजपर्यंत शासन पातळीवर आढळून आलेली अनास्था, उदासीनता आणि भाषेची उपेक्षा ही खरे म्हणजे खूप अस्वस्थ करणारी आहे. या संदर्भात शासनाचा जो काही निर्णय आहे त्यामध्ये लोकसहभाग आवश्यक आहे आणि अपेक्षित आहे. त्यादृष्टीने आपण पावले टाकणार आहोत काय हा महत्वाचा प्रश्न आहे. केवळ विद्यापीठ निर्मिती आणि न्यायालयीन कामकाजात मराठीचा वापर करुन मराठी भाषा समृद्ध होणार नाही. आपली मराठी बोली भाषा जगविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. मराठी भाषेत अत्यंत समृद्ध असा ठेवा आहे. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेतून आपली ग्रंथनिर्मिती करताना विश्वात्मक पातळीवर विचार दिलेले होते. विश्वात्मकाची पसायदानाची कल्पना आपल्या सर्वांपुढे मराठी भाषेतून मांडली गेली होती. त्यामुळे या सर्व गोष्टींचा चांगला धांडोळा घेऊन मराठी भाषेसाठी जे काही करायचे असेल ते आपण केले पाहिजे. मराठी माणसांच्या संस्कृतीसाठी या भाषेची जी आवश्यकता आहे त्या दृष्टीने विचार करुन आपण त्यामागे निश्चित प्रकारची काही पावले उचललीत तर कुसुमाग्रजांनी मंत्रालयाच्या दारात

..3..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

उभ्या असलेल्या मराठी भाषेचे जे वर्णन केले होते ती मराठी भाषा योग्य ठिकाणी नेण्यासाठी आपल्या सर्वांना प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजातील सर्व घटकांना सहभागी करुन घेण्याची आवश्यकता आहे. केवळ साहित्याचा परीघ हे आपले क्षेत्र न मानता महाराष्ट्राचा सांस्कृतिक परीघ, महाराष्ट्राची बोली भाषा, महाराष्ट्रातील बोली भाषांचे जतन, महाराष्ट्राच्या बोली भाषेतून निर्माण होणारी ग्रंथसंपदा, अशा अनेक विषयासाठी मराठी विद्यापीठाची नितांत आवश्यकता आहे. आपण या सर्व गोष्टींकडे अत्यंत काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. मराठी भाषेसाठी खूप काही करण्यासारखे आहे असे आपल्या मनात असू शकेल. पण एक निश्चित दिशा ठरवून त्याप्रमाणे कार्यक्रम आखत गेलो तर आपण यशस्वी ठरु असे मला वाटते. आपण मराठी भाषेच्या धोरणाचा पुढील 25 वर्षाचा जो मसुदा दिलेला आहे त्याबाबत पुन्हा एकदा साधकबाधक चर्चा करुन त्याचा अंतिम आराखडा तयार करुन, त्याचा कृती कार्यक्रम लवकरात लवकर जाहीर करावा. आपण जगाला मराठी संस्कृतीची नव्याने ओळख करुन दिली पाहिजे. तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या राजवटीत मराठी भाषेचा सन्मान अधिक मानाच्या स्थानावर जाईल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जनार्दन चांदूरकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या चर्चेचा विषय अत्यंत उदात्त आहे. तसेच या चर्चेतील विषय महाराष्ट्राचा स्वाभिमान जागृत करणारा आहे. या चर्चेचा विषय व्यापक असताना, या विषयावरील चर्चा मात्र अल्पकालीन आहे. या चर्चेमध्ये माननीय मंत्र्यांचा रोल अतिशय महत्त्वाचा राहणार आहे. महोदय, दोन दिवसांपूर्वी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपल्या भाषणात सांगितले होते की, देशामध्ये महाराष्ट्र आणि सौराष्ट्र या दोन राज्यांनाच 'राष्ट्र' म्हणण्यात येते. यातील सौराष्ट्राबद्दल मला काही बोलायचे नाही. परंतु महाराष्ट्राच्या बाबतीत सांगू इच्छितो की, देशाच्या दक्षिण भागात तंजावर आहे. त्या ठिकाणी मराठी भाषा बोलली जाते. तंजावरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे चुलत भाऊ श्री.व्यंकोजी भोसले यांचे राज्य होते आणि आजही त्या ठिकाणी मराठी भाषा बोलली जाते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विरोधी पक्ष नेत्याच्या घोषणेबाबत

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नुकतेच आम्हाला एक परिपत्रक वितरित करण्यात आलेले आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, "आज सोमवार, दिनांक 22 डिसेंबर, 2014 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये बाब क्रमांक "चार (ब)" नंतर "पाच" पुढीलप्रमाणे कामकाज घेण्यात येईल. :-

पाच : माननीय सभापती, "विरोधी पक्षनेत्यासंबंधीची घोषणा" करतील.

त्यानंतर

कामकाज पत्रिकेवर दर्शविलेल्या पुढील बाबी अनुक्रमे "सहा (क)", "सहा (ख)", "सात", "आठ", "नऊ (अ)", "नऊ (ब)", "दहा (क)", दहा (ख)", "अकरा (1)" व "अकरा (2)" अशा वाचण्यात याव्यात."

महोदय, बाब क्रमांक-चार (ब) होऊन गेलेली आहे. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, विरोधी पक्ष नेत्यांच्या घोषणेचे काय झाले आहे ?

**तालिका सभापती** : मला वाटते की, या अल्पकालीन चर्चेवरील चर्चा होऊ द्यावी. त्यानंतर बघू या.

सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 17:30

**पृ.शी.**: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्यूनगंड दूर करणे

**मु.शी.**: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्यूनगंड दूर करणे, या विषयावर सर्वश्री हेमंत टकले, सुनील तटकरे, राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री आनंद ठाकूर, अमरसिंह पंडित रामराजे निंबाळकर, प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, ख्वाजा बेग, प्रभाकर घार्गे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

(चर्चा पुढे सुरु....)

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, कर्नाटक राज्यातील अर्ध्या राज्यात उदाहरणार्थ बेळगाव, कारवार, धारवाड येथे मराठी भाषा बोलली जाते. हा सीमा भाग मराठी भाषिकांचा आहे. महाराष्ट्र राज्य सोडल्यानंतर मध्य प्रदेशातील इंदौर, उज्जैन, ग्वाल्हेर नव्हे तर वाराणसी पर्यंत मराठी भाषा बोलली जाते. एवढेच नव्हे तर पानिपतमध्ये सुध्दा मराठी भाषा बोलली जाते. आज खऱ्या अर्थाने देशामध्ये मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या अधिक आहे की हिंदी भाषा बोलणाऱ्यांची संख्या अधिक आहे याचा अभ्यास केला पाहिजे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

महोदय, एवढ्या मोठ्या प्रमाणावर बोलल्या जाणाऱ्या या मराठी भाषेच्या विकासासंबंधी महाराष्ट्र शासनाने कार्यक्रम राबविणे अतिशय गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी या संदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांशी मी सहमत आहे. 14 व्या, 15 व्या, 17 व्या शतकापासून आतापर्यंत मराठी भाषेचा अभ्यास करीत गेलो तर आपल्याला मराठी भाषेचे महत्त्व लक्षात येईल. हेमाड पंतानी मोडी लिपीचा शोध लावला. मराठी भाषेमध्ये लिहिलेली क्रोणीकल्स कदाचित आज वाचता येणार नाहीत, ती वाचण्यासाठी तज्ज्ञ लोकांची आवश्यकता आहे. आज शिलालेखावरील भाषा समजण्यास अवघड होत आहे. पूर्वीच्या काळापासून आजपर्यंतचा अभ्यास करीत असताना अनेक बाबी निदर्शनास येतात. खानदेश भागात अहिराणी भाषा बोलली जाते. गोवा राज्यामध्ये कोकणी भाषा मराठीचे डायलेक्ट आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, राज्य सरकारने या सर्व बाबींचा अभ्यास केला आहे काय ?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर....

महोदय, मुंबई शहरामध्ये दुकानांवर इंग्रजी भाषेतून पाट्या लावू नयेत हे मला मान्य आहे. मराठी भाषेच्या पाट्यांसाठी लढा दिलाच पाहिजे. रेल्वे स्टेशनचे नाव इंग्रजी भाषेत असेल तर ते मराठी भाषेतून लिहिले पाहिजे आणि त्यासाठी सुध्दा लढा दिला पाहिजे. अशा छोट्याछोट्या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे माननीय मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली योग्य प्रकारचा कार्यक्रम आखला जावा अशी सभागृहाची इच्छा आहे. मराठी भाषेचा विकास करावयाचा असेल तर काही बाबी कराव्या लागतील. मराठी ही संस्कृत भाषेपासून निर्माण झालेली आहे. त्यानंतर तिचे स्थित्यंतर कसे कसे होत गेले हा विद्यार्थ्यांसाठी आवडीचा विषय होईल. आज संगणकीय युगात मराठीचा वापर कशा प्रकारे केला पाहिजे, त्यासाठी की-बोर्डची रचना कशी केली पाहिजे, इत्यादी बाबींचा अंतर्भाव करुन मराठीचा उत्कर्ष आणि विकास करण्यासाठी एक रचनात्मक कार्यक्रम आखला पाहिजे. या संदर्भात सरकार जे व्हीजन डॉक्युमेंट बनविणार आहे ते तयार केले पाहिजे. अशी माझी सूचना असून, त्यांच्या सूचनेला माझा पाठिंबा आहे.

महोदय, सभागृहात आणि सभागृहाबाहेर निरनिराळी परिपत्रके काढताना जाहीर केले आहे की, शासनाच्या कारभारामध्ये मराठी भाषेचा 100 टक्के वापर झाला पाहिजे. पूर्वीच्या तुलनेत मराठी भाषेचा वापर वाढत चालला आहे ही गोष्ट मी मान्य करतो. परंतु मराठी भाषेचा वापर 100 टक्के होत नाही. विशेषत: न्यायालयाचे कामकाज इंग्रजी भाषेतून चालते. त्यामुळे मराठी भाषिक अशिलाला न्यायालयात काय सुरु आहे हे समजत नाही. एवढेच नव्हे तर वकील जे काही सांगतील त्यावर त्यांना अवलंबून राहावे लागते. बऱ्याच वेळा वकील पैसे काढण्यासाठी अशिलाची दिशाभूल करतात. कारण तो त्यांचा धंदा असतो. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, न्यायालयात मराठी भाषेचा वापर करण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ? या अनुषंगाने सरकारला ठोस कार्यक्रम आखावा लागेल.

महोदय, महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वात शक्तीशाली आणि बलशाली राज्य आहे. या राज्याच्या आणि सभागृहाच्या कामकाजाची परंपरा संपूर्ण देशात राबविली जाते. इतर राज्यातील समित्यांना अभ्यास करण्यासाठी कोठे जायचे असेल तर ती राज्ये महाराष्ट्राला प्राधान्य देतात. महाराष्ट्रातील समित्या छोट्या राज्यात जायला तयार नसतात. अशा प्रकारे आपल्या राज्याचा

..5..



SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 17:30

प्रा.जनार्दन चांदूरकर....

उत्कर्ष झालेला आहे. त्यामुळे मराठी भाषेचा अधिक उत्कर्ष आणि विकास करण्यासाठी या संदर्भात ठोस कार्यक्रम आखणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

महोदय, राज्य सरकारकडून 'लोकराज्य' हे मासिक प्रकाशित केले जाते. त्यामध्ये शासनाचे जी.आर. छापण्यात येतात. परंतु ते वेळेवर छापले जात नाहीत. वास्तविक पाहता शासनाकडून या मासिकावर मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. सरकारकडून एखादे मासिक चालविले जात असेल तर त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या पाहिजेत. या निमित्ताने माझी सूचना आहे की, शासनाच्या मासिकामध्ये माननीय मंत्र्यांचे मनोगत छापले पाहिजे. महाराष्ट्रासाठी चांगल्या कल्पना करणारे साहित्यिक, लेखक इत्यादींचे मनोगत छापले पाहिजे. परंतु बऱ्याच वेळा लोकराज्य या मासिकामध्ये जी.आर.शिवाय काहीच उल्लेख नसतो. त्यामुळे या मासिकामध्ये मी सांगितल्यानुसार मान्यवरांचे मनोगत प्रकाशित केले पाहिजे अशी माझी सूचना आहे. तसेच या बाबतीत केवळ राजकीय वापर करुन चालणार नाही. निवडणुकीत मते मिळावीत म्हणून मराठी भाषेचा राजकीय वापर करण्यापेक्षा मराठी भाषेचा विकास करण्यासाठी शासनाने पुढे येऊन काम केले पाहिजे. तसेच शासनाच्या मासिकामध्ये मी सांगितलेले डॉक्युमेंट लवकरात लवकर प्रसिध्द करीत असताना सन्माननीय सदस्यांच्या मनोगताचा सुध्दा त्यामध्ये समावेश करावा, अशी माझी विनंती आहे.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

--------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहातील आमचे विद्वान मित्र सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेब यांनी मराठी भाषेच्या संदर्भात अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. ते केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील आणि विदेशातील मराठी भाषेचा सन्मान बाळगणाऱ्या, मान बाळगणाऱ्या, मराठी भाषेबद्दल गौरव असणाऱ्या मंडळींच्या मनामध्ये आशेचा नवा किरण निर्माण करण्याचे काम या चर्चेच्या माध्यमातून करीत आहेत, असे मी गृहीत धरून चालतो. भाषा हे माध्यम आहे. आपले म्हणणे समोरच्या व्यक्तींना समजण्यासाठी भाषा असते. मराठी भाषेचे वेगळे स्थान आहे, वेगळा इतिहास आहे. मराठी भाषेला सातत्याने समृध्द करण्याचे कार्य आपल्या संतांनी केले, साहित्यिकांनी केले, कवींनी केले. अनेक क्षेत्रांमध्ये मराठी भाषेला समृध्द करण्याचे, मराठी भाषा जास्तीत जास्त सुलभ आणि सोपी करण्याचे काम त्यांनी केले. आपल्याकडे प्रथा अशी आहे की, जो जास्त अवघड बोलतो, अवघड लिहितो, तो जास्त मोठा विद्वान आणि जो सोपे बोलतो, सोपे लिहितो, तो खालच्या दर्जाचा असतो. ही भावना कुठेतरी दूर झाली पाहिजे. भाषा आपण बोललेले लोकांना समजले पाहिजे आणि लोकांनी बोललेले आपल्याला समजले पाहिजे यासाठी असते. मराठी भाषा अभिजात झाली पाहिजे. मला 'अभिजात; शब्दाचा अजूनही अर्थ लागत नाही. आपल्या समाजामध्ये काही बहुजन आहेत तर बहुजनामध्ये काही अभिजन आहेत. 'अभिजात' म्हणजे काय याचा खुलासा झाला पाहिजे. अभिजात म्हणजे पुणेरी लोक बोलतात ती भाषा अभिजात मराठी आहे. आपल्याकडून हाही विचार झाला पाहिजे. प्रत्येक क्षेत्रामध्ये मराठी भाषेचा उत्कृष्ट विकास झाला पाहिजे. आपले माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांचा तर प्रश्नच नाही. आपले माननीय शिक्षण मंत्री तडाखेबाज आहेत. त्यामुळे आमची मराठी देखील तशी तडाखेबाज झाली पाहिजे. "भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाचे माथी हाणू काठी" असा आपले माननीय मंत्री आहेत आणि ही काही साधी गोष्ट नाही. सभापती महोदय, अशी ही मराठी भाषा आहे.

सभापती महोदय, कुसुमाग्रज साहेबांनी मराठी भाषेत सर्व काही लिहिले. खरोखरच मराठी माणूस खरा मराठी, सच्चा मराठी माणूस असेल तो मराठी भाषेच्या प्रेमात पडल्याशिवाय राहत नाही. मराठी भाषेच्या प्रेमात पडणारी माणसे जी दुसरी आहेत, ती देखील मराठी भाषेच्या प्रेमात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

पडतात आणि प्रेमात पडून मराठी व्यक्तींशी लग्न देखील करतात. एवढी प्रभावी आपली मराठी भाषा आहे. प्रेमात पडून लग्न करतात म्हणजे प्रेम विवाह करतात.

सभापती महोदय, मराठीची सुरुवात चक्रधरस्वामीपासून झाली. पहिल्यांदा मराठीत त्यांनी लिहिले, नंतर मराठी भाषेची सुरुवात ज्ञानेश्वर माऊलींनी केली. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी आताच संतांची परंपरा, पसायदान याबद्दल सांगितले. ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान. आपण मराठी भाषेचे वैभव पहा. "दुरितांचे तिमीर जाओ, जो जे वांच्छिल तो ते लाहो" हे सांगणारे मराठीचे तत्वज्ञान आहे. ज्ञानेश्वर माऊलींची विश्वात्मकतेची कल्पना, संकल्पना मराठी भाषेची आहे. हे आमचे विश्व म्हणजे कोणते आमचे विश्व, म्हणजे महाराष्ट्र, पंढरपूर, आळंदी, देऊळ ? चोराची आळंदी की देवाची आळंदी ? हे आमचे विश्व आहे का ? आमचे विश्व मराठीचे विश्व आहे. सर्व माणुसकीला कवेत घेणारे मराठीचे विश्व आहे. पसायदान ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिले आहे. तुकोबारायांनी मराठीवर कळस चढविला आहे. तुकोबारायांचे सर्व अभंग, ग्रंथच्या ग्रंथ, गाथा इंद्रायणीच्या डोहामध्ये बुडवून टाकण्यात आले, नष्ट करण्यात आले. संतश्रेष्ठ संताजी जगनाडे महाराज तुकोबारायांचे मित्र होते, सोबती होते, सहकारी होते. तुकोबाराय जेव्हा अभंग लिहायचे तेव्हा ते पहिल्यांदा संत जगनाडे महाराजांना वाचून दाखवायचे आणि जगनाडे महाराजांनी ऐकले की, ते त्यांच्या मुखोद्गत होऊन जायचे. आपण त्याला एक पाठी म्हणतो. संत जगनाडे महाराजांनी त्यांना जे मुखोद्गत होते, जे ऐकले होते, ते पुन्हा लिहून काढले. ते ग्रंथ तरंगले नाहीत तर ते गेले, पाण्यामध्ये बुडाले, सर्व काही संपले. तुम्ही त्याचा शोध लावा. मराठी शोधक, वैज्ञानिक असतील त्यांच्याकडून शोध लावावा. त्या गाथा, ग्रंथ तरंगल्या की नाहीत हा वादाचा मुद्दा असेल. पण आमच्या संत जगनाडे महाराजांनी ते पुन्हा लिहून काढले आणि तेव्हा संपूर्ण जगाला तुकोबाराय कळले. ही मराठी भाषा होती. संत नामदेव, संत चोखामेळा असे अनेक संत होऊन गेले. संत चोखामेळा म्हणतात की, "ऊस डोंगळा पण रस नव्हे डोंगळा, का रे भुललासी वरलिया रंगा". त्यांची पत्नी सोयराबाई देखील हेच म्हणते. ही परंपरा मराठीची आहे. आता यापेक्षा जास्त काय अभिजात असेल ते आपण सांगा. यापेक्षा काही अभिजात आहे का ? साहित्य क्षेत्रात

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

साहित्यिकांना जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्याचे काम केले पाहिजे. लोकाश्रय तर आहेच पण राजाश्रय देखील आपल्या मराठी भाषेला मिळाला पाहिजे. जेणेकरून मराठीचा उद्रेक, समतेचा उद्रेक, मराठी भाषेतून बंधुत्वाचा उद्रेक, विश्वशांतीचा उद्रेक, फुले-शाहू-डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवरायांच्या शौर्याचा, विद्वत्तेचा व माणुसकीचा उद्रेक संपूर्ण देशात पसरावा आणि याच दृष्टीकोनातून मराठी भाषा प्रवाही झाली पाहिजे.

सभापती महोदय, आपण विद्यापीठाच्या संदर्भातील मुद्दा मांडला. आपल्या देशात इतकी विद्यापीठे आहेत, ते काय कमी आहेत का ? पुण्यामध्ये टिळक संस्कृत विद्यापीठ आहे. संस्कृत भाषा काही मोजक्या मूठभर लोकांना कळते आणि त्यासाठी तुम्ही विद्यापीठ काढले. आमच्याकडे रामटेकला कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ आहे. तेथे संस्कृत कमी शिकवितात आणि कॉमर्स व आर्टस्‌चेच विषय जास्त शिकवितात. विद्यापीठाचे नाव संस्कृत. "नाव सोनुबाई आणि हाती कथलाचा वाळा", अशी स्थिती आहे. सभापती महोदय, हे थांबले पाहिजे. सभापती महोदय, आपण विद्यापीठ उघडण्यापेक्षा आहे त्याच विद्यापीठामध्ये आपली मराठी भाषा सर्व स्तरावर बंधनकारक कशी होईल, प्ले ग्रूप, केजी-1, केजी-2 अशाप्रकारे शाळांपासून पहिल्या वर्गापासून बंधनकारक केले पाहिजे. अनेक भाषा आहेत, त्यांचे राहू द्यावे. उर्दू, इंग्रजी भाषेचे राहू द्यावे. आमच्या भाषेबद्दल कोणासोबतही भांडणे नाहीत. आम्ही भाषेसाठी कधी भांडलो नाही. आम्ही सर्वांचा आदर करतो. भाषांचा आदर करतो. पण मराठी मात्र प्रत्येकाला आलीच पाहिजे. हा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून आपले माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. विनोदजी तावडे करतील, असा मला विश्वास वाटतो. भाषेबद्दलचे न्यूनगंड वगैरे काही नाही. आमच्यात कुठे भाषेबद्दल न्यूनगंड आहे ? आम्ही युरोपच्या दौऱ्यावर गेलो होतो.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

सभापती महोदय, आम्ही तेथे देखील फ्रान्सच्या माणसाशी मराठीत बोलत होतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे..........

जर्मनीतही आम्ही गेलो होतो आणि तेथेही मराठी भाषेतच बोलत होतो. आमच्या सोबत भाषांतर करणारा व्यक्ती आमच्या संभाषणाचे भाषांतर करुन आम्हाला सांगायचा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे यांना मी आता थांबवतो आहे. ते ऑनलेग राहतील.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विरोधी पक्ष नेता निवडी संदर्भातील निर्णय**

**सभापती** : आता मी विरोधी पक्ष नेते पदाबाबतचा निर्णय या ठिकाणी जाहीर करीत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे तथा अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांनी दिनांक 11 नोव्हेंबर, 2014 रोजीच्या पत्राव्दारे काँग्रेस पक्षाला विरोधी पक्ष म्हणून मान्यता देऊन काँग्रेस पक्षाच्या नेत्याला विरोधी पक्ष नेत्याचा दर्जा व स्थान द्यावे, अशी विनंती मला केली आहे. त्यानंतर श्री.हेमंत टकले, प्रतोद, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी मला दिनांक 4 डिसेंबर, 2014 रोजी पत्र पाठवून विधान परिषदेतील त्यांच्या पक्षाची सदस्य संख्या जास्त असल्यामुळे त्यांच्या पक्षाकडून विरोधी पक्ष नेते पदी नियुक्ती करण्याबाबत योग्य वेळी दावा करण्यात येईल, असे कळविले होते. त्यानंतर दिनांक 8 डिसेंबर, 2014 रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधिमंडळ पक्ष नेते सन्माननीय श्री.अजित पवार, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, मुख्य प्रतोद, सर्वश्री सुनील तटकरे, रामराजे नाईक निंबाळकर, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री विक्रम काळे, जयदेव गायकवाड, निरंजन डावखरे, प्रकाश गजभिये, ख्वाजा बेग, रामराव वडकुते, विधान परिषद सदस्य यांनी पत्र पाठवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांना विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते म्हणून मान्यता देऊन सभागृहात दिनांक 8 डिसेंबर, 2014 रोजी तशी घोषणा करावी, अशी विनंती केली होती. त्याचप्रमाणे दिनांक 8 डिसेंबर, 2014 रोजी माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीष बापट यांनी सुध्दा विरोधी पक्ष नेते पदाच्या घोषणेबाबतची बाब कार्यक्रम पत्रिकेत समाविष्ट करावी, अशी मला विनंती केली होती.

विरोधी पक्ष नेत्याची नियुक्ती या संदर्भातील भारताचे संविधान, विधान परिषद नियम यामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. मात्र राज्य विधिमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, 1978 या अधिनियमात 'विरोधी पक्ष नेता' या शब्दाची व्याख्या करण्यात आलेली आहे, ती पुढील प्रमाणे आहे.

"या अधिनियमात, राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या संबंधात विरोधी पक्ष नेता म्हणजे त्यावेळी राज्य शासनाच्या विरोधी असलेल्या सर्वात जास्त सदस्य संख्या असणाऱ्या, पक्षाचा नेता असलेला आणि विधानसभेचा अध्यक्ष किंवा यथास्थिती विधानपरिषदेचा सभापती यांनी तशी मान्यता दिलेली यथास्थिती राज्य विधानसभेचा किंवा राज्य विधान परिषदेचा सदस्य.

...3....

**सभापती**..........

स्पष्टीकरण, जेव्हा समान सदस्य संख्या असणारे विधान सभेतील किंवा विधानपरिषदेतील राज्य शासनाच्या विरोधात असलेले दोन किंवा अधिक पक्ष असतील तेव्हा विधानसभेच्या अध्यक्षांनी किंवा यथास्थिती विधान परिषदेच्या सभापतींनी पक्षाचे स्थान लक्षात घेऊन या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता अशा पक्षांच्या नेत्यांपैकी कोणत्याही एकाला विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता दिली पाहिजे आणि अशी मान्यता ही अंतिम व निर्णायक असेल.

भारतीय संविधान तसेच महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा नियमांमध्ये विरोधी पक्ष नेते या शब्दाबाबत कोणतेही स्पष्टीकरण करण्यात आलेले नसल्यामुळे त्यामध्ये या शब्दाचा अर्थउकल होण्यासाठी इतरत्र कोठे माहिती उपलब्ध होते काय, याबाबत मी तपासणी केली. संसदीय प्रथा, परंपरा, पूर्वीचे निर्णय इत्यादींचा सखोल अभ्यास केला. लोकसभेमध्ये नुकत्याच विरोधी पक्ष नेते या संबंधी दिलेल्या माननीय लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाचा सुध्दा सांगोपांग विचार केला.

अधिकृत सत्ताधारी पक्ष म्हणजे आता विधान परिषदेमध्ये भारतीय जनता पक्ष व शिवसेना पक्ष हे आहेत. या व्यतिरिक्त विरोधी पक्षाच्या बाकावर सद्य:स्थितीत बसणारे पक्ष म्हणजे इंडियन नॅशनल कॉंग्रेस पक्षाचे 21 सदस्य, नॅशनलिस्ट कॉंग्रेस पक्षाचे 28 सदस्य, लोकभारती पक्षाचा 1 सदस्य, शेतकरी कामगार पक्षाचा 1 सदस्य, पिपल्स रिपब्लिकन पार्टीचा 1 सदस्य, अपक्ष 7 आणि रिक्त 4 हे सभागृहातील बलाबल पाहता नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी यांची राज्य शासनाच्या विरोधात सर्वात जास्त सदस्य संख्या असल्यामुळे आणि त्यांचे विधिमंडळ पक्ष नेते व प्रतोद यांनी विरोधी पक्ष नेते पदाची मागणी केलेली असल्यामुळे श्री.धनंजय पंडितराव मुंडे, विधान परिषद सदस्य यांना विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देत आहे व तशी मी घोषणा करीत आहे.

त्यांना अधिनियमातील तरतुदींप्रमाणे सर्व सोयी-सवलती प्राप्त होतील.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विरोधी पक्षनेत्यासंबंधी घोषणा

**सभापती** : श्री.हेमंत टकले, प्रतोद, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी असे कळविले आहे की, श्री.धनंजय मुंडे हे विरोधी पक्षनेते म्हणून काम पाहतील. त्यामुळे श्री.धनंजय मुंडे हे यापुढे या सभागृहातील विरोधी पक्षनेते राहतील, असे मी घोषित करतो.

आता सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे, यांनी विरोधी पक्ष नेते पदाचे आसन ग्रहण करावे.

(सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे हे विरोधी पक्ष नेते पदाचे आसन ग्रहण करतात.)

---------------

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विरोधी पक्ष नेते पदी माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदनपर भाषणे**

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आज विधान परिषदेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांच्या नावाची विरोधी पक्ष नेते म्हणून आपण घोषणा केली आहे. सभागृहाच्या वतीने मी आपले आभार मानतो आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील नाथा या छोट्याशा गावी सन्माननीय श्री.धनंजय मुंडे यांचा जन्म झाला आणि अतिशय कमी वयात त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. सुरुवातीला भारतीय जनता पक्षामध्ये काम करीत असताना भारतीय युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून एक अत्यंत संघर्षशील नेतृत्त्व त्यांनी त्या काळात दिले. सामान्य युवकांचे, विद्यार्थ्यांचे प्रश्न या संदर्भात खूप मोठे काम त्यांनी केले आहे. इतकेच नाही तर वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक उपक्रमही त्यांनी राबविले आहेत. सन 2003 मध्ये घाटनांदूर येथील रेल्वे अपघातात त्या ठिकाणी जाऊन अतिशय हिरीरीने 12 प्रवाशांचे प्राण वाचविण्याचे कामही त्यांनी केले आहे. वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा, आरोग्य शिबिरे यांचे आयोजन आणि राज्यव्यापी आंदोलने त्यांनी उभी केली.

सभापती महोदय, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये एक अत्यंत धडाडीचा नेता म्हणूनही काम केल्याचे गेल्या काही वर्षात आपण बघितले आहे. या सभागृहामध्ये देखील एक आक्रमक वक्ता, विषयांची जाण असलेला आणि वेगवेगळे विषय हाताळणारा सदस्य, अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्त्व आपण पाहिले आहे.

सभापती महोदय, विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेत्यांची एक मोठी मालिका आहे. अनेक विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय उत्तम काम या ठिकाणी केलेले आहे. आमच्या आठवणीतील विरोधी पक्ष नेत्यांचा विचार केला तर सन्माननीय श्री.ना.स.फरांदे, सन्माननीय श्री.छगन भुजबळ, सन्माननीय श्री.नितीन गडकरी, सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय श्री.विनोद तावडे या सर्वांनी विधान परिषदेच्या माध्यमातून सरकारकडून वेगवेगळ्या प्रश्नांवर जनतेला न्याय मिळाला पाहिजे, अशा प्रकारची भूमिका सातत्याने घेतली आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस..

श्री.धनंजय मुंडे हे अतिशय तरूण आहेत, तरुण वयात त्यांना ही संधी प्राप्त झाली आहे. लोकशाहीत सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष असतात. सर्वाचे मत वेगवेगळे असले तरी त्यांची ध्येय मात्र एकच असतात. सामान्य लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटच्या व्यक्तीपर्यंत सरकारचे विकासाचे कार्य पोहचले पाहिजे. कोणत्याही घटकावर अन्याय होत असेल तर तो दूर करण्याचे काम जसे सरकार करते तसेच विरोधी पक्ष देखील करीत असते. त्यामुळे आपापल्या भूमिकांना न्याय देणे आवश्यक आहे. राजकीय व्यवस्थेत कालपर्यंत आम्ही विरोधी पक्षात होतो. ते सत्ताधारी पक्षात होते. आता आम्ही सत्ताधारी पक्षात आहोत. आता ते विरोधी पक्षात आहेत. आपल्या भूमिका बदलल्या असल्या तरी आपले ध्येय बदलू शकत नाहीत. आपापल्या परीने आपण तो प्रयत्न करीत असतो. मला विश्वास आहे की, श्री.धनंजय मुंडे युवा नेते आहेत. विरोधी पक्ष नेते पदाची धुरा ते अत्यंत चांगल्या पध्दतीने पार पाडतील. ही जबाबदारी पार पाडत असताना सरकारच्या काही चुका झाल्या तर ते टीका करतील, सरकारवर हल्ला बोल करतील. त्याच वेळी माझी अशी देखील अपेक्षा आहे की, सरकारच्या वतीने जी चांगली धोरणे आणली जातील, त्याचा परिणाम सर्व सामान्य जनता, दीन, दलित, गरीब, आदिवासी, विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून असेल त्या धोरणांना मोठ्या हृदयाने पाठिंबा देतील असा मी विश्वास व्यक्त करतो. विधान परिषदेत विरोधी पक्ष नेत्यांची उच्च परंपरा आहे. ही उच्च परंपरा ते निश्चित राखतील. आजपर्यंत वेगवेगळ्या विरोधी पक्ष नेत्यांनी उत्तम कार्य करून दाखविले आहे. त्याच मालिकेत त्यांचे देखील नाव आपणाला घेता येईल, अशा प्रकारचे कार्य त्यांच्या हातून घडेल असा विश्वास मी व्यक्त करतो. पुन्हा श्री.धनंजय मुंडे यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. त्यांचा व माझा संपर्क खूप जुना आहे. आम्ही दोघांनी एकत्रित काम केले आहे. आता ते विरोधी पक्षात आहेत तर मी सत्तापक्षात आहे. राज्याच्या कल्याणाकरिता एकत्रित काम करण्याचा त्यांचा व माझा अनुभव जुना आहे. आता देखील आम्ही एकत्रित चांगले काम करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सभापती महोदय, या निमिताने मी आपले अभिनंदन करतो. सभागृहात सातत्याने थोडेसे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, ते दूर करण्यासाठी आपण अतिशय मोठ्या मनाने आणि चांगला निर्णय घेतला आहे. त्याबाबत मी आपले अभिनंदन करतो. श्री.धनंजय मुंडे यांचे मी पुन्हा मन:पूर्वक अभिनंदन करतो व माझे भाषण संपवितो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, राज्याच्या विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेते पदी श्री.धनंजय मुंडे याची निवड जाहीर केल्याबाबत सुरुवातीला मी मनापासून आपले आभार मानतो. मुख्यमंत्री महोदयांनी श्री.धनंजय मुंडे यांचे अभिनंदन करताना उच्च परंपराचा उल्लेख केला आहे. गेल्या 10 ते 11 दिवसांपासून सभागृहात तणावाचे वातावरण होते. प्रसंगी काही वेळा पक्षाचा प्रमुख सहकारी या नात्याने मला ही भूमिका वारंवार मांडावी लागली होती. आपल्या हेतूबद्दल, आसनाबद्दल किंवा व्यक्तीगत आपल्याबाबत कमालीचा आदर नेहमीच राहिला आहे, तो आजही आहे, उद्याही असेल आणि शेवटपर्यंत देखील राहणार आहे. गेल्या 10-12 दिवसांमध्ये मी किंवा माझ्या सहकाऱ्यांकडून एखादा दुसरा शब्द गेला असेल तर या निमित्ताने मी माफी किंवा दिलगिरी व्यक्त करतो. सर्वोच्च परंपरेचा आदर करीत श्री.धनंजय मुंडे यांची नियुक्ती जाहीर केली आहे. मी श्री.धनंजय मुंडे यांचे मनापासून अभिनंदन करतो. सर्वात तरुण विरोधी पक्ष नेता महाराष्ट्र विधानपरिषदेला श्री.धनंजय मुंडे यांच्या रुपाने मिळाला आहे. महाराष्ट्राची स्थापना 1 मे 1960 रोजी झाली. महाराष्ट्राची पहिली विधानसभा 1962 मध्ये अस्तित्वात आली. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या सारखे सुसंस्कृत नेतृत्व महाराष्ट्राला मिळाले होते. त्यांनी महाराष्ट्र घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. संसदीय लोकशाहीवर गाढा विश्वास असणारे नेतृत्व म्हणजे स्व.यशवंतराव चव्हाण यांच्याकडे नेहमी पाहिले जाते. त्या वेळेपासून सदनाचे नेते, विरोधी पक्ष नेते, सभागृहातील कामकाज आणि परंपरा गेले अनेक वर्षापासून आपण पाहत आहोत. श्री.धनंजय मुंडे याच्या रुपाने तरुण सहकारी विरोधी पक्ष नेते पदी आरुढ होतो, तेव्हा आमच्या सर्वांच्या मनात एक वेगळ्या भावना व अपेक्षा निश्चितपणे आहेत.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, तरुण वयात संघटनेत काम करीत असताना नेतृत्वाची चुणूक, कामाची झलक बीड जिल्ह्याने अनुभवली तशीच महाराष्ट्र निश्चितपणे अनुभवेल. त्यांच्या वडिलांनी जिल्हापरिषदेचे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. आदरणीय स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या नावाचा उल्लेख या निमित्ताने मी जरुर करीन, काही वेळा पक्षीय मतभेद असू शकतात, सिध्दांताबाबत मुलभूत विचार वेगळा असू शकतो. समाज जीवनात काम करीत असताना कार्यकर्ता घडणे व कार्यकर्त्यांची उंची वाढणे महत्वाचे आहे. एखादे नेतृत्व त्या परिसरात प्रस्थापित होत

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे..

असते. माझ्या सारख्या कार्यकर्त्यांनी स्व.यशवंतराव चव्हाण, स्व. वसंतदादा यांचे नेतृत्व पाहिले आहे. आदरणीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही दीर्घकाळ अनुभव घेत आहोत. अलीकडील काळात श्री.धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर खंबीर नेतृत्वाखाली वाटचाल करण्याची त्यांना संधी मिळाली आहे. राजकारणात काही वेळा काही निर्णय असे असतात की, टीका होऊ शकते, स्वागत देखील होऊ शकते. एका राजकीय पक्षापासून फारकत घेतल्यामुळे टीका झाली असेल, राजकीय विचारांचा, राजकीय पक्षाचा किंवा खंबीर नेतृत्वाचा अंत:करणापासून स्वीकार केल्यानंतर त्यांचे स्वागत करण्याची भूमिका समाजात वेगवेगळ्या पध्दतीने असू शकते. दोन अडीच वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानपरिषदेचे विधिमंडळ सदस्य म्हणून त्यांची कामगिरी पाहण्याची अनेक वेळा मला संधी मिळाली आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही त्या बाजूला होतो आज या बाजूला आहोत. आमचा पक्ष सत्तेत असताना राज्याचा मंत्री म्हणून विधानपरिषदेत अनेक वेळा कामकाजाच्या निमित्ताने मी आलो होतो. ज्यावेळी महाराष्ट्र व मराठवाड्याच्या अस्मितेचे प्रश्न निर्माण झाले, त्यावेळी पक्षीय अभिनिवेश बाजूला सारुन सत्तारुढ पक्षात आहोत, ही भावना क्षणभर बाजूला ठेऊन मराठवाड्याच्या प्रश्नांना न्याय मिळायला पाहिजे. अशी मनस्वी ठाम भूमिका श्री.धनंजय मुंडे यांनी मांडली होती. त्यांची भूमिका माझ्या सारख्या कार्यकर्त्यांनी निश्चितपणे अनुभवली आहे. पक्षात तरुण नेतृत्व काम करीत असताना नवीन विचार घेऊन काम करण्याची मानसिकता असते. अशा कालखंडात आज त्यांच्यावर विरोधी पक्ष नेत्याची जबाबदारी आली आहे. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात राजकीय स्थित्यंतर झाले किती वर्षाने झाले कोण किती काळ राहणार आहे, त्याबाबत बोलण्याचा आजचा क्षण नाही. आजचा क्षण आमच्या दृष्टीने सर्वोच्च आनंदाचा आहे. समाधानाचा व आपण दिलेल्या न्याया प्रती आदर व्यक्त करणारा आहे. कोण किती काळ या बाजूला व कोण किती काळ त्या बाजूला बसेल हा भाग आजच्या सभागृहाच्या कामकाजाचा नाही. राज्यात नवीन सरकार आले आहे. लोकशाहीत लोकांच्या भावनांना नेहमीच प्राधान्य देण्यात येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील या बाबीला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय आपण, सभागृहाचे नेते माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे, माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते असतील हे सर्वच सहकारी त्या बाजूला बसले आहेत. याबाबत कोणाच्याही मनात विषाद नाही. कदाचित आमच्यापेक्षा जास्त विश्वास



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे..

त्यांच्या कार्य पध्दतीवर व्यक्त करण्याची मनोभूमिका लोकांनी यावेळी स्वीकारली आहे. त्यामुळे या बाजूला बसून लोकांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. संसदीय आयुधांचा वापर करुन सरकार वर अंकुश ठेवून लोकांचे प्रश्न सोडविण्याची वेळ आमच्यावर आली आहे.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांना तरूणवयात ही संधी मिळाली. मी कदाचित चुकत नसेल तर महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतील एक तरूण विरोधी पक्षनेता हा आपण श्री. धनंजय मुंडे यांच्या रूपाने पहात आहोत. त्यांच्या कारकिर्दीला आता सुरूवात होत आहे. आमच्या सर्वांच्या तुम्हाला मनापासून हार्दिक शुभेच्छा आहेत. या आसनावरून विरोधी पक्षाच्या माध्यमातून जनतेचे वेगवेगळे प्रश्न मांडत असताना अनेक वेळा एक संविधानिक चर्चा अनुभवली. नगरविकास खात्याचा राज्यमंत्री म्हणून मी सत्ताधारी पक्षामध्ये बसत होतो. त्यावेळी विरोधी पक्षनेते म्हणून मी सन्माननीय श्री. नितीन गडकरी, सन्माननीय श्री. पांडुरंग फुंडकर आणि विद्यमान शालेय शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांना देखील विरोधी पक्षनेता म्हणून अनुभवले आहे. विरोधी पक्षनेते पदाच्या आसनावरून विरोधी पक्षाची कोंडी करत वेगवेगळया संसदीय आयुधांचा वापर करत भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांचे संख्याबळ कमी असताना देखील त्या पदाचा वापर करीत अनेक वेळा जनतेच्या प्रश्नावर न्याय देण्याच्या प्रक्रियेमध्ये सरकारला भाग पाडल्याचे आम्ही पाहिलेले आहे. मला आठवते मी जेव्हा विधानसभेचा सदस्य झालो त्यावेळी आदरणीय श्री. शरद पवार हे विधानपरिषदेमध्ये विरोधी पक्षनेते होते. एक-सव्वावर्षे त्यांनी विरोधी पक्षनेते या नात्याने काम केले. त्यांना संसदीय कामाचा प्रचंड अनुभव आहे. 1962 ते 67 या काळात या विधानसभेवर निर्वाचित झाल्यानंतर त्यांची ससंदीय कारकीर्द खूप प्रभावी राहिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, विधानसभेचा विरोधी पक्षनेता, विधानपरिषदेचा विरोधी पक्षनेता आणि देशपातळीवरही विरोधी पक्षनेता आणि युपीएच्या माध्यमातून मागील 10 वर्षे कृषी मंत्री म्हणून त्यांनी फार प्रभावी काम केले. विविध पदावर काम करण्याचा अनुभव त्यांना मिळाला. 1995 ते 1996 या काळात विरोधी पक्षनेता आणि 1996 नंतर श्री. छगन भुजबळ यांची विरोधी पक्षनेता या नात्याने त्यांची कामगिरी प्रभावी ठरली. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे आपणाकडून जनतेच्या खूप मोठ्या अपेक्षा आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपले अभिनंदन केले. त्यांचा मनाचा मोठेपणा आहे. या निमित्ताने मी माननीय मुख्यमंत्र्यांचे देखील अभिनंदन करतो. ते आणि आपण एक युवा कार्यकर्ता म्हणून एका राजकीय पक्षामध्ये काम केले. सहाजिकच एका राजकीय पक्षामध्ये दीर्घकाळ काम केलेले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

असल्यामुळे एकमेकांची चांगली ओळख आहे, एकमेकांशी चांगला परिचय आहे.एकमेकांच्या कार्यपध्दती माहीत आहेत. त्यामुळे या सभागृहामध्ये काम करीत असताना दोघेही त्याचा चांगला उपयोग करुन घेतील याबद्दल माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुडे यांची विरोधी पक्षनेता म्हणून नियुक्ती करावी असे मी ज्या ज्या वेळी आपणास सांगितले त्या त्यावेळी महसूल मंत्री महोदय श्री. एकनाथराव खडसे यांनी त्यांचा उल्लेख धनु या नावाने करत त्यांची देखील त्यांच्याशी किती प्रेमाची जवळीक आहे हे दाखवून दिले. जवळीक ही जवळीक असते. परंतु तडफार पध्दतीने काम करीत असताना सरकार जनतेच्या विरोधी भूमिका घेत असेल त्यावेळी त्या जवळीकेचा उपयोग कदापि होणार नाही. परंतु एखाद्या वेळी लोकांच्या हिताचे काम सरकारच्या माध्यमातून होणार असेल तर केवळ पक्षीय अभिनिवेशाने विरोध करण्याचे काम आम्ही करणार नाही याची देखील हमी मी या अभिनंदनाच्या प्रस्तावाच्या निमित्ताने देत आहे. एक गौरवशाली परंपरेचे साक्षीदार बनण्याचे काम सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे हे निश्चितपणे करतील असा मी विश्वास व्यक्त करतो. हे काम 5 वर्षे इतक्या जिकिरीने करायचे आहे की 5 वर्षानंतर अदलाबदल करण्याची वेळ आपोआपच येईल, अशा प्रकारच्या अपेक्षा मी व्यक्त करतो. त्यांची 5 वर्षाची कामगिरी अतिशय उत्तम ठरो, संसदीय आयुधे, प्रथा आणि पंरपरा यांचा कोणत्याही प्रकारे अनादार न होता उलट त्या परंपरा अधिक उंच कशा होतील असे काम आपणाकडून व्हायला पाहिजे, माननीय सभापतींपदी असलेले नेतृत्व हे आपणा सर्वांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरलेले आहे, त्या आसनाचा योग्य सन्मान करीत, तसेच सदनाचे नेते, माननीय मुख्यमंत्री आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचा आदर करीत या सभागृहाच्या गौरवशाली परंपरा पुढे चालवत रहा असा विश्वास सर्व सहकाऱ्यांच्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रदेशाध्यक्ष या नात्याने व्यक्त करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रदेशाध्यक्ष या नात्याने माझ्या त्यांना मनापासून हार्दिक शुभेच्छा आहेत. एका महत्वाच्या फळीमध्ये तुमचा समावेश झालेला आहे. आज या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. अजितदादा तसेच आदरणीय श्री. शरद पवार नाहीत. पण पक्षाचे नेते या नात्याने त्यांच्या तर्फे देखील मी आपले मनस्वी शब्दात अभिनंदन करतो. आपले

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

विविध विषयावरील ज्ञान,सर्वसामान्य जनतेविषयी असलेली आपली पोटतिडीक प्रत्येक शब्दातून प्रत्येकाला अनुभवावयास मिळेल असा रास्त विश्वास मी या अभिनंदनाच्या माध्यमातून व्यक्त करतो. पुन्हा एकदा मी त्यांचे अभिनंदन करतो. एक तरुण नेता विरोधी पक्षनेते पदी आरुढ झाल्यानंतर लोकांच्या प्रश्नाला कसा न्याय मिळतो याचे एक उत्तम उदाहरण आपल्या माध्यमातून पहायला मिळेल अशा प्रकारची भावना व्यक्त करतो आणि पुनश्च आपले अभिनंदन करतो आणि सभापती महोदय, मी आपले ऋण व्यक्त करुन माझे दोन शब्द थांबवितो.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते म्हणून सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांची आपण नियुक्ती केली. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांचे मनापासून स्वागत करतो, त्यांचे अभिनंदन करतो.काही दिवसापासून या विधानपरिषदेमध्ये विरोधी पक्षनेते पद जाहीर व्हावे अशा प्रकारची मागणी विरोधी पक्षाकडून सातत्याने आपणाकडे आली. विरोधी पक्षनेतेपदाच्या संदर्भात काँग्रेस पक्ष म्हणून त्यासंदर्भातील आग्रह आम्ही आपणाकडे धरला होता. त्यामागे निश्चितच काही कारणे होती. राज्यातील निवडणुका आणि निवडणुकांच्या नंतरचे राज्यातील जे वातावरण होते त्यावरुन आम्हा अनेकांना असे वाटले होते की, विरोधी पक्ष म्हणून दोन्ही सदनामध्ये नेतृत्व असावे. विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये विरोधी पक्ष नेतृत्वाने प्रभावी भूमिका पार पाडावी. त्यावेळी सत्तेमध्ये असलेल्या पक्षाच्या विरोधात ही भूमिका घेतली जाते त्यावेळी ती भूमिका प्रभावीपणे आपण करु शकतो या भावनेतून आम्ही विनंती केली होती, अर्ज केला होता. परंतु आज या ठिकाणी जी नियुक्ती झाली त्यासंदर्भात राष्ट्रवादी काँगेसचे नेते सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी त्यांच्या भावना या सदनामध्ये व्यक्त केल्या. विरोधी पक्षनेता म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम झाले पाहिजे. आजच्या काळात एक आव्हानात्मक अशा प्रकारची जबाबदारी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांच्यावर आलेली आहे. राज्यात इतर वेळी जे प्रश्न असतात त्यापेक्षा वेगळया प्रकारचे प्रश्न आज राज्यासमोर आहेत. राज्यातील जनतेला शासनाकडून फार मोठया अपेक्षा आहेत. यावेळी राज्यावर आलेली संकटे लक्षात घेतली तर विरोधी पक्षनेता म्हणून फार प्रभावीपणे भूमिका बजावण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रभावीपणे काम केलेले आहे. सुरुवातीला एक तरुण आणि धडाडीचा कार्यकर्ता म्हणून भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राज्यामध्ये नेतृत्व करीत होते. नंतरच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता म्हणून त्यांचे वेगळे व्यक्तिमत्व राज्यासमोर आले आणि ते देखील आपण सर्वांनी पाहिलेले आहे. राज्यामध्ये राजकीय जीवनामध्ये काम करीत असताना जे जे तरुण नेतृत्व पुढे आले त्यामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांचे नाव घेता येईल.

..5..



श्री. माणिकराव ठाकरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्या बद्दल वेगळे काही सांगण्याची आवश्यकता नाही. जेव्हा विरोधी पक्षनेते पद येते त्यावेळी त्या पदावरील व्यक्तीला राज्यांच्या प्रश्नांची जाणीव असली पाहिजे. मराठवाडा आणि विदर्भाचे असलेले श्री. धनंजय मुंडे यांना त्यांच्या जबाबदारीची आणि राज्याच्या प्रश्नांची जाणीव आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे......

त्या दृष्टीने तशा प्रकारची प्रभावीपणे विषयाची मांडणी करतील. त्यांच्या नजरेसमोर असलेल्या बाबी मांडून शासनाकडून अपेक्षित असलेली भूमिका मांडावयास भाग पाडतील. अनेकदा शासनाला अडचणी येत असतात. कशा प्रकारे मदत केली पाहिजे या संदर्भात सर्वांचे विचार घेऊन शासनाच्या माध्यमातून काम झाले पाहिजे ही अपेक्षा ठेवून ते काम करतील तर निश्चितपणे राज्यातील समस्या सुटण्याकरिता सत्ताधारी पक्षासोबत विरोधी पक्षाचा सुध्दा हातभार लागल्याशिवाय राहणार नाही. त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. त्यांनी प्रभावीपणे काम करावे.

सभापती महोदय, कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आणि आमच्या सर्वांच्या वतीने मी आपले सुध्दा अभिनंदन करतो. आपण सभापती स्थानी विराजमान झाल्यानंतर आपल्या संपूर्ण कार्यकाळामध्ये कोणत्या पक्षाने आपल्यावर आरोप केले असतील असे आम्हाला वाटत नाही. आम्हाला न्याय दिला जात नाही असे कोणी म्हटले असे आम्हाला वाटत नाही. आम्ही सत्तारुढ पक्षात असतानाही आपण विरोधी बाकाकडे पहात होता आणि पहिला मान विरोधकांचा आहे म्हणून पहिली संधी विरोधी पक्षाच्या बाकावरील माननीय सदस्यांना दिली पाहिजे ही आपली भूमिका आपण सातत्याने मांडली. या सदनामध्ये वाद निर्माण होऊ नये. वाद निर्माण झाला तर किमान आपल्याकडून तो होऊ नये ही भूमिका मनाशी बाळगली. एवढा मनाचा मोठेपणा आपण दाखविला. अनेक विषय वादाचे ठरले परंतु आपण शांतपणे सदनाला उचित होईल असा न्याय दिल्याशिवाय मी राहणार नाही ही आपली भूमिका कॉंग्रेस पक्षाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाची आहे. विरोधी पक्ष म्हणून बहुमत असेल त्या ठिकाणी नेतृत्वाची संधी दिली पाहिजे. आम्ही सुध्दा त्या बहुमताचा आदर करतो. कशा पध्दतीने बहुमताचा आदर राखून निर्णय घ्यावा हे आपल्याकडून शिकण्यासारखे आहे. त्या दृष्टीने आपला निर्णय आम्ही अंत:करणापासून स्वीकारतो आणि माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी विरोधी पक्षनेता म्हणून प्रभावीपणे काम करावे व राज्यातील जनतेला न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि कॉंग्रेस पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो. धन्यवाद.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, गेले तीन आठवडे या सदनामधील विरोधी पक्षनेता या पदाचा दुष्काळ संपला आणि आमच्या दुष्काळी भागाला आदर वाटावा असे तरुण, लढवय्ये, तडफदार असलेले माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे हे विरोधी पक्षनेते पदी विराजमान झाले. मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. आपल्याला पहिले अडचणीत टाकायचे, अडचणीत टाकल्यानंतर त्या अडचणीचे कोडकौतुक करीत सांगायचे की, आपण केले ते योग्य केले. तरीही लोकशाहीच्या माध्यमातून विधिमंडळामध्ये सत्तारुढ पक्षासमोर विरोधी पक्षनेता जर नसेल, सत्तारुढ पक्षाचा एककलमी कारभार चालू असतो ही जाणीव झाली तर लोक म्हणतील की, विरोधी पक्षनेता नसताना सर्व व्यवस्थित चालले आहे. मुख्यमंत्र्यांच्या प्रभावाखाली व्यवस्थित काम होते. त्यांचा प्रभाव होता आणि तो असणार आहे. पण समोरासमोर लढण्यामध्ये जी मजा असते ती नव्हती. कारण तुम्ही आपसात लढत होता.

सभापती महोदय, मला माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या भाषणाचे फारच कौतुक वाटले. या सभागृहात बहुमताचा आदर करणे वगैरे आपण सांगत होता. आपण सांगता त्यावर विश्वास ठेवतो. तरी सुध्दा आपले बहुमत नाही हे आपल्याला तीन आठवड्यानंतर कळले. सदनामध्ये एका तरुण तडफदार नेतृत्वाचे नाव राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने अगोदरच जाहीर केले होते. पण आपल्या भूमिकेने त्यांना आसनस्थ होण्यापासून दूर ठेवण्याचे काम केले नाही ना? भविष्यात असे काम आपल्यासारख्या थोर, अनुभवी आणि पक्षाचे महाराष्ट्रात नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वाने पक्षातील लोकांनाही पुढे येण्यासाठी संधी राखावी म्हणून मुद्दाम उल्लेख करतो.

सभापती महोदय, मला व्यक्तिगत आनंद झालाच. माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांचे मी माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या सहकाऱ्यांच्या वतीने अभिनंदन करीत असताना ते ज्या पदावर विराजमान आहेत त्या पदावर त्याचा किंवा माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांचाच अधिकार होता. पक्ष बदलण्याची क्षमता असावी लागते, ती पात्रता त्यांच्याकडे आहे. दुसरे म्हणजे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये आमच्याकडून तयार झालेले व्यक्तिमत्व मोठे होत असते. ते मंत्रिमंडळात आपण पाहिले. आज माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे विरोधी बाकावर असले तरी माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही एकत्रपणे काम केले आहे. तेच कौतुक माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे करीत होते. एकमेकांचे मन म्हणते, कार्यपध्दती म्हणते परंतु काही झाले तरी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

वेळ आली तर जनतेच्या हितासाठी त्या पदाला न्याय देण्याची भूमिका स्वीकारली नाही तर त्या पदाला महत्व राहणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांची बीड जिल्हा परिषदेमधील कार्यपध्दती तडफदार होती. जिल्हा परिषदेत त्यांच्या वडिलांचा वारसा त्यांच्याबरोबर होताच. खास करुन या महाराष्ट्रामध्ये आदरणीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जडणघडणीतून तयार झालेले व्यक्तिमत्व म्हणून मराठवाड्यामध्ये श्री.धनंजय मुंडे यांच्याकडे पाहिले जाते. ती जडणघडण लढवय्याची होती, संघर्षाची होती. त्याचबरोबर ही जी जडणघडण होती ती एकमेकाला जवळ करुन कुठेही काम बिघडणार नाही याचे सामर्थ्य टिकविणारी होती. माझे ऐकता ना हे सांगणारी होती. हे लक्षात ठेवले तर माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी पक्षाचे अध्यक्ष या नात्याने जाणीवपूर्वक जबाबदारीने सांगितले की, संघर्षाच्या वेळेला संघर्ष आणि महाराष्ट्राच्या हिताकरिता मात्र कोणतीही प्रतिष्ठा न करता या सदनामध्ये काम करा. तुम्हाला त्यांनी अत्यंत मौलिक सल्ला दिला आहे तो फार महत्वाचा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी तरुणपणी पहिल्याच बाकावर बसावे असे त्यांच्या प्रारब्धात लिहिले होते. ते आज सत्ताधारी बाजूला असते तरी हेच चित्र दिसले असते. लाल दिवा 100 टक्के त्यांच्या नशिबी होता. मात्र माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित तुमचे दोन्हीकडे जमले नाही. तरुण तडफदार म्हणून स्वकियांशी आपण भविष्यात जनतेच्या हिताकरिता लढणार आहात. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी चांगली गोष्ट सांगितली. अनुभवी गोष्ट सांगितली आहे. जनहिताकरिता कधीही आडवे जाणार नाही, बहुमत कितीही असले म्हणून महाभारत जे घडले ते लक्षात ठेवून स्वकीय असले तरी लढणारच या भावनेतून जनहिताकरिता लढा. तुमच्या त्या लढयातून सरकार सक्रिय झाले पाहिजे. सरकार गतिमान झाले पाहिजे. तुमच्या त्या लढयामधून सरकारकडून भविष्यात चूक घडणार नाही ही भूमिका ठेवली पाहिजे. तुम्ही किती वर्षे विरोधी बाकावर बसावे, आम्ही किती वर्षे सत्ताधारी बाकावर बसावे हे महत्वाचे नाही. मला खात्री आहे, आम्हाला ज्यावेळेला जनतेने या बाजूला बसविले त्यावेळी आम्ही एक भान ठेवले पाहिजे ते म्हणजे तुम्ही गेल्या 15 वर्षाच्या काळात आम्ही कोणी मनात आणले नाही ना तरी तुम्हाला विरोधी बाकावर बसावे लागेल.

नंतर 2क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ..............

त्या जाणिवेतून ज्यावेळी येथे बसलो त्या चुका पुन्हा आम्हाला करता कामा नये. सन्माननीय धनंजय मुंडेसारखे इकडचे नेतृत्व तिकडे बसते त्यावेळी भविष्यात या चुका आम्हाला कराव्या लागणार नाहीत ही त्यांच्यावर पडलेली जबाबदारी फार वेगळ्या प्रकारची आहे. अशा वेळी जे विरोधी पक्षनेते म्हणून तिकडच्या बाजूला बसलेले आहेत त्याबद्दल आम्हाला आनंदच आहे परंतु या सभागृहात त्यांची जबाबदारी पार पाडतांना ज्या चर्चा होतील अथवा भविष्यात परिस्थिती निर्माण होईल ती पुण्याईची टोपली कोणाच्या डोक्यावर ठेवावयाची आणि ती कशी वाहायची हे सुध्दा त्यांना पहावे लागणार आहे. कारण आमची पाटी इकडे कोरी असल्यामुळे या सभागृहात समोर जे येईल ते सगळे आपल्यालाच पाहून पुढे संघर्ष करावा लागणार आहे. गेल्या तीन वर्षांपासून सिंचनाच्या बाबतीत या सभागृहात जो आकांडतांडव केला, तो किल्ला तीन वर्षे कोणी लढविला म्हणून शेवटी माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांना सांगावे लागले की "होय, ते आम्ही देणार आहोत". मी खरे तर आपले अभिनंदन मनापासूनच करतो आणि आमच्या सदिच्छा आपल्या पाठीशी आहेतच. ज्या पक्षाचे बहुमत असेल त्यांचाच विरोधी पक्षनेता व्हावा असे असताना देखील इतके दिवस हा प्रश्न का सुटला नाही हेच मला समजत नाही. राष्ट्रवादी पक्षाचे संख्याबळ जास्त असल्याने आणि आपले नाव जाहीरच झालेले असल्याने आपणच या पदावर विराजमान होणार होता पण तीन आठवड्यांचा कालावधी या पदापासून आपणास दूर ठेवण्यात आले असले तरी या तीन आठवड्यात ज्या पध्दतीने आपण राज्यातील वेगवेगळ्या समस्यांवर वेगवेगळ्या आयुधांच्या माध्यमातून संघर्ष करीत होता ते सुध्दा एक प्रकारे विरोधी पक्षनेत्याचेच काम होते व ती चुणूक आपण दाखविलेली आहे म्हणून आपण त्या पदावर बसण्यास योग्य आहात. माननीय सभापती महोदयांचे त्या दिवशीचे शब्द मला आठवतात. आपण सांगितले होते की, काहीही झाले तरी मी कोणावरही कोणत्याच प्रकारचा अन्याय करणार नाही तर योग्य तोच निर्णय घेणार आणि हे आपले शब्द एक प्रकारे विश्वासार्हतेचे होते पण ती विश्वासार्हता समोरच्यांनी दाखविणे आवश्यक होते पण त्यांनी ती दाखविली नाही. तसेच आपल्या राजकीय जीवनातील इतक्या वर्षांचा सन्मान यातून व्हायला पाहिजे होता पण तसा तो कोणालाही वाटला नाही. ज्याप्रमाणे लढायला समोर कोणी नसेल तर लढण्यास मजा येत नाही तसे सभागृहात विरोधी पक्षनेता नसताना वाटत

..........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ..............

होते म्हणून लढण्यासाठी अथवा संघर्ष करण्यासाठी समोर कोणीतरी पाहिजे असते. हे सगळे होत असताना संध्याकाळ झाली, सूर्यास्त झाला आणि मग विरोधी पक्षनेता पदाकरिता एखाद्या भुंग्यासारखे आपण बसला होता ते कमळ आता सूर्यास्तामुळे मिटले. "नलिनीम् गज उध्दारा" या संस्कृत उक्तीप्रमाणे ही परिस्थिती मान्य करण्याची वेळ आली आता पुढचा सर्वस्वाचा होम यातून निर्माण करावा अशा शुभेच्छा देऊन मी माझे अभिनंदनाचे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद जय महाराष्ट्र.

----------

..............3

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सभागृहात विरोधी पक्षनेते म्हणून सन्माननीय श्री. धनंजयजी मुंडे यांची निवड झाल्याबद्दल मला मनापासून आनंद होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, गेल्या अनेक वर्षांचा स्नेह आणि कामकाजाच्या निमित्ताने ते एकत्र राहिले त्याप्रमाणेच माझाही मुंडे परिवाराशी अनेक वर्षाचा संबंध आहे. आमचे नेते कै. गोपीनाथजी मुंडे यांच्याबरोबर 35 वर्षांच्या राजकीय जीवनात आम्ही एकत्र राहून काम केले. त्या काळापासून आजतागायत स्व. मुंडेसाहेब या जगातून गेल्यानंतर सन्माननीय श्री. धनंजय मुंडे यांच्या रुपाने तसेच आमच्या मंत्रिमंडळातील सदस्या श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या रुपाने पुन्हा महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मुंडे परिवाराला दोन्ही बाजूला प्राप्त झाली. गेली कित्येक वर्षे माननीय धनंजय मुंडे यांचा आणि माझा परिचय आहे. तरुण वयापासून किंवा त्याही पूर्वी पासून काम करण्याची त्यांची शैली म्हणजे आक्रमकता, समाज जीवनात काम करीत असताना समाजाबद्दलची आस्था, दुर्बल माणसाला न्याय मिळाला पाहिजे त्यासाठी संघर्षाची भूमिका ही त्यांची शैली आहे. स्व. गोपीनाथजी मुंडे यांनी ओबीसी प्रवर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी जे धोरण अंगिकारले होते त्यासंदर्भात सन्माननीय श्री. धनंजय मुंडे यांनी अनेक वेळा आंदोलने व मोर्चात त्यांच्याबरोबर भाग घेतला व उपेक्षितांना न्याय मिळाला पाहिजे असाच सातत्याने विचार केला. त्यासाठी जेथे संघर्ष करण्याची आवश्यकता भासली तेथे संघर्ष करुन, रस्त्यावर उतरुन काम करण्याची व त्या निमित्ताने संपूर्ण राज्यभर फिरण्याची संधी श्री. धनंजय मुंडे यांना भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चोच्या माध्यमातून मिळाली. मग त्यात कार्यकर्त्यांचा परिचय, त्यांच्या व्यथा तसेच कार्यकर्त्यांमध्ये समन्वय अशा भूमिका त्यांनी घेतल्या. विरोधी पक्ष नेता पदावर काम करताना आपण जरी संसदीय आयुधांचा अनुभव आवश्यक असला तरी रस्त्यावरील अनुभव सुध्दा तितकाच महत्वाचा असतो आणि तो मुंडे साहेबांकडे आहे. त्यात लोकांच्या व्यथा व वेदना मांडण्याचा आणि त्या सोडविण्याचा अनुभव त्यांच्याकडे निश्चितच आहे. संसदीय कार्यप्रणाली मध्ये विरोधी पक्षनेता आणि सत्ताधारी असे दोन प्रकार असतात. सत्ताधाऱ्यांनी जे काम केले त्याचे मूल्यमापन करुन त्यातील चुका शासनाच्या तसेच जनतेच्या निदर्शनास आणून देणे व त्यात सुधारणा करण्यासाठी प्रसंगी विरोधी पक्षाने सत्ताधाऱ्यांवर प्रहार करणे महत्वाचे असते व ही जबाबदारी माननीय श्री. धनंजयजी चांगल्या प्रकारे पार पाडतील अशी माझी खात्री आहे. हे सर्व करताना कोणत्याही प्रकारे

.............4

श्री. एकनाथराव खडसे ..............

कटुता न येता सर्वसामान्य जनतेसाठी प्रयत्न करणे हीच भूमिका असली पाहिजे व ती त्यांच्याकडे आहे. माननीय मंत्री श्री. विनोदजी तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे 15 वर्षे तिकडेच रहावे पण या सभागृहाच्या परंपरा थोर आहेत. खालच्या सभागृहात आपण पाहिले की या परंपरांनुसार तिकडचे सभासद इकडे आणि इकडचे तिकडे हे होतच राहते, त्यासाठी निवडणुका लढल्या पाहिजे असे नाही. तसेच या सभागृहाने पाहिले की, 15 दिवस विरोधी पक्षनेते पदावर राहिलेले माननीय श्री. एकनाथ शिंदे आज सत्तेत आले, त्यांना मंत्री म्हणून संधी मिळाली तसे आपणही येऊ शकता, कारण इकडचे दरवाजे नेहमी मोकळेच असतात. मी असे म्हणणार नाही की आपण याच पण राजकीय जीवनात कोण कोठे असेल हे आपणही अनुभवले आणि मी तर खूपच अनुभवले आहे. आमचे सन्माननीय श्री. भुजबळ साहेब इकडे होते पण अचानक 1993 मध्ये तिकडे गेले हा काळ देखील मी अनुभवला. त्यानंतर स्व. गोपीनाथजी विरोधी पक्षनेते पदावर विराजमान झाले. एवढेच नव्हे तर मी अनेक वेळा सांगत होतो की, मागील मंत्रिमंडळातील निम्मे सदस्य आमच्या मंत्रिमंडळात सुध्दा होते. त्यात अनिल देशमुख साहेबांचे उदाहरण देता येईल.

.............नंतर श्री. भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

सभापती महोदय, या संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये कोण इकडे आणि कोण तिकडे आहे हा विषय नाही. लोकशाहीप्रती आपली बांधिलकी असली पाहिजे. त्यांनी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी बांधिलकी ठेवली पाहिजे. हे जबाबदारीचे पद आहे. हे जबाबदारीचे पद सांभाळत असताना अनेकांचे मार्गदर्शन लाभते. जबाबदारीचे पद स्वीकारत असताना काही मर्यादा येतात हे ही तितकेसे खरे आहे. मी मंत्री झाल्यावर नाथाभाऊंनी कसे वागावे, कसे बोलावे यासंबंधी खूप काही शिकलो. कृपा करून हे लिहू नका. आपल्याला शिकविणारे देखील भरपूर असतात. त्यांच्याकडून आपण शिकून घेतले पाहिजे. त्यामुळे श्री.धनंजयजी मुंडे आपल्याला देखील आता अनुभव येतील. पण जे चांगले आहे ते आपण स्वीकारले पाहिजे. राजकीय जीवनामध्ये एवढे वर्षे काम करीत असताना आपण पथ्य पाळत आलेलो आहोत. आपण कधीही राजकीय संबंध बिघडू दिलेले नाहीत. शेवटी राजकारणामध्ये विरोध असतो. सभागृहात तर आपण कट्टर विरोध दर्शवत असतो. पण बाहेरील कँटीनमध्ये आपण एकत्र बसलेलो असतो. याच खेळीमेळीच्या वातावरणामध्ये दोन्ही पक्षांकडून काम झाले तर लोकशाही अजूनही जीवंत आहे हे समाजाला दाखवून देऊ शकू. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ्यांची कारकीर्द अत्यंत उज्ज्वल राहील. राजकारणात दमदारपणाने पाऊल उचलण्यासाठी हे एक उत्तम पद आहे. विरोधी पक्ष नेता असताना आक्रमकतेने आपण प्रश्न सोडविले पाहिजेत, आक्रमकतेने विषय मांडले पाहिजेत. जो विषय समाजापर्यंत नेईल त्याचे भविष्य हे उज्ज्वल असते असा अनुभव या सभागृहातील अनेक नेत्यांनी घेतला आहे. या सभागृहाने अनेकांचे नेतृत्त्व पाहिले आहे. प्रा.एन.डी.पाटील. श्री.दत्ता पाटील, श्री.प्रमोद नवलकर, श्री.सूर्यभानजी वहाडणे, प्रा.ना.स.फरांदे, श्री.उत्तमराव पाटील अशा अनेकांनी या सभागृहाचे नेतृत्त्व केले आहे. श्री.उत्तमराव पाटील यांनी तर आम्हाला घडविले आहे. अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या कामकाजाप्रती योगदान दिलेले आहे.

मागच्या नेत्यांनी ज्या काही प्रथा आणि परंपरा सुरू केल्या आहेत त्या नुसारच आपल्याला कामकाज करावयाचे असते. त्यांनी संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये या सभागृहाचे महत्त्व वाढविले आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

मुळात या सभागृहाचे महत्त्व कमी आहे अशातला भाग नाही. परंतु, या सभागृहाची प्रतिष्ठा टिकविण्याचे काम आपल्या हातामध्ये असते. ती प्रतिष्ठा वाढविण्याचे काम आपल्या हातून होईल व ते पुढच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल.

माननीय सभापती महोदयांनी पाच-सहा दिवसांपूर्वी भाष्य केले होते की, माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला पटेल असाच मी निर्णय घेणार आहे. मी कोणाच्याही दबावाखाली येणार नाही. त्यामुळे आपले खास करून अभिनंदन केले पाहिजे. आपण कोणाच्याही दबावाखाली न येता, बहुमताचा मान ठेवून श्री.धनंजय मुंडे यांची विरोधी पक्ष नेते पदी निवड केली आहे. ही परंपरा पुढील पिढीसाठी पथदर्शक आहे. आजचा निर्णय हा साधा नाही. आजचा निर्णय हा सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्यासाठी नाही. या पुढच्या कालखंडामध्ये आपल्याला परंपरा जपायच्या आहेत. येथे जे मार्गदर्शक तत्त्व आणि सूत्र आखून दिले आहे ते पुढील कित्येक पिढ्या साक्षीदार म्हणून प्रोसिडिंगला राहणार आहे आणि त्यानुसार निर्णय होतील. मागे काय घडले आहे याच्या आधारावर पुढचा निर्णय होत असतो. बहुतांशी निर्णय हे त्याच आधारावर असतात. त्यामुळे आपला निर्णय देखील तेवढाच महत्त्वाचा आहे. आपण हा निर्णय घेतल्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करतो आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. त्यांची पुढील वाटचाल ही महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त राहील, चांगली राहील आणि तेवढीच प्रगतिशील राहील अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

............



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाच्या विरोधी पक्ष नेते पदी सन्माननीय सदस्य श्री.धनंजयराव मुंडे यांची निवड करून अत्यंत निर्दोष निर्णय दिल्याबद्दल मी सर्वप्रथम आपल्या प्रती ऋण व्यक्त करतो आणि आभारही मानतो. मजबूत विरोधी पक्ष हा लोकशाहीचा आत्मा असतो. या सभागृहात विरोधी पक्ष हा खरोखरच मजबूत आहे. या सभागृहात सत्ताधारी पक्ष हा अल्पमतात आहे. या वरिष्ठांच्या सभागृहामध्ये पहिल्यांदाच तरूण विरोधी पक्ष नेता झाला आहे याबद्दल श्री.धनंजयराव मुंडे यांचे खास अभिनंदन केले पाहिजे.

या राज्याचे माननीय मुख्यमंत्री देखील तरूण आहेत. त्यामुळे विरोधी पक्ष नेता तरूण असणे स्वाभाविक आहे. मी येथे आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे. या राज्याचे नेते श्री.शरद पवार यांच्याकडे एक विलक्षण हातोटी आहे. बदलत्या आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुद्धा नव-नवे नेतृत्व उभे करणे, त्यांना ताकद देणे, बळ देणे यासाठी त्यांच्याकडे अजब कौशल्य आहे, त्याची प्रचिती आज पुन्हा श्री.धनंजयराव मुंडे यांच्या निवडीमुळे आली आहे.

सभापती महोदय, सभागृहाचे कामकाम आणि राज्याचे कामकाज दोन खांबांवर उभे असते. एक म्हणजे संवेदनशील मुख्यमंत्री आणि दुसरे म्हणजे आक्रमक विरोधी पक्ष नेता. माननीय मुख्यमंत्री संवेदनशील असतील, राज्यकर्ते संवेदनशील असतील आणि विरोधी पक्ष आक्रमक असेल तर या राज्याच्या जनतेला न्याय मिळण्याची शक्यता अधिक वाढते, संभावना वाढते. आपल्या राज्यातील या सभागृहाची परंपरा फार मोठी आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संसदीय लोकशाहीमध्ये अनेक पायंडे घालून दिले. ज्यावेळी विरोधी पक्ष नेता बोलायला उभे राहत होते त्यावेळी पंडित नेहरू सभागृहात धावत येत असत. तीच परंपरा या राज्यात श्री.यशवंतराव चव्हाण,श्री.शरद पवार, श्री.विलासराव देशमुख, श्री.वसंतदादा पाटील यांनी कायम जपली होती. यापुढेही ती परंपरा सुरू राहील याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. विरोधी पक्ष आक्रमक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

असणे म्हणजे वेलमध्ये उतरणे असे देखील नाही. विरोधी पक्ष नेता पद मागण्यासाठी देखील वेलमध्ये उतरावे लागले. पण मला असे वाटते की, राज्याला ज्यावेळी संवेदनशील मुख्यमंत्री आणि आक्रमक विरोधी पक्ष नेता असेल त्यावेळी या सभागृहामध्ये वेलमध्ये उतरण्याचा प्रसंग विरोधी पक्षावर येऊ नये. या सभागृहात संसदीय आयुधांनीच लढले गेले पाहिजे आणि परस्परांवरचा जो हल्ला आहे तो संसदीय शस्त्रांनीच केला पाहिजे अशी अपेक्षा आपल्या निवडीच्या निमित्ताने मी व्यक्त करतो. मला श्री.गोपीनाथ मुंडे साहेबांचा व्यक्तीगत स्नेह मिळाल्यामुळे मला एका गोष्टीचा आनंद आहे. आज श्री.गोपीनाथ मुंडे साहेबांची दोन माणसे या राज्यात नेतृत्त्व करण्यासाठी पुढे आलेली आहेत. स्वत: माननीय मुख्यमंत्री हे श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या जवळचे मानले जात होते, तर त्यांच्याच संस्कारात तयार झालेले श्री.धनंजयरावी मुंडे आज विरोधी पक्ष नेतेपदी विराजमान झाले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांना आनंद होणे स्वाभाविकच आहे की, आपल्याच पॉलिटीकल स्कूलमधील एक जण आज विरोधी पक्ष नेता होत आहे. आज विरोधी पक्ष नेत्यावर अधिक आव्हान आहे. मी त्या स्कूल मधील नसून जबाबदार विरोधी पक्ष नेत्याची भूमिका पार पाडणार आहे हे दाखवून द्यावे लागणार आहे. त्यांना आता विरोधी पक्ष नेत्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. ते आव्हान या पुढच्या काळात आपण नक्कीच पेलाल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो. एक उत्तम वक्ता, संघर्षशील कार्यकर्ता म्हणून आपली नवीन ओळख सभागृहातील विरोधी पक्ष नेता या नात्याने व्हावी अशी पुन्हा एकदा अपेक्षा व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

.............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सर्वप्रथम मी आपले अभिनंदन करतो, आपल्याला धन्यवाद देतो. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून मी माझा निर्णय देईन अशा प्रकारची घोषणा आपण सभागृहात केली होती. त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांची विरोधी पक्ष नेते पदी निवड झाल्याची घोषणा केली, त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. तसेच, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सभागृहाचे जेवढे वय वाढत चालले आहे तेवढे ते तरूण होत आहे. आमचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे हे दोघेही तरूण आहेत. हे चांगले लक्षण आहे. तरूणांच्या हातामध्ये देशाचे भवितव्य दिले पाहिजे असे आपण सर्वजण नेहमीच म्हणत असतो. पण वेळ येते तेव्हा मात्र का-कू करतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकरजी रावते हे माझे फार जवळचे मित्र आहेत. अनेक मुद्यांवर आमचे कधीच पटत नाही. ते म्हणाले की, आपण विरोधी पक्ष नेते पदासाठी भांडत होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, सरकारच्या चुकीच्या निर्णयाच्या विरोधात कसे भांडायचे याची रंगीत तालीम आम्ही आपणा समोर करीत होतो.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

मी सन्माननीय मंत्री महोदय, श्री.रावते साहेबांना सांगू इच्छितो की, आम्ही आपापसात भांडत होतो ते तुमच्याशी कसे भांडावयाचे यासाठी. आमची ती रंगीत तालीम होती. सरकारच्या चुकीच्या निर्णयाबाबत कसे भांडावयाचे याची ती रंगीत तालीम होती व आजचा हा शेवटचा अंक होता. माननीय श्री. धंनजय मुंडे यांची विरोधी पक्ष नेते पदी झालेली नियुक्ती हा या नाटयाचा शेवटचा अंक असून माननीय सभापती महोदयांनी हा अंक देखील अत्यंत उत्कृष्टपणे रंगवल्याबद्दल मी त्यांनाही धन्यवाद देतो. माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस हे या राज्याचे मुख्यमंत्री जरी असले तरी ते आमच्यासाठी मुख्यमंत्री कमी आणि मित्रच जास्त आहेत. जेव्हा मुख्यमंत्री संवेदनशील आणि विरोधी पक्ष नेता आक्रमक असतो व यांचे जेव्हा एकत्रीकरण होते, वैचारिक संघर्ष होतो त्यातून लोकशाही मजबूत होत जाते व त्यातून जनतेचे हित जास्त साधले जाते हा आतापर्यंतचा अनुभव आहे. आपल्या लोकशाहीचे सौंदर्य हे डिसीजन आऊट ऑफ डिस्कशनमध्ये आहे. भारतीय राज्य घटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केली असून या लोकशाहीचे सौंदर्य आणखी वाढवण्याचे काम माननीय धनंजय मुंडे यांची विरोधी पक्ष नेता म्हणून नियुक्ती केल्याबद्दल मी माननीय सभापती महोदयांना अंत:करणापासून धन्यवाद देतो. आम्ही सर्व माननीय धनंजय मुंडे साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करणार आहोत. आपण आमचे नेते आहात. परंतु पूर्वीचे ऋणानुबंध ठेवून काहीही लफडे करावयाचे नाहीत हे प्रथम आपण लक्षात घेतले पाहिजे. आपण अगोदर त्यांच्या शाळेमध्ये होता, आता आपली शाळा बदलली असून आपली शाळा समतेच्या, बंधुत्वाच्या,न्यायाच्या, माणुसकीच्या विचारावर म्हणजे शाहू, फुले,आंबेडकरांच्या विचाराने चालणारी आहे. मला विश्वास आहे की, छत्रपती शिवराय असतील, शाहू महाराज असतील, फुले असतील, बाबासाहेब आंबेडकर असतील, गाडगे महाराज असतील अशी अनेक थोर परंपरा आपल्या सोबत आहे. हा विचार घेऊन शासनाचा चांगला निर्णय असेल तर वेळ प्रसंगी शासनाला मदत करा परंतु जेव्हा राज्यातील जनतेचा हिताचा विचार होत नसेल तेव्हा तुम्ही वाघासारखे सरकारवर तुटून पडण्याची तयारी ठेवली पाहिजे. आम्ही आपल्या पाठीशी आहोत.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय धनंजय मुंडे यांचा उल्लेख करतांना ते मराठवाडयातील आहेत असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला परंतु आता प्रांताचा उल्लेख

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

करुन भिंती उभारु नका. माननीय श्री.धनंजय मुंडे हे महाराष्ट्राच्या विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते झाल्यामुळे आता भिंती उभारु नका. आता नो मराठवाडा, नो विदर्भ, नो खानदेश, नो कोकण आणि तीच गोष्ट आमच्या मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात देखील लागू आहे. ते आता विदर्भाचे नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचे झाले आहेत. जेव्हा विदर्भ वेगळा होईल तेव्हा होईल. विदर्भ वेगळा होईल तेव्हा आम्ही मुख्यमंत्री होऊ. हा गमतीचा भाग झाला. माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा अनेक लोक विदर्भाचा मुख्यमंत्री झाला, विदर्भाचा मुख्यमंत्री झाला असे म्हणत होते परंतु हा फालतुपणा आता बंद झाला पाहिजे. आता माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या सर्व प्रादेशिक भिंती तोडून देवेंद्रजी महाराष्ट्राच्या विकासाला उत्कर्षावर नेतील असा विश्वास वाटतो.

माननीय धनंजयजी मुंडे आपल्या नेतृत्वाखाली राज्याच्या विरोधी पक्षाचा कारभार अत्यंत उत्कृष्टपणे चालेल असा विचार व्यक्त करतो. पुन्हा एकदा आपली विरोधी पक्ष नेते पदी नियुक्ती झाल्याबद्दल माझ्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो व सभापती महोदयांचेही अभिनंदन करतो. धन्यवाद. जय भीम.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, गेल्या अनेक दिवसापासून या सभागृहात एक संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते त्या संभ्रमाच्या वातावरणाच्या संदर्भात आपण निर्णय देऊन पूर्ण विराम दिल्याबद्दल मी प्रथम सभापती महोदयांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, संभ्रमाचे वातावरण महाराष्ट्राच्या लोकशाहीमध्ये पहिल्यांदाच तयार झाले होते असे समजण्याचे काही एक कारण नाही. सभापती महोदयांनी वक्तव्य केले होते की, "मी माझ्या सदसद् विवेकबुध्दीला स्मरुन कोणावरही अन्याय होऊ देणार नाही". मग तो तारांकित प्रश्न असो, लक्षवेधी सूचना असो किंवा कोणत्याही आयुधाने उपस्थित केलेला प्रश्न असो. अशा प्रकारची वक्तव्य आपण केली होती. मला शब्दच्छल करता येत नाही. परंतु शब्दाच्या कसरती करीत असताना काही सन्माननीय सदस्यांनी माननीय श्री. माणिकराव ठाकरे यांना आता कसे सुचले असे वक्तव्य केले होते. परंतु बोलणाऱ्यांना जे सुचले होते ते स्वतः सोयीस्करपणे विसरले. दि.31 ऑक्टोबर, 2014 रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शपथग्रहण करतात, त्यानंतर एका अधिवेशनात विरोधी पक्ष म्हणून बसतात आणि पुढच्या अधिवेशनात विरोधी पक्षात बसलेले लोक सत्ताधारी पक्षात जाऊन बसतात अशी घटना महाराष्ट्रात आणि देशात एखाद्या दुसऱ्याच वेळी घडलेली आहे. हरियाणा राज्यात अशा प्रकारची पहिली घटना घडली होती व त्या घटनेचा मी साक्षीदार असून मी त्यावेळी हरियाणामध्ये निरीक्षक म्हणून काम करीत होतो. कोणाला काय सुचले हा जर अंकगणिताचा विषय असेल तर त्यावेळेस 63 ही संख्या फार मोठी होती. त्यामुळे 121 आणि 63 हा देखील मोठा विषय होऊ शकतो.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा विषय अन्य वेळी उपस्थित करणे योग्य होईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आपल्या वक्तव्यातील एकाही वाक्यात झालेल्या घटनेचा साधा उल्लेख सुध्दा केला नव्हता. परंतु हे सांगत असतांना आमचे मित्र लोकशाहीच्या परंपरा, सभागृहाच्या परंपरा शिकण्याचा प्रयत्न करीत असतात. या सभागृहातील परंपरा तेव्हा कोठे गेल्या होत्या असाही प्रश्न त्यामुळे निर्माण होतो. खरे म्हणजे पहिल्यापासून माननीय श्री. धनंजय मुंडे यांची विरोधी पक्ष नेता म्हणून निवड जवळ जवळ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ......

निश्चितच होती. मराठी भाषा वाकावी तशी वाकते, बोलावी तसे बोलते अशा पध्दतीने न घेता मला असे वाटते की, आपण सर्वंकष लोकशाहीचे पाईक आहोत, समर्थक आहोत. आपण या ठिकाणी जो निर्णय दिला तेथपर्यंत थांबायला काहीच हरकत नव्हती, कारण अजून अधिवेशनाचे दोन दिवस शिल्लक होते. विरोधी पक्ष नेता निवडीच्या संदर्भात सभापती महोदयांनी सांगितले होते की, "मी परिस्थितीचा अभ्यास करीन." कित्येक वेळा परिस्थिती माहिती असताना सुध्दा त्या परिस्थितीची पडताळणी करुनच आपल्याला निर्णय घ्यावा लागत असतो. विधि मंडळाच्या प्रथा परंपरा आहेत. माननीय श्री. धनंजय मुंडे हे पलीकडच्या बाकावर होते आणि त्यांनी जेव्हा पहिल्यांदा भाषण केले होते त्यावेळेला मी त्यांना चिठ्ठी पाठवून त्यांचे अभिनंदन केले होते. त्यांची त्यावेळी मी आक्रमक शैली पाहिली होती.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 19:00

श्री.भाई जगताप....

त्यांच्या भाषण शैलीमुळे मी त्यांचा चाहता झालो होतो. काही माणसे अशी असतात की, एखादा विषय हातामध्ये घेतल्यानंतर त्या विषयाशी एकरूप असतात, एकनिष्ठ असतात. या वरिष्ठ सभागृहाचे नेतृत्व आमचे तरुण सहकारी श्री.धनजंय मुंडे करणार आहेत. आम्ही त्यांना खात्री देतो की, आम्ही सर्वजण आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू. येथे काही उल्लेख झाले. आपल्यातील मतभेद पाहिले. परंतु आपण एक गोष्ट अजून पाहिली असेल की, ज्यावेळी सरकारने चुकीचे पाऊल उचलले त्यावेळी आम्ही एकत्रितरित्या आवाज उठविला होता, याची जाण आपणा सर्वांना आहे आणि हीच गोष्ट लोकशाहीला अभिप्रेत आहे. आपण सर्वजण या विधिमंडळाच्या प्रवाहातील प्रवासी आहोत. या प्रवाहामध्ये काम करीत असताना खूप गोष्टी शिकायला मिळतात. याही गोष्टी शिकायला मिळाल्या. हा अनुभव देखील आमच्या गाठीशी राहील.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या भाषणात कोणत्याही गोष्टीचा लवलेश नव्हता. त्यांनी एकाही गोष्टीचा उल्लेख केला नव्हता, हा त्यांचा मोठेपणाच आहे आणि हा काँग्रेस पक्षाच्या विचाराचा मोठेपणा आहे, हे मला येथे मुद्दाम सांगावेसे वाटते. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आम्ही आपल्याशी पूर्णत: बरोबर राहून, आपल्या खांद्याला खांदा देऊन काम करु. मी या निमित्ताने त्यांना सांगू इच्छितो की, यापुढे त्यांना वेलमध्ये येता येणार नाही. आपण आपल्या आसनावर बसावे. आम्ही आपल्या नेतृत्वाखाली ते काम अगदी बखुबी निभाऊ.

सभापती महोदय, या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांनी जे सांगितले ते खरे आहे. आपणास गुरुकुलमध्ये दिलेल्या शिकवणीचा आम्हाला उपयोग होईल. आपण तिकडून सहा सांगाल, आम्ही इकडून नऊ म्हणू,परंतु दोन्ही आकडा सारखाच असेल, ही शिकवण आम्हाला देखील उपयोगी ठरेल. राज्याच्या हिताचे निर्णय, कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे, तरुणांचे, विद्यार्थ्यांचे दलितांचे या सर्वांच्या प्रश्नांच्या बाबतीत आम्ही सर्वजण आपल्या नेतृत्वाखाली आपल्यासोबत राहू. मात्र आपण पावले टाकताना एखादे पाऊल इतके तिकडे गेले तर त्यास कडकडून विरोध करु असेही येथे सांगतो. मी पुन्हा एकदा आपणास शुभेच्छा देऊन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, श्री.धनंजय मुंडे यांची विरोधी पक्ष नेते पदी निवड झाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. माननीय मुख्यमंत्री, शिवेसनेचे गट नेते आणि माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन केलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे अभिनंदन करताना त्यांना कोणी मराठवाड्याचे म्हणाले तर कोणी महाराष्ट्राचे म्हणाले. पण मी येथे सांगू इच्छिते की, ते माझे शेजारी आहेत. पुणे येथील मॉडेल कॉलनीमध्ये माझा सिल्व्हर रॉक्स बंगला आहे. त्याच्या शेजारी एक नवीन इमारत उभी राहिली. त्या ठिकाणी मराठवाड्यातील खूप लोक आलेले दिसल्यावर मी मनात म्हणाले की, मराठवाड्यातील कोणता नेता आपल्या शेजारी रहायला आला आहे. तेव्हा मला समजले की, तेथे धनंजय मुंडे रहायला आले आहेत. त्यावेळी मी त्यांना शुभेच्छा देताना त्यांना सांगितले होते की, आपण मॉडेल कॉलनीत आला आहात, तेव्हा आपली भरभराट होणार आहे, प्रगती होणार आहे. ही प्रगती कशी होणार आहे, हे मला माहीत नव्हते. परंतु आपण विरोधी पक्ष नेते पदापर्यंत पोहोचला आहात, त्याबद्दल आपणास मन:पूर्वक शुभेच्छा देते. महाराष्ट्रातील भगिनींच्या वतीने, शिवसेना पक्षाच्या वतीने आपले पुनश्च एकदा अभिनंदन करुन माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी काही उल्लेख केला. आजच्या प्रसंगामुळे मी त्यावर काही भाष्य करणार नाही. आज शुभेच्छा देण्याचा दिवस आहे. विरोधी पक्ष पदी नियुक्ती झालेले श्री.धनंजय मुंडे यांना आपण सर्वांनी शुभेच्छा दिलेल्या आहेत. भाषण करताना इकडचा शब्द तिकडे होतो. या ठिकाणी माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते असे म्हणाले की, आमच्यामुळे आपल्यावर दबाव होता व आमच्या दबावामुळे आपण उशिरा निर्णय घेतला. माननीय मंत्री महोदयांचे हे वक्तव्य कामकाजातून काढून टाकावेत अशी आपणास विनंती आहे. खरी परिस्थिती काय होती हे आपणा सर्वांना माहीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जे चालले होते ते उघड सत्य आहे आणि आपण नाटक करीत होता हे आता आम्हाला कळले. आपण जे नाटक करीत होता ते मी सांगितले.

--------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहाच्या विरोधी पक्ष नेते पदी माझ्यासारखा वयाने लहान असणारा, अनुभवाने कमी असणारा आणि या सभागृहात माझ्यापेक्षा ज्ञानाने, कर्तृत्वाने व सर्वार्थाने ज्येष्ठ असणारे सदस्य या सभागृहात असताना माझ्यावर विरोधी पक्ष नेते पदाची जबाबदारी सोपविली त्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, माझ्यासारख्या एका सामान्य कार्यकर्त्यावर विरोधी पक्ष नेते पदाची जबाबदारी आमच्या पक्षाचे नेते आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांनी दिली. तसेच विधिमंडळाचे नेते आदरणीय श्री.अजितदादा पवारसाहेब, राज्याचे नेते आदरणीय श्री.सुनील तटकरेसाहेब, ज्येष्ठ नेते मा.श्री.प्रफुल्ल पटेल साहेब, आदरणीय श्री.छगन भुजबळ साहेब, आदरणीय श्री.आर.आर.पाटील साहेब, आदरणीय श्री.जयंत पाटील साहेब, सन्माननीय सुप्रियाताई सुळे आणि पक्षातील इतर सर्व सहकाऱ्यांनी माझ्यावर ही जबाबदारी टाकली, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे आणि त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, इतिहासाची पुनरावृत्ती व्हावी, अशा दोन पुनरावृत्तीची मला प्रचिती झाली आहे. 23 वर्षापूर्वी अशाच हिवाळी अधिवेशनामध्ये माझे काका आदरणीय गोपीनाथ मुंडे साहेब यांना विरोधी पक्ष नेते पद मिळाले होते. त्यापूर्वी स्व.गोपीनाथ मुंडे यांनी 1978 मध्ये पहिल्यांदा राजकीय जीवनामध्ये जिल्हा परिषदेची निवडणूक लढविली होती. त्याच जिल्हा परिषदेच्या जागेवर त्यांनी मला 2002 मध्ये उभे केले होते. त्यांच्याप्रमाणेच हिवाळी अधिवेशनात विधानपरिषदेच्या विरोधी पक्ष नेते पदाची जबाबदारी माझ्यावर येत आहे. हा कुठेतरी दैवी योगायोग आहे असे मी समजतो.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या नावाचा उल्लेख केला. उभ्या महाराष्ट्राने आणि देशाने त्यांचे संघर्षमय जीवन पाहिले आहे. ही गोष्ट खरी आहे की, मी त्यांच्याकडे पाहून, त्यांच्यासोबत राहून राजकारणात आलो आणि राजकारणात मोठाही झालो. दुर्दैवाने काही गोष्टी घडू नयेत त्या घडल्या. राजकारणाच्या एका स्तरावर मला वेगळा निर्णय घ्यावा लागला. मी हा निर्णय घेत असताना त्यांनी मला बोलावून सांगितले की, यापुढे तुला स्वत:च्या पद्धत्तीने राजकारण करावे लागेल, तुला मोठे व्हावयाचे असेल तर स्वत:च्या कर्तृत्वाने मोठे व्हावे लागेल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

आज ही जबाबदारी स्वीकारत असताना त्यांनी मला जे वाक्य सांगितले होते त्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. कदाचित आज जर ते असते तर त्यांना नक्कीच मनातून कोठे ना कोठे आनंद झाला असता. माझ्या नियुक्तीपर अनेक मान्यवरांनी अभिनंदनपर आपले मनोगत व्यक्त केले आहे. त्यामध्ये आदरणीय मुख्यमंत्री असतील, सभागृहाचे नेते आदरणीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे असतील, सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते असतील, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, माणिकराव ठाकरे, प्रा.जोगेंद्र कवाडे, कपिल पाटील, भाई जगताप असतील, या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो आणि आपल्या सर्वांकडून सहकार्याची अपेक्षा करतो.

महोदय, ज्या पदावर आपण माझी नियुक्ती केली आहे त्या पदाला अनेक मान्यवरांनी एका वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवले आहे. मग त्यामध्ये या सभागृहाचे सर्वात पहिले विरोधी पक्ष नेते आदरणीय सर्वश्री बी.एम.गायकवाड असतील, गोगाटेजी असतील, चौधरीजी , उत्तमरावजी पाटील, अर्जुनरावजी कस्तुरे, रामजी मेघे, प्रा.ग.प्र.प्रधान, दत्ताजी मेघे, देवीदासजी कराळे, रा.सु.गवई, विठ्ठलरावजी हांडे, प्रमोदजी नवलकर, अण्णा डांगे, सुधीर जोशी, शरदचंद्रजी पवार, छगनजी भुजबळ, नितीनजी गडकरी, पांडुरंगजी फुंडकर असतील किंवा आदरणीय श्री.विनोदजी तावडे असतील, या 19 विरोधी पक्ष नेत्यानंतर 20 व्या विरोधी पक्ष नेते पदाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे.

महोदय, माझ्या सबंध कुटुंबाचे जीवन अतिशय संघर्षात गेले. वडील आणि चुलत्यांच्या संघर्षातून आम्हाला आमचे नाव मिळाले. तशी पार्श्वभूमी बघितली तर आमचे कुटुंब ऊस तोडणारे शेतकरी कुटुंब होते. त्या कुटुंबातून पुढे येत-येत मला आदरणीय स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांचा सहवास जीवनात लाभला. स्व.प्रमोदजी महाजन यांच्यासोबत त्यांना पाहून बरेच दिवस काम करता आले. राज्याचे माननीय मुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्रजी फडणवीस आणि मी युवा मोर्चात एकत्र काम केलेले आहे. ते युवा मोर्चाचे उपाध्यक्ष आणि मी चिटणीस, सरचिटणीस होतो. मला आजही चांगले आठवते की, त्या कालावधीत त्यांना प्रथम विधानसभेची उमेदवारी मिळाली होती. त्यावेळी याच नागपुरात युवक आंदोलन आयोजित केले होते आणि याच ठिकाणी त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले होते. या सर्व गोष्टींची आज आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

श्री.धनंजय मुंडे....

महोदय, कदाचित अनेक वेळा गृहकलह आणि पक्षांतर झाल्यानंतर माझ्यावर आरोप झाले. त्यावेळी माझ्याबद्दल चांगलेही बोलले गेले आणि वाईटही बोलले गेले. पण एक सांगू इच्छितो की, मला जीवनात कधीही स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे साहेबांचे राजकीय वारस व्हायचे नव्हते. परंतु माझ्या वडिलांचा आणि चुलत्यांचा संघर्षाचा जो वारसा आहे तो नियतीने मला नक्कीच या ठिकाणी दिला आहे. हा संघर्षाचा वारसा महाराष्ट्रातील जनतेच्या आणि महाराष्ट्राच्या कल्याणासाठी मी नक्कीच यशस्वीपणे पार पाडेल हा शब्द मी या सभागृहाच्या माध्यमातून देतो. आज एका वेगळ्या परिस्थितीत माझ्यावर विरोधी पक्ष नेते पदाची जबाबदारी येऊन पडली आहे. महाराष्ट्राच्या विदर्भ आणि मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती आहे. खानदेश असेल, कोकण असेल, उत्तर महाराष्ट्र असेल, या भागात गारपिटीची परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत सभागृहाचा विरोधी पक्ष नेता म्हणून जनतेशी असलेली बांधिलकी लक्षात घेता सरकारच्या माध्यमातून समन्वयाने जनतेच्या पदरात काही तरी पाडून द्यायची माझी भूमिका राहील. या निमित्ताने मी सभागृहात शब्द देतो की, विरोधी पक्ष म्हणून सामंजस्याने लोकांच्या हितासाठी ज्या काही गोष्टी करता येतील त्या गोष्टी विराधी पक्षाच्या बाजूने करण्यात येतील. सरकारने चांगले काम केले, लोकाभिमुख पावले उचलली तर त्या पावलांचे निधड्या छातीने स्वागत करण्यात येईल. या कामी आम्ही कुठेही कमी पडणार नाही. परंतु सरकार लोकाभिमुख कामाच्या थोडे जरी बाजूला गेले तर त्याचा सुध्दा निधड्या छातीने या सभागृहात आणि सभागृहाबाहेर विरोध करण्यात येईल. सरकारला लोककल्याणाच्या बाजूने राहण्यासाठी विरोधी पक्ष म्हणून जेवढा काही संघर्ष करावा लागेल तेवढा संघर्ष विरोधी पक्ष म्हणून नक्कीच करण्यात येईल.

महोदय, या ठिकाणी बसलेल्या माझ्या जुन्या सहकाऱ्यांना माहीत आहे की, मी ज्या ठिकाणी निष्ठा ठेवतो, त्या ठिकाणी निष्ठेसाठी मरतो आणि या ठिकाणी सुध्दा निष्ठेसाठीच मरणार, हे नक्की आहे. मी या बाकावर जनतेच्या हितासाठी बसलो आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सन्माननीय सभागृह, माननीय सभापती आणि सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. सध्या माझ्या शेजारी माननीय उप सभापती आदरणीय श्री.वसंतराव डावखरेजी बसलेले आहेत. विरोधी पक्ष नेते पदासाठी माझे नाव जाहीर झाल्यापासून त्यांनी माझ्या पाठीवर हात टाकला. परंतु आजच्या प्रसंगी त्यांना आपले मनोगत व्यक्त करता आले नाही. त्यांनी अभिनंदनपर भाषण केले असते तर मला

..3..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 19:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

नक्कीच आनंद झाला असता. मी या सभागृहाचे आणि आपल्या सर्वांचे पुन्हा एकदा मनापासून आभार मानतो आणि या पुढेही जनतेच्या हितासाठी, चांगल्या गोष्टीसाठी आम्ही नक्कीच सरकारचे स्वागत करु आणि सरकार जर कोठे चुकले तर या सभागृहात विविध आयुधांच्या माध्यमातून सरकारला विरोध करु. महोदय, या सभागृहाचे पावित्र्य विरोधी पक्ष नेता आणि विरोध पक्ष म्हणून आमच्याकडून नक्कीच पाळले जाईल, एवढेच या निमित्ताने सांगतो व आपली रजा घेतो.

---------



अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषदेचे नूतन विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री.धनंजय पंडितराव मुंडे साहेब यांची आपल्या सर्वांच्या साक्षीने आज मी विरोधी पक्ष नेते पदी निवड केली आहे. गेले 15 दिवस या सभागृहात दररोज किमान 15-20 मिनिटे विरोधी पक्ष नेत्यांच्या घोषणेबाबत चर्चा होत होती. लोकशाही परंपरेनुसार विधानसभा असो, विधानपरिषद असो किंवा अन्य सभागृहे असोत, लोकशाहीतील प्रत्येक राजकीय पक्षाला विरोधी पक्ष नेता होण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्याची जरूर संधी आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी काँग्रेस पक्षाने का अर्ज केला, असे म्हणून चालणार नाही. ही लोकशाही परंपरेला धरून असलेली एक साथ होती. गेल्या 12-13 दिवसांत त्यांनी त्यांच्या निवेदनात मांडलेल्या मुद्यांचा मी सविस्तर अभ्यास केला. त्याच बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सुध्दा मी पूर्णतः अभ्यास केला. काही वेळा आपण नकळत रागावल्यासारखे सुध्दा दाखविले. पण मला असे वाटते की, लोकशाहीमध्ये आपण ज्यावेळी काही परंपरा निर्माण करतो, त्यावेळी काही हक्कांसाठी सुध्दा सभागृहाचा काही क्षणापुरता वापर केला तर ते गैर आहे, असे म्हणून चालणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

गेली 10, 12, 14 दिवस इतकेच नव्हे तर आज सुध्दा मी तुमचे भाषण माझ्या दालनात बसून ऐकत होतो. मी या अनुषंगाने ही चर्चा अत्यंत खिलाडूपणे घेतली. एक दिवस माननीय मुख्यमंत्री आले असताना त्यांच्या समोरही हा प्रश्न उपस्थित झाला. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी पहिल्याच दिवशी म्हणजे 8 तारखेला याची मला आठवणही करून दिली होती. अशा पध्दतीने जवळपास 14-15 दिवसांच्या कालावधीनंतर आज मी या निर्णयाप्रत पोहचलो आहे. माझ्याकडून नकळत एक गोष्ट राहून गेली की, माननीय मुख्यमंत्र्यांशी दोन्ही सदनाचे नेते म्हणून या संदर्भात निर्णय घेण्याच्या अगोदर एक तास बोलणे गरजेचे होते. परंतु, मला काही ते शक्य झाले नाही. मी अगदी शेवटच्या टप्प्यात तो निर्णय घेतला आहे.

सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे किंवा काँग्रेस पक्षाचे कोणतेही दडपण माझ्यावर आयुष्यात कधी आलेले नाही. मला वाटते की, गेल्या 18 वर्षांतही अशा पध्दतीचे दडपण येण्याचे यत्किंचितही कारण नव्हते. लोकशाही परंपरेत काही गोष्टी ठाम पध्दतीने करायच्या असतात. मला आतापर्यंत मिळालेल्या शिकवणीने नक्की मला शिकविले आहे की, कोणतेही निर्णय अत्यंत धीरगंभीरपणे घ्या, अचूक घ्या, ते अनेक वर्षे टिकणारे घ्या. कारण असे निर्णय घेतल्यानंतर भविष्य काळात अनेक वेळा ते निर्णय बघितले जातात आणि पूर्व इतिहास म्हणून सुध्दा सांगितले जातात.

सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे साहेबांनी येथे विरोधी पक्षनेत्यांची यादी वाचली. या सभागृहात राज्य स्तरवर व राष्ट्रीय स्तरावर काम केलेल्या अनेक नेत्यांची त्यामध्ये नावे आहेत. मी पुन्हा एक वेळा त्यांचा उल्लेख न करता आपणास सांगतो की, त्या सर्व नेत्यांनी ज्या पध्दतीने या सदनात महाराष्ट्राची सेवा केली, गरीब माणूस हा केंद्रबिंदू मानून गरिबाची सेवा केली, त्याप्रमाणे आपणही करावी. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुडे साहेब, तुमच्या निवडीमध्ये सर्वात जास्त कोणाचे यश असेल तर ते ऊसतोड कामगारांचे, मजुरांचे आहे. महाराष्ट्रात वर्षाला जवळपास 6 लाख लोक वणवण फिरून किमान 7 महिने घराच्या बाहेर राहणाऱ्या लोकांचे, अत्यंत कष्टाची कामे करणाऱ्या पिढीचे लालनपालन तुमच्या चुलत्यांनी केले, तुम्हीही केले, तुमच्या वडिलांनीही केले आणि ते जे गरीब आहेत, त्यांची पुण्याई म्हणून आज या पवित्र ठिकाणी तुम्ही बसला आहात, असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

मला स्वत:ला वाटते. मुंडे साहेब, महाराष्ट्रात दुष्काळी भाग आहे, तो पश्चिम महाराष्ट्रात आहे, मराठवाड्यात आहे, मराठवाड्यातील बीडचा दुष्काळ हा सर्वांत जास्त आहे. अन्य ठिकाणीही म्हणजे विदर्भात काही ठिकाणी दुर्दैवाने हा दुष्काळाचा टप्पा वाढत आहे, असे वाटते. त्यामुळे माझी इच्छा आहे की, या सदनात काम करीत असताना तुमचा-माझा, माननीय मुख्यंत्र्यांचा खरा केंद्रबिंदू कोण असेल तर तो गरीब माणूस असला पाहिजे, जो दुर्दैवाने 7 महिने आपल्या घरापासून वंचित राहतो, मुलांच्या शिक्षणापासून वंचित राहतो, घरच्या मंडळींना मग त्या स्त्रिया असतील तरीही त्यांना सुध्दा त्याला आपल्याबरोबर शेतात घेऊन जावे लागते, त्यांनी ऊस तोडावा किंवा ऊस भरावा, अशी दुर्दैवाने आमच्या गरीब माणसाची परिस्थिती आहे. आपण ती परिस्थिती बदलविण्यास सुरूवात केली आहे. परंतु, आज आपला तो प्रयत्न तोकडा होत आहे, असे माझे मत आहे. आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर त्याची परिस्थिती बदलवू शकतो. महाराष्ट्रातील गोरगरीब, सामान्य माणसाने तुम्हाला, सर्वांना पाठबळ दिले आहे. लोकशाहीतील जबरदस्त पाठबळ त्या गरिबाने दिले आहे. आपण त्याचा खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या आणि एकंदरीत जीवनाच्या दृष्टीने अत्यंत उत्कृष्ट पध्दतीने विकास केला तरच आपला खरा सन्मान होऊ शकतो. आजचे विरोधी पक्षनेते पद त्या पुत्राला आहे की, जो दुष्काळी भागातील आहे, जो लढवय्या आहे, ज्याने दु:ख बघितले आहे, तोच आक्रमक होऊ शकतो.

मला वाटते की, माझी तुमच्याशी 7-8 वर्षांपूर्वी ओळख झाली. माझ्या आयुष्यात तुमच्या वयात कोणतेही प्रेम न मिळालेल्यापैकी मी आहे. मी तरूण वयात होतो त्यावेळी दुर्दैवाने मला अशा पध्दतीचे प्रेम कधी मिळाले नाही. त्यामुळे मी कोणीही व्यक्ती कोणत्याही पक्षातील असो, मी कधी कोणाला आयुष्यात, तू कोणत्या पक्षाचा आहेस, कोणत्या जातीचा आहेस, हे या क्षणापर्यंत गेली 60 वर्षे विचारलेले नाही. माझी इच्छा आहे की, आपले हे पवित्र सदन आहे, महाराष्ट्र विधानपरिषद आहे. सत्याकरिता, गरिबांकरिता विरोधी पक्षनेता म्हणून तुम्ही जबरदस्त संघर्ष करा, तो सुध्दा विधायक संघर्ष झाला पाहिजे. आपण येथून बाहेर पडलो की, तुम्ही-आम्ही सर्व मित्र झालो पाहिजे. विरोधी पक्षनेता म्हणून तुमच्यावर विरोधी बाकावर बसलेल्या सर्व लोकप्रतिनिधींची जबाबदारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

आहे. तुम्ही एकत्र बसणे, एकत्रित काम करणे, सरकार समोर सातत्याने प्रश्न मांडणे गरजेचे आहे. आपण असे केले तर मला वाटेल की, माझा विरोधी पक्षनेता आक्रमक आहे, माझा मुख्यमंत्री प्रभावी आहे. दोघांचाही समन्वय झाला तरच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा विकास होणार आहे. आपण त्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. महाराष्ट्र विधानपरिषदेची उज्ज्वल परंपरा वाढविण्याचा, राखण्याचा आपण सर्व मंडळी प्रयत्न करू या. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : नगर रचना योजना

**मु.शी.** : नगर रचना योजना संबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

**टाईप प्लॅनच्या आधारे 7 दिवसांत बांधकाम परवानगी**

बांधकाम परवानगीची प्रक्रिया लालफितीमुळे खूप विलंबाने होत असल्यामुळे जागतिक बँकेच्या Global Ease of doing Business मध्ये महाराष्ट्राचा 180 वा क्रमांक आहे. .... कारण त्यामध्ये मुंबई मोजली जाते. .... ही बांधकाम प्रक्रिया सुलभ होण्यासाठी राज्यातील नागरी तसेच ग्रामीण भागामध्ये लहान क्षेत्राच्या अधिकृत भूखंडामध्ये, एकूण 56 प्रमाणभूत बांधकाम आराखड्यांपैकी (Type Plan) .... म्हणजे 56 टाईप प्लॅन तयार केले आहेत. .... उचित नमुन्याची निवड करून, .... म्हणजे आपल्याला त्यातील एक टाईप प्लॅन निवडता येईल. .... त्यानुसार संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज प्राप्त झाल्यापासून 7 कामाच्या दिवसांच्या आत बांधकाम परवानगी मिळणेबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. नमुना आराखडे स्वीकारणे हे पूर्णपणे ऐच्छिक आहे. ....56 पैकी कोणताही एक टाईप प्लॅन स्वीकारला आणि त्या प्लॉटच्या आरजीप्रमाणे स्वीकारून टाकला तर 7 दिवसांत हा प्लॅन मंजूर करणे, अशा प्रकारचा निर्णय आपण घेतला आहे.

**औद्योगिक वापरासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक**

महाराष्ट्र राज्याने नुकतेच Make in Maharashtra अभियान हाती घेऊन Ease of doing Business प्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अंतर्गत No Development Zone/कृषी क्षेत्रात औद्योगिकीकरणाच्या मंजुरीसाठी राज्य शासनाकडे मुख्यमंत्र्यांपर्यंत नस्ती सादर करण्यात येत होती. या प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करून आता हे अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात आले आहेत व 0.1 ते 0.9 पर्यंत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ....

अधिमूल्य दर आकारून त्याच भूखंडावर वापरता येणे शक्य झाले आहे. या निर्णयामुळे औद्योगिक विकासासाठी वापर विभागात बदल करण्याची वेळकाढू प्रक्रिया अवलंबवावी लागणार नाही. तसेच उद्योग विकासासाठी अधिकची शेत जमीन खरेदी करण्याची आवश्यकता राहणार नाही. परिणामी, ग्रामीण भागात औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळेल.

**शैक्षणिक वापरासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक**

राज्यातील मंजूर प्रादेशिक योजनांमध्ये शेती तथा ना-विकास विभागात मर्यादित स्वरूपाच्या बांधकामासह शैक्षणिक वापर अनुज्ञेय आहे. त्यामध्ये कालानुरूप, वेळोवेळी विस्तारासाठी कराव्या लागणाऱ्या जमीन वापर फेरबदल प्रस्तावांऐवजी, .... आतापर्यंत फेरबदल करावा लागायचा, मुख्यमंत्र्यांपर्यंत ही नस्ती पाठवावी लागायची. त्यामध्ये खूप काळ जायचा. .... राज्यातील मंजूर 13 प्रादेशिक योजनांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये, शेती तथा ना विकास विभागात, शैक्षणिक वापराकरिता, अधिमूल्य आकारून, रस्ता रुंदी सापेक्ष 1.0 या कमाल मर्यादेपर्यंत, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे शैक्षणिक सुविधांचा विकास व विस्ताराचा मार्ग प्रशस्त होणार आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ प्रथम श्री.मंगेश......... 19:30

श्री.देवेंद्र फडणवीस..........

सभापती महोदय, पर्यटनासाठी महामार्गालगतच्या तारांकित हॉटेल्सना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. महामार्गालगतच्या सुविधांमध्ये तारांकित हॉटेल्स हा वापर महत्त्वाचा आहे. बऱ्याचदा असे वापर एमआयडीसी वसाहत परिसर, विमानतळे, पर्यटन स्थळांचा परिसर अथवा मोठमोठ्या हमरस्त्यांवर उपयोगाचे असतात. अशा हॉटेल्समुळे पर्यटनाला तसेच स्थानिक रोजगाराला चालना मिळते. परिणामी ग्रामीण भागातील जनतेची क्रयशक्ती वाढण्यास मदत होते. पर्यटनाला प्रोत्साहन देण्याकरिता 0.10 या चटई क्षेत्र निर्देशांकाच्या वर, रस्तारुंदीसापेक्ष, 1.0 या कमाल मर्यादेपर्यंत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक, अधिमूल्य आकारुन अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे व्यवसाय व पर्यटनासाठी आवश्यक आतिथ्यविषयक सुविधांच्या विस्तारास चालना मिळेल.

सभापती महोदय, महामार्गालगत यात्री सुविधा निर्माण करण्याकरिता विकास नियंत्रण निमावलीत सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महामार्गालगत ठिकठिकाणी पेट्रोलपंपसह कामगार, वाहनचालकांसाठी विश्राम कक्ष, उपहारगृह, हायवे मॉल, औषधी दुकान, बँक एटीएम, पोलीस चौकी, हायवे ॲम्ब्यूलन्स पार्किंग, ट्रॉमा सेंटर, वे-ब्रीज इत्यादी सुविधा एकत्रितरित्या एकाच छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात, या दृष्टीकोनातून अशा यात्री सुविधा उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी शेती व ना विकास विभागामध्ये अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, पोलीस, सफाई कर्मचारी व सार्वजनिक प्राधिकरणांच्या कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. पोलीस, सफाई कर्मचारी व सार्वजनिक प्राधिकरणांच्या कर्मचाऱ्यांच्या निवासाबाबतचा प्रश्न ऐरणीवर आला असून ते व त्यांचे कुटुंबीय कठीण परिस्थितीत जीवन जगत असतात. त्यांच्या मूलभूत प्रश्नांपैकी शासकीय निवासस्थानाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने खाजगी अथवा शासकीय जागांवर 3.00 व 18.00 मी.रुंद रस्त्यावर 4.0 पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक देऊन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे पोलीस, सफाई कर्मचारी व सार्वजनिक प्राधिकरणांच्या कर्मचाऱ्यांसाठी मुबलक प्रमाणात शासकीय निवासस्थाने (Staff Quarters) उपलब्ध होणार आहेत.

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस..........

सभापती महोदय, नगर रचना योजनेच्या माध्यमातून विकास आराखड्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील शहरांसाठीच्या विकास आराखड्याची निधीअभावी अंमलबजावणी करण्याची बाब अत्यंत जिकिरीची झाली असून सर्वसाधारणपणे विकास आराखड्यांची अंमलबजावणी केवळ 13 ते 25 टक्क्यांपर्यंतच होत आहे. अशा आराखड्यांमधील रस्ते, आरक्षणे याखालील जमीन संपादनासाठी फार मोठ्या आर्थिक निधीची गरज आहे. यावर पर्याय म्हणून सन 2011 मध्ये नगर रचना योजनेमध्ये सुधारणा करण्यात आल्या असून सदर विधेयकास राष्ट्रपती महोदयांची मंजुरी आवश्यक असल्याने विधेयक त्यांचे मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते. सदर विधेयकास राष्ट्रपती महोदयांची मंजुरी प्राप्त झाली असून यास पर्याय म्हणून "नगर रचना योजना" मधील सुधारणांमुळे या प्रभावी माध्यमातून अंमलबजावणी करता येणे शक्य झाले आहे. सभापती महोदय, याव्दारे आता आपण अशी तरतूद करणार आहोत की, आरक्षणांखालील जमीन देण्याचा बोजा हा ज्याच्या जमिनीवर आपण आरक्षण दाखविले त्याच्यावर होता. त्यामुळे आरक्षणाखालील जमीन देण्याचा बोजा एका मालकाऐवजी सामूहिकरित्या व वेगवेगळ्या जागा मालकांच्या क्षेत्राच्या प्रमाणात विभागला जाणार आहे. त्यामुळे एकावर बोजा न येता वेगवेगळ्या लोकांवर जाणार आहे. तसेच, आरक्षणांखालील सर्व जमिनी नियोजन प्राधिकरणांना उपलब्ध होणार आहेत. त्याचप्रमाणे या योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व व्यक्तींना त्यांच्या मूळ क्षेत्रापेक्षा काही प्रमाणात कमी क्षेत्र विकसित स्वरुपातील उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरी सुविधांसाठी विना मोबदला व तातडीने जमिनी उपलब्ध होतील. सदर अधिनियम अंमलात आणण्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येत असून त्यांचा अंमल लगेचच सुरु होईल.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

--------------

...3.....

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 23 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 या वेळेत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 35 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 23 डिसेंबर, 2014 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही